॥ श्री ॥

॥ श्री रामचरितमानस ॥

[मराठी]

लेखकः—प. प. प्रज्ञानानंद सरस्वती

शाके

मूल्य
१ रुपये
१

— प्रकाशक —

शेठ लालचंद हिंमतमल कटारे
मु. चास (कमान) जि. पुणे.

— मुद्रण —
बालकांड
नवयुग प्रिंटिंग प्रेस, पृ. १ ते ६४
शिवाजी प्रिंटिंग प्रेस, पृ. ६५ ते १७७

— मुद्रक —
अ. दे. इनामदार,
श्रीशारदा मुद्रणालय,
४१६ नारायण पेठ, पुणे.
(बालकांड व्यतिरिक्त सर्वभाग)

श्री रामायणगुरु श्री बाबा गंगादास महाराज



गोस्वामी तुलसीदास महाराजांचे सांप्रदायिक भक्त

* समर्पण पत्रिका *

अणुवज्र[1] ज्याचा बोध कामक्रोध नगरां जाळितो
नभयानंवेधी[2] तोफ शब्दहि विघ्न पळवुनि पाळितो ।
निरुपम जयाचा, प्रेम पान्हा, बाबु[3] तान्ह्यावरि महा
निःस्पृह सदा निर्भय निरालस, मित्र निर्हेतुक अहा ! ॥ १ ॥

शुभ संग ज्याचा, विषयसंगा खंगवी; रंगा रवि ।
मन-तुरग-तंगा कसुनि, ढंगां निरासि; **मानसि** रंगवी ।
ज्याचा कृपाशीर्वाद **चरितांमृत**[4] रहस्या दाखवी ।
करि रामगुण-- मुक्ताफळाशन, हंसिनी रसनें कवि ॥ २ ॥

त्रयताप--शरदातप--सुधाकर, अमल अक्षय पूर्ण जो ।
मन-मंदिरीं मम, बोधदीपा नित्य--विद्युत्-- बल्ब जो ॥
जो भक्तिगंगा, दास मानसिं आणि; **गंगादास**[5] तो ।
प्रज्ञा[6] तया **अनुवाद तुलसी** हार **मानस** अर्पितो ॥ ३ ॥

---

१ अणुबाँब. २ विमान--वेधि. ३ बाबा गंगादास 'बाबू' या नांवानें लेखकास संबोधीत असत. ४ रामचरितमानस. ५ ज्यांचा हा फोटो आहे ते संत "बाबा गंगादास" ६ प्रज्ञानानंद.

॥ ॐ ॥

श्री १००८ श्री अवधूतस्वामी वासुदेवानन्द सरस्वती-
महाराज यांचा अभिप्राय.

धन्योऽसि कृतकृत्योऽसि पावितं स्वकुलं त्वया ।
अन्तःसन्तोषमापन्नाः श्रुत्वा रामायणं वयम् ॥ १ ॥

साकीः—तुलसिदास-कृत-काव्य-कुसुम-गत-मधुपः प्रज्ञानोऽयम् ।
रामचरितमधु, निजभाषायामर्पितवानस्मभ्यः ॥ २ ॥

श्लोः—इदं रामायणं काव्यं जनांना सौख्यदायकंम् ।
प्रीतिपात्रं, भवेल्लोके शाश्वतं, कीर्तिवर्धनम् ॥ ३ ॥

भुक्तिं भक्तिं च कैवल्यं ज्ञानं वैराग्यमेवच ।
सेवनादचिरान्नित्यं, दास्यत्येष वरो मम ॥ ४ ॥

श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती

स्वाक्षरी—श्रीमद्वासुदेवानन्द सरस्वती महाराज

श्रीमत् सद्गुरु वासुदेवानन्द सरस्वती अवधूत स्वामी

जन्म—श्रावण शु॥ १ शाके १८०६ ★ **समाधि**—पौष शु॥ २ शाके १८७०
(परशुराम) (आळें)



शिष्य—**प. प. प्रज्ञानानन्द सरस्वती**

जन्म—वैशाख व॥ ३० शाके १८१५ (माहीम) ग्रंथकर्ते.

प्रकाशकाचे हृद्गत

रामायण हे भारतीय महासागरांतील एक मूल्यवान रत्न आहे. या रत्नाला भारतांतील सर्वभाषाच्या सुवर्णाचें कोंदण चढविले गेलेले असले तरी गोस्वामी तुळशीदासाचे हिंदीभाषेतील "रामचरितमानस" हे सर्व भाषा रामायणांत मूर्धन्यस्थानीच गणले गेलेले आहे. सोन्याचा कांहीं गुण, सोनाराचा कांहीं गुण असतो व उभयविध गुणांनी अलंकाराला जशी सोन्यापेक्षांहि अधिकच शोभा येते. तशीच पूज्य गोस्वामी तुळशीदासाचा सर्वांगीण अधिकार, रामयणासारखा विषय, तो विषय श्रोत्यांना विशद करून सांगण्यासाठीं त्यांनीं घेतलेले गानसुलभ चौपाई व दोहा हे वृत्त, या तीन गोष्टीचा संगम म्हणजेच "रामचरित मानस" आहे. आणि म्हणूनच ते रामचरित्राप्रमाणें शतकोटी विस्तृत झाले आहे. अशा ग्रंथाचा मराठी भाषिकांना अन्यूनानतिरिक्त शब्दांत व त्याच छंदात परिचय होणे अत्यंत आवश्य होते. पण ही उणीव कोणत्या मराठी व हिंदी उभयभाषिक अधिकारी व्यक्तीकडून भरून निघाली नव्हती मर्यादा पुरुषोत्तम रामचंद्र हे प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार होते. महर्षी वाल्मिकी हे सरस्वतीप्रसाद प्रतिभांशाली तपोधन होते. व त्यांचाच कलियुगीन आत्मा म्हणजे गोस्वामी तुळशीदास हे होतें. तेव्हां त्यांना रामायणाची जुळणी करणें शक्य झाले. पण गोस्वामीच्या ह्या वाङ्मय गङ्गेला महाराष्ट्रांत आणणारा भगीरथ कोण निघेल, त्यासाठीं लागणारी उग्र तपश्चर्या कोण करील, यांची उत्कंठा माझ्या प्रमाणेंच सर्व महाराष्ट्र भाषा भाषिकांना लागल्यावाचून राहिली नसेल पण परमेश्वरी संकेत कांहीं निराळा असतो. परमेश्वराला मनुष्याप्रमाणे संचित बसावे लागत नाहीं. सर्व गोष्टी संकल्पमात्रानीं घडून आणता येतात त्याला अनुसरूच त्यांनीच हे कार्य घडवून आणले असावे असे वाटते, कारण प्रस्तुत ग्रंथाचे लेखन अवघे तीन महि-

न्यांतच पूर्ण झाले. ग्रंथाची रचना करण्यासाठीं प. प. प्रज्ञानानंदस्वामी महाराजांसारख्या अधिकारी पुरुषाची योजना झाली. हे दोन योग घडून आल्यावर माझ्यासारख्या प्रकाशकाचा तेथें संबंध असाच दैवी संकेतानेच घडून आला असावा असें वाटते. कारण पांच वर्षापूर्वी घोर नास्तिक्यानें वेढलेल्या माझ्यासारख्या एखाद्या पामराची व आमच्या स्वामीमहाराजांची ओळख झाली तेव्हां प्रस्तुत ग्रंथाच्या रचनेचा इतिहास ऐकून माझे नास्तिक्य विरून गेले आणि हा ग्रंथ प्रकाशनासाठीं हाती घ्यावा अशी बुद्धी उत्पन्न झाली. अर्थातच या संकल्पानें जन्मतः मी जैन धर्मीय असूनही या कार्याचा ओढा अधिक अधिक वाटुं लागला आणि त्यामुळें आर्थिक दृष्ट्या एवढ्या खर्चाचे कार्य हाती घेण्याची पात्रता नसतानांही हे कार्य हाती घेतले व परमेश्वर कृपेनें प्रदीर्घ काळाने कां होईना ते पूर्ण झाले ही समाधानाची गोष्ट आहे. या संबंधांत घडलेल्या सर्व घटनांचे समालोचन केले असता हा ग्रंथ वाचकाच्या हातीं देत असतांना मला किती आनंद होत असेल हे शब्दानें प्रगट करणे शक्य नाहीं.

कोणताही ग्रंथ म्हटला कीं, ग्रंथकाराबद्दल जिज्ञासा सहजच उत्पन्न होते व त्याची माहिती करून घ्यावी अशी आकांक्षा ही उत्थापित होते. आणि ही आकांक्षा पुरविण्याचे उत्तरदायित्व प्रकाशकावरच असते. हा सामान्य सिद्धांत मला माहीत आहे परंतु त्या बाबतीत वाचकांची थोडीशी निराशा होण्याचा संभव आहे. कारण प्रस्तुत ग्रंथाच्या जनकांनी आपले चरित्र ग्रंथात देऊ नये असें सांगितल्यामुळें मला खरोखरच वाचकांची त्याबद्दल क्षमाच मागावी लागणार आहे.तरी पण माझे हे वाचकांचे क्षमापात्र मी थोडेसे लाहन करीत आहें व त्याचाच थोडासा? स्वामीमहाराजाकडे देऊन माझ्या कर्तव्यबुद्धीची जागृती वाचकांच्या लक्षांत यावी म्हणून स्वामीमहाराजांची क्षमा मागून त्यांच्या आज्ञेचे अंशतः पालन करून थोडासा बालहट्टानुसार त्यांचेबद्दल चार ओळी लिहित आहे. त्यामुळें वाचकांची निराशा अंशतः कमी होईल असें वाटते.

प्रस्तुत ग्रंथाचे लेखक पूजनीय प. प. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी महाराज हे पूर्वाश्रमी दत्तात्रेय नारायण कर्वे या नावानें ओळखले जात होते. त्यांचा जन्म मिती वैशाख वद्य ३०।१८१५ (दि. १५ मे १८९३) ला महीम (ता. पालकर जि. ठाणे) येथे झाला इ.स.१९१८ ते मुम्बई विश्वविद्यालयाची बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले त्यानंतर त्यांनी कांहीं दिवस खाजगी हायस्कुलांत अध्यापनाचे कार्य केले. अध्यापनाचे कार्य करीत असतांना त्याचा ओढा पारमार्थिक गोष्टी कडेच अधिक होता याचवेळी गोस्वामी तुळशीदासांचे सांप्रदायिक श्री. बाबा गंगादास यांची व ग्रंथ लेखकांची भेट झाली व त्यांच्या संगतीचा लाभ त्यांना पांच सात वर्षें सतत मिळाला त्याबद्दलची थोडक्यांत माहिती ग्रंथाच्या शेवटी दिलेल्या आरतीत आलेली आहे. त्यावरून त्याचे बद्दलचा थोडासा बोध वाचकांस होईलच त्यांच्याच प्रेरणेवरून प्रस्तुत ग्रंथलेखकाला तुळशीरामायणाच्या अभ्यासाची गोडी उत्पन्न झाली व त्यासाठी त्यांनी तुळसीकृत रामायणाची अनेक पारायणे केली कारण श्री. बाबा गंगादास यांचे, याबद्दल असे म्हणणे असे कीं, रामचरितमानसाची (तुळशीरामायण) अनेक पारायणे झाली तर पारायणे करणाऱ्या व्यक्तीची इतकी योग्यता वाढते कीं प्रत्यक्ष गोस्वामीजी त्यांचे मुखाने बोलतात आणि त्यामुळेंच प्रस्तुत ग्रंथ लेखकालाहि अध्यापन कार्य करीत असताना त्या पेक्षाहि कांहीं मोठ्या कार्याची प्रेरणा झाली असावी व त्याला अनुसरूनच त्यांनी पौष शु॥ १२।१८६४ (दि. १८ जानेवारी १९४३) ला खेड मुक्कामीं सर्वसंग परित्याग करून चतुर्थाश्रम घेतला व या कार्यास प्रारंभ केला. स्वामींची काव्यशक्ती अतिशय शीघ्र असल्यामुळें त्यानी रामायणाप्रमाणेच विविध विषयांवर काव्यरचना केली आहे ती क्रमशः वाचकाच्या हाती येईलच पण त्यांतील पाहिले पुष्प म्हणून हे वाचकांच्या हाती आम्ही देत आहोत.

आमचे अपेक्षेप्रमाणे हा ग्रंथ जर छापून झाला असता तर यावेळेपर्यन्त त्यांच्या एक दोन आवृत्त्याही निघाल्या असत्या पण तसा ईश्वरी संकेत नसल्यामुळेच ते घडले नाहीं. प्रथम हा ग्रंथ छापण्याचे कार्य मुम्बईस सुरू केलें होतें पण तीन वर्षांत फक्त तेथे बालकांडच छापून मिळाले. इतक्या मंदगतीनें हे कार्य चालणे योग्य नाहीं. असे वाटल्यावरून

ण्यांतच पूर्ण झाले. ग्रंथाची रचना करण्यासाठीं प. प. प्रज्ञानानंदस्वामी महाराजासारख्या अधिकारी पुरुषाची योजना झाली. हे दोन योग घडून आल्यावर माझ्यासारख्या प्रकाशकाचा तेथें संबंध असाच दैवी संकेतानेच घडून आला असावा असें वाटते. कारण पांच वर्षापूर्वी घोर नास्तिक्यानें वेढलेल्या माझ्यासारख्या एखाद्या पामराची व आमच्या स्वामीमहाराजांची ओळख झाली तेव्हां प्रस्तुत ग्रंथाच्या रचनेचा इतिहास ऐकून माझे नास्तिक्य विरून गेले आणि हा ग्रंथ प्रकाशनासाठीं हाती घ्यावा अशी बुद्धी उत्पन्न झाली. अर्थातच या संकल्पानें जन्मत: मी जैन धर्मीय असूनही या कार्याचा ओढा अधिक अधिक वाटूं लागला आणि त्यामुळें आर्थिक दृष्ट्या एवढ्या खर्चाचे कार्य हाती घेण्याची पात्रता नसतानांही हे कार्य हाती घेतले व परमेश्वर कृपेनें प्रदीर्घ काळाने कां होईना ते पूर्ण झाले ही समाधानाची गोष्ट आहे. या संबंधांत घडलेल्या सर्व घटनांचे समालोचन केले असता हा ग्रंथ वाचकाच्या हातीं देत असतांना मला किती आनंद होत असेल हे शब्दाने प्रगट करणे शक्य नाही.

कोणताही ग्रंथ म्हटला कीं, ग्रंथकाराबद्दल जिज्ञासा सहजच उत्पन्न होते व त्याची माहिती करून घ्यावी अशी आकांक्षा ही उत्थापित होते. आणि ही आकांक्षा पुरविण्याचे उत्तरदायित्व प्रकाशकावरच असते. हा सामान्य सिद्धांत मला माहीत आहे परंतु त्या बाबतीत वाचकांची थोडीशी निराशा होण्याचा संभव आहे. कारण प्रस्तुत ग्रंथाच्या जनकांनी आपले चरित्र ग्रंथात देऊ नये असे सांगितल्यामुळें मला खरोखरच वाचकांची त्याबद्दल क्षमाच मागावी लागणार आहे.तरी पण माझे हे वाचकांचे क्षमापात्र मी थोडेसे लाहन करीत आहे व त्याचाच थोडासा? स्वामीमहाराजाकडे देऊन माझ्या कर्तव्यबुद्धीची जागृती वाचकांच्या लक्षांत यावी म्हणून स्वामीमहाराजांची क्षमा मागून त्यांच्या आज्ञेचे अंशत: पालन करून थोडासा बालहट्टानुसार त्यांचेबद्दल चार ओळी लिहित आहे. त्यामुळें वाचकांची निराशा अंशत: कमी होईल असें वाटते.

प्रस्तुत ग्रंथाचे लेखक पूजनीय प. प. प्रज्ञानंद सरस्वती स्वामी महाराज हे पूर्वाश्रमी दत्तात्रेय नारायण कर्वे या नावानें ओळखले जात होते. त्यांचा जन्म मिती वैशाख वद्य ३०।१८१५ (दि. १५ मे १८९३) ला महीम (ता. पालकर जि. ठाणे) येथे झाला इ.स.१९१८ ते मुम्बई विश्व-विद्यालयाची बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले त्यानंतर त्यांनी कांहीं दिवस खाजगी हायस्कुलांत अध्यापनाचे कार्य केले. अध्यापनाचे कार्य करीत असतांना त्याचा ओढा पारमार्थिक गोष्टी कडेच अधिक होता याचवेळी गोस्वामी तुळशीदासांचे सांप्रदायिक श्री. बाबा गंगादास यांची व ग्रंथ लेखकांची भेट झाली व त्यांच्या संगतीचा लाभ त्यांना पांच सात वर्षे सतत मिळाला त्याबद्दलची थोडक्यांत माहिती ग्रंथाच्या शेवटी दिलेल्या आरतीत आलेली आहे. त्यावरून त्याचे बद्दलचा थोडासा बोध वाचकांस होईलच त्यांच्याच प्रेरणेवरून प्रस्तुत ग्रंथलेखकाला तुळशीरामायणाच्या अभ्यासाची गोडी उत्पन्न झाली व त्यासाठी त्यांनी तुळसीकृत रामायणाची अनेक पारायणे केली कारण श्री. बाबा गंगादास यांचे, याबद्दल असे म्हणणे असे कीं, रामचरित-मानसाची (तुळशीरामायण) अनेक पारायणे झाली तर पारायणे करणाऱ्या व्यक्तीची इतकी योग्यता वाढते कीं प्रत्यक्ष गोस्वामीजी त्यांचे मुखाने बोलतात आणि त्यामुळेंच प्रस्तुत ग्रंथ लेखकालाहि अध्यापन कार्य करीत असताना त्या पेक्षाहि कांहीं मोठ्या कार्याची प्रेरणा झाली असावी व त्याला अनुस-रूनच त्यांनी पौष शु।। १२।१८६४ (दि. १८ जानेवारी १९४३) ला खेड मुक्कामीं सर्वसंग परित्याग करून चतुर्थाश्रम घेतला व या कार्यास प्रारंभ केला. स्वामींची काव्यशक्ती अतिशय शीघ्र असल्यामुळें त्यानी रामायणा-प्रमाणेच विविध विषांयावर काव्यरचना केली आहे ती क्रमशः वाचकाच्या हाती येईलच पण त्यांतील पाहिले पुष्प म्हणून हे वाचकांच्या हाती आम्ही देत आहोत.

आमचे अपेक्षेप्रमाणे हा ग्रंथ जर छापून झाला असता तर यावेळे-पर्यन्त त्यांच्या एक दोन आवृत्त्याही निघाल्या असत्या पण तसा ईश्वरी संकेत नसल्यामुळेच ते घडले नाहीं. प्रथम हा ग्रंथ छापण्याचे कार्य मुम्ब-ईस सुरू केलें होतें पण तीस वर्षांत फक्त तेथे बालकांडच छापून मिळाले. इतक्या मंदगतीनें हे कार्य चालणे योग्य नाहीं. असे वाटल्यावरून

पुढील भाग श्री शारदा मुद्रणालयांत छापून घेण्याचे ठरविले व तेथे एक वर्षाचे आंतच हा सर्व ग्रंथ छापून आमचे हाती आला. ग्रंथ छापताना शेवटचे फार्म लेखकाच्या नरजे खालून जाणे अवश्य असते, पण इतक्या प्रदीर्घ कालपर्यन्त स्वामीमहाराजाना मुम्बई पुण्यासारख्या शहरांत राहणें शक्य नसल्यामुळें मुद्रणदृष्ट्या ग्रंथात कांहीं दोष राहिले आहेत. श्रीरामचरित्रमानसाची मराठी आवृत्ती हातांत आलेली पाहून वाचकाला जो हर्ष होईल त्यांत मुद्रण दोषाची क्षमा करण्यास वाचक विसरणार नाहींत असें मला वाटते ग्रंथाची दुसरी आवृत्ती काढण्याचा प्रसंग लवकरच येईल त्यावेळी मात्र मुद्रण दोष न ठेवता वाचकाच्या हातांत आम्ही नवी आवृत्ती देऊ असें आजच आश्वासन देत आहे.

हा ग्रंथ वाचनाला घेण्यापूर्वी शुद्धीपत्राप्रमाणें काव्य शुद्ध करून घेऊन वाचकांनी ते वाचावे अशी विनन्ती आहे कारण हा ग्रंथ प्रासादिक असून मुळ रामचरित-मानसाप्रमाणेच याचीही पारायणे निश्चित फलदायी होतील त्या दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथात मासपारायणाचे विश्राम वगैरे दिले आहेत. इच्छित फलप्राप्तीसाठी केली जाणारी पारायणें अशुद्ध ग्रंथावरून होता कामा नयेत असा स्वामी महाराजांचा आदेश आहे. कारण या ग्रंथाना मंत्ररूपता असते अशुद्ध मंत्राचा पाठ हा मंत्र शास्त्रदृष्ट्या योग्य होत नसतो हे वाचकांनी ध्यानांत घ्यावयास पाहिजे ग्रंथातील, दोहा चौपाई इत्यादि वृत्ते ही मराठी भाषिकांना फारशीं परिचित नसल्यामुळे अशुद्ध स्थितीतील काव्य वाचण्यास व विशेषतः गान पद्धतीनें म्हणण्यास कठीण जाईल ह्या अडचणी लक्षांत घेऊन वाचकांनी शुद्धी पत्रकांचा उपयोग करावा म्हणजे चिताकर्षता व माधुरीभंग होणार नाहीं असे वाटत असल्याने ही विनन्ती मी वाचकास करीत आहे.

शेवटी हे कार्य पूर्ण करण्यासाठी ज्या दयाघन परमेश्वरानें मला शक्ती दिली त्याला वंदन करून हे कार्य पूर्ण करण्यासाठी ज्या सर्व लोकांनी मला सहाय्य केले त्या सर्वांचे आभार मानून हे प्रास्ताविक शब्द मी पूर्ण करीत आहे.

आपला,

लालचंद हिंमतमल कटारे

लेखकाचें हृद्गत

चौ०— सांगतसे मज तो रघुराणा । मम आज्ञा ऐके प्रज्ञाना ।
सत्वर करण्या घे तूं हातीं । रामचरित-मानस रचना ती
बुद्धिहीन, जरि रत तव नामीं, । करूं कसें सांगा जी स्वामी ! ।
कुठें सुकवि-कृति मेरु विशाला । वल्मीकोच्चहि बुद्धि न याला ! ॥ २ ॥
राम म्हणे " कां भितोस बाळा ! । सत्य सांगतों मी वचनाला ।
वक्ता मी, तूं निमित्त होई, । मम भक्तांना सौख्या देई ॥ ३ ॥
काय गाबा पंडित होता । भावार्थाची करी पूर्णता " ।
प्रेमें शिरसा वंदुनि नाथा । सद्गुरुचरणीं ठेवुनि माथा—॥ ४ ॥
बाबा **गंगादास** वंदिला । गोस्वामींना प्रणाम केला ।
समर्थ सज्जन सखा हि नमिला । अनुवादा आरंभ चि झाला ॥ ५ ॥
दो०— रामभक्ति ज्यां प्रिय तथा, स्वसुखालागिं विशेष
तुलसी-कृतिला चढवुं हा, निजभाषेचा वेष ॥ ६ ॥
क्रिया मात्र जगदीश करितसे । प्रज्ञानाचें काव्य चि कैसें ।
तुळसीदासानुग्रह झाला । गंगादासें दिलें वराला ॥ ७ ॥
प्रेरी रघुवर वाग् हस्तांनां । यंत्रापरि लिहितों शब्दानां ।
गुणदोषां स्वामी प्रभु झाला । स्तुति वा निंदा पात्र त्याला ॥ ८ ॥
लेखन करितां श्रम जो झाला । परमानंद श्रेय पावला ।
कुसुमहार माळ्यानें ग्रथिला । सुगंध सहज चि मिळे तयाला ॥ ९ ॥
तुलसिदास—वच कुसुमें झालीं । गंगादासें करीं अर्पिलीं ।
निजभाषा—तंतूमधिं भरलीं । माळ तयांची सुरम्य रचिली ॥ १० ॥
दो०— रामकथाप्रिय मनुज जे; वासुदेव ते जाण ।
कंठिं हार त्यां अर्पितो; सद्भावें प्रज्ञान ॥ ११ ॥

---

१ श्री नाथ महाराजांचा शिष्य २ भावार्थ रामायण ३ रामायण गुरु

आर्याः— बाबा गंगादासा तुलसीदासा पुनश्च नमनाते—
गंगादास-तनैय करि, पुत्रासम तुलसिशीं असे नातें ॥ १२ ॥
श्री रामचरित मानस पुत्रासी तुलसिनें मला दिधलें ।
" याते जतन करी तूं प्राणासम मम सदा" मला वदले ॥ १३ ॥
तुलसी—कविता—दुहिता प्रभु--प्रतापार्क पतिंस वरोनी ।
या देशिं महाराष्ट्रीं बसली बंधू--गृहांत येवोनी ॥ १४ ॥
गंगादासाज्ञेपरि त्यांची केली यथामती सेवा ।
भगिनी प्रसन्न होउनि, निज हृद्गत मज तिनें दिला मेवा ॥ १५ ॥
सीतारामाचि मानुनि पूजा दासे परोपरी केली ।
वस्त्रादिक निजमतिनें प्रेमानें उचितशीं तयां दिधली ॥ १६ ॥
केला होता त्यानीं आजवरीं कीं स्वकीय तो वेष ।
भाषा तद्देशींची बुरखा निज टाकिलाच सविशेष ॥ १७ ॥
भाषा—भेदाने त्या रूपा त्यांच्या खरेंचि लपवीलें ।
अस्मद्भाषीयांचे चित्ता चिरकाळ चोख चकवीलें ॥ १८ ॥
तुलसी--कन्या धन्या मान्या तैशीच ती असे युवती ।
रूपान्तर नच झाले स्वालंकारादिकां त्यजी ना ती ॥ १९ ॥
देश जसा वेष तसा, करुनी आतां जनांत शोभेल ।
पद—लालित्यें रूपे रस-सौन्दर्यें स्वकीय, मिरवेल ॥ २० ॥
भगिनी-सौन्दर्यातें रूपाते पालटील जो बंधु ।
सुधन हरील तिचे जो सज्जन-वृंदांत होय तो निंद्य ॥ २१ ॥
जो निज कौशल्याने घालुनि तिज अधिकही अलंकार ।
सौंदर्या खुलवी जगिं बंधू त्याचाच जगतिं जयकार ॥ २२ ॥
जैसीं प्रभा प्रभाकर भिन्न नसुनि भिन्नशीं नभीं दिसती ।
तुलसी-दुहिता ' मानस, सविता राम-प्रताप, एकचि तीं ॥ २३ ॥
हृदयांबरिं तो पडतां प्रकाश पावन हरी पुराणतमा ।

---

४ शिष्य

श्रम हरुनी जनिमृतिचे, देतो सौख्यासि ज्या नसे उपमा ॥ २४ ॥
हिंदी आंग्ल मराठी गुर्जर गीर्वाण काव्य बहुसाल ।
अवलोकिलिं सन्मतिनें परि तुळसीच्या न एक तोलाल ॥ २५ ॥
त्यातें काव्य कसें म्हणुं ! सिद्ध परम मंत्रपूर्ण ती शक्ति ।
आदर्शनीति--शिक्षक रक्षुनि भक्ति प्रदान करि मुक्ति ॥ २६ ॥
भक्तिज्ञानरसाचें कासारचि भव्य दिव्य ही गमते ।
शांत-शृंगारादिक उपमा रूपक बहु स्वलंकृत ते ॥ २७ ॥
अति रम्य दिव्य निर्मळ संगीताचि ही रसाळ गाईल ।
विविधा व्यवसायांनां सांडुनि मन-मृग निमग्न होईल ॥ २८ ॥
मन-मृग मग रामगुणीं रमुनी रामा-रमादि रागातें--।
त्यागा करि, निजसुख वरि, दिनरजनीं मग रमावरा गातें ॥ २९ ॥
मातें हातें धरुनी सागर-पर- तीरिं तारिलें त्यातें ।
प्रज्ञानानन्द नमी, मीन जला तेवि, **वासुदेवातें** ॥ ३० ॥

—ॐ तत्सत्—

अनुक्रमणिका

अयोध्याकाण्ड

अरण्य काण्ड

किष्किंधा कांड

सुंदरकांड

लंकाकांड

उत्तर कांड

शुद्धि-पत्र

प्रास्ताविक विभाग

४	८	१६।१९	१५।१६
५	७	अर्थमनर्थ	अर्धमनर्थ
९	१९	साकरचा	सांकाचा
१०	१६	प्रज्ञानद	प्रज्ञानानंद
१३	९	भक्तिरसाई	भक्तिरसार्द्र
१८	१२	७००	७०००
२१	१६	पुढील	मागील
२६	१९	धारणशक्ति	धारणाशक्ति
२७	१०	असान्य	असामान्य
३२	१०	२१६	११६
,,	२४	घिसें	घिसे
३३	२६	वंदावन	वृंदावन
३४	२४	राग	पद
३५	३	कहाँकहाँ	कहौ कहाँ
,,	६	राग	पद
३७	२९	मनला	मनाला
४०	२३	भध्द--रक्षक	भक्तरक्षक
४२	३	ह्यास्मिन्—तरु	ह्यस्मिन्--तरुः
४३	१३	सगजलात	समजताच
,,	१४	परम	पर
४४	१४	झालेली	आलेली
५४	९	एकदा	एकादा
४८	९	१७६०	१६७०
,,	१२	८	२९
,,	१५	राम-धन	राम-धना

५०	२३	विश्वास नाहीं--आहे	विश्वास आहे--नाहीं
५१	२	तोंडनें	तोडणें

बालकाण्ड

२	४	कर्तारं	कर्तारौ
४	२३	वद् बेलन्चि	वद्वेलन्चि
९	१८	वेधुनी	वेधुनि
१०	८	धरूनि	धरुनि
११	३३	२ सूर्य	२ नाव
१५	८	ह्रद	ह्रद
,,	३२	अपर	अपार
१७	१०	समर्थ हनुमान	हनुमान समर्थ
२८	५	विचारीत	विचारित
२९	१	पुत्रा	नृप पुत्रा
,,	४	होई	होइ
३१	१३	आपणांपरि	अपणांपरि
३६	३	त्रिकालज्ञा	त्रिकालज्ञ
३७	१	वरा विषयीं	वरा विषयिं
,,	२५	स्वरूपा	सुरूपा
३८	२२	परिसुंनी	परिसुनि
४८	३०	बुझविति	बुझाविति
५५	२४	माह्मिा	माहिमा
५७	१	रज्यु	रज्जु
७०	२६	नौमिष	नैमिष
७३	टीप	४ सूप	४ रूप
७७	७	बधुनि	बधुनी
७९	४	भिकारी	भिकारि
८०	१९	प्रतीति	प्रतीती
८१	२२	वाजुनीही	वाचुनिही

८३	४	येईन	येइन
९४	२४	विचारी	विचांरी
१०६	१०	मज	गज
११६	३	पट्पीत	पटपीत
११९	१०	वाटती	वाटति
१२१	२	एका	ऐका
,,	६	आम्हां	अम्हां
१२४	२०	हाय	हात
१२५	२१	हारले	हरले
१२६	२	सर्व	खर्व
,,	६	श्रुण	श्रुणु
१२९	२१	दो	सो
,,	,,	बघुनी	बघुनि
१३०	१७	पिनाक	पिनाका
,,	२५	कांक्षी	कांक्षि
१३१	११	शीरीं	शिरीं
,,	१२	भू	भ्रू
१३४	९	तुम्हीं	तुम्हि
,,	१३	बोलती	बोलति
,,	२२	द्रोहि	द्रोही
,,	२७	हसुनि	हसुनी
१३५	१६	जाणुनि	जाणुनी
,,	२४	होऊनि	होउनी
१३६	१७	परिसूनी	परिसूनि
१३७	८	शशील	शशीला
१४४	२५	युवकहि	युवकही
१६३	११	वाल्मीकादिक	वाल्मीकादीक
,,	१२	मुनीवर	मुनिवर
,,	१२	कौशिकादी	कौशिकादि

१६४	२६	नारी	नारि
१६८	२३	भेद्वनि	भेद्वनी
,,	३०	तवुनी	स्तवुनी
१७४	१२	किं	कीं

अयोध्या काण्ड

७	२	देऊं	देउं
९	९	उत्पाषाणि	उर पाषाणिं
११	५	तुझे	तूझे
११	१०	फंद	फंद
१४	२५	कष्टि	कंठि
१७	८	टाकुनि	टाकुनी
,,	१२	गुरू	गुरु
१९	१	सांडुनि	साडुनी
१७	७	जायराहि	राहि
"	१२	जर	जरठ
२०	२१	जाणा	जाण
२१	३	प्रमोदन	प्रमोद न
,,	७	अतुर	आतुर
,,	२१	श्रमुनि	श्रवुनि
,,	२३	धरूनि	धरुनि
२२	१०	जाइअधिक	जाइ न अधिक
,,	१५	घरिशी	घरिशि
,,	१९	जाऊं	जाउं
,,	२५	विपुलनि	विलपुनि
,,	२८	परिसुनि	परिसुनि
,,	२९	गेली	गेलि
,,	३१	रूपराशी	रूपराशिं
२४	१६	स्मभाव	स्वभाव
,,	२०	कूशकंटक	कुशकंटक

,,	२१	मंजतर	मंजुतर
,,	२३	वागवृककरीत	वाघ वृक करी ते
२५	१४	निशासेवी	निशांसे
२७	३	वदन	वदुनि
२८	१६	धराप्र तीती	धरा प्रतीती
३२	२४	सफलविन	सफल वन
३४	१४	करा	करी
,,	१६	भट	भेट
३५	२४	जन	सत्य जन
३७	२०	कतव्य	कर्तव्य
३८	२९	मनुनी	नमुनी
४६	१	हि	ही
,,	१४	निधि	विधि
५३	३	सांडुनि	सोडुनी
६०	३३	भरत-मनि	भरत-मनीं
६१	१९	मरणा राम-	मरणा विसरे राम
६३	२	बंधु	बंधू
६६	२०	योग्यायोग	योग्यायोग्य
६७	१९	गुरुनें	गुरूनें
६८	११	करुनि	करुनी
६९	६	विधि	विधी
७१	टीप	शरयू	—
७८	६	सकोचा	संकोचा
,,	१४	आणि ते	आणिते
८०	२८	वधुनी	बघुनि
८३	४	सुरत	सुर
८९	९	गाति	गाती
,,	१०	सकल	सफूल
९८	६	समतें	स्वमतें

९९	१५	सुगरण	सुरगण
,,	२६	भतर	भरत
१०५	११	सुख	सुखा–
१०७	२४	सुरसमयिं	सुसमयिं
१०९	शीर्षक	२५ वा	२७ वा.
११०	१	रक्षुनि व्रता	रक्षुनि धर्म व्रता
१११	१८	अपणांस	अपणांसम
,,	२०	भल	भले
११३	१६	श्वाम	श्वा
,,	२५	सकोच	संकोचे
११४	२७	हि	ही
११५	४	स्नेह-माधीं	स्नेहसमाधीं

अरण्यकाण्ड

२	२	॥ १ ॥	॥ १ ॥*
१४	२०	सभमार्जिं	सभेमार्जिं
१५	५	वरी	वरि
१८	७	विपत्त	विपत्ती
२०	२१	जपति	जंपलि
२५	१४	सुखदायक	वरदायक

किष्किंधाकाण्ड

३	१	सवकां	सेवकां
८	४	तनु, धरिती	तनु, सुर धरिती

सुन्दरकाण्ड

२	६	साहुनि	सहुनि
,,	१४	मग करी	मग त्या करी
,,	२०	शिरतो	येऊनि शिरतो
,,	२७	विबुधा	विबुधीं

८	१२	प्रिय	प्रिये
,,	३	क्षिर्ली	भक्षिर्ली
१६	९	चिकरिती	चिकरिति
२१	३	नस	नसे
,,	४	प्रभा	प्रभो

लंकाकांड

१	१०	कुन्दावदात	कन्दावदातं
१	४	जनिभय	जनिभयं
३	६	दशन	दर्शन
,,	१०	नौकसम	नौकेसम
,,	१३	प्राण	जाण
,,	१७	वृं	वृंद
,,	२१	--न	आड न
५	१२	बोल	बोले
८	६	करा	करीं
१५	१	मरुनि	मारुनि
२१	१८	निशिजर	निशिचर
२४	२५	नयन	नयन उर
२६	१	कडे	इकडे
३८	८	दो०	सो०
२९	७	दुमद	दुर्मद
३४	२०	यइन	येइन
,,	२१	शकर	शंकर
३९	८	काटि	कोटि
,,	२०	त्यासि	त्यासी
४०	१७	घरुनि	घरुनी
४२	१२	रामबाण	रामबाणें
,,	१९	पाहुनी	पावुनी
४३	१५	हस	हसें

४४	१०	उडवुनि	उठवुनि
,,	१३	करिती	करिवि
४५	१४	बिभीषण	बिभिषण
४६	१	होई	होइ
५०	१८	बहू	बहु
५२	३	सभय	सभय
,,	६	पाबश	पावक
५३	९	प्रमाण	प्रणाम
५४	६	एकुनि	ऐकुनि
,,	१०	मन	मम
,,	२६	घेऊनी	घेउनी
,,	२७	बहू	बहु
५६	८	अनुजा	अनुज
५८	१७	त्ता	तो
,,	२९	भुषण	भूषण
५९	१६	प्रभू	प्रभु
,,	१८	अतिवर	अति सुर
,,	२१	सुरश	सुरेश

उत्तरकाण्ड

३	२४	होई	होइ
५	२२	तरी	तरि
६	९	बचन	बच
७	१६	अमरीं	अमरिं
,,	१७	बोलावुनी	बोलावुनि
९	९	अन्यक्त	अव्यक्त
१३	१२	वर्णू	बर्णु
१५	२	कोटिशष	कोटि शेष
१६	२७	होई	होइ
१७	१२	काली न	कालीन

१९	२	धीर	धरि
२१	१	पुजन	पुरजन
,,	१६	सवती	सेविती
२३	४	तींथी	तीर्थी
२६	१४	प्रभा	प्रभो
२६	३	जलन	जलज
,,	५	गिरीवरीं	गिरीवरि
,,	१६	गणांकेलासिं	गुणा कैलासि
,,	२९	वद	वदे
२८	१७	करूनि	करुनि
२९	११	वाल्मिक	वाल्मीक
३०	२६	तुम्हीं	तुम्हि
३१	१७	गुणां	गुण
३३	४	करितीं	करिति
३४	१	बाहु	बाहु
,,	४	सुखदा	सुखद
,,	२०	मागा	माया
३५	२	प्रभू	प्रभु
,,	२१	जैं	जें
३७	७	खुखद	सुखद
४२	२४	नृपधांर्नी (१)	नृपधार्नी (३)
,,	२९	काळिकळ	कालिमल
,,	टीप	केलें भग	केलें ३
४३	८	ज्या ज्या	ज्याच्या
४४	७	हरिभक्त	हरिभक्ति
४८	२	आपत्र	आपल
५०	२४	मुनीं	मनीं

श्री राम समर्थ

अनुवादाविषयीं लेखकाचें अल्प निवेदन

रामचरणरति वांछिति अथवा कैवल्य कोणि निर्वाण ।
रामचरित-रस भावें, श्रवणपुटांनीं क'ोत ते पान ॥ (उ.कां.)

श्री तुलसीकृत रामायण या प्रकरणांत, श्री तुलसीदासांनीं केलेल्या रामायणाबद्दल यथामति अल्पविस्तार करून त्याचें महत्व, भाषा, परिणाम इत्यादिकांचें साभिप्राय वर्णन केलें आहे. त्यांतच मराठींतील भाषांतरांविषयीं उल्लेख केलेला आहे. वाचकांच्या हातीं असलेला हा तंतोतंत समश्लोकी काव्यानुवाद श्री भगवदाज्ञेनें अकल्पित रीतीनेंच कसा लिहून झाला हें प्रथम सांगून मग अनुवादांतील अडचणी व अनुवादांत काय केलें आहे, तें सांगू. " लेखकाचें हृद्गत " या प्रकरणावरून अनुवादांत कोणतें ध्येय ठेविलें गेलें आहे, हें सुज्ञ वाचकांचे ध्यानीं येईल.

या अनुवादाचा आरंभ श्रावण शुद्ध २ शके १८६७ गुरुवारीं दुपारीं अनपेक्षित रीतीनें करावा लागला. लेखन-साहित्यहि नव्हतें. त्यामुळें पेन्सिलीनेंच आरंभ करणें भाग पडलें. अपेक्षेपेक्षां फारच लवकर म्हणजे कार्तिक शुद्ध २ मंगळवारीं समाप्ती झाली. निदान दोन वर्षे तरी लागतील असें वाटलें होतें; पण प्रथम दीड महिन्यांत ½ ग्रंथ झाला तर पुढील दीड महिन्यांत बाकीचा सर्व पूर्ण झाला. " मूकं करोति वाचालं " अशा श्री रघुनाथाची ही अघटित–घटना–पटुता आहे या पेक्षां दुसरें काय म्हणावें. ? श्रावण शुद्ध द्वितीयेला प्रारंभ होण्यापूर्वी पांच मिनिटेंच एकाद्या उत्तम व निरपेक्ष, निस्वार्थी, ज्योतिष्यानें असें होणार म्हणून सांगितलें असतें, तर त्याची लायकी वेड्यांचे इस्पितळांत राहण्याची आहे असें खास वाटलें असतें. गेल्या बारा वर्षांच्या श्री रामायणाच्या व्यासंगांत असली अभिलाषा स्वप्नांत सुद्धां प्रादुर्भूत झाली नसेल. शिवाय लेखकाचें हिंदी भाषेचें ज्ञान तर अकटोविकटायतें. बरें लेखक कांहीं कसलेला लेखक किंवा कुशल कवि नव्हे. कांहीं स्फुरण होईल ते लिहून ठेवावे हा क्रम मात्र ३२ वर्षांचा. लेखक कांहीं

जाडा विद्वान, पंडित, वेदांती, आहे असेंहि नाहीं. पूर्वाश्रमांत मास्तरकी केलेला, एक व्यवहारशून्य व शिरावर येऊन पडलें तें कार्य तर आवाक्याच्या बाहेरचें; हंसाच्या पिलाच्या मस्तकावर मंदार पर्वत देण्यासारखेंच तें. पण एकच भरंवसा वाटूं लागला, " आज्ञापालनं सेवकानां धर्मः " बाकीची जबाबदारी आज्ञा देणारावर. असें वाटून चिंतेचा लवलेशहि उत्पन्न न होतां, तीन महिने समाधिस्थितींतील आनंदापेक्षांहि अधिक मजेंत निघून गेले. जवळ पैशाचा स्पर्श नाहीं, असें असतां न बोलतांच, सर्व लेखन-सामग्री पासून तों मुद्रणार्थ द्रव्य खर्च करणारा एक तरूण, व तोहि जैनधर्मी, उभा करून ज्याचें काम त्यानें उत्तम रीतीनें पार पाडलें. यांत लेखकाकडे कोणत्याच बाबतींत थारवी वा कर्तृत्व नाहीं. लेखकाचा अधिकार काय याचें लेखकाचें हद्गत, मंगलाचे संस्कृत श्लोक, शेवटचे श्लोक, व आरत्या यावरून प्रदर्शित होणारच आहे. पण संतांचा अनुग्रह व अनाथ-नाथ श्रीरामाची कृपा एवढाच अधिकार.

अडचणी:— हिंदी भाषेचें शास्त्रशुद्ध ज्ञान यथा तथा; रामायणा-सारखा चारशें वर्षांपूर्वीचा जुन्या हिंदींत लिहिलेला अत्यंत प्रासादिक, गूढ, दुर्बोध, अलौकिक ग्रंथ. तेंहि एक महाकाव्य कीं जें तद्देशीय पंडितांच्या मतीस सुध्दां गुंग करतें. व ज्याच्या अर्थ-- विशदी– करणासाठीं सात हजार पृष्ठांची टीका लिहावी लागते असला ग्रंथ. येथें चासेंत ना ग्रंथालय, ना कोणी काव्योपासक; जवळ कोणत्याच भाषेंतला शब्दकोश किंवा वृत्तदर्पण देखील नाहीं. तुलसीदासांच्या भाषेंत व आजच्या प्रचलित मराठी भाषेंत जमीन अस्मानाचें अंतर. रामायणांत मृदु शब्द फार; विभक्ति प्रत्ययांना पुष्कळच ठिकाणीं फांटा दिलेला, निरंकुश काव्य. तेंहि संगीतमय, आरोहावरोहांनीं युक्त, मात्रायुक्त. एवढें असूनसुद्धां हजारों शब्द दीर्घ असूनसुद्धां छंदाच्या साठीं लघु उच्चारावे लागणारे. उदा:—एक, जोइ, सोइ, जो, सों, जेहि केहि, एहि, देहि, लेइ, ताहि, संग, रंग इ. इ. जसे लिहिलें आहेत तसेच रामायणांत वापरले असून आद्याक्षराचा उच्चार ऱ्हस्व म्हणजे एक मात्रात्मक. कांहीं ठिकाणीं मात्रांची वृद्धी फार, उ. आनंद यांत मधल्या अक्षराचा उचार एक मात्रात्मक; एवढेंच काय, पांच मात्रांच्या शब्दांचा उच्चार तीन मात्रांचा; चक्रवाक बद्दल चक पयस्विनी बद्दल पय ' असलेहि प्रयोग पुष्कळ. बोलून, ऐकून, चालून इत्यादि मराठींतील पांच मात्रांचा अर्थ फक्त, कहि, सुनि,

इत्यादि दोन मात्रांत. अशा भाषाभेदाच्या अडचणींचे डोंगर, पर्वत पुढें उभे. मराठी संतकवींच्या ग्रंथांचा व्यासंग ओवी–वृत्ताशिवाय सुटलेलाच. असें असतांनासुद्धां आरंभ करणें भाग पडलें. पण दीनदयाघन रामरायासारखा स्वामी, कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं समर्थ, जो रेड्याच्या मुखांतून वेद बोलवितो, पाषाणाच्या नंदीला चारा खावयाला लावतो, त्याला प्रज्ञानानंदाकडून एवढेंसें कार्य करवून घेणें म्हणजे आश्चर्य नव्हे. " निमित्त मात्रं भव सव्य–साचिन् " तस्मात्, या अनुवादाचें कर्तृत्व श्री रामरायाकडे आहे एवढें सांगून यांत काय केलें आहे तें पाहूं:—

अनुवादांत केलें तरी काय ? या प्रश्नाचें उत्तर " केलें " या शद्बांत नसून " झालें " या शद्बांत आहे. स्वरवर्णांपासून बनलेले शब्द स्वभाषेंत होतेच; कांहीं नवीनहि झाले असले, तरी प्रणवापासूनच सर्व वर्णमाला. व प्रणव श्री रामापासून झालेला. विचार, रस, अलंकार मूळ कवीचे; फक्त जे शद्बप्रयोग भाषाभेदामुळें सहज समजण्यासारखे नव्हते ते बदललें गेले; त्यांचे जागीं मराठी अगर संस्कृत शब्द आले, इकडले तिकडे बसले; आरोहावरोहांच्याप्रमाणे त्यांची जुळणी झाली. मात्रांची ओढाताण नाहींशी झाली. यतिभंग वगैरे दोष मूळग्रंथापेक्षां फारच कमी झाले; पुष्कळ ठिकाणीं गूढ असलेला अर्थ स्पष्ट झाला. क्वचित् अर्थ न बदलतां अलंकारांची भर पडली. अर्थ स्पष्ट होण्यासाठीं मूळग्रंथांत नसलेले उपाय केले आहेत. उदाहरणार्थ कठिण शद्बावर भरपूर टीका. अध्याहृत शद्बांबद्दल आवश्यक तेथें विराम चिन्हें, व संदर्भ दाखविण्यासाठीं चरण रेघेच्या मागें अगर पुढे–अशा रेघा. मूळ ग्रंथांत अध्याय नसतांना सुद्धा अध्याय विभागणी. व मूळग्रंथांतल्या कांहीं छंदांचीं नांवें घालणें, इत्यादि गोष्टी घडून आल्या आहेत. यांत लेखकाकडून कांहीं पुरुषार्थ घडला असें नाहीं. हें सर्व सहज झालें. अर्थामध्यें न्यूनाधिकता कोठेंच झाली नाहीं. वृत्तांत बदल नाहीं. फार काय, प्रत्येक चरणाचा अनुवाद चरणानेंच झाला आहे. रस, पदलालित्य, कर्णमधुरपणा, अनुप्रास.यांतहि न्यूनता झालेली दिसणार नाहीं. वरील सर्व गोष्टी साधण्यांत मराठी व्याकरणाचा कांटेतोलपणा पूर्णपणें राहिला असणें शक्य नाहीं. क्वचित् हा दोष आढळेलच. मूळच्या काव्याशीं लेखकाचें पूर्ण तादात्म्य झालें असल्यानें न कळत कांहीं हिंदी शद्ब व प्रयोग राहिले असले तरी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेहि नसतील. संस्कृत किंवा कोणताच शद्बकोश जवळ

नसल्यानें अपरिचित संस्कृत अगर इतर शब्द घातले गेले नाहींत हा एक फायदाच झाला !

वृत्तें:—तु. रामायणांत मुख्य वृत्तें चार आहेत. चौपाई, दोहा, सोरठा व छंद. त्यांचीं लक्षणें रामायणांत जीं आढळलीं तीं खालीं दिलीं आहेत.

चौपाई:—प्रामुख्यानें हें वृत्त आहे. 'चार पाय' म्हणजे चार पादांची म्हणून चौपाई. जशीं आर्या चार पादांची असते तशीं. प्रथमार्धांत दोन पाद व द्वितीयार्धांत दोन पाद. प्रत्येक पादांत मात्रा सोळा. तरी पण तुलसीदासांनीं १५।१५; १६।१६, १६।१५ मात्रांचे प्रयोग कांहीं ठिकाणीं केले आहेत. त्यांत कांहीं तरी हेतु असला पाहिजे. पण तो अद्याप ध्यानांत आला नाहीं. यमकें बहुधा चार-चार मात्रांचीं असून प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ चरणांत यमक असतें. अनुवादांतहि निरपवाद १६।१६ मात्रांचेच चरण आहेत. मात्र यमकें मुळांतल्या एवढीं सर्वत्रच सुंदर साधलीं नाहींत. कांही ठिकाणीं दोन मात्रांचींहि आलीं आहेत. कांहीं कांहीं ठिकाणीं मूळांतच जेथें दोन चरणांची चौपाई आहे तेथें अनुवादांतहि तशीच सांपडेल. चोपाई हें वृत्त मराठीं भाषेंत अगदींच नवीन नाहीं. हें एक प्रकारचें "पादाकुलक" च आहे. कीर्तनांतून म्हणण्यांत येणारे 'कटाव' म्हणजेच पूर्ण चौपाई वृत्त. तेथें जसा आंतरा असतो, तसा येथें दोहा, किंवा सोरठा हें वृत्त मालकंस, भूप वगैरे रागांत फार चांगले म्हणतां येतें. म्हणून तर वाटेल त्या अनुक्रमानें सोळा मात्रा पुऱ्या करून भागत नाहीं. आरोह व अवरोहांकडे लक्ष देउन रचना करावी लागते. यति ८, ७ किंवा ६ मात्रांच्या नंतर आढळतो; पण ८ मात्रांचा यति कानाला फारच गोड लागतो. मुळापेक्षां अनुवादांत इकडे जास्त लक्ष दिलेलें आहे. पुढें जोडाक्षर वगैरे आले असतां मागील अक्षराला दीर्घत्व, चौपाईंत व दोह्यांत गोस्वामींनीं कोठेंच दिलेलें फारसें आढळणार नाहीं. (अर्थात् मूळचे संस्कृत शब्द सोडून) पण त्यांतहि तुलसीदासांनी सुप्रेम, सप्रेम, स्वच्छंद, आनंद, अशा अनेक शब्दांत तो नियम पाळलेला नाहीं. अनुवादांत जरी वरील नियम पाळण्याचा प्रयत्न केला असला तरी तो फारच अल्प साधला आहे. कारण बंधनें फार. मूळ सूत्रमय, व अर्थ थोड्या मात्रांत पुष्कळ भरलेला. मात्र अनुवादांत एकाच संस्कृत शब्दांतर्गत जोडाक्षरांबद्दल तसा दोष कोठेंच राहिलेला नाहीं. जेथें संस्कृत सामासिक शब्द—रेघ न देतां लिहिले असतील

तेथें तो नियम वाचणारांनीं पाळावा. तोडले असतील तेथें पाळूं नये. प्रथम वाचतांना नवीन वृत्तांमुळें गोडी लागणार नाहीं, पण संवयीनें किंवा श्रवणानें समजेल. यतींच्या जागीं वाचनाच्या सुलभतेसाठीं अर्धविराम चिन्हें सर्व वृत्तांत घातलीं आहेत. तिकडे व ऱ्हस्व दीर्घाकडे पूर्ण लक्ष देऊन वाचल्यास त्रास वाटणार नाहीं. अर्थ सुलभ होण्यासाठीं जरूर त्या सर्व विराम चिन्हांचा सर्वच वृत्तांतून उपयोग केला आहे. ॥ हरि नारायण, दुरित निवारण । परमानन्द सदाशिव शंकर ॥ किंवा "अर्थमनर्थ भावय" या भजना प्रमाणें चौपाई म्हणाव्या.

दोहाः—चौपाईच्या खालोखाल संख्या दोह्यांची आहे. मराठींत, मोरोपंतांनीं दोहा वृत्तांत्त काव्य केलें आहे. दोह्यास आर्येप्रमाणें चरण चार व यमक द्वितीय व चतुर्थ चरणाचे शेवटीं असतें. मात्र आर्येत शेवटचें अक्षर निदान उच्चारण्यांत तरी दीर्घ असावें लागतें, तसें दोह्यांत नसून दोह्यांत उपांत्य अक्षर निरपवाद दीर्घ असावें लागतें. जसें प्रीति, रीति, खास, त्रास, अशीं यमकें येतात. विषम म्हणजे प्रत्येक ओळीच्या प्रथम व तृतीय चरणांत निदान लिहितांना तरी १३ अगर १२ मात्रा आढळतात. या विषम चरणांतील अंत्याक्षर दीर्घ असो अगर ऱ्हस्व असो त्याचा उच्चार दीर्घ करावा लागतो; एवढेंच नव्हें तर तें अक्षर ४।५ मात्रा लांबविलें तर फार उत्तम; म्हणजे उच्चाराचे दृष्टीनें विषम चरणांत १४ अगर १३ मात्रा असतात. व अनुवादांत पुष्कळ ठिकाणीं प्रथम वेळीं जरी लिहिण्याच्या दृष्टीनें सुद्धां तेरा मात्रांचेच चरण साधले होते, तरी मराठी वाचकांस मध्येंच ह्रस्व लिहिलेलें अक्षर दीर्घ वाचण्याची संवय नसल्यानें मुद्रणांत सर्वत्र 'इ'कार व 'उ'कार उच्चाराप्रमाणें दीर्घच केले आहेत. 'अ'कार असल्यास तो दीर्घ, लांबवून वाचावा. दोह्याचें उदाहरण सर्वांच्या परिचयाचेंच घेऊं:—

दया धरमका मूल है; पापमूल अभिमान ।
तुलसी दया न छाँडि ऐ; जबलग घटमें प्राण ॥

यांतील अधोरेखांकित **है** व **ऐ** हे शब्द लांबवून वाचावे.

अनुवादांतील:—**शरयू वाहे उत्तरे; निर्मल जल गंभीर ।**
सुबद्ध घाटहि मनोहर, पंकहीन तत्तीर ॥

यांतील र लांबवून दीर्घ वाचावा. विषम चरणांत यमक पाहिजेच असा नियम नाहीं. सम चरणांत ११।११ मात्रा असतात.

सोरठाः— हें वृत्त मात्र मराठींत नवीन असावेंसें वाटतें. दोह्याच्या चरणांची उलटापालट केली म्हणजे सोरठा होतो असें थोडक्यांत सांगितलें असतां चालण्यासारखें आहे. यांत ११–१३, ११–१३ अशा मात्रांचे चरण असतात. यमकें प्रथम व तृतीय चरणांचे शेवटीं असून अंत्याक्षर ऱ्हस्व असतें. बाकीच्या दोन चरणांत यमक पाहिजे असें नाहीं. उदा०:–

सोरठाः— प्रभु आसनिं आसीनें; नेत्रें भरुनि शोभा बघति

मुनिवर परम प्रवीण; कर जोडुनि स्तवना करिति

४ ३ ४ २ ४ ४ ३

यांतील अधोरेखांकित अक्षरें दीर्घ पण बरींच लांबवून सी ऽऽऽऽ न वी ऽऽऽऽ ण अशीं वाचावीं म्हणजे गोड वाटेल. शेवटचें अक्षर दीर्घ वाचावें.

दोहे व सोरठे यांचा अर्थ फारच सूत्रात्मक, निदान कांहीं ठिकाणीं तरी तसा असल्यानें अर्थ सहज समजणार नाहीं, असें वाटल्यावरून त्यांचा अर्थ स्पष्ट होण्यासाठीं आणखी आर्या बालकांडांतच घातल्या आहेत. बऱ्याच ठिकाणीं ही द्विरुक्ति झाल्यासारखी वाटेल. तर बऱ्याच ठिकाणीं अर्थ समजण्याला टीकेप्रमाणें त्यांची मदत होईल. त्यामुळें पुस्तकाचा आकार थोडा वाढला. अनावश्यक वाटल्यास पुढील आवृत्तीचा योग आल्यास त्या काढून टाकूं.

छंदः—तु. रामायणांतील छंदांत तीन चार प्रकार पडतील. १ बहुतेक संस्कृत छंद, २ संस्कृत– प्राकृत मिश्र, ३ प्राकृत. संस्कृत छंद बहुधा तोटक, भुजंगप्रयात, पंचचामर, अशा वृत्तांत आहेत. त्यांचीं नांवें कोणत्याच टीकांतून दिलेलीं नव्हतीं. तरी बऱ्याच छंदांचीं नांवें सापडलीं, तीं दिलीं आहेत. बाकीचे छंद बहुधा २८।२८ अगर ३०।३० मात्रांच्या चार चार चरणांचे; कांहीं १२।१२ मात्रांच्या चार चरणांचे असे आहेत. यतींच्या ठिकाणीं अर्ध विराम व इतर ठिकाणीं योग्य वाटलीं तीं चिन्हें अर्थ सौकर्याच्या दृष्टीनें दिलीं आहेत.

दोह्यांच्या व सोरठ्यांच्या संख्येचा अनुक्रम गोरखपूरच्या गीता प्रेस मधून निघालेल्या " मानसांकाच्या " अनुरोधानें दिला आहे; हेतु हा कीं, कोणाहि हिंदी जाणणाऱ्या व्यक्तीस तुलना करून पाहणें सुकर व्हावें. मुळांतील छंदांपेक्षां अनुवादांतील छंद पुष्कळच निर्दोष व सरस दिसतील. संस्कृत छंदांतील दोष रस हानि न होतां काढतां येण्यासारखे होते ते काढले गेले आहेत. हिंदी शब्द संस्कृत छंदांतून क्वचित् क्वचित् होते ते काढून संस्कृत घातले आहेत. तुलना करून पहावी म्हणजे कळेल. मात्र समग्र ग्रंथाची तुलना करून पहावी. म्हणजे श्रीरामानें काय काय केलें तें दिसेल.

सर्वसाधारणरीत्या अर्थ सुस्पष्ट करण्याच्या ध्येयानें अनुवाद झाला आहे; पण जाणून बुजून अर्थ गूढ ठेवणें हा तुलसीदासांचा हेतु जेथें दिसला तेथें तेथे तो मुळांतल्या सारखाच गूढ ठेविला आहे. पुष्कळ शब्द उ० नाठी, बडा, सब, असे जरी रोजच्या प्रचारांत नसले तरी मराठींत वापरले जातात. कांहीं शब्द—भालु,अस्वल, सरि, हे जरी मराठी न वाटले तरी संस्कृत आहेत.

रामायण कसें वाचावें:— आरंभ करण्यापूर्वी श्री मारुतिरायांना व्यास— पीठाजवळ आसन मांडून आवाहन करावयाचें असतें; व अंतीं विसर्जन करून जयजयकार करावयाचा असतो. इतर ग्रंथ वाचतांना पुढील प्रकरणाची एक ओंवी अगर श्लोक वाचून ठेवण्याचा रिवाज आहे; पण रामायणांत तसें करावयाचें नाहीं. **गुरुचरित्र, भागवत** इत्यादि ग्रंथांचा जसा सप्ताह पारायणाचा विधि आहे. तसाच रामायणाचें पारायण ९ दिवसांत करण्याचा, नवाहपारायण विधि आहे, तो ग्रंथांत मुद्दाम दिला नाहीं. फक्त नवाह व मास पारायणांच्या विश्रामस्थानांचा उल्लेख केला आहे. ऐहिक व पारलौकिक हेतूंस्तव पाठ— पारायण— करण्याचे विशिष्ट विधि आहेत ते हिंदी " मानसांकांत पहावे, " किंवा लेखकास भेटावें, ते सांप्रदायिक आहेत. या विधींचें ज्ञान करून घेण्यासाठीं लेखकास देण्यासाठीं म्हणून पैचा सुद्धां खर्च करण्यास लागणार नाहीं. फक्त ग्रंथावर श्रद्धा, स्वधर्मपालन, वगैरे गोष्टी असल्या म्हणजे पुरे.

या ग्रंथांत अनुवादकाच्या बुद्धीचें जर कांहीं असेल तर मुळांत नसून अनुवादांत उत्पन्न झालेले दोष एवढेंच. बाकी चांगले जेवढें असेल तें सर्व

त्या दयामय लीलानाटकपटु भगवंताच्या, श्री गोस्वामी तुलसीदासांच्या व रामायणगुरु श्री १००८ बाबा गंगादास, या सर्वांच्या कृपेचें फळ आहे. तसेच या जड देहाच्या जनक जननींनीं जे कांहीं, नैतिक, धार्मिक, पारमार्थिक शिक्षण, प्रत्यक्ष आणि स्वतःच्या आचरणानें देऊन अनुकूल संस्कार निर्माण केले त्यांच्या पुण्यसंचयाचा परिपाक आहे.

प्रकाशनाचा हेतुः—या अनुवादाच्या प्रकाशनानें वा विक्रीनें एक पैसा सुद्धां प्राप्त करून घेण्याची लेखकाची इच्छा नाहीं. लेखक शास्त्राज्ञे-प्रमाणें द्रव्य संग्रह किंवा द्रव्यस्पर्शहि करीत नाहीं. हा ग्रंथ शक्य तेवढ्या कमी किमतीस वाचकांस प्राप्त व्हावा, व त्यावर कोणीहि नफेबाजी करूं नये अशा इच्छेनें या ग्रंथाच्या प्रकाशनाचे वगैरे सर्व हक्क लेखकानें रा. लालचंद हिंमतलाल कटारे, राहणार चास ता. खेड जि. पुणें यांस विनामूल्य दिले आहेत. हेतु हा कीं, ग्रंथाच्या विक्रींतून फायदा झाल्यास लेखकाचे इतर ग्रंथ त्यांनीं छापून प्रसिद्ध करावे. रामायणाच्या प्रति शक्य तेवढ्या स्वस्त मिळतील अशा आवृत्या काढाव्या.

प्रस्तावनाः—लेखकाच्या व ग्रंथाच्या गुणांचें शब्दचित्र मांडण्यासाठीं म्हणा अगर अन्य कांहीं हेतूंनीं म्हणा, लेखकाहून इतर मोठ्या व्यक्तीकडून प्रस्तावना लिहून घेण्याची या जाहिरात-युगाची परिपाठी पडली असली, तरी सर्वांत मोठा " श्रीराम " त्याचाच हा ग्रंथ, व तो सर्व भूतमय असून तोच सर्व प्रयत्न करीत असलेला दिसत असतां, असल्या प्रयत्नांची जरूर वाटली नाहीं. सबब लेखकाचा अल्पपरिचय न देतांच ग्रंथ छापावा अशी इच्छा आहे. कोणी म्हणतील मग अनुवादकाला लाभ काय? तर ज्या रामायणानें अनिर्वाच्य सुखाची, प्रेमाची—शुद्ध प्रेमाची प्राप्ती करून दिली तें रामायण भाषाभेदाची अडचण दूर करून हजारों लोकांस सुख देणार! इतरांच्या सुखांत, महाराष्ट्रीयांच्या सुखांत, स्वधर्माच्या वृद्धींत, स्वराष्ट्रांच्या सुखांत भर पडणार म्हणजेच स्वतःच्या सुखांत भर पडणार. तसेंच श्री १००८ श्रीबाबा गंगादास महाराज व " श्री राम-चरित-मानस " यांच्या उपकारांतून अल्पांशानें कां होईना उत्तीर्ण होतां आलें; व लेखकाची लायकी नसतांनासुद्धां दयाघन रामानें हातीं धरून हें अति दुष्कर कार्य सुकर केलें, त्याच्या पूर्ण कृपेचा अनुभव आला, यापेक्षां नर जन्मांत येऊन अधिक लाभ तो कोणता! त्या दयाघन, भक्तवत्सल, कृपाधाम, सुखाराम, निजजनपूरित-

काम, संसृतिविराम, सौंदर्यललाम, श्रीराम, जगन्नाथ, रघुनाथ, अनाथनाथ रघुविराच्या उपकारांची फेड देहाला चिंध्या गुंडाळून तूप ओतून त्याचा काकडा पेटविल्यानें अल्पांशानें सुद्धां होणार नाहीं. तरीपण त्याच्या नाम स्मरणानें व गुणगणगानानें थोडेसे उतराई होतां येते. तेच तर या अनुवादांत त्यानें करवून घेतलें !!!

हा ग्रंथ श्रीरामाच्या इच्छेनें छापला जात आहे. तो लेखकाचा पहिलाच व कदाचित् शेवटचाहि असण्याचा संभव आहे. कारण "गुरुगीता प्रबोधिनी" "परमामृत प्रकाश" तसेंच इतर कांहीं लेख, पत्रें, व स्वतंत्र काव्य पुष्कळच लिहून झालेलें असलें तरी त्यांच्या छापविण्याची आवश्यकता वाटत नाहीं. कारण महाराष्ट्रांत वेदांतविषयावर भाराभर ग्रंथ आहेत. त्यांची वाण नाहीं. वाण असेल तर त्याग, सेवा, तपश्चर्या, धर्म, निष्ठा, वगैरे गुणांची व कृतीची. ती वाण या ग्रंथाने अंशतः तरी भरून निघण्यासारखी आहे असें वाटल्यावरूनच श्रीरामानें आज्ञा केली असावीसे वाटतें. आणि म्हणूनच मूळप्रत लिहून झाली, त्या महानंदाच्या दिवशींच रा. ला. हिं. कटारे यांनीं एक हजार प्रति छापविण्याचा खर्च करण्याचें, स्वयंस्फूर्तीनें येऊन सांगितलें व त्याप्रमाणें त्यानीं केलें.

आभार प्रदर्शनः—सदर अनुवाद "कल्याण कार्यालय, गोरखपुर," यांनीं प्रसिद्ध केलेल्या रामायणाच्या आधारें केला आहे. त्यांच्या "श्रीमानसांकरचा" कांहीं ठिकाणीं चांगला उपयोग झाला. त्यांनीं उदार अंतःकरणानें अनुवाद करण्याची परवानगी, दि. ४-१०-४५ च्या पत्रानें दिली या बद्दल त्यांचे उपकार झाले आहेत. चास येथील मंडळींनीं महर्घतेचे दिवसांत लेखनसामग्री पुरविली आणि ग्रंथ लेखनाच्या तीन महिन्यांत, व प्रेस कॉपीच्या एक महिन्यांत पूर्ण एकांत मिळूं दिला, व लेखकाचा समय वाचविण्याचा व आरोग्य रक्षणाचा ज्यांनीं ज्यांनीं प्रयत्न केला त्या सर्वांचे उपकार झाले आहेत. तसेंच ज्यांनीं ईशसेवा म्हणून छापण्याकरितां पैसा खर्च केला, ज्यांनीं ज्यांनीं मुद्रणाचे बाबतीत शरीरानें व मनानें साहाय्य केले त्यांचे वाचकांवर उपकार आहेतच व ते रामरायाकडे रुजू आहेत. त्या उपकारांची फेड वाचकांनीं करणें म्हणजे ग्रंथाचा प्रसार करून तो अत्यंत स्वस्त ८।१० आणे पर्यंत सुलभ, व सुन्दर मिळण्यास मदत करणें व करविणें व ज्या श्री रामरायानें हा ग्रंथ महाराष्ट्रास उपलब्ध करून दिला त्याच्या आज्ञांचें म्हणजेच स्वधर्मांचें

पालन करणें व त्याचें भजन करून भूत मात्रावर दया करून, स्वधर्मरक्षणाच्या पायावर स्वदेशाच्या उद्धारासाठीं त्याची अनन्य भावानें नित्य नियमित प्रार्थना करणें होय.

ज्यास पारायणासंबंधी माहिती किंवा इतर शंका असतील त्यांनीं समक्ष भेटावे. पत्रव्यवहार करण्यास वेळ नाहीं.

मध्यम बुध्दीच्या माणसास आडणाऱ्या कठीण शब्दांवर थोडक्यांत जरूर तेवढ्या टीपा दिल्या आहेत. कांहीं चुका दृष्टोत्पत्तीस आल्यास विचार विनिमयाच्या बुद्धीनें विचारल्यास व पुढील आवृत्तीचा सुयोग आल्यास आवश्य विचार केला जाईल.

हा ग्रंथ वाचकांना श्रीराम पदकमल–सन्मुख करो !

तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु !

हा वाचकांना धर्मप्रवण करो ! :—तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु !

हा वाचकांना निर्मत्सर करो ! तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु !

हा ग्रंथ सर्वांना भक्तिप्रेम रसायन देवो. तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु !

सन्तचरणरज,

दण्डीस्वामी प्रज्ञानंद सरस्वती

[पूर्वाश्रमींचे : दत्तात्रय नारायण कर्वे बी. ए. एस्. टी. सी.

ईश्वरदास रामदासी] चास कमान दि. २।६।४६

अनुवादक.

वाचकांस आवश्यक सूचना—

(१) काव्यांतील बरेचसे अर्धविराम वाचनाच्या सोईसाठीं दिले आहेत.

(२) जेथें वृत्ताचें नांव छापलेलें नाहीं तेथें वृत्त चौपाई आहे.

(३) प्रथम अशुद्धें शुद्ध करून घेऊन मग वाचनास आरंभ करावा.

तुलसीकृत रामायण

प्रास्ताविक

प्रास्ताविकः—श्री तुलसीकृत रामायण असें ज्या ग्रंथास सामान्यतः म्हणतात; त्याचें मूळचें नांव "श्रीराम-चरित मानस" हें होय. याग्रंथाविषयीं आमच्या सारख्यानें मत प्रगट करणें, म्हणजे काजव्याच्या उजेडानें दिनकरास दाखविण्या सारखें जरी असलें तरी हिंदी न जाणणाऱ्यांसाठीं म्हणून कांहीं लिहिणें भाग पडत आहे. या धृष्टते बद्दल सज्जन क्षमा करतीलच. हिंदी भाषेचें अल्पहि ज्ञान नसतांना सुद्धां संतांच्या संगतींत या ग्रंथाचा जो आस्वाद मिळाला; व ज्या भावना बनल्या त्या मराठी वाचकांपुढे लेखक या नात्यानें मांडणें ओघानेंच प्राप्त झालें आहे. यांत स्वानुभवाच्या बाहेरचें कांहीहि लिहिलें नाहीं. "आधीं केलें व मग सांगितलें" हा समर्थ सांप्रदायाचा दंडकच आहे. या ग्रंथामुळें कवीवर किती संकटें आलीं; व रूढीचे गुलाम बनलेल्या पंडितांकडून झालेला छळ किति सोसावा लागला व विश्वेश्वर व हनुमंत या रामभक्तांनीं त्याचें रक्षण कसें केलें हें चरित्रांत वाचल्यानें सुद्धां महत्व लक्षांत येण्यासारखें आहे.

विषयः—यांत भगवान श्रीरामचंद्राचें चरित्र मुख्यतः वर्णन केलें असून त्याच्या अभ्यासानें, जीवानें चिरसुख शांतिलाभ करून घ्यावा हा हेतू आहे. हें प्रथम श्रीशंकरांनीं रचून आपल्या मानसांत ठेवलें म्हणून याला "श्रीराम-चरित मानस" हें नांव दिलें गेलें. श्रीशंकरांनीं हें प्रथम पार्वतीस सांगितलें नंतर काकभुशुंडीस सांगितलें. तेथून याची परंपरा सुरू झाली. म्हणूनच "शिव, काकभुशुंडि, गोस्वामी तुलसीदासा ऋषयः" असा क्रम आहे. यांत सात कांडें असून चार मुख्य संवाद आहेत. (१) शिवपार्वती, (२) याज्ञवल्क्य भरद्वाज (३) काकभुशुंडि गरुड, व (४) तुलसीदास व त्यांचे सांप्रदायिक. असे हे चार संवाद होत. म्हणूनच जेथें जेथें 'उमे', 'पार्वति', 'गिरिजे', 'गरुड', 'खगपति', 'भरद्वाज' अशीं संबोधनें

आहेत तीं त्या त्या संवादाची निदर्शक आहेत. तुलसीदासांच्या पश्चात् इतर सांप्रदायिकांनीं, मूळात नसलेले पण वाल्मीकिरामायण वगैरे इतर ग्रंथांत असलेले अहिरावणमहिरावण, दधिबल, सुलोचना, इत्यादिक अनेक आख्यानें, व लवकुशकांड व इतर अनेक भाग मध्यें मध्यें घुसडून दिले; व ग्रंथ एकशष्ठांश एवढा वाढला. परंतु आमच्या भाग्यानें जुन्या हस्तलिखित प्रति सांपडल्या; व शुद्ध पाठ छापला गेला. याचें बरेंचसें श्रेय "कल्याण" मासिकाच्या चालकांस देणें जरूर आहे.

अद्वितीय ग्रंथः—अनुवाद–लेखकानें, मराठी (मातृभाषा), संस्कृत, हिंदी, गुजराथी, व इंग्लिश या पांच भाषांतील अनेक ग्रंथ सन १९१४ पासून सूक्ष्म दृष्ट्या अवलोकन करून पाहिले. ज्ञानेश्वरी, नाथभागवत, ग्रंथराज दासबोध यांची तर पारायणेंहि झालीं. स्वभाषेंतील असल्या ग्रंथांबद्दल व आपल्या स्वतःच्या सांप्रदायाबद्दल निष्ठा व आदर कोणास नसेल असें नाहीं. पण जें सत्य आहे तें केव्हांहि लपवून ठेवणें योग्य नव्हे. याप्रमाणें अनेक ग्रंथांच्या परिशीलनानंतर असें सांगावेसें वाटतें कीं, तुलसीकृत रामायणासारखा ग्रंथ, हिंदुस्थानांतीलच काय, पण जगांतील कोणत्याच भाषेंत झाला नाहीं व पुढेंहि होणें शक्य नाहीं. गंगेला नदी, चिंतामणीला दगड, व कल्पवृक्षाला लाकुड म्हणणें शोभत नाहीं, त्याप्रमाणें "राम+अयन" भगवंताचें निवासस्थान अशा प्रसादास ग्रंथ म्हणणें कमीपणाचें आहे. चरित्रांतील "मधुसूदन सरस्वतींचा" अभिप्राय पहावा. मग याचें वैशिष्ट्य तरी काय असा प्रश्न सहज उद्भवतो. श्रीमद् भगवद्गीतेखेरीज इतर सर्व ग्रंथ, —श्री दासबोधसुद्धां—मूळचे जरी सांप्रदायिक स्वरूपाचे नसले, तरी त्यांस आज सांप्रदायिकत्व आलेलें आहे. ज्ञानेश्वरी इत्यादि ग्रंथांतील मुख्य प्रतिपाद्यविषय वेदांत, तत्वज्ञान असल्यानें वाटेल त्या व्यक्तीनें वाचून फायदा करून देणारे ते नाहींत. ते एकांगी आहेत. गीता संस्कृत असल्यानें दुर्बोध, श्री मद्भागवताची दुर्बोधता तर "विद्यावतां भागवते परीक्षा" या न्यायानें विश्रुतच आहे. तेही सांप्रदायिकच. उत्तर हिंदुस्थानांतील श्री रामायणाचा प्रसार व त्यावरील जनतेचें प्रेम पाहिलें म्हणजे महाराष्ट्रांतील ज्ञानेश्वरीच्या प्रसाराचें कांहींच वाटत नाहीं. महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरीचा प्रसार इतर ग्रंथांहून फारच जास्त आहे.

सर्वांस उपयुक्तः—तुलसीकृत रामायण हा ग्रंथ अशा खुबीनें लिहिला आहे कीं तो वाटेल त्या सांप्रदायाच्या व्यक्तीस प्रिय वाटावा. हा ग्रंथ लहान-थोर, राव-रंक, स्त्री-पुरुष; तरुण-तरुणी, बाल-वृद्ध, मूर्ख-पंडित, भक्त-अभक्त, ज्ञानी-अज्ञानी, हिंदु, ख्रिश्चन, पारशी, यहुदी, यवन, इत्यादि कोणत्याहि धर्माचा, पंथांचा, जातीचा, वयाचा, मनुष्य असो, त्यानें वाचण्या लायक आहे. सर्वांचेंच, सर्व देशीयांचें उभयविध कल्याण करून देणारा तो ग्रंथ आहे. मनुष्य असून पशू किंवा त्यांहूनहि नीच बनलेल्यांना मानवत्व देणारा आहे. नीति, धर्म, भक्ति, ज्ञान, वैराग्य यांचे शिक्षण, सुंदर, चित्ताकर्षक, रसाळ, प्रासादिक, भक्तिरसार्ह, सहज गोड, वीणामधुर भाषेत प्रेमानें देणारा हा एक अलौकिक, अद्वितीय ग्रंथ आहे. व्यक्तिधर्माचें आदर्श शिक्षण देणारा तुलसी रामायणा सारखा अन्य ग्रंथच नाहीं. हें आम्हींच म्हणतों असें नाहीं; तर ज्यांनीं कोणीं त्याचा आस्वाद घेतला ते निःपक्षपाती पंडित, परकीय सुद्धां हेंच म्हणतात. म्हणूनच या प्रकरणाचे शेवटीं कांहीं ठळक अभिप्रायांचा सारांश दिला आहे. हा ग्रंथ तर सुभाषितांची खाणच आहे. सर्व ग्रंथांचें सार आहे. इतक्या प्रमाणांत सुभाषितें इतर कोणत्याच ग्रंथांत नाहींत. युद्धवर्णनांत सुद्धां सुभाषितें ! !

सूत्रमय आहेः—रामायणांत कंटाळा येण्यासारखा विस्तार, वर्णनें कोठेंच नाहींत. तो अगदीं सूत्रमय आहे, इतकेंच नव्हे मंत्रमय दिव्य शक्ती आहे. त्यामुळें पुष्कळ ठिकाणीं कर्ता, क्रियापदें वगैरे अध्याहृत आहेत. हें काव्य दिव्य प्रेम भक्तिरसानें थबथबलेलें असून कवीच्या अंतःकरणांतील प्रेमरूपी वीणेच्या मधुर संगीत लहरींनीं तें पूर्ण भरलेलें आहे. रामकथेच्या निमित्तानें कवीनें आपल्या ७७ वर्षांच्या चरित्राचे अनुभवच त्यांत चित्रित केले आहेत असें सुज्ञ वाचकांसहि दिसेल. यांत वेदांताची चर्चा आहे, पण सूत्ररूप असून ती घटमठादि शब्द खटपटीनें रुक्ष बनलेली नसून भक्ति-रसाच्या अनुपानांत सहज ओघानें मिसळून दिलेली असल्यानें चेतोग्राही आहे. एवढें असून सुद्धां प्रत्येक सांप्रदायिकास असें वाटेल कीं आपल्याच सांप्रदायाच्या मतांचा परिपोष त्यांत केलेला आहे. वेद, उपनिषदें, भागवत, भगवद्गीता, वाल्मिकी रामायण, अध्यात्म रामायण, शतकत्रय, शिवगीता, योगसूत्रें, इ. इ. मुख्य मुख्य ग्रंथांचें सार त्यांत भरलें आहेच. पण एकट्या अयोध्या कांडांत १५० संस्कृत ग्रंथांतील उताऱ्यांचें सुधारलेलें रूपांतर

सिद्ध करितां येतें; नव्हे, एकानें प्रत्यक्ष केलें आहे. यावरून तुलसी रामायणाचा पंडित लोक सुद्धां किती सूक्ष्म अभ्यास करतात हें कळण्यासारखें आहे. हा ग्रंथ माध्व, रामानुज, रामानंद, वल्लभ, निंबार्काचार्य, केवलाद्वैती इ. इ. सर्व सांप्रदायांस प्रिय झालेला आहे. फार काय, अलीकडील सुधारणावादी चार्वाकसुद्धां त्याला पूज्य मानतात; अशी त्याची भाषा मोहक व सर्वांग सुंदर आहे.

लेखकाचा अनुभवः—अनुवाद–लेखकानें "कल्याण" या हिंदी मासिकाच्या संपादकांस हिंदींत लिहिलेल्या पत्रांतील कांहीं भागाचा अनुवादः— " रामचरित मानस हें रामचंद्र प्रभूचें प्रत्यक्ष निवासस्थान आहे. मंत्रमय दिव्य संगीत आहे. त्यांत निमग्न झाल्यानें बगळ्यांचे हंस व कावळ्यांचे कोकिळ होतील. कलियुगांतील नाना आपत्तींनीं गांजलेल्या, विविध तापानीं होरपळून निघालेल्या चित्तभ्रमराला, भगवत्पदजन्य भक्तिमकरंद आस्वादन करून स्थिर होऊन बसण्याला, सुगंधयुक्त अशी ती तुलसी मंजरी आहे. या मंजरींत जो कोणी किडा होऊन बसला, त्याला या मंजरीच्या संगतीनें भगवान सुद्धां आपल्या शिरावर धारण करण्यास तयार असतात. ती भगवत्कथा असून दिव्य अनुपम काव्य आहे. आदर्श नीतिशिक्षक असून सहज उपदेश देणारें काव्य आहे. श्रीरामचंद्राचे पदकमळाजवळ न कळत ओढून नेणारी ती रज्जु आहे. प्रपंचांत काय किंवा परमार्थांत काय, किंकर्तव्यमूढ झालेल्यांस स्वकर्तव्याची परम जाणीव करून देणारा तो निर्हेतुक प्रेमळ मित्र आहे. शब्दज्ञानानें आंधळे झालेल्यांच्या नेत्रांत कर्मोपासनेचें मृदु अंजन घालून शुद्धीवर आणणारें तें नेत्रांजन आहे. अनाचारी व कर्मठ यांना मोहनिद्रेंतून जागा करणारा तो दिव्य दुंदुभिनिनाद आहे. ज्ञानाविषयीं बेपर्वा असलेल्या भाविकांना धोक्याची सूचना देणारा तो लाल बावटा आहे. विषयपंकांत रुतलेल्यांच्या हातीं वैराग्य रुपी काठी आहे. बद्धाला मुमुक्षु, मुमुक्षूला साधक, साधकास सिद्ध, व सिद्धास पंचम पुरुषार्थ प्रवण करणारा हा ग्रंथ आहे. जीवाला निर्भय, गतशोक करून परमसुखांत मग्न करून सदा प्रसन्न ठेवणारें असें तें दिव्यसुधारसयुक्त चूर्ण आहे. मर्त्य लोकांतील मर्त्यांना खरे खरे अमर करणारी ती मृतसंजीवनी आहे. "

सुंदर काव्यः—केवळ काव्योपासकांना सुद्धां तें एक मोठें आवडीचें खाद्य आहे. इच्छा भोजनाचें अन्नसत्र आहे. कवीची प्रतिभा ज्या ज्या रसविशेषांत प्रवेश करते, तो तो रस परिपूर्ण रंगवून शेवटीं त्याची परिसमाप्ति शांत रसांत होते. शृंगार रसाचें वर्णन कालिदासाच्या शाकुंतलाला मागें सारणारें असून त्यांत मेघदूताचा अगर शाकुंतलाचा उत्तानपणा नाहीं. स्वैराचार नाहीं. सीता व राम उभयतांनाहि आपल्या कुळाच्या महत्तेची जाणीव आहे. गुरुजनांची, लज्जा व भीति आहे. बा. कां. अ. २६ पहा. उत्तर रामचरित्रांतील अगर वेणीसंहारांतील वीर रसाला मागें सारणारे प्रसंगः—लक्ष्मण परशुराम संवाद, (बा. कां. दो. २७०—८०) हनुमान रावणसंवाद (सुं. कां. दो. २०—२३) अंगद रावण संवाद (लं. कां दो. १७ ख ते ३५ क) पहा. याप्रमाणें प्रत्येक रसाचा पूर्ण परिपोष झालेला दिसेल. करुणा रसाचें वर्णन बालकांडाच्या शेवटीं व अयोध्या कांडांत भरपूर वाचावें. विशेषतः कैकेयी प्रकरण, चित्रकूट प्रकरण, वगैरे विशेष अवलोकनीय, हास्य अद्भुत, बीभत्स, रौद्र व भयानक यांचें वर्णन अरण्यकांड, व लंकाकांड यांत पहावें. शान्तरस तर सर्वत्र भरलेलाच आहे.

उपमा, कालिदासाच्या उपमांना मागें सारणाऱ्या असून, रूपकें इतकीं पूर्ण व सुंदर आहेत कीं चित्त थकितच होतें. रूपकाचे नमुने म्हणून नुसता नामनिर्देश करतो. मानसाचें रूपक (बा. कां.) शोकसरितेचें रूपक (अयो. कां.) भरत कीर्ति विधु. (अयो. कां.) ज्ञानदीप, भक्तिमाणि, मानसरोग (उ. कां) धर्ममय रथ (लं. कां.) रामचंद्राच्या वरातीच्या वेळचें वर्षाकाळाचें रूपक. दशरथ—कैकयी संवादांतलि रूपकें व इतर किती म्हणून सांगावीं, सर्वत्र भरलेलीं आहेत. उत्प्रेक्षा, वक्रोक्ति इत्यादिकांचा तर तोटाच नाहीं. श्लेषहि आहेतच. अनुभवानें समजेलच.

निर्दोष चरित्रें:—वाल्मीकिरामायण वगैरेंतील चरित्रांत जे जे दोष दिसतात त्यांचा यांत मागमूसहि नाहीं. सगळींच चरित्रें आदर्श असून 'निर्दोष आहेत. रावण, कैकयी, मंथरा यांच्या चरित्रांचें जर सूक्ष्म अवलोकन केलें तर तीं सुद्धां उदात्त, व निर्दोष आढळतील. जेथें जेथें कांहीं शंका श्रीरामचरित्राबद्दल येण्यासारख्या आहेत त्यांचें समाधान तावडतोब केलेलें आहे. सृष्टिवर्णनें वगैरे वाल्मीकिरामायण, योगवासिष्ठ यांतील वर्णनांसारखीं कंटाळवाणी नाहींत. अयोध्या कांडांत भरताची व

हॅम्लेटची भूमिका सारखी वाटण्याचा संभव आहे; पण भरताचें उदात्त, गंभीर, निःस्वार्थ, निगर्व, विनयपूर्ण, सेवाभावप्रिय, राजर्षितुल्य, अलौकिक चरित्र कुठें, कीं ज्याची कीर्ती भरद्वाजांनीं गावी; वसिष्ठांची मति भरताच्या शुद्ध निर्मळ प्रेमाला पाहून किंकर्तव्यमूढ व कुंठित व्हावी; व जनकानें म्हणावें कीं भरताचा प्रेमसागर अगाध आहे; व आत्महत्या करण्यास तयार झालेल्या लोभाविष्ट हॅम्लेटचें चरित्र कोठें! याप्रमाणें तुलसीकृत रामायणांतील एकेका चरित्राचें वर्णन करणें स्वतंत्र विषयच होईल.

भाषा शैलीः—रामायण अगदीं सूत्र रूपानें रामचरित्र वर्णन करणारें काव्य असल्यानें, विशिष्ट हेतु, विशिष्ट सिद्धांत मांडण्याशिवाय, केवळ सिद्धांत ठसविण्यासाठीं म्हणून दृष्टांतादिकांची रांगच रांग लावलेली फारच क्वचित् दिसेल. जास्त दृष्टांत जेथें असतील तेथें कवीचा हेतू शोधून काढून कवीच्या बुद्धीची वाहवा करण्यांत किती आनंद मिळतो म्हणून सांगावा! तुलसीदास हे “ निरंकुशाः कवयः ” “ ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनु धावति ” अशा कोटींतले कवि. पंधरा वर्षांच्या पर्यटणांत अनेक भाषा व रीतिरिवाज यांचा संबंध आल्यानें किती तरी भाषांतील शब्दांचा उपयोग त्यांनीं रामायणांत केलेला आहे. संस्कृत भाषेचे महापंडित असून सुद्धां अंतःकरणभक्तिरसानें भरलेलें असल्यानें अंतःकरणांतील भावना स्वतःच्या कल्पनेप्रमाणें व्यक्त करण्यास जो शद्ब व जो प्रयोग योग्य वाटेल तो केलेला आहे. पुष्कळ ठिकाणीं भाषेंत बोलतांना शद्ब जसे उच्चारतात त्याप्रमाणें त्यांच्या मात्रांची गणना लेखनांतहि केली असल्यामुळें महाराष्ट्रीयांना तो ग्रंथ नुसता, सरळ, व्यवस्थित, वाचणें सुद्धां फार कठीण. उदाः--करणें, बोलला, चटकन्, लगबग इत्यादि मराठी शद्बांत बोलतांना दुसऱ्या अक्षराची मात्रा गणली जात नाहीं; पण लिहितांना तसें करीत नाहींत. फार काय ‘ पयस्विनी ’ ‘ चक्रवाक ’ यां शद्बांबद्दल फक्त ‘ पय ’ ‘ चक्र ’ ‘ चक ’ असेंहि प्रयोग-छंदाच्या सोईसाठीं केलेले पुष्कळ आढळले. अशी स्थिति असल्यामुळें यति-भंग, मात्रांची ओढाताण, ऱ्हस्वदीर्घांच्या बद्दल बेफिकीर पणा, व आवश्यकते प्रमाणें संस्कृतांतून नवीन शद्ब निर्माण करण्याची शक्ति इत्यादिक गोष्टी सर्वत्र आढळतात. संस्कृत शद्बांचा भरणा फार, शद्बानुप्रासाची फार आवड यांमुळें अन्वय व अर्थ दुर्बोध झालेला आढळतो; तरीपण त्याच्यांत अशी कांहीं दिव्य शक्ती आहे कीं, अर्थ न समजणारे लोकसुद्धां त्याचे प्रेमानें

आलाप मारीत असलेले दिसतात. संस्कृत श्लोकांतून सुद्धां व्याकरणाच्या नियमांकडे दुर्लक्ष्य झालेलें आढळतें. कवीनें ग्रंथ लिहिला तो लोकरंजनासाठीं नव्हता. " कोण लाभ जगिं, लोक रिझवितां " हें त्यांचेंच वाक्य आहे. रामायण त्यांनीं लोकांच्या हितासाठीं लिहिलेंच नाहीं; विश्वेश्वराची आज्ञा पाळून करून " स्वांतस्तमः शान्तये " साठींच त्यांनीं तो ग्रंथ लिहिला. पैसे मिळविणें, कीर्तिसंपादन करणें वगैरे कोणताच हेतु नव्हता.

शिकवण:—हें रामचरित्र असलें तरी शिवभक्तीवांचून रामभक्ति नाहीं असें सिद्धांतरूपानें सांगून, सांप्रदायिक द्वेषाचें उन्मूलन करणारें तें आहे. चिदचित् ग्रंथी मृषा असली तरी रामकृपेशिवाय ती सुटत नाहीं असें तें ठासून सांगतें. नामस्मरण हें कलियुगांतील सुलभ व रामबाण साधन, असें प्रतिपादन करणारें तें असले तरी शास्त्रोक्त वर्णाश्रमधर्माचें पालन, अंत्यक्षणापर्यंत केलेंच पाहिजे असें प्रतिपादन केलें आहे. भक्ति सर्वोत्कृष्ट साधन व साध्य आहे म्हणून प्रतिपादन करणारें तें असलें तरी कोणाशींच विरोध करणें योग्य नव्हे. " जें जें दिसें भूत, तें तें जाणावें भगवंत. " हें भक्तीचें वर्म प्रतिपादन करून विश्वरूप भगवंताची सेवा म्हणजेच अनन्य भक्ति असेंहि सांगितलें आहे. नुसत्या ब्रह्मज्ञानाच्या लांब लांब गप्पा मारून कांहीं हित होणार नाहीं; तर कामक्रोधादिकांपासून सुटून प्रथम मनुष्य बना; व जीवमात्राकडे भगवद्बुद्धीनें बघून सर्वांचे मित्र व्हा. शत्रूचें सुद्धां हित करण्याचा प्रयत्न करा, असें रामायण शिकवितें. समर्थांच्या म्हणण्याप्रमाणें, निदान या कलिकालांत तरी, प्रपंचांत परमार्थ पुरा होत नाहीं हें जरी खरें असलें; व स्वतः तुलसीदासांचें जीवन जरी अंतर्बाह्य त्यागपूर्ण होतें, तरीपण, गृहत्याग न करितांच विश्वावर प्रेम करून, व त्या विश्वप्रेमांत निजदेहादिकांचें प्रेम विसरून जाऊन, भगवंताला सहज आपुलासा कसा करून घ्यावा असें सर्व जनोपयोगी शिक्षण देणारा तुलसीकृत रामायण हा एकमेवाद्वितीय, अलौकिक, असा श्रीरामचंद्राचा प्रसाद आहे. त्यांतील पुष्कळ 'दोहे' व 'चौपाया' आजहि लौकिक व पारलौकिक कामना पूर्तीसाठीं उपयोगांत येत आहेत. त्याबद्दलचे पाठ करण्याविषयीं निरनिराळे प्रयोग आहेत ते येथें देत नाहीं. याप्रमाणें आम्ही काय अगर कोणीहि काय तुलसीकृत रामायणाबद्दल जेवढें लिहावें तेवढें थोडेंच. त्याचें पूर्ण वर्णन करणें कोणासच शक्य नाहीं.

जस जसा काळ जाईल तस तशी त्याची किंमत वाढत जाईल. प्रत्येक पाठाच्या वेळेला कांहींना कांहीं विशेष रहस्य बाहेर पडतेंच.

प्रसार:—भारतांतील महत्वाच्या बहुतेक भाषेंत या रामायणाची गद्य भाषांतरें झालीं, यांत नवल नाहीं. पण संस्कृतांत सुद्धां कित्येक भाषांतरें झालीं एवढेच नव्हे, तर त्यांतील एक तर संस्कृतांत " चौपाई " वृत्तांतच असून तुलसीदासांनीं माझ्याच ग्रंथाचें भाषांतर केलें असा उलटा तोतयेपणा एका लेखकानें सुरू केला होता. तो टिकला नाहीं ही गोष्ट निराळी. हिंदींत तर त्याचीं हजारों संस्करणें निघालीं. आठ आणे किंमती पासून ४० रुपये किंमती पर्यंत रामायणाचीं पुस्तकें, टीका आहेत. मराठींत भगवद्गीतेवर जेवढ्या टकिा आहेत त्यांहून कितीतरी अधीक व कितीतरी विस्तृत अशा टीका या रामायणावर आहेत. " मानस पीयूष " ही टीका ७०० पृष्टांची असून किंमत ३६ रुपये आहे. अनुवादकास फक्त १॥। रुपये किंमतीची पं ज्वालाप्रसाद यांची सर्वांत लहान टीका पहावयास मिळाली होती. सर्व टीकांचें काम श्री १००८ श्री बाबागंगादास, तुलसी दासांचे सांप्रदायिक, यांच्या ६।७ वर्षांच्या संगतीनें व आशीर्वादानें केलें. गुजराथींत दोन गद्य भाषांतरें पाहिलीं आहेत. बरीं आहेत. श्री. जामदार (नागपूर) यांनीं मराठींत गद्य भाषांतर बऱ्यापैकीं केलेलें आहे. पण महत्वाच्या जागीं अर्थ व रहस्य न समजल्यामुळें, भाषांतरास निराळेंच वळण मिळाले आहे. दुसरें ह. भ. प. भोपटकर (ग्वाल्हेर) यांचें चौपाई रामायण नुकतेंच थोडें पाहिलें. पण तें भाषांतरहि नव्हे किंवा काव्यानु-वादहि नव्हे. त्याच्यांत तुळसीदासांचे विचार शोधित बसावे लागतें. तें रूपा-न्तर आहे. फक्त सुंदरकांड समश्लोकी करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला, पण जमेना व तोहि साधला नाहींच. त्यांनीं तुलसीकृत रामायणाच्या आधारानें त्यांतील कांहीं भाग घेऊन, कांहीं सोडून, अध्यात्म रामायण, श्रीमद्भागवत व वाल्मीकिरामायण यांतून कांहीं भाग घेऊन, आपल्या स्वतःच्या शद्वात काव्यरूपानें तयार केलेली ती एक खिचडी आहे. आहे मात्र चांगली. पण त्यांत तुलसीकृत रामायण नाहीं. व लेखक जरी गवई होते तरी, आरोह व अवरोह यांकडे फारच दुर्लक्ष झालें असल्यानें ती कर्णकटू पण झाली आहे. व आडवळणांतले संस्कृत शद्व फार वापरल्यानें नीरसहि झाली आहे. अलीकडे रशिआंत एका तत्वज्ञान्यानें तीन वर्षे मेहेनत करून रशिअन गद्य

भाषेंत तु. रामायणाचें भाषांतर कांहीं महिन्यापूर्वीच केलें. यूरोपांतील बऱ्याचशा भाषेंतहि त्याचीं भाषांतरें झालीं आहेत.

उपसंहार:— याप्रमाणें या अल्पज्ञ लेखकाला १२ वर्षांच्या अनुभवानें व वाचनानें श्री तुलसीकृत रामायणाबद्दल जें कळलें, समजलें व उमजलें ते यथामति मांडलें आहे. तरीपण असें वाटतें कीं, वाचक मूळ रामायणाचे उपासक बनतील तर फार चांगलें; कारण कितीहि भगवदनुग्रह झाला तरी एकदां जें जसें झालें तसें तंतोतंत तें पुन्हां होत नाहीं. काळ, वेळ, देश, यांचें महत्व असतेंच. प्रत्येक जीवानें श्रीतुलसीकृत रामायण निदान एकदां तरी वाचून आपल्या कल्याणाचा मार्ग शोधून त्याच बरोबर, धर्म व स्वदेश रक्षणासहि हातभार लावावा, इतकें सांगून व यानंतर कांहीं आधुनिक सुशिक्षित प्रसिद्ध अशा व्यक्तींचीं मतें, अभिप्राय "कल्याण" च्या "मानसांकांत" प्रसिद्ध झाले आहेत ते देऊन, व मूळ अभिप्राय सर्वच्या सर्व वाचण्याबद्दल प्रार्थना करून हें प्रकरण संपवूं. खालील अभिप्रायांत मोठमोठ्या संत महंतांचे अभिप्राय दिले नाहींत कारण ते रामायणाच्या स्तुतिपर असणारच. जे दिले आहेत ते सुद्धां अगदीं सूत्ररूपानें दिले आहेत.

अनुवादासंबंधीं विशेष "अनुवादकाचे चार शब्द" यांत पहावें.

"श्री तुलसीकृत रामायणासंबंधीं आधुनिकांचे अभिप्राय."

पंडित मदन मोहन मालवीय.

"मानसाचे योगे अनुपम सुख–शांति. प्रसार प्रत्येक घरांत झाला पाहिजे."

मोहनदास गांधी.

"मनुष्यांस श्रद्धा कशी मिळेल याचें उत्तर श्री रामचरितमानसांत आहे."

शामाप्रसाद मुकर्जी.

एम्. ए. एल्एल्. बी, बार ॲट लॉ. व्हाईस चॅन्सेलर, कलकत्ता युनिव्हर्सिटी.

"रामायणानें दिव्य प्रेरणा प्राप्त होते."

श्रीयुत हरिहरेंद्रनाथ दत्त.

एम्. ए. एल्एल्. बी. वेदान्त रत्न व्हा. प्रेसिडेंट अ. भा. थिऑसॉफिकल सोसायटी;

" भारतीय साहित्यांतील अद्वितीय ग्रंथ. तुलसीकृत रामायण जाणणें, म्हणजे जाणण्यासारख्या सर्व गोष्टी जाणल्या सारखें आहे. "

बाबू राजेन्द्र प्रसाद

" तु. रामायणानें धर्म व अध्यात्मविद्येचा प्रसार. अध्यात्मविद्येच्या उच्चातिउच्च सिध्दांतांना, तुलसीदासांनीं, सुंदर, सुललित, सहज, सरळ भाषेंत गांवोगांव नव्हे, घरोघर, पसरून दिले आहेत. " —समग्र पहा.

रे. एडविन् ग्रीव्हज्

" मानसांत वीरत्व व विनय पूर्णभावांचा प्रवाह आहे. "

डॉ. सच्चिदानंद सिंह.

एम्. ए. बार-ॲट-लॉ. व्हा. चॅ. पाटणा यूनिव्हर्सिटी,

" मानसांची उपादेयता सर्वोपरि आहे. "

श्रीयुत सी. वाय्. चिंतामणि.

" तुलसीदासांचे काव्य अमर आहे. "

व्ही. एन्. मेहेता.

आय्. सी. एस्.

" रामायण मानवमात्राचें बायबल आहे. "

श्री. काका कालेलकर.

" श्रम परिहार करण्याची तुलसी वचन शक्ति अनुभवास आली. थोड्या शब्दांत अधिक भाव तुलसीदास कसे प्रगट करितात हें पाहून शरीर पुलकित होतें. तुलसीदास हे भारताचे हृदय सम्राट आहेतच; पण साहित्य सम्राटहि आहेत. सदाचाराचा प्रसार भारतांत कोणी केला, याची गणना होईल, तेव्हां तुलसीदासांचें नांव प्रथम येईल. जो पर्यंत तुलसी रामायण आहे तों पर्यंत, हिंदी भाषेचा प्रचार अबाधित राहणार. "—समग्रच पहा.

श्री. डी. बी. पट्टाभिसीतारामय्या

" रामायणानें आध्यात्मिक उत्थान "

श्री. न. चिं. केळकर

" मधुर संगीत लहरी. "

श्री. एम् सत्यमूर्ति

" रामायण आमचें संजीवन–अमृत आहे "

श्री. गंगाधरराव देशपांडेः—

" वीणा मधुर असून, स्वार्थत्याग, मनःसंयम, भूतप्रेम, परदुःख-दुःखिता, कर्तव्यपरायणता, निष्कामता, निरहंकारता, गुरुजनसेवा, इ. इ. गुणांची दृढ छाप वाचकांवर पडते. "

इतर अभिप्राय

" राष्ट्राचा महानिधि, " " आर्यसंस्कृतिसंरक्षक " भक्तिभावाचा सागर ", " मानसांत पुरुषोत्तम आहे, " वगैरे वाचनीय आहेत. तरीपण वाचक अनुवादाच्या पठनानें वरील अभिप्राय अंशतः तरी अनुभवास आणतीलच. इतकें सांगून पुढील प्रकरणाकडे वळूं.

सूचनाः—पुढील प्रकरण बुद्धिपूर्वक वाचावें म्हणजे अनुवाद वाचतांना अडचण पडणार नाहीं.

श्री राम समर्थ

भक्त- शिरोमणि श्री गोस्वामी

तुलसीदास महाराज यांचें अल्पचरित्र

श्री वाल्मीकवि झाला श्री तुलसीदास राम- यश गाया।
तरिच प्रेमरसाची खाणी वाणी तशीच वश गा या ॥

(मोरोपंत)

प्रास्ताविकः— श्री तुलसीकृत रामायणासारख्या अद्वितीय काव्य ग्रंथाच्या जनकाचें विश्वसनीय, साधार असें ज्ञान प्राप्त करून घेण्याची जिज्ञासा वाचकांस सहजच असते; म्हणून त्यांचें अल्पसें चरित्र " मूल-गुसांई चरित " या ग्रंथाच्या आधारें लिहिलें जात आहे. त्यावरून या महात्म्याविषयीं व त्यांच्या या ग्रंथाविषयीं वाचकांचे अन्तःकरणांत शुद्ध प्रेमाची वृध्दि झाल्याशिवाय राहणार नाहीं, असा लेखकास आत्मविश्वास आहे. संत चरित्र म्हटलें म्हणजे त्यांत बऱ्याचशा चमत्कारांचीं वर्णनें असावयाचीं, असा बहुधा रिवाजच पडून गेल्यासारखा झाला आहे. त्यांतलि कांहीं खरीं असतात; व कांहीं त्यांच्या सांप्रदायिक भक्तांनीं, आपलें महत्व वाढविण्याचें साधन म्हणून प्रचलित केलेलीं असतात; पण साधुत्व आणि चमत्कार यांचा कार्यकारण संबंध नसतो. चमत्कार करण्याचें सामर्थ्य, जन्म, मंत्र, मणि, महौषधि, तपश्चर्या व समाधि यांपैकीं एक अथवा अधिक कारणांमुळें प्राप्त होत असतें. खरे संत असतात ते, कोणी कितीहि आग्रह केला तरी चमत्कार करून दाखवीत नसतात. खेळ करून पैसे कमावण्यासाठीं, गारुडी किंवा जादूगार चमत्कार ' करून ' दाखवितात. हां ! परमेश्वराला ज्या संतांना निमित्त करून, कांहीं कार्य करून घ्यावयाचें असतें तेव्हां, त्या कार्यांतील दुर्जनरूप अस्तनींतील निखारे, जोड्यांतलि खडे, काढून टाकून कार्य सुकर होण्यासाठीं म्हणून

किंवा कांहीं अन्य हेतूनें, कांहीं चमत्कारिक गोष्टी संतांकडून सहज घडत असतात. संतांनीं निरनिराळ्या गुणांची प्राप्ति, काम–क्रोधादिकांचा जय, भगवद्भक्ति, ज्ञान, तपस्या, जनहित इत्यादि साधण्यासाठीं कस कसे प्रयत्न केले; त्यांत त्यांस अडचणी कोणत्या व कशा आल्या; त्यांतून पार पडून ते आज या जगांत कशानें प्रसिद्धीस आले इत्यादि गोष्टींचा विचार मुख्यतः चरित्रांत यावयास पाहिजे. त्या दृष्टीनें सत्याचा अपलाप न करितां, इतिहासाला पायाखालीं न तुडवितां, भारतांत चरित्र– लेखनाची शुभ प्रणाली केव्हां पडेल ती खरी ! आत्मचरित्र छापणें किंवा छापविणें, विद्यमान पुरुषांचें चरित्र छापणें, हें सुद्धां तितकेंच अनिष्ट वाटतें. भोळ्या भाबड्या लोकांना , गतानुगतिकांना, आपल्या कळपांत ओढून घेण्याचें तें एक सहज सोपें साधन होतें. निदान संतांचीं चरित्रें तरी त्यांच्या आयुष्यांत प्रसिद्ध केलीं जाऊं नयेत, हें उभयतांच्या दृष्टीनें हितावह आहे.

आधारः—' मूल गुसांई चरित्र ' श्री गोस्वामी तुलसीदासांचे शिष्य श्रीवेणी-माधवदास यांनीं लिहिलेलें आहे. त्यांची व तुलसीदासांची भेट संवत् १६०९ ते १६१६ चे दरम्यान झाली. ते त्यांचे संगतींत शेवटपर्यंत म्हणजे संवत् १६८० पर्यंत होते. म्हणजे कमींत कमी ६५ वर्षे श्री गोस्वामींचे चरित्र त्यांनीं प्रत्यक्ष अवलोकन केलें होतें; म्हणून इतर चरित्रांहून हें चरित्र अधिक विश्वसनीय आहे. त्यांत तिथि, वार इत्यादिकांचा सूक्ष्म उल्लेख करूनच मुख्य गोष्टींचा उल्लेख काव्य रूपानें केलेला आहे. आज कांहीं अश्रद्धावान व्यक्तींस असंभव वाटणाऱ्या अशा चमत्कारांचा उल्लेख त्यांत आहे, एवढ्याच गोष्टीवरून तें अप्रमाण ठरवितां येणार नाहीं.

अवतारः—ज्या ज्या वेळेस धर्माची ग्लानी नाहींशी करून, धर्मोध्दार करावयाचा असतो, पण " विनाशाय च दुष्कृतां " हें कार्य नसतें, त्यावेळीं महान् महान् अंशावतार, अगर महापुरुषांचे अवतार होतात; आणि ज्यावेळीं, साधुपरित्राण, धर्मसंस्थापन व दुर्जन-नाश हें कार्य कर्तव्य असतें त्यावेळीं, भक्तिमार्ग सुकर करण्यासाठीं, भगवंताला लीला-विग्रह धारण करावा लागतो. तुलसीदास महाराज हे आद्य कवि व ब्रह्मदेवाच्या मानस पुत्रांपैकीं एक, प्रसिद्ध वाल्मीकि ऋषी यांचा अवतार होत. चरित्राचें आरंभीं दिलेल्या मयूर कवीच्या उक्तीवरून व महीपतींच्या उल्लेखावरूनहि हेंच ठरतें कीं, महाराष्ट्रासारख्या दूर देशांत सुद्धां गोस्वामी हे वाल्मीकीचे अवतार म्हणून

मान्य झाले होते. व मोरोपंतांसारख्यांनीं त्यांची स्तुति गाण्या एवढें, व महीपतीनीं त्यांचें चरित्र लिहिण्या एवढें त्यांचें रामायण प्रसिद्ध व लोकप्रिय झालें होतें. स्वतः गोस्वामीनीं मात्र आपण कोणाचा अवतार याचा कोठेंच उल्लेख केलेला नाहीं. कोणी त्यांस श्री हनुमंताचा अवतारहि मानतात.

तत्कालीन परिस्थितिः—इ. स. च्या पंधराव्या शतकाचे अंतीं भरत खंडांत यवनांच्या जुलमामुळें वेद, पुराण, शास्त्र इत्यादिक सद्ग्रंथांची होळी होत होती. हिंदूंचा व हिंदूधर्माचा समूळ नाश करण्याचे गुप्त प्रगट प्रयत्न चालले होते. व्यक्तिनिष्ठ धर्म पालन करणें सुद्धां, उघड उघड दुर्घट झालें होतें. कित्येक अन्तःकरणें एकांतांत, आजच्या सारखींच, "देवा धाव ! धाव ! तुझ्या शिवाय या सनातन धर्माचें रक्षण होईल, करील, असें कांहीं साधन दिसत नाहीं. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. दंभ, कपट, अश्रद्धा, परस्पर द्वेष; अन्तःकलह, वृथाभिमान, इत्यादिकांनीं स्वधर्मीयच धर्माचा नाश करूं पहात आहेत. भक्तिमार्ग लोपला, ज्ञान मार्गाची नुसती बडबड उरली, सत्कर्माचा पत्ता नाहीं, एवढेंच नव्हे तर अकर्म व विकर्माचा प्रसार झाला. तुझ्या शिवाय त्राता नाहीं." या सारखे निराशेचे उद्गार, व्यथित अशा कित्येक धर्मशील अंतःकरणांतून निघूं लागले होते. असले तळमळीचे उद्गार, श्री रामरायास ऐकावयास जाताच. त्या प्रमाणें ते गेले व वाल्मीकि मुनींस भारतांत अवतीर्ण होण्याची आज्ञा मिळाली. त्यांचें रक्षण करून प्रत्यक्ष मदत करण्याचे अभिवचन मारुतिरायांनीं दिलें व तुलसीदासांच्या रूपानें अवतार झाला.

जन्म व मातृ-पितृ वियोगः—प्रयागचे जवळ, यमुनेच्या दक्षिण-तीरावर राजापूर नांवाच्या गावांत आत्माराम दुबे नांवाचे पाराशर गोत्री, शरयूपारी ब्राह्मण रहात होते. ते प्रतिष्ठित सदाचारसंपन्न व श्रद्धावान होते. त्यांच्या पत्नीचें नांव "हुलसी". ती महापतिव्रता होती. संवत १५५४ श्रावण शुक्ल सप्तमीचे दिवशीं, अभुक्त मूळ नक्षत्रावर हुलसीचे पोटीं एक पुत्र जन्मास आला. हें बालक मातृ-गर्भांत बारा महिने होतें. जन्मल्या बरोबर मुलानें रडण्या ऐवजीं "राम" शब्दाचा उच्चार केला. जन्मतांच मुलाला बत्तीस दात होते; व चार पांच वर्षांच्या मुला सारखें मूल दिसत होतें. हें सर्व अशुभ पाहून, शास्त्री, पंडित, ज्योतिषी इत्यादिकांचे मतानें निर्णय ठरला कीं, तीन दिवस वाट पहावी; मुलगा नच

मेला तर परित्याग करावा; नाहीं तर कुळाचा नाश होणार. पण तें मूल कुळाचीं कीर्ति अमर करणारें असल्यानें हें वृत्त हुलसीला समजलें तेव्हां तिनें आपली प्रेमळ व विश्वासू दासी "चुनिआ" हिला बोलावून दशमीचे रात्रीं*—एकादशी लागली असतां, तिला सांगितलें कीं, "माझें प्राणोत्क्रमण सकाळीं होणार; सबब माझ्या या प्राणप्रिय सुंदर अर्भकाला घेऊन तूं गुपचूप हरिपुराला आपल्या सासरीं जा. याचें मातेप्रमाणें संगोपन कर; माझ्या मागें ही सर्व मंडळी, हे सर्व शहाणे लोक, त्याला कोठें तरी निर्दयतेनें फेकून दिल्याशिवाय राहणार नाहींत, माझे हे सर्व अमूल्य अलंकार घे." असें सांगून तो तीन दिवसांचा शिशु व आपले सर्व अलंकार चुनिआचे हवालीं केले. दासी बालकाला घेऊन रातोरात हरिपूरला निघून गेली. प्रातःकाळीं हुलसीनें देहत्याग केला.

बाळपण व अनाथस्थिति:—चुनिआची हकीकत ऐकून व तें तेजस्वी मूल पाहून, सासू सासरे प्रसन्न झाले. घरच्या कपिला गाईचे दुधावर चुनिआ मुलाचें पोषण करून त्याचें प्रेमानें संगोपन करूं लागली. देव तारी त्याला कोण मारी. या प्रमाणें चुनिआनें शुद्ध प्रेमानें ५-५॥ वर्षे मुलाचें संगोपन केलें; पण लगेच तीहि स्वर्गवासी झाली. त्या मुलाच्या प्रेमळ बाल-लीलांनीं सर्वांनाच सुख होत होतें; पण आतां कोणाचाच आधार राहिला नाहीं. चुनिआची सासू अतिवृद्ध, सबब तिनें तु. दा. च्या वडिलांस निरोप पाठवून मुलास घेऊन जाण्याबद्दल विनंति केली; पण उत्तर आलें कीं "जन्मतांच ज्यानें आईला मारिली; पालन करणारी दासी सुद्धां सहावे वर्षीं मेली, अशा अभागी मुलाला आणून मी काय करूं? मुलगा जगो मरो, मला पर्वा नाहीं." तुलसीदास म्हणतातच "स्वार्थी मित्र सकल जगिं पाहीं" (तु. रा.) "माता पिता; स्वार्थी रत तेही" (तु. रा.) जगांत संत व परमात्मा यां शिवाय कोणी कोणाचें नाहीं हेंच खरें. समजतें सर्वांस; पण उमजतें कोणा भाग्यवंतास. झालें, मुलगा पोरका झाला. कोणी आश्रय देईना. पैशाशिवाय आश्रय, श्री रामा वांचून, कोण देणार! मुलगा दारोदार भटकूं लागला. ही त्याची दुर्दशा पाहून, जगज्जननी अन्नपूर्णेला त्याची दया आली.

*(१) "पंद्रह सौ चौवन विषे, कालिंदीके तीर। श्रावण शुक्ला सप्तिमी, तुलसी धरेउ शरीर॥

तो जेथें असेल तेथें ब्राह्मण स्त्रीच्या वेषांत जाऊन, मुलास जेवूं घालून ती नित्य निघून जाऊं लागली; पण तपास करून सुद्धां ही स्त्री कोण कोठली कोणास पत्ता लागेना. या स्थितींत दोन वर्षे निघून गेली. आठवें वर्ष लागलें. उपनयनाचा व विद्याभ्यासाचा काळ प्राप्त झाला. अनाथनाथास तजवीज करावी लागली.

गुरुप्राप्ती व उपनयन :—आपल्या प्रियेचें हें व्रत अखंड चाललेलें पाहून कैलासनाथांना वाटले कीं, आतां या मुलाची सर्व व्यवस्था लावलीच पाहिजे. त्यांनीं श्री नरहर्यानन्दांना दृष्टांत देऊन सांगितलें कीं, हरिपूरच्या ब्राम्हण बालकास शोधून आणा व त्याचें उपनयन करून त्यास वैष्णवदीक्षा द्या; व मी सागितलेले रामायण त्यास सांगा. दिव्य दृष्टि प्राप्त होऊन त्याचा तो पुढें चांगला विस्तार करील. श्री नरहर्यानंद हे श्री रामानुज सांप्रदायां-तून निघालेल्या श्री रामानंद सांप्रदायांतील एक महाभगवद्भक्त, ज्ञानी महापुरुष होते. हेच श्री तुलसीदासांचे गुरु. या आज्ञेप्रमाणे श्री नरहरीजींनीं तुलसी दासास शोधून काढून, हरिपूरच्या लोकांच्या परवानगीनें अयोध्येस आणिले. त्याचे नांव रामबोला असें ठेविलें. संवत् १५६१ माघ शु।। ५ ला त्यांचा उपनयन संस्कार झाला. रामबोलानें कोणी न शिकविनांच गायत्री मंत्राचा शुद्ध उच्चार केला. नरहरी स्वामीनीं वैष्णव संस्कारयुक्त श्री राममंत्राची दीक्षा दिली. त्यानंतर दहा महिने अयोध्येंत " हनुमान टीळा " या ठिकाणीं निवास झाला. रामबोला गुरूजवळ विद्याध्ययन करूं लागला. धारणशक्ति अलौकिक असल्यामुळें अध्ययन झपाट्यानें सुरूं झालें. एकपाठी असल्यानें अध्ययनास फारच अल्प वेळ लागे. बहुतेक समय गुरुसेवेंतच जाऊं लागला. परमार्थांतील सर्वांत सुलभ पण प्रभावशाली कोणतें साधन असेल तर हेंच. श्री रामायणांत गुरुसेवेचें महत्व जागजागीं तुलसीदासांनीं वर्णन केलेले, अर्थानच त्यांच्या स्वानुभवाचेच बोल आहेत. आधी केलें व मग सांगितलें. एक दिवस गुरूंचे पाय चेपीत असतां रामबोलानें जन्मापासूनची आपली सर्व करुण कहाणी सांगितली. ती ऐकतां ऐकतांच गुरूंचें हृदय भरून आलें; अश्रू वाहूं लागले; बोलवेना. त्या वेळच्या त्यांच्या व तुलसीदासाच्या अन्तःकरणाच्या स्थितीचें वर्णन कोण कसें करणार ! असले अनुभव ज्यांना आले असतील त्यांनाच कांहीं कल्पना येईल.

रामायण श्रवणः—हेमंत ऋतू येतांच गुरु–शिष्यांच्या जोडीनें अयोध्येंतून प्रयाण केलें व तीर्थयात्रा करीत ते वराहक्षेत्रांत (सोरों) येथें आले. तेथें उभयतां जप, तप, स्वाध्यायानुष्ठान करूं लागले. तेथें नरहरींना विश्वेश्वराच्या आज्ञेचें स्मरण झालें व त्यांनी तुलसीदासांना श्री रामचरित सांगितलें.

काशींत शास्त्राध्ययनः—कांहीं दिवसांनीं गुरु–शिष्य काशी क्षेत्रांत आले. तेथील महाविद्वान पंडित शेष सनातनजी, यांनीं तुलसीदासांची असामान्य बुद्धिमत्ता पाहून त्यांच्या गुरूंच्या परवानगीनें त्यांस आपल्या जवळ ठेऊन घेतलें; व वेद, वेदांग, शास्त्र इत्यादिकांच्या अध्ययनास सुरवात झाली. तुलसीदास पंधरा वर्षें तेथें राहिले. अशा असान्य बुद्धीच्या वैराग्यशील, भक्तिप्रधान अंतःकरणाच्या १०।११ वर्षांच्या विद्यार्थ्यानें असामान्य, प्रसिद्ध पंडिताजवळ अखंड पंधरा वर्षे अध्ययन केल्यावर जीं विद्वत्ता प्राप्त झाली असेल तिचें वर्णन कसें करावें? तुलसीदास २५।२६ वर्षांचे झाले व अध्ययन समाप्ति झाली. पण या संगती दोषानें भजनांत शिथिलता उत्पन्न झाली. लौकिक वासना जागृत झाल्या; जन्मभूमीचें स्मरण झालें. ‘ जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ” ही म्हण सार्थ ठरली; व विद्यागुरूंच्या अनुमतीनें श्री तुलसीदास राजापुरास गेले.

जन्मभूमींत निवासः—त्या वेळीं राजापुरांत त्यांच्या घराचे पडके अवशेष तेवढे होते. तपास करितां गांवच्या भाटानें सांगितलें कीं, हरिपुराहून निरोप आल्यावर तुमच्या वडिलांनीं बेपर्वाईचें नकारात्मक उत्तर पाठविलें. तें ऐकून एका सिद्धानें शाप दिला कीं, “ सहा महिन्यांचे आंत तुमचा, व दहा वर्षांचे आंत तुमच्या मुलाशिवाय बाकीच्या वंशाचा नाश होईल. ” त्या प्रमाणेंच घडलें. आतां तुमच्या वंशांत कोणी नाहीं. तुलसीदासानीं श्राद्ध वगैरे सर्व विधि श्रद्धेनें केलें. गांवच्या लोकांनीं त्यांस घर बांधून दिलें. तेथें राहून तुलसीदास लोकांना रामायण सांगूं लागले. एकदां कार्तिक शुद्ध २ ला भरद्वाज गोत्राचा एक ब्राह्मण यमुना स्नानासाठीं सहकुटुंब आला होता. त्यानें कथेचे वेळीं तुलसीदासास पाहतांच कांहीं विशिष्ट संकल्प मनाशीं केला; व तो त्यांची जात, गोत्र वगैरे गोष्टींचा तपास करून घरीं परत गेला.

विवाह व गृहत्यागः—तो गृहस्थ पुन्हां वैशाख महिन्यांत आला व आपली कन्या स्वीकारण्याबद्दल त्यानें फार आग्रह केला; पण तुलसी-

दासांनीं "विवाह कर्तव्य नाहीं" असा स्पष्ट व सडेतोड जबाब दिला. पण प्रारब्धाचा खेळ कांहीं निराळाच होता. तो ब्राह्मण प्रायोपवेशन करून तुलसीदासांच्या दाराशीं धरणें धरून बसला. असल्या तेजःपुंज असामान्य बुद्धिमान, प्रसिद्ध पंडित, भक्तिप्रधान, अशा सात्विक, रूप-संपन्न तरुणाला आपली रूपवान व सत्वगुणविशिष्ट कन्या द्यावी असें निदान त्या जुन्या काळच्या कोणत्या बापास वाटलें नसतें! आतां तसें वाटणार नाहीं, हा कालमहिमा व गुलामगिरी गोड वाटणाऱ्यांच्या मनाचा आत्मघातकी खेळ आहे, ही गोष्ट निराळी. नाइलाजानें व प्रारब्धाची गति विचित्र म्हणून, विवाहाचे तुलसीदासांनीं कबूल केलें. संवत् १५८३ ज्येष्ठ शुद्ध १३ गुरुवारीं रात्रीं त्यांचा विवाह झाला.

आपल्या नवोढा पत्नीस घेऊन तुळसीदास घरीं आले. त्यांची पत्नी फार सुंदर होती. जशी सुंदर तशीच सुशील व पतिपरायण होती. मग काय, हां हां म्हणतां स्वारी मायेच्या नाजुक पाशांत—जसा कमळांतील भृंग—बद्ध झाले. बायकोला, सहा वर्षांत माहेरी जाण्यास परवानगी नाहीं! याच काळांतील आपल्या मनावर झालेल्या परिणामांचें चित्रच जणूं काय अरण्य काण्डांत श्री भगवान व नारद संवादांत भगवंताच्या मुखांतून बाहेर पडलें आहे. अ. का. दोहा ४२ (ख) ते ४४ पर्यंत पहावें. वैराग्य असून सुद्धां, पूर्णता प्राप्त होण्याच्या आधीं स्त्रीपाशांत जीव गुंतला म्हणजे त्याची कशी दैन्यावस्था होते याचें स्वानुभवाचेच ते बोल आहेत. "नारि विष्णु-माया प्रगट" "मायारूपी नारि" इत्यादि रामायणांतील वचनें हीं या काळांतील स्थितीबद्दल पश्चात्ताप निदर्शक आहेत. परंतु जी माया जीवाला संसारांत गुरुफटविण्यास कारण होते तीच ईश्वरानुग्रह झाला म्हणजे सोडविण्यासही कारण होते, याचा पूर्ण अनुभव गोस्वामीं प्रमाणें प्रज्ञानानंदालाहि आहेच आहे. अस्तु.

शेवटीं कंटाळून, श्री भगवंताच्याच प्रेरणेनें एक दिवस पतिराजांस न विचारतांच त्यांची साध्वी पत्नी माहेरी गेली. ब्राम्ह मुहूर्तापासून मध्यान्ह काळा-पर्यंत, यमुना तीरावर जपादिकांत तुलसीदासांची स्वारी गुंतलेली असे. घरीं येऊन पाहतां पत्नी दिसेना; तेव्हा तपास करितां वृत्त समजलें. मग तसेच उपाशी निघाले. कशी तरी यमुना पार करून ते गेले. या बाबतींत प्रचलित असलेली दन्तकथा तुलसीदासांबद्दलची खरी नसून बिल्वमंगल, जे पुढें सूरदास म्हणून

प्रसिद्ध झाले त्यांची ती होय. तुलसीदास स्वपत्नीच्या मोहांत जरी गुरफटले होते तरी त्यांचे पाऊल कुमार्गावर कधींच पडलें नाहीं व स्वकर्मानुष्ठान कधीं सुटलें नव्हतें. रात्रीची वेळ होती; सासुरवाडची मंडळी दरवाजे बंद करून झोंपलेली होती. यांनीं हाक मारतांच पत्नीनें आवाज ओळखला. ही स्वारी आल्याशिवाय राहणार नाहीं हें काय सहा वर्षांच्या सहवासानें तिला कळलें नव्हतें असें थोडेच होतें. खालीं येऊन तिनें दरवाजा उघडला पण नेहमींच्या मधुर शब्दांत महाराजांचें स्वागत न करितां ती म्हणाली कीं, " महाराज, आपण प्रेमानें इतके आंधळे झालांत कीं, रात्र अपरात्र याची सुद्धां तुम्हांस शुद्धि राहिली नाहीं. धन्य आहे ! धिःकार असो ! माझ्या या हाडामांसाच्या शरीरावर जितकें प्रेम करितां, त्याच्या अर्धें जरी श्री रामावर केलें असतें तर या भयंकर संसारांतून मुक्त झालां नसतां काय ?

अस्थिमांसमय देह मम; त्यावरि जितुकी प्रीति ।
तदर्ध जरि रामावरी; होति नष्ट भव-भीति ॥

या प्रमाणें पतीचा धिःकार करणारी ती खरोखरच पतिव्रता होती. विषयांतील कीड नव्हती. पतीचें परम कल्याण कशांत आहे हें तिला माहीत होतें. कदाचित् तिच्या मुखानें सरस्वतीच बोलली असण्याचा संभव आहे. तुलसीदासांना वाटलें, प्रत्यक्ष श्री रामरायाच तिच्या मुखानें बोलत आहेत. झालें; पूर्वसंस्कार जागृत झाले. जसें भूमीत किती व कोणतीं बीजें गुप्तपणें आहेत हें उन्हाळ्यांत सांगतां येत नाहीं; पण योग्य वेळेला पाऊस पडला म्हणजे चटकन् अंकुर फुटून तीं वाढूं लागतात, तसें झालें. व असेंच पुष्कळ चरित्रांत पहावयास सांपडतें. पण कोठें तरी निष्काम, निर्हेतुक प्रेम, लोक लाज वगैरेची पर्वा न करतां, करण्याचा अभ्यास, स्वभाव असेल त्याला ईश्वरी कृपेनें, असें कांहीं कारण घडल्यास, वैराग्य उत्पन्न होऊन भगवद्भक्ति वगैरे प्राप्त करून घेणें सुकर होऊन याच जन्मांत नर जन्माची इतिकर्तव्यता होते. निश्चय झाला व मग एक क्षणहि तेथें न थांबतां तुलसीदास महाराज निघाले. त्यांना नरहरी गुरुंच्या वचनाची स्मृति झाली व त्यांचा मनांत जपच करीत ते पळत सुटले.

नरहरि, कांचन कामिनी यांपासुनि अति दूर ।
जरि इच्छी कल्याण निज; रामदास भरपूर ॥

तुलसीदासांच्या गमनानें त्यांच्या पत्नीस पश्चात्ताप वगैरे झाला नाहींच. कारण ते शब्द तिनें अविवेकाच्या भरांत उच्चारलेले नव्हते.

पत्नीचा मृत्यु:—ही गोष्ट बायकोच्या भावास समजतांच तो मात्र रातोरात धावत निघाला. पण प्रातःकाळपर्यंत तुलसीदासांची गांठ पडली नाहीं. प्रातः काळीं भेट झाल्यावर त्यानें परत फिरण्याबद्दल पुष्कळ आग्रह पूर्वक नाना प्रयत्न करून पाहिले; पण रामभक्तच ते. त्यांचें वैराग्य कांहीं स्मशान वैराग्य नव्हें. त्यांच्या सारखे भक्ति प्रेमापुढें "तृणसमसिद्धि तीन गुण त्यागी" असे विरागी बनतात. विषय प्रेम जितक्या पराकोटीचें असेल तितकेंच किंबहुना अधिकच भगवत्प्रेम उत्पन्न होतें असा अनुभव आहेच. याप्रमाणें पराकाष्ठा-करूनहि ते वळेनात तेंव्हां तो परत गेला व घरीं जाऊन पाहतो तों बहीण जमिनीवर मूर्छित पडली आहे. शुद्धीवर आल्यावर ती म्हणाली " मी आपल्या पतिराजांना उपदेश करून जागे करण्यासाठीं आले होत्ये. ते गेले निघून. आतां मला जगून काय करावयाचें ? " असें म्हणून तिनें देह त्याग केला. ही गोष्ट संवत् १५८९ आषाढ वद्य ९ बुधवारीं म्हणजे विवाहानंतर सहा वर्षें दोन महिन्यांनीं घडली. या सहा वर्षांत स्त्रियांचे बाबतींत आलेले अनु-भवच जणूं रामायणांत सर्वत्र सुभाषितांच्या रूपानें दिसतात.

तीर्थ यात्रा:—श्री तुलसीदास जे निघाले ते आपल्या घरीं,राजापुरला, तेथील व्यवस्था लावण्यासाठीं सुद्धां गेले नाहींत. काय करूं म्हणून कोणाला विचारावयास गेले नाहींत, ते थेट प्रयागाला गेले. तेथें गृहस्थी बाण्याचा (वेषाचा) त्याग करून साधुवेष त्यांनीं धारण केला, व ते तीर्थयात्रेला निघाले. ते अयोध्या, पुरी, रामेश्वर, द्वारका, बदरी नारायण, कैलास, मानससरोवर वगैरे यात्रा करीत करीत साधु संतांच्या भेटी गांठी घेत, काशीस परत आले. मानससरोवरा-जवळच त्यांस प्राचीन संतांची व काकभुशुंडीची भेट झाली. ही गोष्ट आजच्या चिकित्सक बुद्धीच्या, पाश्चिमात्य वाङ्मयानें मलिन दृष्टि झालेल्यांना विश्वसनीय वाटणार नाहीं. पण ज्यांना हजारो वर्षांच्या संतांचीं व योग्यांचीं दर्शनें घ्यावीं असें वाटत असेल त्यांनीं हिमालयांत २७ हजार फूट उंचीवर असलेल्या " ज्ञानगुह्रि " आश्रमांत जाऊन भेटावें. या संबंधीं माहिती टाइम्सच्या " इलस्ट्रेटेड वुइकली " मध्यें कांहीं वर्षांपूर्वीं येऊन गेलेली आहे. गोस्वामीनीं कैलास प्रदक्षिणाहि केली. चरित्रकाराला खोटेंच लिहावयाचें असतें तर कैलास पर्वतावर गोस्वामी गेल्याचें, मंगळावरील

स्वारीचें चित्रमयजगतांत जसें वर्णन आलें होतें तसें श्री. वेणी-माधव दासांनीं केलें असतें. पण ते मिथ्या-प्रलापी वा कादंबरीकार नव्हते. सासुरवाडीहून निघाल्याहासून तीर्थाटण करून काशींत परत येण्यास त्यांस चौदा वर्षे, दहा महिने व सतरा दिवस लागले. वयाच्या ३६ व्या वर्षी गृहत्याग केला व ५१ वे वर्षी ते काशींत आलें.

मारुतीचें दर्शनः—श्री तुलसीदास काशींत येऊन राहिल्यावर प्रतिदिन रामायण सांगत. व अद्यापहि कांहीं लोक तसें करणारे आहेत. काशी क्षेत्रांत म्हणजे वारणा (वरुणा) व अशी (अस्सी) या दोन नद्यांच्या मधल्या क्षेत्रांत, मलत्याग करूं नये असें वचन उपनिषदांतहि आहे. त्या विधीस अनुसरून गोस्वामी दूर जात असत. व शौचानंतर अवशेष जल एका पिंपळाच्या वृक्षाला घालीत असत. त्या वृक्षावर एक पिशाच होतें. त्याची या जलानें तृप्ति होऊन ते एके दिवशीं प्रगट झालें व म्हणालें, " मी तुमच्यावर प्रसन्न आहे, काय पाहिजे तें मागा. " त्यावर तुलसीदास म्हणतात, "श्रीदशरथनंदन रामचंद्राचें दर्शन व्हावें; मला इतर कांहीं नको. " त्यानें सांगितलें कीं, " जर इतकें सामर्थ्य मला असतें तर या नीच योनींत मी कशाला राहिलो असतो. तुम्हांस उपाय सांगतो. तुमची कथा ऐकण्यास प्रत्यक्ष हनुमान रोज येतात. त्यांचा वेष गलिच्छ, अमंगळ असतो, व ते कुष्ठी देहानें येतात. त्यांचे पाय दृढधरा, कबूल केल्याशिवाय सोडूं नका. ते तुम्हांस श्री रामचंद्राचें दर्शन करवून देतील. " तुलसीदासांनीं त्याप्रमाणें करितांच मारुतींनीं सांगितलें, " चित्रकूटास दर्शन होईल. " तुलसीदास चित्रकूटास जाण्यास जाण्यास निघाले.

चित्रकूटास गमन व श्री रामदर्शनः—यात्रेंतील तुलसीदासांच्या मनःस्थितीचें वर्णनच अ. कां. तील सुतीक्ष्णाचें वर्णनाचें निमित्तानें बाहेर पडलें असावें असें नक्की वाटतें. मारुतीच्या वचनावर पूर्ण विश्वास असून सुद्धां, स्वतःच्या पात्रतेबद्दल मन साशंक होऊं लागलें. " हे विधि ! दीनबंधु, रघुराज । शठासि मजला भेटति सहज ! ॥ " " दृढ विश्वास मला मनिं नाहीं । ज्ञानविरति भक्ति न कांही ! ॥ " वगैरे वगैरे. (अ. कां. अ. २ रा. पहा.) जातांना साशंक होऊन कधीं विचारांमुळें गती मंद व्हावी तर कधीं भगवंताच्या दीनदयालुत्वाची स्मृति होऊन धावूं लागावें. कसें तरी ते चित्रकूटास येऊन पोंचले. तेथील रोजचा कार्यक्रम

म्हणजे मंदाकिनीवर स्नान, देवदर्शन, रामायण पाठ, नित्यकर्म व निरंतर मंत्रजप. एके दिवशीं ते चित्रकूट प्रदक्षिणेस निघाले असतां, मार्गांत अनुपम लावण्यखाणि श्री भगवंताचें दर्शन झालें. दोन अत्यन्त सुंदर राजकुमार घोड्यावर बसलेले व धनुष्यबाण धारण करून शिकारीस जात असतांना दिसले. त्यांस पाहून तुलसीदास प्रेममग्न होऊन देहभान विसरले; पण ते कोण आहेत हें जाणूं शकले नाहींत. कोणी म्हणतील न जाणतांच प्रेम कसें उत्पन्न झालें? तुलसीदास प्रेममग्न होतील यांत नवल नाहींच कारण ते भक्ति-प्रधान ज्ञानी होते; पण जनकासारख्या सदा ब्रह्मानंदांत मग्न असणाऱ्याचें मन सुद्धां, न जाणतांहि भगवन्ताच्या सौंदर्यावर कसें लुब्ध झालें तें त्यांच्याच जबानींत (बा. कां. अ २५ दो. ११५ ते २१६) पहा. "सहज विरागरूप मम चित्त। इंदु चकोरा समान थकित॥ यांसि विलोकुनि अति अनुरागी। ब्रह्मानंद बळें मन त्यागी॥ अस्तु. तेव्हां प्रगट होऊन हनुमंतांनीं सर्व मर्म सांगितलें. भक्तांना असे अनुभव येतात ही गोष्ट आजहि खरी आहे. तुलसीदासांस पश्चात्ताप झाला. हनुमंतांनी आश्वासन देऊन सांगितलें कीं, "उद्यां प्रातःकाळीं दर्शन होईल." हें ऐकून तुलसीदासास धीर आला. संवत् १६०७ त मौनी अमावास्येचे दिवशीं* बुधवारीं प्रातःकाळ होतो न होतो तोंच भगवंताच्या दर्शनलालसेनें विव्हल होऊन ते सर्वत्र निरखून पाहूं लागले; इतक्यांत भगवान् प्रगट होऊन म्हणतात, "बाबा! आम्हांला चन्दन द्या." जवळच मारुतिराय शुकाच्या रूपानें वृक्षावर, ह्या भक्त-भगवंतांच्या लीला पहात होतेच. त्यांस वाटलें या वेळीं ओळख पटेल न पटेल, म्हणून त्यांना जागृत करण्यासाठीं सूचना दिली तो दोहा प्रसिद्ध आहे म्हणून मूळचाच देतोः—

"चित्रकूटके घाटपर; भइ संतनकी भीर।
तुलसीदास चन्दन घिसें, तिलक देत रघुबीर॥"

तुलसीदास तृषित नेत्रांनीं, भगवंताच्या मनमोहन, त्रिभुवनसौंदर्य ललामरूप सुधेचें आकण्ठ पान करूं लागले; प्रेम प्रवाह नयनांतून बाहेर पडूं लागले. तुलसीदास देहभान विसरले. आतां चंदन कोण उगाळणार! भगवान पुन्हां म्हणतात "बाबा! मला गंध लावा." पण ऐकण्यास

---

* माघ वद्य ३० म्हणजेच आपल्याकडील पौष वद्य ३०.

तुलसीदासांचे मन कानांत नव्हतें. तें भगवत्प्रेमसागरांत बुडून तेथेंच स्थिर झाले होतें; त्यांचा देह बेशुद्ध अवस्थेंत पडला होता. कृपाळु भगवंतांनीं आपल्या हातांनीं चंदन घेऊन तुलसीदासांच्या व आपल्या कपाळीं लावून ते अंतर्धान पावले. नंतर शुद्धीवर आल्यावर तुलसीदास माशा सारखे विरहानें तमळ्ळूं लागले. अशास्थितींत सबंध दिवस निघून गेला तरी दाद नाहीं. नाइलाज म्हणून रात्रीं हनुमान प्रगट होऊन, तुलसीदासास पूर्ण शुद्धीवर आणिले. असें कसें होतें, हें कामी, विषयीं जीवांस कसें समजणार? " येथें पाहिजे जातीचें, येरा गबाळाचें काम नाहीं. "

प्रसिद्धि व राम चरित्र दर्शन:—या घटनेनंतर हळूं हळूं तुलसीदासांची कीर्ति सर्वत्र झपाट्यानें होऊं लागली. गावांतील स्त्रिया पोपटांनां पढवितांना सुद्धां तुलसीदासांचा महिमाच पढवूं लागल्या. कित्येक चमत्कारहि यावेळीं तु. दासांकडून घडले; त्यामुळें त्यांची ख्याति झाली. दर्शनार्थी लोकांची गर्दी होऊं लागली. त्याला कंटाळून ते एका गुंफेंत राहूं लागले. कोणीं येवो, जावो, ते बाहेरच पडत नसत. लोक येऊन निराश होऊन परत जात. दरियास्वामी नांवाचे एक संत दर्शनार्थ एक दिवस आले; नव्हें नव्हें भगवंतानेंच धाडले म्हणावयाचें. दर्शन घेतल्याशिवाय न जाण्याचा निश्चय करून ते गुंफेचे दाराजवळ बसले. गोस्वामी लघुशंकेकरतां बाहेर आले तेंव्हां भेट झाली. नंतर दरियास्वामी म्हणाले, " आपण लघुशंकेकरतां बाहेर येतां; आम्हीं आल्यावर येत नाहीं; तेंव्हां आम्ही काय त्याहूनसुद्धां नीच नां! आपण येथें एक उंच माळा बांधून त्यावर बसत जावें. दर्शनार्थी लोक येऊन परभारें दर्शन घेऊन जातील. " तुलसीदासांनां ही गोष्ट कबूल करणें ओघानेंच प्राप्त झालें. माळा बांधून त्यावर बसूं लागले. तेथें बसल्या बसल्या असें घडूं लागलें कीं, त्यांच्या उघडया चर्मचक्षूंसमोर, समोरच्या जंगलांत भगवंताच्या चरित्रांतील निरनिराळया लीला प्रत्यक्ष दिसूं लागल्या. अशा या रामचरित्र लीला चित्रकूटांत प्रेमळ भगवद्भक्तांस अद्यापसुद्धां दिसतात, व कृष्णलीला श्रीवृंदावनांत दिसतात. या काळांत, व्रन्दावन मथुरा, वगैरें अनेक क्षेत्रांतून संत महात्मे, तु. दासांच्या दर्शनास येऊन दर्शनानें व संगतीनें कृतार्थ होऊन परत जाऊं लागले. तुलसीदासांचा सांप्रदायहि वाढत चालला. ' मूल गुसांई चरित्राचे ' लेखक पं. वेणी माधवदास यांचीं भेट येथेच झाली.

सुरदास भेट:—संवत् १६१६ त ज्यावेळीं गोस्वामी कामद-* गिरीचे जवळ निवास करून राहिले होते. त्यावेळीं, श्रीगोकुळनाथ, भगवान् कृष्णाच्या आज्ञेनें तु. दासाच्या भेटीसाठीं सूरदास हे प्रसिद्ध कृष्णभक्त आले. त्यांनीं आपला प्रसिद्ध ग्रंथ "सूरसागर" तुलसीदासांस दाखविला व त्यांतील दोन चार पदें म्हणून दाखविलीं. तुलसीदासांनीं ग्रंथ पोटाशीं धरून कवटाळला, व भगवान कृष्णाचें माहात्म्य खूप वर्णन केलें. "सूरसागर" हा ग्रंथ काव्यदृष्टया फारच उत्तम असून भगवत्प्रेमाचा तो सागरच आहे. नाथांच्या गौंळणी व श्रीज्ञानेश्वरांच्या गौळणी कांहीं बाबतींत तुल्य ठरतील. तु. दासांनीं सुरदासजींचा हात आपल्या हातांत धरून त्यांस संतुष्ट केलें. या उभय भगवद्भक्तांचे सात दिवस भगवच्चर्चेत अपार प्रेमांत गेले. श्री. तुलसीदासांनीं श्रीगोकुळनाथांस एक पत्र लिहून दिलें व भक्त सुरदास परत गेले.

मीराबाईचें पत्र:—सुखपाल नांवाचा ब्राह्मण, मेवाडाहून "मीरा-बाई" चें पत्र घेऊन, याच काळांत तुलसीदासांकडे आला. तें पत्र वाचून त्याचे उत्तर म्हणून जें पद तयार करून दिलें त्याचें धृपद उत्तर हिंदुस्थानांत सर्वतोमुखी आहे. तें पद व त्याचा मराठी अनुवाद खालीं देतो. त्यावरून श्रीतुलसीदासांस काय प्रिय होतें तें समजेल. ज्या अक्षरांखालीं रेघ दिली आहे ती ऱ्हस्व वाचावी. प्रश्न असा होता कीं मी स्त्रीधर्म पाळूं कीं भगवंताच्या अव्यभिचारी भक्तीचे अवलंबन करूं ? मीराबाई, "गिरीधरलाल गोपाल'ची उपासक असून तिनें मनानें बालपणांतच भगवंताला आपला पती मानिला होता. तिचा नरतनुधारी पुरुषासी विवाह तिच्या इच्छेविरुद्ध जबरीनें झाला होता. "देव जोडे तरी, करावा अधर्म" हें तुकाराम महाराजांचे वाक्यहि वाचकांनीं ध्यानांत ठेवणें जरूर आहे.

उत्तरः—राग.—जाके प्रिय न रामवैदेही ।

तजियें ताहि, कोटिवैरीसम, यद्यपि परम सनेही ॥ १ ॥ धृ. ॥
तजो पिता, प्रल्हाद, बिभीषण, बंधु, भरत महतारी ।

---

* चित्रकूटाच्या ज्या शिखरावर श्रीरामचंद्र रहात होते त्यालाच 'कामदागिरी' असें नांव पडलें. काम्तानाथगिरी असेंहि त्यास म्हणतात.

बलि गुरु तजो, कंत ब्रजबनितन्हि, भये मुद मंगलकारी ॥ २ ॥
नाते नेह, रामके मनिअत, सुहृद सुसेव्य जहाँ लौं ।
अंजन कहाँ, आँखि जेहि फूटै, बहुतक कहाँ कहाँ लौं ॥ ३ ॥
तुलसी सो, सबभाँति परम हित, पूज्य प्रानते प्यारो ।
जासो होय, सनेह रामपद, एतो मतो हमारो ॥ ४ ॥

अनुवाद:—राग.—ज्याचे, प्रिय न राम–वैदेही ।
त्यजणें त्यासिं, कोटि वैऱ्यांसम, यद्यपि परम स्नेही ॥ धृ. ॥ १ ॥
त्यजी पिता प्रल्हाद, बिभीषण, बधु, भरत माताही ।
बलि गुरु त्यजी, पती ब्रजवनिता, पावति मोद हिताही ॥ २ ॥
नातें स्नेह, प्रभूचे माना, सुहृद सुसेव्य हि कोणी ।
अंजन कसें नेत्र जें फोडी, बहुत वदूं कां वाणी ॥ ३ ॥
प्रज्ञा तो सबरीति परमहित, पूज्य प्राण प्रिय तो हो ।
जेणे होय प्रेम राम पदि, हेचि आमुचे मत हो ॥ ४ ॥

पहिले दोन ग्रंथः—एक मुलगा भर दुपारीं येई व आपल्या मधुर निर्विकार कंठानें तुलसीदासांना सुंदर सुंदर पदें म्हणून दाखवी. एकदां त्यावर प्रसन्न होऊन गोस्वामींनी त्यास दोन नवीन पदें तयार करून लिहून दिलीं. तीं त्यानें पाठ करून दुसऱ्याच दिवशी म्हणून दाखविलीं, व हट्ट धरिला कीं आणखी नवीन पदें लिहून द्या. निर्विकार वृत्तीच्या बालकांवर संतांचें तेव्हांच प्रेम जडतें. त्याप्रमाणें तीं लिहून देण्यांत आलीं. आतां हा क्रमच सुरू झाला. श्रीरामाचा खेळ कसा असतो पहा! त्या बालकाच्या निमित्तानें श्रीगोस्वामींच्या काव्य प्रतिभेस प्रेरणा मिळून ग्रंथ निर्माण होऊं लागले. संवत १६२८ म्हणजे वयाच्या ७४ व्या वर्षी हीं सर्व पदें ठाकठीक करून "श्रीराम गीतावली" व "श्रीकृष्ण गीतावली" हे ग्रंथ तयार झाले. नंतर ते हनुमंतास गाऊन दाखविले. त्यांनीं प्रसन्न होऊन आज्ञा दिली कीं, "तुमची बदली आतां अयोध्येंत झाली आहे" आज्ञेप्रमाणें गोस्वामी चित्रकूट सोडून अयोध्येस जाण्यास निघाले

प्रयागांत रामायण श्रवणः—गोस्वामी अयोध्येस जावयास निघाले त्या वेळीं प्रयागास कुंभ मेळा होता म्हणून कांहीं दिवस ते तेथें राहिले. सातवे दिवशीं एका वटवृक्षाखालीं त्यांस दोघा मुनींचें दर्शन झालें.

ते केवळ तपोमूर्तीच दिसत असून त्यांच्या मुखमंडलावर अलौकिक तेजाची, जणूं काय ज्योतीच दिसत होती. त्यांस प्रणाम करून गोस्वामी दूर उभे राहिले. त्यांनीं जवळ येऊन बसण्याबद्दल खुणेनें सुचवून आसन दिलें; परंतु गोस्वामी आसनावर न बसतां, जवळच भूमीवर बसले. त्यांच्या गुरूनीं, सूकर क्षेत्रांत जीं कथा लहानपणीं सांगितली होती, तीच कथा त्या उभयतांमध्यें त्यावेळीं चालली होती. तुलसीदासांनीं विचारल्यावरून मुनींनीं सांगितलें कीं, " ही कथा प्रथम भगवान् शंकरांनीं रचिली. त्यांनीं ती पार्वती व काकभुशुंडी यांना सांगितली. मी (याज्ञवल्क्यानें) काकभुशुंडी जवळ श्रवण केली; व आतां या भरद्वाजमुनींना सांगत आहें. कथा समाप्त झाल्यावर गोस्वामी आपल्या ठिकाणीं गेले. दुसरे दिवशीं त्याच वेळीं जाऊन पाहतात तों, त्या ठिकाणीं तो वृक्ष नाहीं वा मुनीहि नाहींत. गोस्वामींस फार आश्चर्य वाटलें व भगवंताच्या कृपेची ही लीला आहे असें जाणून त्यांस समाधान झालें.

श्री उमामहेश्वर दर्शन व आज्ञाः—नंतर ते काशीस जाण्यास निघाले. वाटेंत अनेक चमत्कारिक घटना झाल्या. काशीस गेल्यावर प्रल्हादघाटावर, एका ब्राम्हणाच्या घरीं तें राहिले. तेथें त्यांस कवित्व स्फूर्ति झाली व त्यानीं संस्कृतांत श्री रामायण–रचना करण्यास सुरवात केली. आश्चर्य हें कीं, दिवसा जेवढें लिहावें तेवढें सर्व दुसऱ्या दिवशीं गुप्त व्हावें. या प्रमाणें क्रम चालला. कवित्व स्फूर्ति प्रासादिक कवींना सुद्धां रोजच होते असें नाहीं. तो एक विशिष्ट काळ असतो. त्यावेळीं लिहावयाचें नाहीं म्हटलें, व विचार करावयाचा नाहीं असें ठरविलें तरी सुद्धां " बलादिव नियोजित : " तें करावेंच लागतें. नाहींतर कांहीं सुचतच नाहीं. वाचकांपैकीं कांहींना, अल्प कां होईना हा अनुभव असेलच. अशा प्रासादिक स्फूर्तीचे वेळी छंद, मात्रा, वगैरेंचा कांहीं विचार न करितां आपोआप सर्व बरोबर जमतें. अस्तु. तुलसीदासांस काय करावें हें सुचेना. आठवे दिवशीं स्वप्नामध्यें शंकरानीं सांगितलें कीं, " तुम्हीं स्वभाषेंत काव्यरचना करावी. " जागे झाल्यावर शिवपार्वतींनीं प्रत्यक्ष दर्शन पण दिलें, व सांगितलें कीं, " तुम्हीं आपल्या मातृभाषेंत काव्य लिहावें. संस्कृतच्या भानगडींत पडूं नका. जेणें सर्वांचें कल्याण होईल तें करावें; अंधानुकरण करण्याची आवश्यकता नाहीं. माझ्या आज्ञेनें तुम्हीं अयोध्येंत जाऊन रहा व तेथें रामायण लिहा. माझ्या आशीर्वादानें तुमचें रामायण सामवेदासारखें

सफळ होईल. " या प्रमाणें सांगून उमामहेश्वर अंतर्धान पावले व गोस्वामी अयोध्येस गेले.

अयोध्येंत सिध्दपीठ प्राप्तिः—अयोध्येंत गेल्यावर तेथें नित्यक्रम म्हणजे शरयूस्नान, नित्यकर्म करून देवदर्शन घ्यावें व मग मोठ्या प्रेमानें अयोध्येंतील गल्लीगल्लींतून व वनोपवनांतून हिंडावें. एके दिवशीं एक संत त्यांस एके ठिकाणीं घेऊन गेले. तेथें एक सुंदर वृक्षराजी असून मध्यें एक विशाल वटवृक्ष होता. त्याचे खालीं एक सुंदर सुविशाल वेदी होती. याच स्थानाचें दृश्य, चित्रकूटाच्या भगवंताच्या निवास स्थानाचें वर्णन करतांना कवींच्या हृदयांत खास होतें. तें अवश्य वाचावें. (अयो. का. दो. २३६ ते २३७) त्या वेदीवर एक अग्नीसमान देदीप्यमान महात्मा सिद्धासन घालून बसले होते. तें रम्य, प्रशान्त स्थान पाहतांच गोस्वामींच्या मनांत अशी बलवती इच्छा उत्पन्न झाली कीं, येथेंच आश्रम करून रहावें. तुळसीदास त्या महात्म्याजवळ जातांच त्यांनीं आपलें आसन सोडलें व म्हणाले की, " माझ्या गुरूंची आज्ञा आज पूर्ण झाली. त्यानीं सांगितलें होतें कीं ' येथेंच तुलसीदासजी रामायणाची रचना करितील. हें सिद्धपीठ आहे. आदिकवि वाल्मीकी तुलसीदासांच्या रूपानें येऊन प्राकृतांत रामकथेचा विस्तार करितील. ते येतांच हें स्थान त्यांना सोपवून देह सोडून आम्हां-कडे यावें. " इतकें सांगून तेथून उठले व त्यांनीं योगाग्नीनें देहत्याग केला. ही गोष्ट तुलसीदासांच्या डोळ्यांदेखत घडली. याचेंच वर्णन अरण्य कां. दो. ८–९ पहा. तें दृश्य पाहून तुलसीदासांच्या मुखांतून, " भगवंता धन्य आहे तुमची ! " असे सहज उद्गार निघाले. असे हे सर्व योगायोग भगव-दिच्छेनुसार पूर्वनियोजित असतात व त्याप्रमाणें कार्यकारण संबंध जुळून मनुष्य नेमका आकर्षित केला जातो.

श्रीरामचरितमानस रचनाः—श्री तुलसीदास तेथें राहूं लागले. ते एकवेळ फक्त दूध पीत असत. भगवंतावर पूर्ण निष्ठा. संसारचिंतेचा मनला लेश नाहीं. याप्रमाणें कांहीं काळ लोटला; व गोस्वामींच्याच काय पण जगाच्या इतिहासांतील अत्यंत महत्वाचा दिवस उगवला. संवत् १६३१ चा पहिला महिना, नववा दिवस, चैत्र शुद्ध नवमी, उगवला. त्यावर्षी रामनवमीचे दिवशीं अगदीं भगवंताच्या अवतार काळासारखा ग्रहयोग होता. त्या राम-नवमीचे दिवशीं भौमवारीं, प्रातःकाळीं प्रगट होऊन हनुमंतांनीं तुलसी-

दासांस अभिषेक केला. शिवपार्वती, गणेश, सरस्वती, नारद, शेष, यांनीं आशीर्वाद दिले. या प्रमाणें सर्वांच्या आज्ञेनें व आशीर्वादानें, गोस्वामी तुलसीदासांनीं, आपलें नांव अमर करणारें, भगवंताचें अमर चरित्र आपल्या अमृततुल्य अमर वाणीनें, रचना करण्यास प्रारंभ केला. खरोखर त्याची रचना त्यांचें मनरूपी मानसांत भरलेलीच होती; फक्त वैखरी रूपानें बाहेर पडून लिहिण्यास सुरवात झाली एवढेंच. चौदा-पंधरा वर्षांची तीर्थ-यात्रा, त्यानंतर २८ वर्षांची भगवद्भक्ति व तपश्चर्या यानीं परिपुष्ट झालेलें; आपल्या बाळपणापासूनच्या जगाच्या अनुभवरूपी खतानें गोंडस व गुटगुटित झालेलें असें तें बाहेर पडूं लागलें; व दोन वर्षे, सात महिने व सव्वीस दिवसांनीं संवत् १६३३ मार्गशीर्ष शुक्ल ५ ला पूर्ण झालें. अर्थात् वयाच्या ८० वर्षी तें लिहून पूर्ण झालें.

अनुबंध चतुष्टयः—याचें सामर्थ्य काय, याच्या अभ्यासानें काय प्राप्त होतें, हें कोणत्या प्रकारचें काव्य आहे, वगैरेचें विवरण "श्री तुलसीकृत रामायण" या स्वतंत्र प्रकरणांत केलेलें पहावें. त्याचें रहस्य प्राप्त होण्यास काय केलें पाहिजे; त्याच्या अभ्यासाचा अधिकारी कोण; तें प्राप्त होण्यास अडचणी कोणत्या वगैरेचें सुंदर वर्णन गोस्वामींनींच केलेलें बा. काण्ड दो. ३०–४३ मध्यें अवश्य वाचावें व उत्तर कांडांतील १६ वा अध्याय वाचावा, व आपण कोणत्या वर्गांत बसतों हें पहावें. गोस्वामींचें चरित्र वाचून नंतर रामचरित्र वाचल्यास तें अधिकच प्रिय वाटूं लागेल; कारण मुख्य रामकथेचा सांगाडा सोडून बाकी सर्व आपल्याच चरित्रांतील अनुभवांचें चित्रण कवीनें केलें आहे. त्याबद्दल मागें १।२ स्थळीं नामनिर्देश केलाच आहे. अधिक विस्तार करून उतारे देऊन तुलना करण्याचें हें स्थान नाहीं. तो एका स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे. ग्रंथ मंगळवारींच पुरा झाला; व काकतालीयन्याय असो कांहीं असो अनुवादाचा प्रत्येक खंड व समग्र ग्रंथ यांची समाप्तीहि मंगळवारींच झाली. मंगळवार मारुतीचा प्रिय दिवस असल्यामुळेंहि असें होणें संभवनीय वाटतें. अस्तु. ग्रंथ पुरा झाल्यावर देवांनीं पुष्पवृष्टि केली. श्री गजाननानें त्याच्या पांच प्रती करून, सत्य, कैलास, नाग, द्यु व दिक्पाल या पांच लोकांत नेल्या. चहूंकडे आनंदी आनंद झाला. सर्व सांप्रदायिकांनीं त्याचा स्वीकार केला. पुढें हनुमंतांनीं प्रगट होऊन अथ पासून इति पर्यंत तुलसीदासांच्या मुखानें तें श्रवण केलें.

व तुलसीदासांना वर देऊन श्री रामायणाची स्तुति केली. तो ग्रंथच तसा अद्वितीय आहे. राम-चरित-मानस काय आहे, हें जो तो आपापल्या परीनें समजतोच; परंतु त्याचा वास्तविक महिमा; संत–भगवंत कृपांकित कांहीं विरळा भाग्यवान पुरुषांनाच कळला असेल, व ज्यांना कळला त्यांना सुद्धां तो पूर्णपणें शब्दांनीं सांगतां येत नाहीं.

प्रथम श्रवणः—मनुष्यांमध्यें हा ग्रंथ प्रथम श्रवण करण्याचें सौभाग्य, मिथिलेंतील परम संत श्री रूपारुण गोस्वामीजींना प्राप्त झाले. ते नेहमीं विदेह जनकाच्या भावांत मग्न असत. श्री रामचन्द्र प्रभूंना आपले जामात समजून प्रेम करीत असत. त्यांस उत्तम अधिकारी समजून श्री रामायण प्रथम ऐकविलें. त्यानंतर तें अनेकांनीं श्रवण केलें. पुढें भगवंताची आज्ञा झाली कीं, " काशीस जा ". यांत भगवंताचा हेतु एवढाच कीं, काशी सारख्या सरस्वतीच्या निवासस्थानांत, श्री राम-चरित-मानस व त्याचे लेखक यांचा चांगला छल होऊन, त्यांची कसोटी लागून परीक्षा व्हावी. तेणें-करून उभयतांचे माहात्म्य वाढवून, भोळ्या जनतेस गतानुगतिकत्वापासून सोडवून भक्तिमार्गाचा अवलंब करणे सुकर व्हावें. तुलसीदास, आज्ञेप्रमाणें काशीस गेले;

सत्यं शिवं सुंदरंः—काशीस गेल्यावर भगवान विश्वेश्वर व अन्नपूर्णा यांना प्रथम रामायण वाचून दाखविलें. रात्री ग्रंथ श्री विश्वेश्वराचे संनिध ठेवण्यांत आला. प्रातःकाळीं देवद्वार उघडण्याचे वेळीं, काशींतील बडे बडे विद्वान, संन्यासी, साधू वगैरे पुष्कळ मंडळी उपस्थित होती. सर्वांचे देखत द्वार उघडून, पाहतात तों ग्रंथावर " **सत्यं शिवं सुंदरं** " असें लिहिलें असून खालीं " सही, शंकर " असें लिहिलेलें आढळलें; एवढेंच नव्हे तर " सत्यं, शिवं, सुदरं " हे शब्द सर्वांनीं आपल्या कानांनीं ऐकले. झालें बातमी सर्वत्र पसरली. आनंद सागराला भरती आली. जो तो आपा-पलें प्रेम प्रगट करूं लागला; पण हीच गोष्ट विद्वान शास्त्री मंडळींच्या विरोधास व छळास कारणीभूत झाली.

विरोधकांचे प्रयत्न व छळः—श्री रामचरित मानसाच्या प्रसिद्धीनें शास्त्री पंडितांचे उरांत धडकी भरली ! मत्सर, द्वेष, निंदा यांचा अग्नी, धुमसूं लागला. वरील अहंमन्य मंडळींना वाटलें कीं हा भगवत्प्रसादरूप ग्रंथ लोकांच्या हातीं पडल्यास, आम्हांस कोण विचारणार ? आम्हीं निर्माल्यवत्

होणार, औं! जितके शास्त्री तितकी मतें असें छत्तीसाचे आंकड्याप्रमाणें या विद्वान मंडळींचें वर्तन असलें तरी, तुलसीदासांची व त्यांच्या ग्रंथाची निंदा या समान भूमिकेवर, " समान शीले व्यसनेषु सख्यं " या उक्तीप्रमाणें, उभे राहून ग्रंथाचा, फार काय तुलसीदासांसारख्या महा भगवद्भक्तांचा विनाश करण्याचे गुप्त व प्रगट प्रयत्न सुरू झाले. भक्तिरसहीन शुष्क पांडित्याचा हा धर्मच आहे. यांत त्या बिचाऱ्या मायामूढ विद्वान् मंडळींचा कांहींच दोष नाहीं. समर्थ म्हणतातच. " नको शास्त्र अभ्यास वित्पत्ति गोठी। चढे गर्व ताठा अभीमान पोटीं ॥ "

चोरांची योजना:—हा अमूल्य ग्रंथ चोरून आणण्यासाठीं, या शिष्ट समजल्या जाणाऱ्या मंडळीं कडून चोर पाठविले गेले. भाग्य त्या चोरांचें व दुर्भाग्य त्या शिष्ट मंडळींचें! श्याम गौर वर्णाचे, धनुर्धारी, दोन महावीर पुरुष, श्री तुलसीदासांचे कुटीचे भोंवतीं पाहरा करीत असलेले, त्या चोरांस दिसले. त्यांची सावधानता, व त्यांचें तेज व प्रभाव रात्रभर पाहून, व त्यांच्या असामान्य लावण्याचे प्रभावानें, त्या चोरांची मति पालटली. त्यांनीं निष्कपट बुद्धीनें गोस्वामींस भेटून आपण कोण व कां आलों होतों हें सांगून ते पाहरेकरी कोण होते म्हणून विचारले. ऐकतां ऐकतां महाराजांच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा लागल्या, कंठ भरून आला व भगवत्प्रेमसागरांत ते वरचेवर बुड्या मारूं लागले. शेवटीं आवेग कसा तरी आवरून म्हणाले, " तुम्हीं भाग्यवान् आहांत, धन्य आहांत, तुम्हांला भगवंताचें दर्शन घडलें." चोरांनीं तुलसीदासांच्या पायावर डोकें ठेविलें, त्यांनी आपला निंद्य व्यवसाय सोडला व ते गोस्वामींचे शिष्य झाले. चोरांच्या भाग्यानेंच त्या पंडित मंडळींस असली बुद्धि दिली. हा एक चमत्कार असें वाटेल. पण तो चमत्कार नव्हेच. भक्त-प्रेमळ, भक्त-वत्सल, भद्र-रक्षक, भगवंताच्या ब्रीदाचें तें प्रत्यक्ष उदाहरणच. आम्हां सारख्यांना धीर देऊन निर्भय करण्यासाठीं लीलाप्रिय भगवंतांनीं केलेला तो एक खेळ, व त्या चोरांच्या भाग्योदयाचा तो सुयोगच म्हणावयाचा. प्रातः काळीं तुलसीदासांनीं आपल्या कुटींतल्या सर्व वस्तु लुटविल्या, कारण त्या, कुमार्गांनी, लोकांच्या भावना दुखवून संपादन केल्या होत्या म्हणून वा वैतागानें नव्हे तर " माझ्या प्रियरामास रात्रभर थंडी वाऱ्यांत पाहरा करण्याचा जसा त्रास पडला तसा पुन्हां पडूं नये म्हणून. " " किती भार घालूं रघूनायकाला। मजकारणें शीण होईल त्याला " (समर्थ) लगेच

गोस्वामींनीं मूळ रामायणाची एक प्रत तयार केली, व मूळ ग्रंथ आपला मित्र राजा तोडरमल्ल यांजकडे सुरक्षित राहण्यासाठीं नेऊन ठेविला. आतां रामायणाच्या प्रतीवरून प्रती करण्याचें जणूं काय सजीव छापखानेच सुरू झाले. याप्रमाणें रामायणाचा प्रसार जोरांत सुरू झालेला पाहून पंडितांचें पोट फारच दुखूं लागलें. हा पण्डितांचा स्वभाव, एकनाथमहाराज, तुकाराम बुवा, फार काय समर्थांनासुद्धां चांगलाच अनुभवास आला; व तो अद्यापहि बदलला आहे असें नाहीं. व परमार्थी सज्जनांच्या हिताच्या दृष्टीनें तो न बदलणेंच इष्ट आहे.

मारणाचा प्रयोगः—हा प्रयत्न उलट फळलेला पाहून देखील, या मंडळींनीं याहूनहि घोर उपाय योजण्याचें ठरवून तुलसीदासांचा कांटा अजिबातच फेकून देण्याचें ठरविलें. त्या वेळेचे काशींतील प्रसिद्ध सिद्ध मांत्रिक ' बटेश्वर मिश्र ' यांचे पाय या लोकांनीं धरले; व आपल्यावरील संकट निवारण करण्याची गळ घातली. बटेश्वरानें मारणाचा प्रयोग करून, भैरवाला आज्ञा दिली. मंत्र शक्तीनें वश झाल्याकारणानें भैरव तुलसीदासांना ठार मारण्यासाठीं, त्यांच्या आश्रमाजवळ गेले. तेथें जातांच महारुद्र विक्राळ स्वरूपांत गदा घेऊन श्री. गोस्वामींचे रक्षणास उभे असलेले पाहून कांहींहि न करितां परत यावें लागलें, एवढेंच नव्हे तर सर्व हकीगत सांगावी लागली. मारुतिरायांनीं बटेश्वर मिश्रास चांगली तंबी देऊन त्याचीं सर्व विद्या फुकट घालविली. पण ब्राह्मण म्हणून एकवार क्षमा करून जिवंत ठेविला. हे प्रयोग, जारण मारणादि, करणारे लोक अद्यापहि आहेत. वेड लावणें, मूठ मारणें, वगैरे प्रकार त्यांतलेच आहेत. पण अशा प्रयोगांचा भगवद्भक्तांवर कांहीं विशेष परिणाम होत नाहीं हें आज देखील अनुभवसिद्ध आहे. एवढ्यानेंहि या उपद्व्यापी लोकांचे प्रयत्न थांबले नाहींत.

मधुसूदन सरस्वतींचा अभिप्रायः—स्वामी मधुसूदन सरस्वती हे महाविद्वान् असून लोकांत त्यांचा सन्मान होता. त्यांच्याकडे ही मंडळी गेली व म्हणाली कीं, " विश्वेश्वरांनीं तुलसीदासाचे ग्रंथावर सही केली ही गोष्ट खरी, पण ग्रंथ काय किंमतीचा आहे हें कोठें सांगितलें? तेव्हां आपण तो पहावा व तो कोणत्या ग्रंथाच्या तोडीचा आहे तें सांगावें. " स्वामींनीं ग्रंथ मागविला व अथपासून इतिपर्यंत निःपक्षपात बुद्धीनें सूक्ष्म

अवलोकन केलें. त्यांस ग्रंथ वाचून परमानंद झाला, व त्यांनीं ग्रंथावर अभिप्राय लिहिला तो श्लोकः—

आनन्द-कानने ह्यस्मिन् जङ्गमस्तुलसीतरु ।
कविता-मञ्जरी भाति राम-भ्रमर-भूषिता ॥

पंडित मंडळी आल्यावर त्यांस आपला अभिप्राय दाखविला व सांगितलें कीं, " कोणत्या ग्रंथाच्या तोडीचा हा ग्रंथ आहे, याबद्दल श्री विश्वेश्वरासच कां विचारूं नये ? " पंडितांनीं हें कबूल केलें व सर्व जमून एके रात्रीं खालीं राम-चरित-मानस त्यावर इतर ग्रंथ व मग पुराणें, शास्त्रें, स्मृती व सर्वांहून श्रेष्ठ वेद म्हणून ते सर्वांचेवर ठेविले. राम-चरित-मानस ज्या ग्रंथाचे वर किंवा खालीं असेल त्याप्रमाणें उच्च नीच भाव ठरला जाईल असें ठरून, सर्वांचे देखत सावधगिरीनें, द्वार बंद करून पंडित मंडळी पाहऱ्यावर बसली. त्यांनीं तो सर्वांहून निकृष्ट समजून खालीं ठेविला; पण घराच्या पाया प्रमाणें सर्वांना आधारभूत असाच तो होता. प्रात:काळीं द्वार उघडावयाचे वेळीं गर्दी जमली, व द्वार उघडून पाहतात तों, ठरलेल्या निश्चयाचे उत्तर म्हणून, जणूं काय तो ग्रंथ सर्वांचेवर विराजमान झालेला दिसला. सर्व आश्चर्य चकित झाले. सज्जनांना आनंद वाटला. दुर्जनांचा गर्वज्वर कैलासनाथांच्या या निर्णयानें उतरला. निदान त्या वेळे पुरता तरी उतरलेला दिसला. त्यांनीं तुळसीदासांची क्षमा मागितली. संत सदा क्षमाशील असतातच. त्यांस क्रोध, क्षोभ उत्पन्नच होत नाहीं. " निज प्रभुमय बघती जगत कोणां करीति विरोध ?॥ (रामा.) परंतु एवढयानें तुलसीदासांची कसोटी पूरी झाली नाहीं. जितकी परीक्षा व कसोटी जास्त कडक, तेवढी किंमत जास्त हा व्यवहारांतील नियम आहे.

शास्त्रार्थ व परिणामः—बंगालमधील प्रसिद्ध अशा नवद्वीपांतील एक प्रकांड पंडीत श्री रविदत्त यांनी, गोस्वामींची इच्छा नसतांनां त्यांस शास्त्रार्थ करावयास भाग पाडलें. जरी पन्नास साठ वर्षे व्यासंग सुटला होता तरी सुद्धां शेवटीं श्री रविदत्त यांचाच वादांत पराभव झाला. याचा परिणाम एवढाच झाला कीं सदर पंडितास फार दु:ख झालें व सूडाची भावना उत्पन्न झाली. एके दिवशीं गोस्वामी अंधारांत गंगेवर स्नानास जात असतां पं. रविदत्त स्वत:च मारेकरी बनले व लाठी घेऊन त्यांना मारण्यास धावले. पण गदाधारीं हनुमंतास पाहून जीव घेऊन पळाले. लाज वाटली खरी, पण

अंतःकरणांतील भावना पालटली नाहीं. आपला डाव साधण्यासाठीं पं. रविदत्त बाह्य पश्चात्तापाचें सोंग घेऊन गोस्वामींस प्रसन्न करून घेण्याच्या मार्गास लागले. संत बिचारे भोळे असतात. त्यांस सर्वजग आपणांसारखेंच सरळ वृत्तीचें वाटत असल्यानें तेव्हांच प्रसन्न होतात, त्याप्रमाणें त्यास प्रसन्न करून घेऊन वर मागितला, व सांगितलें कीं, " आपण काशीपुरींत राहूं नये. काशी सोडून चालते व्हावें. " गोस्वामी वचनबद्ध झालेले रामभक्त. रामभक्त रामचंद्राचें ब्रीद पाळतात. नाइलाज म्हणून ते जावयास निघाले व विश्वेश्वराचे दर्शन करून म्हणाले. " भगवन्! मला दूर लोटतां! काशींतून हद्दपार करतां, व अपराध नसतांना! ठीक आहे! मी जातो आतां. " याप्रमाणें सांगून गोस्वामी दक्षिण दिशेकडे निघाले. तुलसीदास काशीक्षेत्राच्या बाहेर जातात तोंच, भगवान शंकरांनीं प्रत्यक्ष दर्शन देऊन सांगितले कीं " तुमची काशींत येण्याबद्दलची सर्व व्यवस्था लवकरच करतों, दूर जाऊं नका. " इकडे तुलसीदास निघून गेल्याचें समजतात पं. रविदत्त यांस आनंद झाला. परम दुःख हें दुर्जनांच्या हर्षाचें साधन असतें. रविदत्त विश्वेश्वराच्या दर्शनास गेले. द्वाराजवळ जातांच द्वार आपोआप बंद झालें व आंतून अत्यंत क्रोधयुक्त शब्द कानीं आले. " दुष्टा! जा! जा! धावत जाऊन तुलसीदासांचे पाय धर, त्यांची क्षमा माग; व त्यांना परत काशींत घेऊन ये, व त्यांची सर्व सोय कर, नाहीं तर तुझा नाश झाला म्हणून समज. " काय करणार? आतां पंडितांची पांचावर धारण बसली, गाळण उडाली. जाऊन तुलसीदासांचे पाय धरिले व क्षमा मागितली. काय हें पांडित्य! काय ही विद्वत्ता!! म्हणून तर तुकाराम महाराज म्हणतात; " बरें झालें शूद्र केलों। नाहीं तर दंभें अस्तो मेलों ॥ " यापेक्षां बिचारे निरक्षर भाविक लोक तरी लवकर तरून जातील. अकारण वैर हा दुर्जनांचा स्वभावच. इकडे तुलसीदास निघून गेल्याची बातमी, त्यांचे मित्र तोडरमल्ल यांस समजली, तेव्हां ते स्वतः गेले व फार आग्रह करून त्यांस घेऊन आले व त्यांच्या निवासासाठीं आश्रम व गंगेला घाट बांधून दिला. यालाच अस्सी घाट म्हणतात. हा घाट अद्याप आहे. व तुलसीदासांच्या वेळचें राममंदिरहि आहे. तेथें गोस्वामी राहूं लागले.

विनय पत्रिकाः—एक दिवस रात्रीं कलियुग तलवार हातांत घेऊन आलें, व तु. दासांस दरडावून सांगितले कीं, " तूं आपली सर्व पुस्तकें

पाण्यांत बुडवून टाक, नाहीं तर बजावून सांगतो कीं मी तुला छळल्या-शिवाय राहणार नाहीं. " असे सांगून कलियुग गेलें. गोस्वामींनीं श्रीहनुमंताचें ध्यान केलें, तेव्हां त्यांनी सांगितले कीं, " तें असें ऐकणार नाहीं. तुम्हीं विनयपत्रिका लिहून द्या म्हणजे मग मी त्याचा समाचार घेतो. " त्या वेळीं गोस्वामीनीं आपल्या अनेक ग्रंथापैकीं दुसऱ्या प्रतीचा ग्रंथ "विनयपत्रिका" हा लिहिला. त्यावर भगवान रामचंद्रांनीं आपली सही करून त्यास निर्भय केले. या ग्रंथांत गणेश-सरस्वती पासून बहुतेक सर्व देवतांची स्तुति व प्रार्थना आहेत. शुद्ध शास्त्रीय संगीत पदे आहेत. तीं फारच गोड व रसाळ आहेत. ग्रंथ निदान एकवार तरी अवश्य वाचनीय आहे. अत्यंत हृदयस्पर्शी सुंदर असें हे काव्य आहे. या नंतर तुलसीदासाच्या मागची साडेसाती संपल्या-सारखी झाली. रामायणाच्या लेखना पासून तों विनयपत्रिकेच्या काळापर्यंत सुमारे ७ । ८ । वर्षे तुलसीदासांना अत्यंत तापदायक गेलीं.

दोहावली:—या नंतर तुलसीदासांनीं जनकपुरीची यात्रा केली. जात असतां आपल्या भक्तिबलाने व तपस्सामर्थ्याने निरनिराळ्या व्यक्तींवर झालेली धार्मिक व राजकीय संकटे निवारण करीत ते हरिहरपूरला आले. तेथें जनकनंदि-नीने बालिकारूपांत येऊन आपल्या पतीच्या प्रियभक्ताला खीर खाऊं घातली ! हे गोस्वामींस समजतांच ते प्रेमविव्हळ झाले. पुढें, नबाबानें हरण केलेली कित्येक ब्राम्हणांची वृत्ति, त्यांची त्यांस परत देवविली. संवत् १६४० त काशींत येऊन "**दोहावली**" लिहिली. संवत् १६४१ मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी रविवारीं वाल्मीकिरामायणाचें लेखन संपविलें. यावरून त्यांचे वाल्मीकिरामायणावरील प्रेम व्यक्त होते. विचार करा कीं ८७।८८ वर्षांच्या वयांत जनकपुरी सारख्या डोंगराळ प्रदेशाची अनवाणी पायीं यात्रा करण्या एवढे शरीर सामर्थ्य; व यापुढेहि अनेक ग्रंथ लिहिण्याची शक्ति; वाल्मिकीरामायणांसारखा विस्तृत ग्रंथ लिहून काढण्याचीं चिकाटी व असले कष्ट करून सुंदर अक्षरांत लिहिलेले ग्रंथ, शरण आलेल्यांचें कल्याण व समाधान करण्यासाठीं प्रसाद म्हणून देऊन टाकण्याचे औदार्य; वगैरे गुण, केवळ खऱ्या भगवद्भक्तांच्या ठायींच दिसून येतात. संवत् १६४२ त जानकीनवमीला (वै. शु॥ ९ ला) "**शतसई**" चें लेखन सुरू झाले.

कवित्त:—एकदां काशींत महामारीचा रोग फार जोरांत सुरू झाला. तेंव्हां लोक हवालदील होऊन श्री तुलसीदासांकडे येऊन तो निवारण करण्याविषयीं प्रार्थना करूं लागले. संतांचें चित्त " अन्यदेह विलसत् परितापात् द्रवति " असें असल्यानें, लोकांची केविलवाणी स्थिति पाहून त्यांस दया आली; व त्यानीं विश्वेश्वराची स्तुती केली. तो ग्रंथ " कवित्त " या नावानें प्रसिद्ध आहे. नंतर प्रख्यात कवि केशव याचा गर्व परिहार करून त्यास वाटेवर आणला. पुढें याच केशव कवीला पिशाच्च योनींतून सोडवून त्यास गति दिली. पुढें ज्या कोणावर एकादें मोठें संकट येईल त्यानें आपलें गोस्वामींकडें जावें व त्यांचें पाय धरावे; त्यांनीं त्यास एकदा स्वहस्तलिखित, वाल्मीकिरामायणासारखाहि ग्रंथ देऊन टाकावा; त्याचें संकट निवारण करावे व त्यांस धर्मप्रवण करावा असा परोपकार व धर्मजागृति करण्याचा क्रम, व्याख्यानें वगैरे न देतांच, सुरू झाला. खरोखर तास दोन तास एकाद्या ठिकाणीं जाऊन झोडलेल्या व्याख्यानांनीं धर्म जागृति होत नसून स्वतःच्या आचरणानें व उदाहरणानेंच खरे कार्य होत असतें.

नीमसार व वृंदावनः—नीमसार येथें जाऊन " बनखंडी " च्या आग्रहा वरून बनखंडीची प्रदक्षिणा केली. तेथील तीर्थांचा शोध लावून, त्यांचा जीर्णोद्धार केला. तेथून नंतर वृंदावनांत गेले. तेथील महान् कृष्णभक्त नाभास्वामी यांची भेट घेतली. त्यांनीं गोस्वामींचा चांगला सन्मान केला. खऱ्या भगवद्भक्तांचें अन्तःकरणांत, सांप्रदाय द्वेषाला व तिरस्काराला जागा नसते. ते " अमानी मानदश्चैव मैत्रः कारुणिकः कविः " (श्री. भा.) " अद्वेष्टा सर्वभूतानां " " कोणाही भूताचा न घडो मत्सर " हें तर वर्म आहे. थोडा जरी द्वेष किंवा मत्सर असला तरी समजावें कीं भक्तीचा पूर्ण अभाव, ' कोरडा माळ, ठण् ठण् पाळ ' आहे म्हणून. मग त्यांची लोकांत कितीहि प्रसिद्धी असो, वाटेल तेवढे चमत्कार त्यांचे जवळ असोत; ते कोट्यवधि जन्म भगवंतापासून दूर आहेत व त्यांनीं चित्तशुद्धीसाठीं कर्माचेंच अनुष्ठान केलें पाहिजे. वृंदावनांत आल्यावर श्री तुलसीदास, श्री मदनमोहनजीचे दर्शनास गेले. तुलसीदासांस राम-उपासक जाणून श्री मदनमोहनजी धनुर्धारी राम बनले. ही बातमी वृंदावनांत पसरली; वैष्णवांत मत्सर उठला, ते शंका घेऊं लागले, तेव्हां गोस्वामी म्हणाले कीं, " श्री रामानें आपल्या भक्ताचा पण कधीं नाहीं पुरविला ? " प्रेमळ व दरिद्री आईबाप,

सुद्धां आपल्या लाडक्या लहान मुलांचे हट्ट पुरवितात; मग कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं समर्थ षड्गुणैश्वर्य संपन्न भगवंताला, जगत्पित्याला, तुळसीदासांसारख्या अगर समर्थां सारख्या, आपल्या प्राणप्रिय शिशूंचें कौड पुरविणें काय अशक्य आहे ? समर्थांना तर पांडुरंग, खंडोबा, महालक्ष्मी वगैरे सर्वांनीच रामरूपानें दर्शन जेथें तेथें दिल्याचें प्रत्यक्ष समर्थ वाङ्मयच सांगत आहे. पण विवेक–वैराग्य युक्त होऊन ज्यांनीं संतसंगतींत व संतसेवेंत दृढश्रद्धा प्राप्त करून घेतली; इतर सर्वांचीं आशा सोडून केवळ रामावरच निष्ठायुक्त भक्ति ठेवून, जे भगवंताच्या चरणीं लीन झाले; भगवंताच्या मांडीवरचे अनन्य गतिक शिशु बनले भगवंताचे प्रेमस्तन्य पिऊन त्यांत जे मग्न होऊन राहिले; त्यांच्याशिवाय इतरांस हें कसें अनुभवास येणार ! ! " सरल स्वभाव; न मनीं कुटिलता ! यथा लाभसंतोष सर्वदा ॥ असे जे बनले नसतील त्यांस हें कसें कळावें ? व त्यांचा विश्वास तरीं कसा बसावा ? पण असल्या गोष्टी आजहि घडतात हें विचार सत्य आहे. करून अनुभव घेऊन पहावा.

वृंदावनाहून तुलसीदास चित्रकूटला गेले. आतां ते खरोखरच कल्प-वृक्षाहून महान् झालेले. त्यांनीं कित्येकांना सत्पात्र पाहून दीक्षा दिल्या; तर कित्येकांच्या लौकिक कामनांची तृप्ति केली. केवळ पैशासाठीं मन्दाकिनी नदींत जीव देणाऱ्या ब्राह्मणाला मन्दाकिनींतूनच स्पर्शमणी देववून जगविला.

चमत्कार व कैद:—याप्रमाणें तुलसीदास महाराजांची सर्वतोमुखीं झालेली कीर्ति ऐकून दिल्लीच्या मोंगल बादशहानें त्यांस भेटण्यास बोलाविलें. तुलसीदास दिल्लीस जाण्यास निघाले. वाटेनें कित्येक पिशाच्चांचा उद्धार केला. एका मुलीचें फसवणुकीनें मुलीशीच लग्न झालें होतें, तेव्हां लोकांच्या आग्रहाने दया येऊन त्यानीं श्री राम-चरित-मानसाचें नवाह पारायण, विधियुक्त केलें व त्या मुलीचे स्त्रीपतीस पुरुषत्व दिलें ! वाचक हो ! विस्मय करण्याचें कारण नाहीं. अगदीं अलीकडे गोदूबाईचे गोविंदराव झाल्याचें प्रसिद्धच आहे. वाचक म्हणतील कीं लेखक इंग्रजी न शिकलेला म्हणून असें लिहितो. पण तसें मानण्याचें प्रयोजन नाहींच नाहीं. इंग्लिश शिक्षणानेंच नव्हे तर इंग्लिश लोकांनीं प्रचलित केलेल्या हेतुपुरःसर टाकलेल्या शिक्षणरूपी गळाला अडकलेले हिंदू-लोक-रूपी-मासे धर्म व श्रद्धा या आपल्या सनातन जीवनाला आंचवतात हें खरें असलें तरीं

अपवाद हे असतातच. मेकॉले, ट्रिव्हिलिअन, सर वुइल्यम हन्टर यांचे इ. स. १८१३ ते १८७० पर्यंतचे लेख व रिपोर्ट अवलोकन करावे. म्हणजे ६०००, मैलांवरून आलेल्यांची काळाच्या दृष्टीनें किती दूरदृष्टि होती, व आमची किती संकुचित होती हें समजेल. अस्तु थोडें विषयांतर झालें पण "अंतरीचे धावे स्वभावें बाहेरीं' त्यास काय इलाज! दुर्दैव देशाचें व धर्माचें!! दिल्लीस गेल्यावर बादशहानें सांगितलें कीं, "कांहीं चमत्कार दाखवा." आजचे कोणी प्रसिद्ध संत असते तर "नारळांत नथ" "करंगळींतून गंगा" असे एक ना अनेक चमत्कार करून दाखविले असते; बादशहास खूष करून वार्षिक तनखा मिळवून, कदाचित् बादशहाचे मस्तकावर हातहि ठेविला असता; व आपलें ऐश्वर्य व कीर्ति वाढवून, पुष्कळ यज्ञयाग, ब्राह्मण भोजन; अन्नसंतर्पण केलें असतें. पण संतांस, कांचन केरा पेक्षांहि त्याज्य वाटतें; कारण कचऱ्याच्या ठिकाणीं, अर्थाच्या ठिकाणीं असलेल्या १५ अनर्थांपैकीं एकहि नाहीं. तुलसीदासांनीं साफ सांगितलें कीं "मला चमत्कार नाहीं करतां येत." बादशहानें नाना उपाय करून पाहिले पण तुलसीदास चमत्कार करून दाखवीत नाहींत असें पाहून त्यांची रवानगी कारागृहांत केली. "सदा सर्वदा रामदासांसि पावे। खळीं गांजितां ध्यान सांडोनि धावे॥ (समर्थ) हें ज्यांचें ब्रीद त्या रामभक्त-प्रवर हनुमन्तास हें कसें खपणार? थोड्याच वेळांत रात्र झाल्याबरोबर हजारों वानरें जमलीं व किल्ला व राजवाडा उध्वस्त करण्यास सुरवात झाली. राजवाड्यांत सुद्धां मार, पीट, तोड, मोड, सुरू झाली. बादशहाहि चांगलाच बुकलला गेला. तेव्हां प्रधानाच्या सुचनेवरून, तो आपले हात रुमालानें बांधून तुलसीदासास शरण गेला. त्यांची सुटका करून क्षमा मागितली व पुष्कळ नजराणा पुढें ठेवून त्यांचा मान सन्मान केला. तुलसीदासांनीं द्रव्य घेतलें नाहींच. कांहीं ठिकाणीं उल्लेख मिळतो कीं, तुलसीदासांनीं बादशहास दिल्ली सोडून जाण्यास सांगितलें व त्या किल्ल्यावर भगवंताचें निशाण फड़कविलें; तेव्हां बादशहानें शहाजहानाबाद हें नवें शहर दिल्ली-जवळच वसविलें. पुढें काशीस परत येतांना त्यांनीं कित्येक जड जीवांचा उद्धार केला. तुलसीदासांचें वय ११० चे वर झालें होतें. काशींत आल्या-वर त्यांनीं क्षेत्र संन्यास केला. शरीर वृद्ध झालें होतें; एवढें महाभक्त व ज्ञानी तरीपण माघाच्या महिन्यांत सुद्धां काशीच्या थंडींत, पाण्यांत उभे

राहून सूर्योदयापूर्वीं जप करीत असलेले तुलसीदास सर्वांस दिसावयाचेच. इतका स्वकर्माबद्दल आदर श्रीनाथ-महाराजांसारखा होता. तेथें एका दरिद्री ब्राह्मणासाठीं, गंगेची प्रार्थना करून, प्रवाह मागें सारून, गंगेच्या पात्रांतील भूमि ब्राह्मणास देवविली. एका सती जाणाऱ्या स्त्रीला चुकून आशीर्वाद दिल्यामुळें तिचा पापी नवरा सजीव केला. असे अनेक चमत्कार घडले.

जहांगीराची भेट :— संवंत १६६९ त तोडरमल्ल वारला व नंतर पांच महिन्यांनीं तुलसीदासांनी त्याच्या दोन मुलांच्या वांटण्या करून दिल्या. या गोष्टीवरून असे अनुमान निघतें की, तोडरमल्लाच्या मुलांचाहि बापाप्रमाणेंच तुलसीदासांवर पूर्ण विश्वास होता. नंतर संवत् १७६० त जहांगीर बादशहा झाला; व त्यानें गोस्वामींस विनंती करून, बरेंचसें इनाम व धनदौलत देऊं केली, पण तुलसीदासांनीं त्यांतील कांहीहि घेतले नाहीं. " नरहरि ! कांचन कामिनी, यांपासुनि अतिदूर " या पृष्ठ ८ वरील वाक्याचा परिणाम शेवट पर्यंत टिकला. भक्तांना श्रीराम नाम धनापुढें, धनमदमत्त धनिक लोकांच्या धनाची किंमत ती काय ? " श्री राम—धन सांडुनि; इतर धनीं मन मुळी न मम रमतें, " असा त्यांचा स्वभावच झालेला असतो. म्हणून तर समर्थांनीं श्री चाफळचे मंदिराकरितां, शिवरायांसारख्या शिष्याकडूनसुद्धां द्रव्याचा स्वीकार केला नाहीं. कोट्याधीशाचे मुलानें कधी कोठें दक्षिणा वाटीत असतील ती घेतली आहे काय ? एकदां बीरबलाची गोष्ट निघाली असतां गोस्वामीनी त्यांच्या बुद्धिमत्तेची व वाक्पटुतेची तारीफ केली व म्हणाले कीं, " खेदाची गोष्ट एवढीच कीं, इतकीं बुद्धिमत्ता असून भगवद्भजन केलें नाही." यावरून ठाम निष्कर्ष निघतो की भक्तीवांचून इतर सर्वगुण व्यर्थ आहेत. " भक्ति-हीन गुण शोभति कैसे। लवणविणा बहु भोजन जैसें ॥ (तु. रा.) अशा गुणांस " बहुभूषण-भूषित वर नारी। वसन विना शोभे न, सुरारी ॥ अशी उपमा दिली आहे. इतर संतांचीं वचनें देऊन विस्तार करीत नाहीं. ज्ञानेश्वरांची या विषयींची उपमा अवश्य पहावी.

नामाचा भरंवसा :—एकदां गिरनारचे कांहीं सिद्ध आकाशमार्गानें श्री. तुलसीदासांच्या भेटीस आले. ते तुलसीदासांच्या दर्शनानें प्रसन्न होऊन विचारतात कीं, " तुम्ही कलियुगांत रहात असूनसुद्ध कामाच्या तडाख्यां-तून कसे वाचलांत ? योगबलानें कीं भक्तिबलानें. " तुलसीदासांनीं उत्तर

दिलें, "मला ना योगसामर्थ्य ना भक्तीचें बळ. मला केवळ भगवंताच्या नामाचा भरोसा व आधार." "मुखीं नाम त्यां काम बाधूं शकेना;" "मुखीं नाम नाहीं, तयां मुक्ति कैची"(समर्थ) येथें नामाच्या संबंधें पुष्कळ विस्तार करतां येण्यासारखा आहे पण थोडक्यांत एवढेंच सांगावेसें वाटतें की, नामावर खऱ्या संतांचें प्रेम असतेंच, कारण त्याच्या प्रभावानेंच ते कलियुगांत राहूनसुद्धां त्यांना सत्ययुगांतील समाधान लाभलेलें असतें. नामाचा महिमा ज्याला उमजला त्याला इतर साधनें तुच्छ वाटतात. पण सोप्या व फुकटच्या औषधाची किंमत नसते. शिवाय तो नाम-मंत्र जागृत झालेला मिळणें दुर्लभ; व सत्य, ब्रह्मचर्य इत्यादि पथ्य पालन दुष्कर, त्यामुळें नाम सोपें, फुकाचें, स्वतंत्र, निर्विघ्न, प्रत्यवाय नसलेलें व ऐहिक वा पारमार्थिक वाटेल तो लाभ व्यक्तीला प्राप्त करून देणारें असलें; फार काय योगाभ्यासानें जें जें प्राप्त होतें तें तें सर्व देणारें असून योगविघ्नें त्यांत नाहींत असें प्रभावी जरी असलें तरी अभागी, जीवांचा त्यावर विश्वास बसत नाहीं ! ! तुळसीदासांची नामावर किती निष्ठा होती पहाः—

नामनिष्ठाः— एकदां एक चंद नामक ब्रह्महत्येचें पातक लागलेला ब्राह्मण, तुलसीदासांचे आश्रमापासून दूर उभा राहून "राम, राम, राम" याप्रमाणें श्री रामनामाचा गजर करीत होता. आपल्या इष्ट देवतेचें नाम ऐकून, तुलसीदास प्रेमांत मस्त झाले; व धांवत जाऊन त्यांनीं त्या ब्राह्मणास कवटाळलें; आश्रमांत आणून पंक्तीस भोजन घातलें; आणि प्रसन्नतेनें म्हणतात;

तुलसी ! ज्याचे मुखांतुनी; चुकुनिहि निघतें "राम"
वहाण त्याचे पायिंची; माझ्या तनुचें चाम ॥

किती अलोट नाम-प्रेम हें ! पण ईशप्रेमाचा व्यावहारिक परिणाम म्हणजे पंडितांचा व कर्मठांचा विरोध. झाले, बातमी पसरली; सायंकाळीं ज्ञानी, ध्यानी, योगी, शास्त्री, इत्यादि बडीं बडीं धेंडें एकत्र जमलीं व गोस्वामीकडे येऊन विचारतात, "हा महापातकी प्रायश्चित्ताशिवाय कसा शुद्ध झाला ?" उत्तर, "वेद, पुराणांतून नाममाहात्म्य वर्णिलें आहे तें वाचून पहा." शाहणे म्हणतात, "होय, लिहिलें तर आहे; पण तो अर्थवाद आहे," "रोचनार्थी फलश्रुती आहे. तो सिद्धांत नव्हे. त्या वचनांवर आमचा विश्वास नाहीं." कसा असणार ? "वचनात्प्रवृत्तिर्वचनात्

निवृत्तिः " असें फक्त तोंडानें व्यासपीठावरून सांगणारी मंडळी त्यांचा पशुहत्येनें युक्त अशा मोठमोठ्या यज्ञांच्या फलश्रुतीबद्दल विश्वास असावयाचा. पण रामनामाच्या फलश्रुतीबद्दल विश्वास नसावयाचा. याचेंच नांव कलिमाहात्म्य. नामाच्या महत्वाचे अनुभव आजहि येतात, आले, व पुढेंहि विधियुक्त निष्ठेनें अनुष्ठान करणारांस येतील, असा सानुभव दृढ विश्वास आहे. तुलसीदास तर निर्गुण व सगुण या दोहोंकडून नामासच मोठें ठरवितात. (पहा. बा. का. अ. ३ दो. २२ ते २५). असल्या भक्तिहीन विद्वानांना आपण जाणूनबुजून केलेले पापाचे पर्वत दिसत नाहींत; व संतांच्या नाम-प्रेमाच्या लीलेंत यांना पाप दिसावयाचेंच. न दिसलें तर त्यांच्या पांडित्याचा उपयोग काय? शेवटीं " फलश्रुती सत्य असल्याबद्दल आम्हांस प्रतीति आणून दिलीत तर आम्ही सत्य मानूं." असें त्या मंडळीनीं सांगितल्यावरून तुलसीदासांनीं त्या चंद ब्राह्मणाच्या हातानें श्री विश्वेश्वराचे नंदीस ओला चारा खाऊं घातला. तो त्या पाषाणाचे नंदीनें खाल्ला. तेव्हां मोठा जयजयकार झाला. पंडित मंडळीनीं क्षमा मागितली. एवढ्यानें पंडित लोक मोठे श्रद्धावान व भक्त बनले असें नाहींच; पण तो ब्राह्मण दोषमुक्त झाला; व तुलसीदासांवरचें ग्रामण्य टळलें.

त्रिशूलावर उडी, व रामदर्शनः—एकदां एक ब्राह्मण, " मला रामदर्शन करून द्या " म्हणून हट्ट धरून बसला. तुलसीदासांनीं पिंपळाच्या झाडाखालीं त्रिशूल रोवून त्या ब्राह्मणास सांगितलें कीं " झाडावर चढून या त्रिशूलावर उडी मार, म्हणजे रामदर्शन होईल." ब्राह्मण झाडावर तर चढला, पण दुर्दैवानें उडी मारण्याचें धारिष्ट होईना, मरण्याची भीति वाटली, व खालीं उतरला. याचा अर्थच हा कीं संतांच्या वचनावर पूर्ण विश्वास नाहीं व देहलोभ आहे, तेथें रामदर्शन कसें होणार नाहीं मग जेथें अविश्वास व देहलोभ आहे तेथें रामदर्शन कसें होणार ? हें चाललें आहे तोंच एक घोडेस्वार क्षत्रिय आला. तपास करतां सर्व समजलें, तेव्हां तो वर चढला व उडी मारिली. भगवंतांचें दर्शन झालें. हनुमंतानें त्यास तत्त्वज्ञानाचा उपदेश केला; व तो कृतार्थ झाला. हा चमत्कार नसून महाभगवद्भक्ताच्या शब्दावर विश्वास ठेविला व देहलोभ सोडला म्हणजे कसें कल्याण होतें, हा धडा भगवंतांनीं आम्हां सारख्यांस शिकविला. " हँ हँ ! त्रिशूलावर उडी मारून कुठें देव भेटत असतो " अशा शंकांनीं कांहीं

होणार नाहीं. व त्रिशूलावर उडी मारणें किंवा झाडाच्या फांदीवर पुढें बसून मागें तोडनें पोहतां येत नसतां विहिरींत पडणें वगैरे ईश्वरप्राप्तीचीं साधनें नाहींत हें अगदीं खरें आहे. संतांच्या शब्दावर पूर्ण विश्वास व देहलोभाचा अभाव इत्यादि अनेक गोष्टींच्या संयोगानेंच, असंभव वाटणाऱ्या गोष्टी प्रत्यक्ष घडतात. मनुष्यांचे दृढसंकल्पाचें व आत्मविश्वासाचें सामर्थ्य अनुभवानेंच समजतें. अशाच प्रकारच्या संताज्ञेचें परिपालनाचें प्रत्यक्ष प्रमाणच जणूं काय हा अनुवाद आहे.

इतर ग्रंथः—गीतावली, छप्पया रामायण, बरव्या रामायण, हनुमान चालिसा, हनुमान बाहुक, इत्यादि लहान मोठे भक्ति वैराग्य प्रधान ३२।३४ ग्रंथ तुलसीदासांनीं लिहिले. "हनुमान चाळीसा" व "राम-शलाका प्रश्नावली" हे दोन अगदीं लहान असून सुद्धां फारच प्रभावशाली आहेत. सर्व ग्रंथांचें समालोचन करण्याचें हें स्थान नव्हे.

चरित्राचा हेतुः—हें चरित्र लिहिण्यांत श्री गोस्वामींविषयींची साधार माहिती वाचकांस व्हावी व श्रीराम-चरित-मानसाची पूर्वपीठिका, त्या ग्रंथासाठीं लेखकास किती मोठमोठ्या दिव्यांतून जावें लागलें; व संत हे या प्रमाणें जगाच्या हितासाठीं कसे झटतात; धनदौलत, मानमरातब यांबद्दल ते कसे निरपेक्ष असतात; जनांच्या खऱ्या व शाश्वत कल्याणासाठीं देहाची कुर्वंडी करून, धन—गेहादिकांवर पाणी सोडून सर्वस्व वेंचणाऱ्यांना भगवंताचे साहाय्य कसें मिळतें हेंच संतांच्या चरित्रांवरून पाहावयाचें असतें. "साँग ऑफ् लाइफ्" या इंग्रजी काव्यांत म्हटल्याप्रमाणें भवसागराच्या किनाऱ्यावर भटकणाऱ्या निराश जीवांना आशेचें दान करणारीं पदचिन्हें म्हणजेच संत चरित्रें होत. संतांच्या सारखे अलौकिक गुण प्राप्त करून विश्वाच्या सुखास व हितास यथाशक्ति हातभार लावण्याचा निश्चय वाचकांसहि करतां यावा व त्यानींहि, तरून तारण्याच्या प्रयत्नास लागणें अवश्य आहे; वगैरे गोष्टी वाचकांच्या मनावर ठसविणें हाच हें चरित्र लेखनांत हेतू आहे. तो कितपत साधला हें वाचक ठरवितील. प्रथम लिहिलेल्या चरित्राच्या सुमारें दुप्पट इतकें हें वाढत आलें तरी आतां फार विस्तार न करितांच आवरतें घेऊं. पण उपसंहार करण्याचे पूर्वी रामायणाची भाषा, काव्य, महत्व, उपयुक्तता, प्रसार टीका, वगैरे गोष्टी बद्दल उल्लेख

करणें जरूर होतें, परंतु " तुलसीकृत रामायण " हें निराळें स्वतंत्र प्रकरणच दिलें असल्यानें पुनरुक्तीदोष नको. आतां फक्त तुलसीदासांचा सांप्रदाय व त्यांचीं आध्यात्मिक मतें या विषयीं अगदीं थोडक्यांत विवेचन करून उपसंहाराकडे वळूं.

सांप्रदायः—तुलसीदास हे सांप्रदाय दृष्टया, विशिष्टाद्वैत सांप्रदायाचे, जो श्री रामानुजाचार्यांनीं प्रचलित केला त्या परंपरेंतले, असें बाह्यतः वाटतें खरें; पण रामानुजसांप्रदायांत कांहीं काळानें " रामानंद " सांप्रदाय सुरू झाला; त्यांतील एक महान अधिकारी " नरहर्यानंद " हे तुलसीदासांचे मंत्रदीक्षा गुरु होत. असें जरी असलें तरी श्री राम-चरित-मानसाचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां, व उपक्रम, उपसंहार वगैरें सहा प्रमाणांचा उपयोग निरपेक्ष बुद्धीनें केला असतां, सुज्ञ वाचकांस सहज दिसून येईल कीं, त्यांचीं स्वतःची मतें व अनुभव केवलाद्वैतसिद्धांताचींच होतीं. " ब्रह्म सत्य, जगत् मिथ्या, जीव हा ब्रह्मच आहे अन्य नव्हे " हाच तो सिद्धांत. तुकाराम महाराजहि केवलाद्वैती खरे, पण त्यांच्या काव्यांत सुद्धां " नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितीभाव, मी भक्त तूं देव ऐसे करी " ॥ अशीं संशय उत्पन्न करणारी वचनें आढळतातच. तशींच तीं तुळसीकृत रामायणांतहि दिसतीलच. उ. " जीव किं ईशसमान " " सेवक सेव्यभाव विण भव न तरति उरगारि " वगैरे वचनें जरी आढळली तरी मंगलाचरणांतील " यन्माया वशवर्ति " या श्लोकांत तसेंच इतर अनेक ठिकाणीं जगताचा मिथ्यात्ववाद व जीवब्रह्मैक्य वादच प्रस्थापित केलेला आढळेल. उ. " यदपि मृषा त्रैकालिंही, भ्रम न शके कुणि टाळुं " " यदपि मृषा छूटत कठिणाई "

" यत् सत्वात् अमृषा एव भाति सकलं रज्जौ यथा अहेः भ्रमः । "

" स्वप्नीं होइ भिकारि नृप, रंक नाकपति होइ, जागृति लाभ न हानि मुळीं प्रपंच तैसा पाहि." " जड चैतन्या ग्रंथी पडली, यदपि मृषा तरि सहज न सुटली." रज्जुसर्प, शुक्तिका रजत, स्वप्न भ्रम, इत्यादि दृष्टांत अनेक ठिकाणीं आले आहेत " जास्त उतारे नकोत, वाचकांस रामायणांत दिसेलच. असा त्यांचा सिद्धान्त असला तरी भक्तीचा ओढा फार, मात्र ही साधन भक्ति नसून ज्ञानोत्तर भक्ति, जिला कोणी प्रेमलक्षणा भक्ति

म्हणतात, नाथ पांचवा पुरुषार्थ किंवा निर्गुण भक्ति म्हणतात तीच तुलसीदासांची भक्ति होय. ज्ञानाशिवाय ही भक्ति प्राप्त होत नाहीं. नुसत्या ज्ञानाची, अगर मोक्षाची, श्री भागवतकारांप्रमाणें त्यांनांहि किंमत नव्हती. या बाबतींत श्रीमद्भागवत व तुलसीकृत रामायण, यांतील उतारे देऊन तुलना करणें हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे. नाथांप्रमाणेंच भक्तिहीनांस पशूचीच उपमा दिलेली आहे. तुलसीदासांची वैराग्याची व्याख्या पहा. " तोचि म्हणावा परम विरागी। तृणसम सिद्धि, तीन गुण त्यागी ॥ " म्हणजे भगवतगीतेच्या १४ व्या अध्यायांतील गुणातीतता तेंच तुलसीदासांचें वैराग्य.

ज्ञानाची व्याख्याः—" ज्ञान मान जहँ एक नाहीं। देखहि ब्रह्म समान जगमाहीं " अशा रीतीनें पाहिलें तर तुळसीदासांची मतें महाराष्ट्रांतील संत श्रीज्ञानेश्वर, नाथमहाराज, तुकारामबोवा, श्रीसमर्थ, यांच्या मतांशीं तंतोतंत जुळतीं आहेत. काल परिस्थितीप्रमाणें प्रत्येकाची मांडणी करण्याची पद्धति निराळी इतकाच औपाधिक भेद. तुलसीदासांच्या मतें भक्ति स्वतंत्र असून ज्ञान विज्ञान इत्यादि भक्तीच्या आधीन आहेत. संत कृपेशिवाय भक्तीची प्राप्ति होत नाहीं. भगवत्कृपेशिवाय विमल संतांची भेट होत नाहीं. भक्ति प्राप्तीस्तव गोस्वामी साधनपरंपरा सांगतात ती अशी:—प्रथम विप्रसेवा. नंतर स्वकर्मानुष्ठान, त्यापासून वैराग्य, पुढें संतसंगति साधनभक्ति, ज्ञान, व नंतर जीवन्मुक्ति; मग विदेहमुक्ति व सर्वोपरि विमल भक्ति अशाच भक्तींत मग्न असणारे गोस्वामी होते. " मी माझें, तूं तूझें हीच माया." " गो-गोचर जहंलगि मन जाई, सो सब माया, जानहु भाई." निर्गुण व सगुण यांत भेद नसून जळ व जळगार याप्रमाणें अभेद आहे. असा त्यांचा सिद्धांत. अस्तु. तरी पण विस्तार झालाच.

युगपरिवर्तन करणाऱ्या व्यक्तीचे हातीं एकतर राजसत्ता अगर अलौकिक तपश्चर्या वगैरे कांहीं तरी विशेष, असाधारण सामर्थ्य लागतें. चमत्काराशिवाय, राजसत्तेशिवाय वा आत्मतेजाशिवाय कोणी लवेल वा वळेल हें शक्य नाहीं. पण ज्यावेळीं भगवंताच्या इच्छेनें वा कृपेनें प्रेमाचें साम्राज्य हृदयावर चालविण्याचें भाग्य कोणास लाभतें तेव्हां ते जगांत प्रसिद्धीस येतात. बाकीचे जरी संत या दृष्टीनें सारखेच असले तरी गहन अरण्यांतील

जाईच्या फुलांसारखे फुलून सुकून जातात. तर कांहीं समुद्राच्या तळाशीं असलेल्या दिव्य रत्नांप्रमाणें चमकतात; पण त्यांचा प्रकाश जगास दिसत नाहीं. जगाला ज्यांचा, जितका जास्त उपयोग झाला; निदान झाल्या सारखा भासला, ते प्रसिद्धीस आले. प्रसिद्धि, कीर्ति, सामर्थ्य, चमत्कार इत्यादिक गोष्टींचा संबंध देहोपाधीशीं आहे हें निदान पारमार्थिक हिता-कांक्षी व्यक्तींनीं विसरणें हितावह होणार नाहीं. कीर्ति कितीहि निर्मळ, व अपार असली तरी ती उपाधिजन्य असल्यानें शाश्वत व व्यापक नाहीं. फक्त तर–तमभाव असणार इतकेंच. कीर्तीची लालसा हा तर परमार्थांतला फारच मोठा खाडा होय.

उपसंहारः—चरित्र नायकाच्या अवतार समाप्तीची वेळ जवळ आली. समय जाणून ते लोकांस म्हणाले, " श्री रामचंद्राच्या चरित्राचें वर्णन करून आतां मी शांत होऊं इच्छितो; माझ्या मुखांत आतां तुलसीपत्र व सोनें घाला. " असें सांगून कांहीं वेळानें गोस्वामींनीं इहलोकची आपल्या अवताराची समाप्ति केली. त्यावेळीं त्यांचें वय १२६ वर्षांचें होतें. प्रसिद्ध अशा संत मंडळींत दीर्घ आयुष्य कोणांसच लाभलें नाहीं. सुश्रुतादि वैद्यकीय ग्रंथ व ज्योतिषशास्त्रसुद्धां पूर्ण आयुष्याची कलियुगांतील मर्यादा १२० वर्षांची सांगतात. तुळसीदासांचें महत्व काय या संबंधीं उतारे निराळेच दिले आहेत.

" संवत सोलहसो असी, असी गंगके तीर ।
श्रावण शुक्ला तीज शनी, तुलसी तजो सरीर ॥

संवत् १६८० श्रावण शुध्द ३ शनिवारीं काशींत अशीच्या तीरावर आपला देह विसर्जन केला.

अनुवादांकरितां जो ग्रंथ घेतला त्यांत बालकांड १६६१ त लिहिलेले, सुन्दरकांड, तुलसीदासांच्या हातचें, अयोध्याकांडहि तुलसी-दासांच्या हयातींत लिहिलेलें व बाकीचीं चार कांडेहि अत्यंत पुराण प्रतीवरून संशोधन केलेलींच आहेत. यांहून जुनें रामायण उपलब्धच नाहीं. जास्त माहिती " कल्याण " च्या मानसांकांत पहावी.

तुल्सीदासांसारख्या विभूतींच्या हातचें फक्त वाल्मीकिरामायण व सुंदर कांड इतक्या दोनच वस्तु उपलब्ध असाव्या, व त्यांच्या हातचें

समग्र रामायण, त्यांच्या पादुका, माळ इत्यादि कांहींच अवशेष राहूं नये हा भारतीयांच्या अनास्थेचा एक नमुनाच आहे.

चरित्र लेखक हा लेखन व्यवसायी नसतांनां किंवा मोठा कुशल, प्रसिध्द कवि नसतांनां सुध्दां, हें सर्व करणें 'सेवकधर्म' या नात्यानें भाग पडलें; त्यामुळें कित्येकांस यांत पुष्कळ दोष दिसण्याचा संभव आहे. तरी पण "संत हंस, गुण घेति पय, त्यजिती वारि, विकार" या नीरक्षीर न्यायानें" सुज्ञ, बुध्दिमान वाचक तें गोड करून घेतीलच. "आपुलेंचि बोलें वाउगें तयाची संपादणी करणें लागे" ही समर्थोक्ती आहे. शिवाय यांत लेखकाकडे कांहींच संबंध नाहीं. सर्व करविता स्वामी माझा राम, योग्यांचा विश्राम आहे. चरित्र अपेक्षेपेक्षां लांब वाटणारांनीं, किंवा अपूर्व वाटणारांनीं लेखकास क्षमा करावी. इतकी वाचकरूपी रामाची प्रार्थना करून म्हणूं याः—

जय जय रघुवीर समर्थ

मिति. माघ शु॥ ८ शके १८६७
शनिवार दि. ९।२।४६
चास—कमान, जि. पुणे

प.प. **स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती**
(पूर्वाश्रमीः-**दत्तात्रय नारायण कर्वे**
बी. ए. एस. टी. सी.
(ईश्वरदास रामदासी)



॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ श्रीराम-चरित-मानस ॥

॥ प्रथमः सोपानः ॥

॥ बालकाण्डम् ॥

(अध्याय १ ला.)

आर्या– *रामनाममहिमज्ञं, पूज्याग्र्यं विघ्ननाशनं देवं ।
करिवरवदनं वन्दे, वाचासदनं सरस्वतीं चैव ॥ १ ॥
*रामभक्तवर-वन्द्यं, रघुवरभक्तार्तिनाशनं धीरं ।
वन्दे रघुवीरनुतं, भक्तानां रक्षकं महावीरम् ॥ २ ॥
*शरदम्बराभनीलं, शरत्सरोरुह-सुरम्य-मुख-कञ्जं ।
रामं हरिहरवन्द्यं, वन्दे वाल्मीकि-विमलवागीड्यम् ॥३॥
*आद्य-कवेरवतारं, भवतारक-राम-चरित-विस्तारं ।
कामारि-प्रिय-भक्तं, तुलसीदासं नमामि साष्टाङ्गम् ॥४॥
*यस्याशीर्वाद-घनो, रामचरित्राम्बुवृष्टिना हृदयं ।
पूरितवानस्माकं गङ्गादासं नमामि भक्त्या तम् ॥५॥

वसं. ति. *यत्पाद-पङ्कज-पराग-पवित्र-मौलि– ।
भूयो न पश्यति नरो जठरं जनन्याः ॥
तं वासुदेव-मजमीशमनन्त-बोधं
श्रीमद् गुरुं शरणदं प्रणतोऽस्मि नित्यम् ॥६॥

---

* अशा खुणा केलेले श्लोक अनुवादक–कृत आहेत.

अनु. *तुलसी-मंजरीगन्धो भक्ति-भ्रमर-भूषितः
रामाज्ञया स्वभाषायां अज्ञानेन वितन्यते ॥ ७ ॥

वर्णानामर्थसंघानां रसानां छन्दसामपि ।
मङ्गलानाञ्च कर्तारं वन्दे वाणीविनायकौ ॥ १ ॥
भवानी-शङ्करौ वन्दे श्रद्धा-विश्वासरूपिणौ।
याभ्यां विना न पश्यन्ति, सिद्धाःस्वान्तस्थमीश्वरम् ॥२॥
वन्दे बोधमयं नित्यं गुरुं शङ्कररूपिणं ।
यमाश्रितो हि वक्रोऽपि चन्द्रः सर्वत्र वन्द्यते ॥ ३ ॥
सीताराम-गुणग्राम-पुण्यारण्य-विहारिणौ ।
वन्दे विशुद्ध-विज्ञानौ, कवीश्वर-कपीश्वरौ ॥ ४ ॥
उद्भव-स्थिति-संहार-कारिणीं क्लेश-हारिणीं ।
सर्वश्रेयस्करीं सीतां, नतोऽहं रामवल्लभाम् ॥ ५ ॥

शा. वि. यन्मायावशवर्ति विश्वमखिलं, ब्रह्मादि-देवासुरा ।
यत्सत्वादमृषैव भाति सकलं रज्जौ यथाहेर्भ्रमः ।
यत्पादप्लवमेकमेव हि भवाम्भोधेस्तितीर्षावतां ।
वन्देऽहं तमशेष-कारण-परं, रामाख्यमीशं हरिम् ॥ ६ ॥

व. ति. नाना पुराण-निगमागम संमतं यद्
रामायणे निगदितं क्वचिदन्यतोऽपि ।
स्वान्तः सुखाय तुलसी रघुनाथ-गाथा-
भाषानिबन्धमति-मञ्जुलमातनोति ॥७॥

सो— ज्या स्मरणें सिधि[1] होइ; गणनायक करिवरवदन ।
करो अनुग्रह तोहि; बुद्धिराशि-शुभ-गुण-सदन ॥१॥
मूक होति; वाचाळ; पंगु चढे गिरिवर गहन ।
ज्याच्या कृपे, दयाळ; द्रवो सकल कलिमलदहन ॥ २ ॥
नील-सरोरुह श्याम; तरुण-अरुण-वारिज-नयन ।
करो मनेंसि[2] मम धाम; सदा क्षीर-सागर-शयन ॥ ३ ॥
कुन्द-इन्दु-समदेह; उमारमण करुणायतन ।
करि दीनांवरि स्नेह; करो कृपा मर्दन मदन ॥ ४ ॥

१ सिद्धी. २ मनांत.

वन्दूं गुरुपदकंज; कृपासिंधु नररूपहरि ।
महामोह-तम-पुंज; यद्भाषणं रविकर-निकर ॥५॥

आर्या— जो स्मरणें सिद्धी दे; वन्दूं गणनायका गजास्यातें ।
तोचि करील अनुग्रह; जो मति-सागर, गुणां सदन मातें ॥१॥
मूकासी ये वाचा; पंगु तसे चढतिही गिरी गहन ।
जया दयालु कृपे तो; द्रवुनि करो सर्व कलिमलां दहन ॥ २ ॥
नीलसरोजश्यामहि; तरुणारुणवारिजाक्ष मनहरण ।
धाम करो मम मानसिं; सोडोनी क्षीरसागरीं शयन ॥ ३ ॥
कुन्देन्दूपरि कोमल; धवल उमारमण तो कृपायतन ।
स्नेही दीनांचा जो; कृपा करो तोचि मन्मथादहन ॥ ४ ॥
वन्दूं गुरुपदकमलां; नररूपें जो कृपाब्धि अपरें हरी ।
महामोहतमसंघा; जो भास्कर-निकरें, वाक्-करिं निवारीं ॥५॥

वन्दूं गुरुपद; पद्मपरागा । सुरुचि सुवास; सरस अनुरागा
अमृतमुळीमय; चूर्ण सुचारूं । शमन सकल भव,-रुजं परिवारू ॥१।
सुकृत-शंभु-तनु-विमल विभूती । मंजुल मंगल; मोद प्रसूती
जनमन मंजु; मुकुरं,-मल हरणी । शिरीं तिलक; गुणगणवशकरणी ॥ २ ।
श्रीगुरुपदनख; मणि-गण जोती । स्मरतां दिव्य; दृष्टि मन होती
तो प्रकाश हरि; मोह-तमासी । हृदयीं पडतां; बहु-भाग्यासी ॥ ३ ।
उघडे निर्मळ; नेत्र जिवाचा । दुःखदोष हरि; भवरजनीचा
रामचरित-मणि; माणिक दिसती । गुप्त प्रगट; खाणींमधिं असती ॥ ४

दो.— नेत्रिं सुअंजन घालुनी; साधक सिद्ध सुजाण ।
लीला देखति शैलवनीं; भूतळिं भूरि निधान ॥ १ ॥

आर्या— नयनिं सुअंजन घालुनि; साधक वा सिद्ध जे अति सुजाण ।
सहज कौतुकें बघती; शैलवनीं भूतळीं बहु निधानें ॥ १ ॥

गुरुपदरज, मृदु; मंजुल अंजन । नयनामृत दृग;-दोष विभंजन
तत्कृत विमल; विवेक विलोचन । वर्णिन राम; चरित भवमोचन ॥ १
वंदूं प्रथम; महीसुर-चरणां । मोह-जनित बहु; संशय हरणां
सुजन समाज; सकल गुणखाणी । प्रेमें करूं; प्रणाम सुवाणी ॥ २
साधुचरित शुभ; सरिसें कपासी । निरस विशद,गुण,-मयफळ ज्यासी
दुःख सहुनि पर; छिद्र झांकिती । वंदनीय जे; जगिं यश पावति ॥ ३

---

१ कमळ. २ ज्याचें भाषण. ३ दुसरा. ४ समुदाय. ५ फार हुंद
६ रोग. ७ भस्म. ८ आरसा. ९ ठेवा, द्रव्य. १० सारखें.

मुद्मंगलमय; संत समाज । जो जगिं जंगम; सुतीर्थ-राज ।
रामभक्ति जणुं; सुरसरि-धार । सरस्वती जणुं; ब्रह्म-विचार ॥ ४ ॥
विधिनिषेधमय; कलिमलहरणी । कर्म-कथा-जणुं; सूर्यनंन्दिनी ।
हरिहरकथा; सुवेणि विराजे । श्रवणिं सकल मुद; मंगले-दा जे ॥ ५ ॥
वट विश्वास; अचल निज धर्मी । प्रयाग राज; समाज सुकर्मी ।
सर्व सुलभ सब; दिन सब देशां । सादर सेवत; शमनक्लेशां ॥ ६ ॥
अगमं अलौकिक; तीर्थराज हा । प्रगट प्रभावी; सद्यफलद हा ॥ ७ ॥

दो.— समजुनि ऐकति मुदित मन; मज्जति सह अनुराग ।
लाभ चारि फळ याचि तन; साधु समाज प्रयाग ॥ २ ॥

आर्या— श्रवणें अर्था जाणुनि; मुदितमनें मज्जतील अनुरागी ।
साधु-प्रयागिं नर, तनु; असतां होतील चारि फलभागी ॥ २ ॥

मज्जनफळ; दिसतें तात्काळ । काक होति पिक; बक हि मराळ ।
करूं नका कुणि; आश्चर्यातें । गुप्त न सत्संगति माहिमा ते ॥१॥
नारद वाल्मिकि; कुंभज यानीं । कथिली स्वमुखें; आत्म कहाणी ।
स्थल-जल-नभचर; जीव हि नाना । त्रैलोकीं जड; चेतन जाणा ॥ २ ॥
मति कीर्ती गति; भूति भलाई । ज्यां ज्यां यत्नें; प्राप्त यदा ही ।
ते जाणति; सत्संग प्रभाव । लोकीं वेदिं न; आन उपाव ॥ ३ ॥
विण सत्संग; विवेक न येतो । रामकृपेविण; सुलभ नसे तो ।
सत्संगति मुद; मंगल-मूळ । हेचि सिद्धि फळ; साधन फूल ॥४॥
सुधारती शठ; सत्संगानें । लोह हेम हो; मणिसंगानें ।
विधिवश सुजन; कुसंगीं पडती । फणि-मणि सम, निजगुण अनुसरती ॥५॥
विधि-हरिहर कवि;-कोविद-वाणी । सद्वर्णनिं; संकोचा मानी ।
तो मातें; वद,वेलचि कैसा । शाकविक्या मणि,-गुण-गण जैसा ॥६॥

दो.— वंदूं संत समान मन; हित अनहित ना कोण्हि ।
अंजलिगत जैं शुभसुमन; समसुगन्ध कर दोन्हि ॥३(क)
संत सरलमन जगतहित; बघुनी स्वभाव स्नेह ।
विनति परिसुनी द्या रती; प्रभुपदिं निःसंदेह ॥ ३ (ख)

आर्या— वंदूं समचित्तांतें; हित अनहित सज्जनां नसे कोणी ।
अंजलिगतशुभसुमनें; जशि करिती समसुगन्ध कर दोन्ही ॥३ (क)
सरलचित्त सज्जन जन;-हितकर मत्स्नेहभाव जाणोन ।
ऐकूनि शिशु-विनती द्या; रति, रामाचे पदीं कृपादान ॥ ३ (ख)

१ यमुना. २ आनंद, मंगलदायक. ३ दुर्गम. ४ स्नान करितात. ५ ऐश्वर्य. ६ मोठेपणा. ७ होतें. ८ स्पर्शमणि.

अथ खलगण; वंदूं सद्भावें। ज्यांनीं कुरीं; वक्र असावें।
परहित-हानी; लाभ वाटतो। नाशीं हर्ष; विषादिं लाभ तो ॥ १ ॥
हरिहरयश-; राकेशीं-राहु हे। पर अकार्यि भट; दशशतभुजे हे।
दोष बघति पर; दशशत अक्षीं। परहितघृतिं; ज्यांचे मन माशी ॥ २ ॥
उग्र कृशानु; रोष महिषेश्वर। अघ-अवगुण-धन;-धनी धनेश्वर।
धूमकेतुसम; हित सर्वांचे। कुंभकर्णसम; निजोत साचे ॥ ३ ॥
पर अपकारीं; तनू हि त्यजिती। धान्य-नाशिं हिम;-उपल वितळती।
वंदूं खल जणुं; शेष सरोषा। दश-शतमुख; वर्णिति परदोषां ॥ ४ ॥
करूं प्रणति; पृथुराज समानां। परअघ ऐकति; अयुत हि कानां।
पुन्हां इन्द्रसम; विनवूं त्यांतें। संतत सुरानीक; हित ज्यांतें ॥ ५ ॥
वचन वज्रि ज्यां; परमा प्रीती। सहस्राक्षि पर; दोष शोधिती ॥ ६ ॥

दो.—उदासीन,अरि,मित्र, हित;-श्रवणिं जळति खलरीति।
जाणुनि करयुग जोडुनी; दास विनवि सप्रीति ॥ ४ ॥

आर्या—मित्र उदासीन तसे; रिपु-हित परिसोनि जळति खलरीती।
पाणिद्वय जोडुनिया; जाणुनि हें, विनवितो अती प्रीती ॥ ४ ॥

मी अपणापरि; केली विनती। चुकुनी ते नच; अल्प मानिती।
पायसें पाजुनि; प्रीति पोषिला। काक निरामिष; कधीं पाहिला ॥ १ ॥
वंदूं संत; असज्जन चरणां। उभय दुःखप्रद; साम्य पहाना।
विरहें एकहि; प्राणां नेती। दुःख दुजे; मिळतां बहु देती ॥ २ ॥
उपजति एका; ठायिंच वसती। जळू जलज जशि; विभिन्न असती।
सुधा-सुरासम; साधु-असाधू। जनक एक जग;-जलधि अगाधू ॥ ३ ॥
भले बुरे निज; निज कर्म गती। यश अपयश; लोकांत मिळविती।
सुधा, सुधाकर; सुरसरि, साधू। गरल, अनल; वैतरणि, असाधू ॥ ४ ॥
गुण अवगुण; जाणति दोघेही। जें ज्या गमे; गोड, तें घेई ॥ ५ ॥

दो.—भल्या भलेपण मिळतसे; नीचासी नीचत्व।
सुधा सहज दे अमरता; गरळ करितसे अंत ॥ ५ ॥

आर्या—भल्यां भलेपण मिळतें; नीचासी प्राप्त होत नीचत्व।
अमृत महत्त्व अमरता; गरलमहत्ता चि मृत्यु हें तत्त्व ॥ ५ ॥

खल अघ अगुण; साधु गुणग्राही। उभय अपार; अगाध चि पाही।
म्हणुनि अल्प गुण; दोष वर्णिले। त्याग न संग्रह; विना आणिले ॥ १ ॥

---

१ सरळ. २ पूर्ण चंद्र. ३ सहस्रार्जुन. ४ अग्नि. ५ गारा
६ सुरा + अनीक, सुरा + नीक. ७ खीर. ८ निर्मांस. ९ कमळ. १० देवनदी, गंगा

सज्जन दुर्जन; विधी-निर्मिले । वेदें गुण; दोषांसि निवडिले ।
वदति वेद; इतिहास पुराणें । विधिकृति युत, गुण; अवगुण यानें ॥२॥
सुख दुख; पाप; पुण्य; दिनराती । साधु असाधु; सुजाति कुजाती ।
देव हि दानव; उच्च नीचता । अमृत जीववी; विष करि घाता ॥३॥
माया ब्रह्मः जीव जगदीश्वर । लक्ष्मि अलक्ष्मि; रंक अवनीश्वर[3] ।
काशि मगध; गंगा वैतरणी । मरु मालव; महिसुर आणि गोघ्नी[4] ॥४॥
स्वर्ग नर्क; अनुराग विरक्ती । निगमागम; गुण, दोष विभक्ती ॥५॥

दो.—जड चेतन गुणदोषमय; ब्रह्मा रचि साकार ।
संतहंस गुण घेति पय; त्यागुनि वारि विकार ॥ ६ ॥

आर्या—जडचेतन जग हें गुण; दोषांनीं ब्रह्मदेव युक्त करी ।
हंससम सज्जन; पय; गुण घेती; दोष सांडुनी वारी ॥ ६ ॥

ऐसी मति ज्यां; ब्रह्मा देतो । दोषां त्यागुनि गुणासि घे तो ।
स्वभाव काल; कर्मवश बनती । भले प्रकृतिवश; गुणासि मुकती ॥१॥
तयां निवारण; भक्तचि करिती । असुख, दोष; दमुनी यश देती ।
करिती खलहि; भलें सत्संगें । सहज मलिनता; तदपि न भंगे ॥ २ ॥
साधु वेषिं; वंचक[5] जे फिरती । वेष प्रतापें; पुजिले जाती ।
अंतिं फजीती नच; निर्वाहू । कालनेमि; रावण वा राहू ॥ ३ ॥
कृतकुवेष; साधूतें मान हि । जांबवन्त सम; वा हनुमान हि ।
हानि कुसंगीं; लाभ सुसंगें । लोकीं विदितचि; श्रुति वेदांगें ॥ ४ ॥
नभीं चढे रज; पवन प्रसंगें । कर्दम होइ; नीच जल संगें ।
साधु असाधु; सदनिं शुक मैना । वदति राम; गाळीतें नाना ॥ ५ ॥
धूम कुसंगें; काजळ होई । मंजु पुराण; लिहिति जैं शाई ।
तो जल अनिल; अनल सांगातें । होति जलद; जगजीवन दाते ॥ ६ ॥

दो.—ग्रहभेषज[6] जल पवन पट; मिळे कुयोग सुयोग ।
होति कुवस्तु सुवस्तु जगिं; बघति सुलक्षण लोक ॥७॥ (क)
सम प्रकाशतम पक्षयुगं[7]; नामभेद विधि देइ ।
रसपोषक शोषक बघुनि; जगिं यश अपयश होइ ॥७॥ (ख)
जडचेतन जगिं जीव जे; सर्व राममय प्राणि ।
नमूं तयांचें पदकमल; सदा जोडुनी पाणि ॥ ७ ॥ (ग)
देव दनुज नर नाग खग; प्रेत पितर गंधर्व ।
वंदूं किन्नर रजनिचर; कृपा करा मज सर्व ॥ ७ ॥ (घ)

---

१ ब्रह्मदेवनिर्मित. २ नीच जाती. ३ राजा. ४ गोमांसभक्षक.
५ ठग, दांभिक. ६ औषध. ७ कृष्णपक्ष, शुक्लपक्ष.

आर्या— ग्रह, भेषजः, जल, पवनां; पटांसि होतां कुयोग सद्योग ।
होति कुवस्तु जगीं वा; सद्वस्तू लक्षिती सुजन लोक ॥ ७ ॥ (क)
पक्षद्वयिं सम तम ही; प्रकाश; धरि नाम-भेद विधि कल्पी ।
रस पोषक शोषक ते; जाणुनि यश–अपयशा, तयां अर्पी ॥७॥(ख)
जीव जगतिं जडचेतनः सकलांसीं रामरूप जाणोनी ।
पदकमलां सर्वांच्या; प्रणती पाणिद्वयासि जोडोनी ॥ ७ (ग)
देव दनुज नर नागहि; खग तैसे प्रेत पितर गन्धर्व ।
किन्नर निशिचर नमितों; मजदीनावरि कृपा करा सर्व ॥ ७ (घ)

इतिश्री बालकाण्डे मंगलाचरणं गुर्वादि संतासंतवन्दनं नाम प्रथमोऽध्यायः

अध्याय २ रा

खाणी चारि; लक्ष चौऱ्याशीं । विविध जीव; भू-जल-नभ-वासी
सिताराममय; सर्वां जाणुनि । करूं प्रणाम; पाणियुग जोडुनि ॥ १ ।
कृपाकरा; समजुनि मज किंकर । प्रेम, कपटाविण; सदा शुद्ध तर
मज निजमतिबल; नसे भरोसा । म्हणुनि विनवि; सर्वांतें बहुसा ॥ २ ।
बहु इच्छा; रघु,पति-गुण-गाना । चरित अगाध; मंदमति जाणा
एकहि अल्प; उपाय न समजा । मन, मति रंक; मनोरथ राजा ॥ ३ ।
मती नीच अति; उच्च कामना । इच्छि अमृत जगिं; तक्र मिळेना
क्षमितिल[२] सज्जन; मम धारिष्ट । ऐकति बाल;–वचन मनिं तुष्ट[१] ॥ ४ ।
बोल बोबडे; बालक वदतां । परिसति मुदित; जनक आणि माता
हसतिल कुटिल; क्रूर अविचारी । ज्यां परदूषण; भूषण भारी ॥ ५ ।
निज कवित्व अति; मानि न कोण । असो सरस; अथवा रसहीन
परकवित्व; ऐकुनि ज्यां हरुषं । जगिं बहु असे; नसति वर पुरुष ॥६।
जगिं बहुनर;सर,सरि-सम वसती । निज जलवृद्धीनेंचि वाढती
सज्जन सकृत; सिंधु सम दिसती । पूर्ण विधू; बघुनी ज्यां भरती ॥ ७ ।

दो.— भाग्य अल्प अभिलाष बहु; असे एक विश्वास ।
होति सुखी परिसुनि सुजन; खल करितिल उपहास ॥८॥

आर्या— भाग्य अल्प, अभिलाषा; महती; धरितोचि एक विश्वासा ।
सज्जन पावति सौख्या; श्रवणें करितील दुष्ट उपहासा ॥ ८ ॥

---

१ हर्ष.   २ एकादा.

खल परिहास; गमे हित थोर। वदे काक पिक[1];-कण्ठ कठोर।
भेक[2] चातकां; बक हंसांनां। हसतिल खल; निर्मल गुणगाना ॥ १ ॥
काव्यरसिक ना; हरिपद खोडी। त्यातें सुखद; हास्यरस हेंही।
भाषा प्राकृत; मति मम थोडी। हसणें योग्य; हसोत न खोडी ॥ २ ॥
प्रभुपद प्रीति न; बुद्धि तीव्रता। फिकी तयां ही; लागे सुकथा।
हरिहरपदरति; मति न कुतर्की। रघुवर-कथा; मधुर त्यांसीं कीं ॥ ३ ॥
जाणुनि राम, भक्तिची खाणी। ऐकुनि सुजन; वर्णिती वाणीं।
वाकपटु, सत्कवि; नच मी जाणा। सकल कला; विद्या मजला ना ॥ ४ ॥
वर्ण हि अर्थ; अलंकृति नाना। छंद प्रबंध; अनेक विधानां।
भावभेद; रस, भेद अपार। काव्य दोषगुण; विविध प्रकार ॥ ५ ॥
काव्य विवेक, अल्प नच मातें। प्रतिज्ञेवरी; लिहितो हातें ॥ ६ ॥
दो.— मम रचना बहुगुणरहित; विश्वविदित गुण एक।
बघुनि तयासी परिसती; ज्यांसीं विमल विवेक ॥९॥
आर्या— सर्वगुणीं रहित परी; ममरचनें[3] विश्ववंद्य गुण एक।
त्या पाहुनि परिसति ते; ज्यां सुमती, प्राप्त निर्मल विवेक ॥९॥
यांत उदार; नाम रघुपतिचें। पावन सारहि; पुराण श्रुतिचे।
मंगलभुवन; अमंगलहारी। उमेसहित जें; जपी पुरारी ॥ १ ॥
सत्कविरचना; सुंदर झाली। शोभा नाम: विना नच आली।
विधुवदनी; बहु,परी भूषली। वसन विना वर;-नारि न गमली ॥२॥
सब गुणरहित; कुकविकृतवाणी। रामनाम यश; युत जाणोनी।
सादर कथन; श्रवण बुध करिती। मधुकर सम; सज्जन गुण घेती ॥ ३ ॥
यद्यपि काव्यरस; एकहि नाहीं। रामप्रताप; प्रगट बहु पाही।
हाचि भरंवसा; मम हृदयाला। मान्य सुसंगें; कोण न झाला ॥ ४ ॥
स्वभाव कटुता; धूम्रहि त्यजितो। मलयज[4]-संगें; सुगंध देतो।
रचना ग्राम्य; विषय बहु भारी। रामकथा जग,-मंगलकारी ॥ ५ ॥
छंद— बहु करणि मंगल; हरणि कलिमल; सत्कथा ही राघवी[5]।
गति-कुटिल कविता; सरित ही, जशि; सरित पावन जान्हवी ॥
प्रभु-सुयश संगतिं; कृति हि मम ही; सुजनमनसुख-दायिनी।
भव अंगिं भूति[6]; स्मशानिची, करि; स्मरत सुंदर पावनी ॥ १ ॥
दो.— प्रिय सर्वांसि गमेल हें; काव्य रामयश-संग।
काष्ठविचार किं करिति कुणी; वंदिति मलय[7] प्रसंग ॥ १० ॥ (क)

१ कोकिल. २ बेडूक. ३ रचनेत. ४ चंदन. ५ रामाची. ६ चितांभस्म. ७ चंदनाचे संगतीनें.

धेनु कपिल, पय शुद्ध अती; गुणद करिति सब पान।
गिराग्राम्य, श्रीराम यश;-परिसुनि गाति सुजाण ॥१०॥(ख)

आर्या—प्रिय अति होइल सर्वां; रचना मम रामचन्द्र यश-रंगें।
काष्ठविचार करिति कीं; मलयजवृक्षांसि वंदिती संगें ॥ १० ॥ (क)
कपिला गो, पय शुद्धचि; गुणद अती, करिति सर्व ही पान।
ग्राम्यगिरा, रामाचें; यश परिसुनि करिति सुज्ञ ते गान ॥१०॥ (ख)

मणि-माणिक;-मुक्तांची आभा। अहि-गिरि-गज-शिरिं; देइ न शोभा।
नृपकिरीट, तरुणीतनु बसती। शोभा तेथें; अधिक पावती ॥ १ ॥
तैशीं सुकवि; काव्य बुध वदती। इथें उपजुनी; तिथें शोभती।
भक्तिलागिं, विधि;-भवना त्यागुनि। येइ शारदा; स्मरतां धावुनि॥ २ ॥
स्नान न घडतां; रामचरित्रीं। ते श्रम विविध; रीति नच जाती।
कोविद कवि हें; हृदयिं विचारी। गाई हरियश; कलिमलहारी ॥ ३ ॥
करितां प्राकृत; जन गुण-गाना। गिरा पिटी शिर; शोकें नाना।
हृदय-सिंधु, मति; शुक्ति समाना। स्वाति शारदा; गमे सुजाणां ॥ ४ ॥
जरि वर्षे वर;-वारि विचारू। होइ काव्य;-मुक्तामणि चारू ॥ ५ ॥

दो.—युक्तीनें तीं ओंवुनी; रामकथा गुण ताग।
सज्जन कण्ठीं घालितां; शोभा अति अनुराग ॥११॥

आर्या—युक्तीनें तीं वेधुनी; रामकथामृत-गुणांत मग ओंवा।
निर्मल सज्जन कण्ठीं; शोभा अनुराग घालुनी पावा ॥ ११ ॥

कलिकालीं; जन्मती कराल। काकासम कृति; वेष मराळ।
कुपथें जाति; वेद पथ त्यागुन। कपट-कलेवर; कलिमल भाजन ॥१॥
वंचक, भक्त; म्हणति रामाचे। किंकर कामिनि; धन कोपाचे।
प्रथम करा मम; त्यांतचि गणती। दांभिक धीट; कपटि जे असती॥ २॥
निज अवगुण; वर्णिन तरि फारचि। कथा वाढ; होईल न पारचि।
म्हणुनि अल्प मी; केलें कथना। थोड्यानें बहु; उमजे सुज्ञां ॥ ३ ॥
जाणुनि मम; विनती बहु उघडी। ऐकुनि ठेवी; कोणि न खोडी।
याहीवरि; करि;-तील कुशंका। मजहुनि त्यांची; मति अति रंका॥४॥
कवी नसें, ना; चतुर म्हणवितो। मति अनुरूप; रामगुण गातो।
कोठें रघुपति; कथा अपारा। कोठें मति मम; रत संसारा ॥ ५ ॥
जो मारुत गिरि; मेरु उडवितो। तूलासी तो; केवीं गणितो।
प्रभुता अमित; दिसे रामाची। कथा गानिं मन; अति संकोची ॥६॥

१ भाषा. २ सीता. ३ तेज. ४ शिंपी. ५ तागाची दोरी. ६ हंस.

दो.—शेष शारदा, ईश, विधी; आगम निगम पुराण ।
नेति नेति ज्याचे गुणही; करिति निरंतर गान ॥१२॥

आर्या—शेष महेश सरस्वति; विधि[1] निगमागम पुराण इतिहास ।
नेति नेति वदुनीया; करिती ज्या, गुण अनन्त गानास ॥१२॥

प्रभु प्रभुतेसी; सर्व जाणती । परि ना कोणी; नच वदताती ।
वेद विदित; कारण तें ऐसें । प्रभाव वर्णिति; ज्या त्यां तैसे ॥ १ ॥
एक अनीह[2]; अरूप अनाम । अज सच्चिदा;नन्द परधाम ।
व्यापक विश्वरूप; हरि झाला । देह धरूनि; करितो बहु लीला ॥ २ ॥
भक्तांलागी; करितो सर्वहि । प्रणतकृपा; अनुराग अपूर्वहि ।
भक्तांवरि; ममता, अति करतो । दया करी परि; क्रोध न धरतो ॥ ३ ॥
क्षेम योगही; चालवि सहजा । सरळ, सबळ; साहिब रघुराजा ।
हें जाणुनि बुध; हरियश वानी । करी पुनीत; सुफल निजवाणी ॥४॥
याचि बळें रघु;-पति गुणगाथा । वदतो नमुनि; रामपदिं माथा ।
मुनीं[3] प्रथम हरि;-कीर्ति गाइली । तो पथ धरितां; सुगम जाहली ॥ ५ ॥

दो.—सरिता ज्या अति दुस्तर ही; सेतु भूपकृत होति ।
पिपीलिका अपि परम लघू ; लीलीं[4] चालत जाति ॥१३॥

आर्या—अति दुस्तर सरितादिक; नृप सेतू बांधिती तयां वरती ।
अति लघु पिपीलिकादिक; कष्टेंविण शीघ्र पार ते तरती ॥ १३ ॥

या रीतीं बल; मनासि देतो । सुंदर राम;-कथा मी गातो ।
व्यासादिक कवि;-पुंगव नाना । सादर हरियश; केलें गाना ॥ १ ॥
चरण-कमल; नमितो मी त्यांचे । पुरवा सर्वहि हेतु मनाचे ।
कलियुग कविनां; करूं प्रणामा । जे वर्णिति; रघु;पति गुण ग्रामा ॥ २ ॥
जे प्राकृत कवि; बुध जाहले । रामचरित; भाषेंत गाइले ।
झाले, होतिल; किंवा असती । निष्कपटें त्यां; सर्वां प्रणती ॥ ३ ॥
प्रसन्न होउनि; द्या वरदाना । साधुसंत; करिती सन्माना ।
ज्या काव्या बुध, नच आदरिती । ते श्रम फुकट; बालकवि करिती ॥ ४ ॥
कीर्ति; काव्य, भक्ति; ती सम्पत्ती । गंगेसम; सर्वां हित कर्ती ।
राम सुकीर्ती; ग्राम्यचि कविता । येथें अल्प न; दिसते समता ॥ ५ ॥
अपुल्या कृपें; सुलभ मज सब तें । रेशिम तरटें;पटीं[5] शुभ दिसतें ॥ ६ ॥

दो.—काव्य सरळ कीर्ती विमल; तें आदरिति सुजाण ।
सहज वैर विसरूनि खळ; ज्यातें देती मान ॥१४॥ (क)

---

१ ब्रह्मदेव. २ इच्छारहित. ३ मुनीनीं. ४ लीलेनें. ५ तरटाच्या वस्त्रावर.

तें न होइ, शुभ मतीविण; मतिबल मासें सानें।
हरियश वदतो प्रार्थुनी; कृपा करा मज दान ॥ १४ ॥(ख)
कविकोविद! रघुवरचरितें;-मानस मंजु मराळ।
बालविनति, रुचि लक्षुनी; व्हा मजवरी कृपाळ ॥ १४ ॥ (ग)
सो.— नमितो मुनिपदकंज, रामायण ज्यानें रचित।
सखर सुकोमल मंजु; दोषरहित, दूषण सहित ॥१४॥ (घ)
वंदूं चारिहि वेद, भवसागरिं जे सम तरणि।
ज्यांतें स्वप्निहि खेद; वाटेना हरियश गानिं ॥ १४ (ङ)
वंदूं विधिपद-रेणु भवसागर जो करितसे।
संत, सुधा, शशि धेनु; प्रगटति खल विष वारुणी ॥१४ (च)
दो.— विबुध,-विप्र-बुध-ग्रह-चरण; विनवुं जुळुनि करपात्र।
व्हा प्रसन्न, पुरवा सकळ; मंजु मनोरथ मात्र ॥ १४ (छ)
आर्या— काव्य सरळ, कीर्तीही; विमळ, तया देति आदरा संत।
सहज वैर विसरूनी: रिपुही ज्या ऐकुनीच नमतात ॥ १४ (क)
तें नच होय विना मति;-निर्मळ, मज बुद्धिही नसे थोडी।
हरियश मी वदताहे; करा कृपा! विनवितो, करां जोडी ॥ १४॥ (ख)
कवि कोविद हो! रघुवर;-चरित्र मानस, तुम्हीं जणुं मराळ।
बाल-विनति ऐकुनि, रुचि; जाणुनि, मजसी कृपाळु होआलें ॥१४॥ (ग)
नमितो मुनिपद पंकज; वाल्मीकी रामचरित निर्माता।
सखर परी अति कोमल; दोषांनीं रहित दूषणा सहिता ॥ १४ ॥ (घ)
वंदन चारी वेदां; दुस्तर भव वारिधी मधें नौका।
ज्यातें स्वप्नीं खेद न; वदतां श्रीराम-शुद्ध-यश ऐका ॥ १४ ॥ (ङ)
नमितो विधिपद—रजही; भवाब्धि यन्निर्मिलों जिथें वसती।
सुरभि, सुधा, संत शशी, दुर्जन, विष, वारुणी प्रगट दिसती ॥१४॥ (च)
विबुधहि, विप्रबुधग्रह; विनती कर जोडुनी करीं चरणां।
प्रसन्न होउनि पुरवा; मंजु अशा मम मनोरथां नाना ॥ १४ ॥ (छ)

नमूं शारदा; तशि सुर सरिता। उभय पुनीत; मनोहर चरिता।
मज्जन पानिं; पाप हरि एक। हरी एक; श्रवणें अविवेक ॥ १ ॥
गुरु, पितरै, भव; वंदु भवानी। नमितो त्रीन; बंधु दिनदानी।
सेवक, स्वामि, सखा, श्रीपतिचे। सर्वपरी हित;-कर तुलसीचे ॥ २ ॥
कलिजन हितार्थ; गिरिजाभर्ता। शाबर; मन्त्र;जाल जो कर्ता।
अमेळ अक्षर; अर्थ न जपही। प्रगट प्रभाव; महेश प्रतापहि ॥ ३ ॥

१ लहान, अल्प. २ सूर्य. ३ मदिरा. ४ व्हाल, ५ ज्यानें केलेला. ६ कामधेनु. ७ सुंदर. ८ आईबाप. ९ प्रतिदिन दाता.

तो उमेश मज;वरि अनुकूल । करिल कथा; मुदमंगलमूल ।
स्मरुनि शिवा[1]-शिव; प्रसाद-पानें । वर्णिन रामचरित हर्षानें ॥ ४ ॥
शम्भुकृपे मम; काव्य सनाथ । निशिं तारागणिं; जणुं निशिनाथं[2] ।
स्नेह समेतचि; रामकथेतें । ऐकुनि, समजुनि; होती गाते ॥ ५ ॥
होतिल राम;चरण अनुरागी । कलिमलरहित; सुमंगल-भागी[3] ॥ ६ ॥

दो.—स्वप्निंहि सत्य असेल जरी; मज हर-गौरि प्रसाद ।
होवो सत्य प्रभाव तरी, प्राकृत-कवि-अनुवाद ॥ १५ ॥

आर्या—स्वप्नींही मजवरि जरि; हरगौरीचा प्रसाद झालासे ।
होवो तरि सत्यचि जो; मम रचनेचा प्रभाव कथिलासे ॥ १५ ॥

इति श्री बालकाण्डे जीववन्दनादि शिवपार्वती वंदनं नाम
द्वितीयोऽध्यायः ।

अध्याय ३ रा

वंदुं अयोध्या; पुरी पावनी । शरयुनदी कलि;-कलुष नाशनी ।
पुरनरनारींनां; करुं प्रणती । प्रभु ममता; थोडि न ज्यां वरती ॥ १ ॥
श्रीनिंदक[4] अघ; ओघ नाशिले । शोक हरुनि निज; लोकिं वसविले ।
नमितो कौस;ल्या दिक्[5] प्राची । कीर्ति जिची जगिं; भरली साची ॥२॥
प्रगटविला रघु;-पति शशि चारू । विश्व-सुखद खल;-कमल-तुषारू[6] ।
दशरथ-भूप;-सहित त्या राणी । सत्कृतिमूर्ति; सुमंगल खाणी ॥ ३ ॥
नमितो मन; वाणीं कर जोडुनि । करा कृपा सुत;-सेवक जाणुनि ।
ज्या निर्मुनि हो; धन्य विधाता । राम-तात अति; महिमा माता ॥ ४ ॥

सो.—वंदुं अयोध्यापाल; साच प्रेम ज्या रामपदिं ।
विरहें दीन दयाळ; तनु तृण सम त्यजितो सपदिं[7] ॥१६॥

आर्या—नमन अयोध्याभूपा; रामपदीं सत्यची जया प्रेम ।
दीन-दयाळा-विरहें; प्रिय तनुतें त्यागिलें तृणा चि सम ॥१६॥

नमितो परिजन; सहित विदेहा[8] । रामपदीं करि; निगूढ[9] स्नेहा ।
भोगीं लपवी; जो योगाला । रामा पाहुनि; प्रगट जाहला ॥ १ ॥
वन्दन प्रथम; भरत पदकमलां । यद्व्रतें[10]-नियम न; जाई वदला ।
रामचरण; पंकजिं मन ज्याचें । लुब्धमधुपसम[11]; त्यजी न साचे ॥ २ ॥

१ पार्वती. २ चंद्र. ३ भागीदार. ४ सीता. ५ दिशा. ६ हिमकण. ७ तात्काळ. ८ जनक. ९ गुप्त. १० ज्याचें व्रत. ११ भुंगा.

नमितो लक्ष्मण; पद्कमलातें। शीतल, सुभग; भक्तसुखदातें ।
रघुपति कीर्ति;-पताका विमला। यश ज्याचें जणुं; दण्डचि बनला ॥३॥
शेष सहस्र;-शीर्ष जग कारण। जो अवतरे; भूमिभय हारण ।
तो अनुकूल; सदा हो मजवर। कृपासिंधु; सौमित्रि गुणाकर ॥ ४ ॥
रिपुसूदन पद;-कमल नमामी। शूर सुशील; भरत अनुगामी ।
महावीर हनु;मन्त वन्दिला। स्वयें राम यद्यशा गाइला ॥ ५ ॥

सो.—नमितो पवन कुमार; खलवनपावक ज्ञानघन ।
ज्याचे हृदयिं अगार; धृत धनुशर रघुनन्दन ॥ १७ ॥

आर्या—ज्ञानघना पवनसुता; खलवन दावाग्निला करूं नमन ।
ज्याचे हृदयी वसती; रामधनुर्धर भवानला शमन ॥ १७ ॥

कपिपति ऋक्ष;-निशाचर राजां। अंगदादि त्या; कीशसमाजा ।
वंन्दन सर्वां; पद्कमलानां। अधम शरीरिं; प्राप्त रघुराणा ॥ १ ॥
रघुपतिचरण; उपासक नाना। खगमृग सुर मुनि; नर असुरांनां ।
वन्दन स,वांचे पायांस। जे निष्काम; हरीचे दास ॥ २ ॥
शुक सनकादि; भक्त मुनिनारद। जे मुनिवर; विज्ञान विशारद ।
मुनि हो! सांष्टांगें मी नमितो। करा कृपा निजदास विनवितो ॥ ३ ॥
जनकसुता जग; जननि जानकी। कृपा निधाना; प्रिय अतिशय कीं ।
तीचे युगे पद; कमल नमामी। लाभो कृपा; शुद्धमति-कामी ॥ ४ ॥
मन वचनें; कर्में रघुनाथा। नमूं चरणयुग, सर्व समर्था ।
राजिव नयन; धरी धनुसायक। भक्तापदभंजन; सुखदायक ॥ ५ ॥

दो.—गिरा अर्थ, जलवीचि सम; वदतां भिन्न न भिन्न ।
वंदूं सीताराम पद; ज्यांसी प्रिय अति खिन्न ॥ १८ ॥

आर्या—जलवींची अर्थ-गिरा;-सम वदणें भिन्न, जे परि अभिन्न।
सीतारामपदानां; नमन, जयां प्रिय अती परम खिन्न ॥ १८ ॥

वंदूं नाम 'राम' रघुपतिचें। बीज कृशानु; भानु निशिपतिचें ।
विधि हरिहरमय; वेद प्राणसें। अगुण निरूपम; गुणनिधानसें ॥ १ ॥
महामन्त्र जो; प्रिय हि महेशीं। काशीं मुक्ती;-स्तव उपदेशी ।
तो महिमा जाणे गणराव। प्रथम पूज्य, हा; नाम प्रभाव ॥ २ ॥
जाण आदिकवि; नाम प्रताप। उलटा जपुनि; होइ निष्पाप ।
सहस्रनामा; समान मानी। जपते पति;-संगतीं भवानी ॥ ३ ॥
हेतु बघुनि हर; हर्षे मनिचे। करि भूषण; स्त्रीभूषण कीचें ।
नाम प्रभावा; शिवें जाणणें। काळकुटा फळ; सुधा कागणें ॥ ४ ॥

१ शत्रुघ्न. २ दीन. ३ त्रस्त झालेले. ४ लाट. ५ शंकराला. ६ वाल्मीक.

दो.— वर्षा ऋतु रघुपति भक्ती; तुलसी सौंळि सुदास।
'राम' नाम युगवर्ण हे; श्रावणादि दो मास ॥ १९ ॥
आर्या— वर्षाऋतु रघुपति-रति; तुलसी ! साळी परी जणुं सुदास।
रामनाम वर्णद्वय; भाद्रपद श्रावणा परी मास ॥ १९ ॥
अक्षर मधुर; रम्य दों जाणा। वर्णनयन जन-जीवचि माना।
स्मरणीं सुलभ; सुखद सर्वांसी। लाभ लोक पर;-लोक जनांसी ॥ १ ॥
स्मरणिं रम्य; श्रवणीं, वदतां तें। रामलक्ष्मणां; सम प्रिय मातें।
वर्ण वर्णितां; गेळे प्रीति ते। ब्रह्मजीवसम; सहवासी ते ॥ २ ॥
नरनारायण; सम सुभ्राता। जगपालक; विशेष जन त्राता।
भक्तिसतीचे कर्ण विभूषण। विश्वहितार्थ; विमल विधु-पूषण³ ॥३॥
स्वाद तोष सम; सुगति सुधेतें। कमठशेषसम; धरि वसुधेतें।
जन-मन मंजु;-कंज. मधुकर हे। जीभ यशोदे; हरिहलधर⁴ हे ॥ ४ ॥
दो.—छत्र एक, पर मुकुटमणी; वर्णशिरीं वसताति।
रघुवर-नामीं वर्ण हे; दोन कसे दिसताति ॥ २० ॥
आर्या—छत्रापरि एक, दुजा; मुकुटासम वर्णमूर्ध्नि वसताती।
रघुवर नामाचे हे; वर्णद्वय रम्य फार दिसताती ॥ २० ॥
सम भासती; नाम अणि नामी। प्रीति परस्पर; प्रभु-अनुगामी।
नामरूप हरि,-उपाधि जाणा। अकथ अनादि; समज सुज्ञांनां ॥ १ ॥
थोर लघू; अपराधचि वदणें। संतांनीं गुण,-भेद जाणणें।
नामाधीन; रूप तें पाहीं। रूप-समज; नामाविण नाहीं ॥ २ ॥
नामावीण रूप जरि दिसलें। करतलगत परि; न च ओळखलें।
रूप न दिसतां; नामा स्मरलें। स्नेहें हृदयीं; प्रगट जाहलें ॥ ३ ॥
नामरूपगति; रम्य कहाणी। अनुभव-सुखद, न; वदवे वाणीं।
निर्गुण सगुणीं; नाम सुसाक्षी। उभय प्रबोधक; चतुर दुभाषी ॥ ४ ॥
दो.—रामनाम मणिदीप धरीं; जीभ देहली द्वार।
तुलसी ! अन्तर्बाह्य जरी; इच्छिशि प्रकाश फार ॥२१॥
आर्या—रामनाममणिदीपा; रसनाद्वारांत नित्य लावावें।
बहिरन्तर्जरि तुलसी !; नित्य असा स्वप्रकाश पावावें ॥ २१ ॥
नामजपें जगिं, जागति योगी। विरत विरंचि-प्रपंच वियोगी।
अनुपम ब्रह्मसुखा अनुभवती। जिथें रूप;-नामाची अगती ॥ १ ॥
आत्मरहस्या; जाणूं इच्छिति। मुखें नाम; जपुनी ते जाणिति।
साधक नाम; जपति लय लावुनि। होति सिद्ध अणि;मादिक पावुनि ॥२॥

१ मास. २ नाहींची होते. ३ चंद्र-सूर्य. ४ कृष्ण-बलराम. ५ अवर्णनीय.

जपति नामजन; आर्त होवुनी। टळति संकटें; सुखासि पावुनि ।
रामभक्त जगिं; चार प्रकार। सुकृती चारी; अनघ उदार ॥ ३ ॥
नाम अधार; चहूं चतुरांला। ज्ञानी त्यांत प्रभू-प्रिय झाला ।
चौयुगिं वेदीं; नाम प्रभाव। कलियुगिं तरि नहि; आन उपाव ॥४॥

दो.—सकल कामनाहीन जे; रामभक्तिरसलीन ।
नाम सुप्रेम पियूषह्रद; ते करिती मन मीन ॥ २२ ॥

आर्या— सकलकामनाहीन हि; रामभजनरस तयांतरीं लीन ।
नाम-प्रेमा पीयुष; ह्रद, मन त्यांचें तयांत जणुं मीन ॥ २२ ॥

सगुण अगुण युगं; ब्रह्म-स्वरूप। अगाध अनादि; अतर्क्य अनूप ।
नाम गुरू मज; यांहुनि गमतें। निजबलवश; जगता जें करतें ॥ १ ॥
प्रौढि सुजन नच; माना कविची। प्रीति प्रतीति; रुचीही मनिंची ।
एक काष्ठगत; दिसतो एक। पावक सम युग; ब्रह्म विवेक ॥ २ ॥
उभय अगम्यचि; नाम-सुगम तें। गुणागुणांहुनि; गुरूचि गमतें ।
व्यापक एक;ब्रह्म अविनाशी। सच्चिद्घन जें; चिर सुखराशी ॥ ३ ॥
हृदयिं असुनि प्रभु; हा अविकारी। जीवां दुःख; दैन्य अति भारी ।
नामनिरूपण, यत्नें घडतें। मणिमूल्यापरि; प्रगट होत ते ॥ ४ ॥

दो.—अगुणाहुनि मोठा खचित; नामप्रभाव अपार ।
कथितो गुरु रामाहुनिही; निजमतिबल अनुसार ॥ २३ ॥

आर्या— अगुण ब्रह्माहुनि बहु; नामाचा तो प्रभाव दुःपार ।
कथितो रामाहुनिही; मोठा तो निजविचार अनुसार ॥ २३ ॥

भक्तहिता; रामें तनु धरलें। दुःख सहुनि, सुख; संतां दिधलें ।
प्रेमें नाम; भक्त जे जपती। सहज होय, मुद; मंगल प्राप्ती ॥ १ ॥
राम एक मुनि;—नारी तारी। नाम कोटि—खल;—कुमति सुधारी ।
सुत-सेनेसि; ताटके वधिलें। रामें मुनिमख,—रक्षण केलें ॥ २ ॥
दुःख दोष तशि; दास दुराशा। हरी नाम, रवि; करि तम नाशा ।
रामें भग्न; कठिण भवचाप। भव-भय-भंजन; नाम प्रताप ॥ ३ ॥
राम रम्य करि; तें दण्डकवन। जनमन-अमित; नाम करि पावन ।
निशिचर निकर; दलन रघुनन्दन। नाम करी कलि;—कलुष निकन्दन ॥४॥

दो.—दास जटायू शबरितें; सुगति देइ रघुनाथ ।
नाम उद्धरी अमित खल; वेद विदित गुणगाथ ॥ २४ ॥

---

१ निष्पाप. २ अमृताचा डोह. ३ दोन. ४ मोठें ५ नामानें सुलभ.
६ अपार. ७ अहल्या. ८ गुणगाथा.

आर्या— सत्सेवक शबरीतें; राम, जटायुसि सद्गती देती ।
अमित खलांतें उद्धरि; नाम, असें वेदही गुणां गाती ॥ २४ ॥

रामसुकण्ठ; बिभीषण दोन्ी । शरण ठेवि; जाणति हे कोणी ।
नाम अनेक; गरीबां रक्षी । लोकां विदित; वेदही साक्षी ॥ १ ॥
ऋक्षकपी; कटका जमवीलें । सेतु कारणें; श्रम बहु केले ।
वदतां नाम; भवाब्धि च सुकतो । सुजन ! विचार; करूनि पहा तो ॥२॥
रामें सकुळ; रावणा वधिलें । सीते सह निज;—पुरिं पद दिधले ।
राजधानि पुरि; रामहि राजा । गाती गुण सुर;—वर सह मनुजां ॥ ३ ॥
प्रेमें सेवक; नामा स्मरती । विना श्रमें; मोहादिक तरती ।
मग फिरती निज; सुखांत मग्न । नाम कृपे, ना; शोकस्वप्न ॥ ४ ॥

दो.—ब्रह्म रामहुनि, नामगुरु; बरदात्यां वर देत ।
रामायण शत कोटिमधि; प्रिय मानुनि शिव घेत ॥२५॥

आर्या—श्रेष्ठ निर्गुणा सगुणा; नामचि बरदायकांसि वरदानी ।
रामचरित शतकोटीं; शिव घे प्राणांसमान तें मानी ॥ २५ ॥

इति श्री बालकाण्डे रामनामवन्दनादि नाममहिमावर्णनं नाम
तृतीयोऽध्यायः

मास पारायणे—प्रथमो विश्रामः

अध्याय ४ था

नाम प्रसादें; शिव अविनाशी । वेष अमंगल; मंगलराशी ।
शुक सनकादि; सिद्ध मुनि योगी । नाम प्रसाद; ब्रह्मसुख-भोगी ॥ १ ॥
नाम प्रतापा; नारद जाणे । प्रिय हरिजगिं; हरिहर प्रिय होणें ।
नामजपें प्रभु; करी प्रसाद । भक्तमणी; झाला प्रल्हाद ॥ २ ॥
ध्रुव तों आर्त; जपे हरिनामा । पावे तो स्थिर; पदा अनुपमा ।
स्मरे पवनसुत; पावन नामा । स्ववश करूनि तो; ठेवी रामा ॥ ३ ॥
गज गणिका हि; अजामिळ पापी । मुक्त होति हरि;—नाम प्रलापीं ।
किती वर्णुं मी; नाम-गुणांना । राम न शक्त; नाम गुण गाना ॥ ४ ॥

दो.—रामनाम हा कल्पतरु; कलि-कल्याण-निवास ।
ज्या स्मरणें हो भांगसा; तुलसी तुलसीदास ॥ २६ ॥

---

१ सुग्रीव. २ वर देणारें.

आर्या—रामनाम सुरतरुसम; कल्याणातें कलींत सुनिवास ।
ज्याच्या स्मरणें झाला; तुलसी; भांगेपरी तुळसिदास ॥ २६ ॥

चहुं युगिं तीन; काळिं त्रैलोकीं । नाम जपुनि जन; होति विशोकी ।
वेद पुराण; संत मत हें हो । सकळ-सुकृत-फळ; रघुवर स्नेहो ॥ १ ॥
ध्यान प्रथमयुगिं; मखविधि दूजे । द्वापरिंपरि;-तोषित प्रभु पूजें ।
कलि केवल मल;-मूल मलीन । पाप पयोनिधि; जन-मन, मीन ॥ २ ॥
नाम कल्पतरु; कलीं कराला । स्मरतां शमवि; सकल भवजाळा ।
नाम कलियुगीं; अभिमत दाता । हित परलोक; लोकिं पितृ माता ॥ ३ ॥
कलियुगिं कर्म न; भक्ति विवेकहि । रामनाम अव;लंबन एकहि ।
कालनेमि कलि; कपट निधान चि । नाम सुमति; समर्थ हनुमान चि ॥४॥

दो.—रामनाम नरकेसरी; कनक-कशिपु कलिकाल ।
जापक जन प्रल्हाद जणूं, पाळि, दमुनि सुर-काळ ॥ २७ ॥

आर्या—रामनाम नरसिंहचि; हिरण्यकश्यपु समान कलिकाला ।
प्रल्हादासम जापक; पाळी त्यालें, दमूनि सुर-काळा ॥ २७ ॥

क्रोधालस्ये; भाव कुभावें । जपतां नामा; मंगल पावे ।
स्मरुनि नाम तें, हरिगुणगाथा । वदूं नमुनि रघु;-नाथा माथा ॥ १ ॥
न्यूनतेसि मम; करी पूर्ण तो । करितां कृपा; तृप्त नच होतो ॥
राम सुसेव्य; कुसेवक हा मी । श्रीदालागिं; पोषि मज स्वामी ॥ २ ॥
लोकिं वेदिं ही; साहिबरीती । ऐकुनि विनति; जाणती प्रीती ॥
आढ्य गरीब; ग्रामनर नागर । पंडित मूढ; मलीन पुण्यतर ॥ ३ ॥
सुकवि कुकवि निज;मति अनुसारें । भूपा स्तविति; नारिनर सारे ॥
साधु सुजाण; सुशील भूपती । ईश्वर अंश; कृपाळू सुमती ॥ ४ ॥
ऐकुनि, मृदु;-वचनें त्यां मानी । जाणुनि भक्ति; गती नति वाणी ॥
हा प्राकृत; भूपाल स्वभाव । ज्ञानि-शिरोमणि; कोसलराव ॥ ५ ॥
संतोषे प्रभु; प्रेमें शुद्ध । कुमती मजसम; कोण अबुद्ध ॥ ६ ॥

दो.—शठदासाची प्रीति रुची; पुरविल राम कृपाळु ।
उपलीं करि जलयान जो; सुमति सचिव कपि भालु ॥ २८ (क)॥

सर्वांसम वदतो तरि ही; राम साहि उपहास ।
स्वामी सीतारामसम, सेवक तुलसीदास ॥ २८ (ख) ॥

---

१ शोकरहित. २ यज्ञ. ३ पूजेनें. ४ आधार. ५ नृसिंह. ६ हिरण्यकश्यप; ७ देवांचा काळ. ८ श्रीमंत. ९ अयोध्यापति. १० अज्ञाणी. ११ पाषाण. १२ होडी.

आर्या—शठदासप्रीतिरुची; माझा स्वामी कृपाळु पुरवील ।
सचिव सुमति कपि रीसें; ज्यानें जलयान बनविलें उपल ॥२८(क)॥
म्हणवीतो हरिसेवक; सर्व जसे, राम सहति उपहास ।
स्वामी सीतापतिसम; सेवक हा मद मी तुलसिदास ॥२८(ख)॥

मम हि विशाल; धिटाइ खोडी । नर्क बघुनि अघ; नाक चि मोडी ।
अशा भयें मम; हृदयचि फाटे । स्वप्निंहि रामा; न्यून न वाटे ॥ १ ॥
परिसुनि बघुनि; परीक्षुनि चित्तें । वानिति राम; भक्ति मम मति ते ।
बोल अमंगळ; निर्मळ हृदई । जनमन बघुनि; राम खुष होई ॥ २ ॥
प्रभुमनिं सेवक; चूक न राही । हरि शतवार; स्मरे हृदयाही ।
व्याधासम वधि; अघार्थ वाली । सुग्रीवहि करि तीच कुचाली ॥ ३ ॥
कर्तूती तशि; बिभीषणाची । स्वप्निंहि रामा; स्मृति नच त्यांची ।
भरत भेटतां; बहु गौरविलें । राजसभेंतहि; गुणां वर्णिलें ॥ ४ ॥

दो.—तरुखालीं प्रभु, प्लवग वरी; केलें त्यां स्वसमान ।
तुलसी कोठें राम-परी; स्वामी शीलनिधान ॥ २९(क)॥
भलेपणा प्रभुचा जरी; असे भला सकलांहि ।
सत्य असे हें वचन तरी; भला होइ तुजलाहि ॥२९(ख)॥
मांडुनि निजगुणदोष मग; सकलां करुनि प्रणाम ।
वर्णूं रघुवर विमल यश; नासे कलि अघधाम ॥२९(ग)॥

आर्या—प्रभु तरुतळिं कपिवरती, त्यातें अपणां समान कीं केलें ।
स्वामी शीलनिधान हि; तुलसी! रामापरी कधीं झाले ॥२९(क)॥
सौजन्य राघवाचें; जीवा सर्वांसिही असेच भलें ।
हें वच सत्य असे तरि; तुलसी! तुजसी भलें हि हो वहिलें ॥२९(ख)॥
मांडुनि निज, दोष गुणा; मग सर्वांसी करूनि नमनातें ।
रघुवर विमल यशातें; वदतो जें ऐकतां दुरित जातें ॥२९(ग)॥

॥ इतिश्री बालकाण्डे नाममहिमावर्णनं नाम चतुर्थोऽध्यायः ॥

अध्याय ५ वा.

याज्ञवल्क्य जी; शुभ गुणगाथा । वदला भर[१]-द्वाज मुनिनाथा ।
त्या संवादा; करितो गाना । परिसुनि संत; सर्व सुख माना ॥१॥

---

१ भक्त. २ पापामुळें. ३ क्रिया.

शंभु; चरित हें; सुंदर बनवी। कृपाकरुनि तें; उमेसि पढवी।
तें शिव, काक;-भुशुंडिसि देतो। रामभक्तिरत; अधिकारी तो ॥ २ ॥
याज्ञवल्क्य त्या; पासुनि पावे। भरद्वाज मुनि;-नाथा ठावें।
श्रोता वक्ता; ते सम शीलें। समदर्शी; जाणति हरिलीले ॥ ३ ॥
त्रिकालज्ञ ते; आत्मज्ञाते। करामलकवत्; ज्ञान तयांतें।
तसे सुजन हरि;-भक्तहि नाना। परिसति समजति; कथा पद्याना ॥४॥

दो.—मजसी ही गुरुनें कथिली; सूकर-क्षेत्रिं सुजाण।
बाळपणें समजे न तशी; होतो अती अजाण ॥ ३० ॥ (क)
श्रोतावक्ता ज्ञाननिधी; रामकथा अति गूढ।
कशि उमजे मी जीवजड; कलिमल-ग्रसित विमूढ ॥३०॥ (ख)

आर्या—गुरुनें क्रोडक्षेत्री; मजला ही अर्पिली कथा जाण।
बाळपणें समजेना; होतो मी तेधवां बहु अजाण ॥ ३० ॥ (क)
श्रोतावक्ता जैसे; ज्ञाननिधी, हरिकथा अती गूढ।
जड जीवा कशि उमजे; मजला; मी ग्रस्त कलिमलें, मूढ ॥ ३० ॥ (ख)

गुरु बहुवार; वदे ती मजला। यथामती हा; अल्प समजला।
प्राकृतांत मी; वदतो तीतें। जशी अंतरीं; स्फूर्ती उठते ॥ १ ॥
मतिबल यथा; विवेक असे तो। वदतों ती, मज; प्रभू प्रेरितो।
निजसंदेह; मोह भ्रम हरणी। करूं कथा भव;-सरिता-तरणी ॥२॥
बुध-विश्राम; सकल जनरंजनि। रामकथा कलि;-कलुष विभंजनि।
रामकथा कलि; पन्नग भरणी। विवेकाग्नि; उत्पादक अरणी ॥३॥
रामकथा कलि; सुरभि-नन्दिनी। सुजनांसीं; अमरत्व दायिनी।
हीच महीवरि; सुधातरंगिणि। भयभंजनि भ्रम;-भेक भुजंगिनि ॥४॥
विबुध-साधुकुल;-हित गिरिनन्दिनि। सुरारिसेना;-नरक, निकन्दिनि।
संतसमाज; पयोधि-रमा जशि। विश्वभारधर; क्षमा अचल तशि ॥५॥
यम-गण-मुख-मशि; जगिं यमुनासी। जीवन्मुक्ति;-दात्रि जणुं काशी।
रामप्रिय; पावन तुलसी ही। तुलसिदास हित;-कर हुलसी ही ॥६॥
शंभुप्रिय जणुं; विन्ध्यनन्दिनी। सकलसिद्धि, सुख; संपत्कारिणी।
अदितीसम; सद्गुण-सुरमाता। प्रेम परिमिती; रघुवर भक्तां ॥ ७ ॥

दो.—रामकथा मंदाकिनी; चित्रकूट मन चारु।
तुलसी ! निर्मळ स्नेह वन; श्री रघुवीर विहारु ॥ ३१ ॥

१ करतळावरील आवळ्या सारखें; २ वराहक्षेत्र. ३ होडी. ४ नाश करणारी. ५ सर्प. ६ एक पक्षी. ७ कामधेनू ८ सापीण. ९ पार्वती–दुर्गा. १० पृथ्वी. ११ काजळ. १२ तुळस. १३ तुळसीदासांची आई. १४ नर्मदा.

आ.—मंदाकिनि रामकथा; सच्चित्तचि चित्रकूट गिरि थोर।
तुलसी विमल-स्नेह चि; वन, सीतारामचन्द्र सुविहार ॥ ३१ ॥

चिंतामणि हरि; चरित सुचारू। सन्मति युवती; शुभ शृंगारू।
जगमंगल गुण;–गण रामाचे। मुक्तिधनद; धामचि धर्माचें ॥ १ ॥
सद्गुरु विरति;–ज्ञान-योगाचे। विबुध वैद्य भव;–भय रोगाचे।
जननिजनक श्री;–हरि–प्रेमाचे। धर्मबीज बहु; व्रत नेमांचे ॥ २ ॥
अघ, संताप; शमन पापांचें। प्रिय पालक इह; परलोकाचे।
सुभट सचिव हें; भूप विचारा। कुंभज लोभा;ब्धीस अपारा ॥ ३ ॥
काम-कोप–कलिमल करिगण हे। केसरि शावक; जनमनवनिं हें।
अतिथि पूज्य प्रिय;–तम पुरारिचे। कामदघन; दारिद्र्य दवाचे ॥ ४ ॥
मंत्रमहामणि; विषयव्याला। पुसति कठिण जे; कुअंक भालां।
हरण मोहतम; दिनकर-कर हें। सेवक शालि;-पाल जलधर हें ॥५॥
अभिमतदानि; देवतरुवर हें। सेवासुलभ; सुखद हरिहर हें।
सुकवि शरद,नभ; मन, उडु[2]गण हें। रामभक्तजन; जीवन धन हें ॥ ६ ॥
सकलसुकृतफळ; भूरिभोग हें। कपटहीन जग;–हिता साधु हें।
सेवक-मन;–मानसे[3] मराळ हें। पावन गांगें[4]; तरंग माळ हें ॥ ७ ॥

दो.—कपट, कुतर्क, कुचाळि, कलि; दंभ कुपथ पाषंड।
दहन रामगुण–ग्राम जणूं इन्धन अनळ प्रचण्ड ॥३२॥ (क)

दो.—रामचरित राकेश–कर; सम सुख दे सर्वांसि।
सज्जन कुमुद, चकोरमन; हित विशेष बहु त्यांसि ॥३२॥ (ख)

आर्या—दंभ कुतर्क कुचाळी; कुपथ, कली कपट काम पाषंड।
रामगुणग्रामचि यां; दहन जसा अनल इन्धनां चण्ड ॥३२॥ (क)
रामचरित पूर्णशशी; सर्वांसीं सुखद तो जरी होतो।
सुजन कुमुद, मनचातक; हितकर्ता त्यां विशेष कीं हो! तो ॥३२॥ (ख)

करी प्रश्न ज्या;परी भवानी। शंकर जैसी; वदले वाणी।
प्रसंग तो मी; वदतो आतां। विचित्र रघुनी; पहा! हरिकथा ॥१॥
ज्यां कथा ही; पडलि न कानां। परिसुनि नच, आश्चर्या मानां।
कथा विचित्र हि; ऐकुनि ज्ञानी। जाणुनि हें नहि; विस्मय मानी ॥ २ ॥
"रामकथेसी; मिति जगिं नाहीं"। प्रतीति अशि; त्यांचे मनिं राही।
बहुविध राम; धरी अवतारां। रामकथा शत,–कोटि अपारा ॥ ३ ॥

---

१ अगस्ति ऋषि. २ नक्षत्रें. ३ मानस सरोवर. ४ गंगेचे; ५ मर्यादा.

कल्प कल्प हरि;-चरित्र सुंदर । अनेक रीतीं; गाति मुनीश्वर ।
धरा न संशय; हें मनिं आणा । कथा-श्रवणिं रति; सादर माना ॥४॥

दो.—राम अनंत, अनंतगुण; अमित कथा-विस्तार ।
परिसुनि विस्मय न मानिती; ज्यांसीं विमल विचार ॥३३॥

आर्या—राम अनंत तसे गुण; अनंत तैशा कथा सुविस्तार ।
आश्चर्या नच मानिति; परिसुनि ते सन्मती जयां फार ॥३३॥

दूर करुनि या; परी संशयां । गुरुपदरज; लावुनी शिरा या ।
विनवीतो कर; जोडुनि दोन्ही । दोष कथेंत न; उपजो कोण्ही ॥ १ ॥
सादर शिवासि; नमुनी माथा । वदतो विशद; रामगुण-गाथा ।
संवत्सोळा;-शें एक्तीसां । कथारंभिं हरि;-पदिं नमुं शीसां ॥२॥
नौमी[2] भौम;-वार मधुमासीं । अयोध्येंत हें; चरित प्रकाशीं ।
ज्या दिनिं राम;-जन्म श्रुति गाती । तीर्थें सकल; तिथें येताती ॥ ३ ॥
देव, असुर, खग; नरादि येती । रघुनाथाची; सेवा करिती ।
जन्मोत्सव, सत् ;-जन करिताती । रम्य राम;-कीर्ती ते गाती ॥ ४ ॥

दो.—मज्जति सज्जन वृंद बहु; पावन शरयू-नीर ।
जपति राम ध्याती हृदयीं; सुंदर शाम-शरीर ॥ ३४ ॥

आर्या—स्नानें करिती सज्जन;-वृंद बहू शरयुचे पवित्र जळीं ।
जपती राम ध्याती; हृदयीं सुंदर तमाल-तनु धरली ॥ ३४ ॥

दर्शन स्पर्श; मज्जनें पानें । अघहर, वदती; वेद पुराणें ।
नदी पुनीत; अमित महिमा अति । वदुं न शके; शारदा विमलमति ॥१॥
पुरी राम;-धामद मन हरणी । लोक विदित अन; पावन करणी ।
चौखाणींचे;-जीव त्यागिती । अयोध्येंत तनु; जन्म न धरिती ॥ २ ॥
पुरी मनोहर; बहुविधि,जाणा । मंगल सकल; सिद्धिदा नाना ।
विमल कथा; आरम्भा करतो । नाश काम मद; श्रवणें होतो ॥ ३ ॥
रामचरित;-मानस या नाम । परिसुनि लाभे; बहु विश्राम ।
मन करि, विषय; अनलिं वनिं जळतां । सुख पावे या; सरांत पडतां ॥ ४ ॥
रामचरित;-मानस मुनि भावन । शंकर विरचित; सुंदर पावन ।
त्रिविध दोष; दारिद्र्य निवारी । कलि-कुतर्क-अघ;-भय-लयकारी ॥ ५ ॥
रघुनी शिव निज; मानसिं ठेवी । योग्य समयिं; उपदेशी देवी ।
यास्तव राम;-चरित मानस वर । हर्षित हृदयें; नाम ठेवि हर ॥ ६ ॥
सुंदर सुखद; कथा ती वदतो । द्या सादर मन; सुजन ! विनविती ॥७॥

१ मल्लकाला. २ नवमी तिथि. ३ चैत्रमास. ४ हत्ती. ५ तलावांत.
६ मुनींना आवडणारें. ७ पार्वतीला.

दो.—मानस रचना झालि जशी; प्रचार जगिं ज्या हेतु।
तो प्रसंग वदतो सकल; स्मरुनि उमा वृषकेतु ॥ ३५ ॥

आर्या.—मानस रचना हेतू; जगांत कैसा प्रचार तो झाला।
स्मरुनि उमावृषकेतू; वदतो मी त्या कथा-विभागाला ॥ ३५ ॥

इतिश्री बालकाण्डे, मानसपरंपरा-महिमा-निर्माणतिथ्यादि वर्णनं
नाम पञ्चमोऽध्यायः

अध्याय ६ वा

शंभु प्रसादें; स्फूर्ति स्वमतिसी। रामचरित;-मानस कवि तुलसी।
करी मनोहर; मति अनुसारा। परिसुनि सज्जन; सुमति! सुधारा ॥१॥
सुमतिभूमि; स्थळहृदय अगाधू। वेद पुराण उदधि; घन साधू।
वर्षति राघव;- यश वर-वारी। मधुर, मनोहर; मंगलकारी ॥ २ ॥
लीला सगुण; वदे वाखाणी। तीच स्वच्छता; करि मल हानी।
प्रेमभक्ति जी; अवर्णनीया। तीच मधुरता; शीतलता या ॥ ३ ॥
सुकृत शालि हित;-कर तें वारी। रामभक्तजन; जीवनकारी।
मेधा महिं,जल; पावन पडलें। मिळुनि श्रवण;-मार्गांत चाललें ॥४॥
भरुनि सुमानस; स्थळि स्थिर झालें। सुखद शीत,रुचि;कर, चिरकाळें॥५॥

दो.— अति सुंदर संवाद वर; रचिले सुमति-विचार।
मंगल पावन सरांत ते; घाट मनोहर चार ॥ ३६ ॥

आर्या— रचिले अति सुंदर वर; संवादां म्यां स्वबुद्धि अनुसार।
तेचि सुभग पावन जणुं; घाट मनोहर सरांत या चार ॥ ३६ ॥

सप्तकाण्डयुत; शुभसोपानीं। बघतां सुखद; ज्ञान नयनांनीं।
रघुपति महिमा; रम्य वर्णिला। रम्य एकरस; तो जळ गमला ॥ १ ॥
सितारामयश; सलिल सुधासम। उपमा वीचि;-विलास मनोरम।
कमलिनि सघन; चारु चौपाई। युक्ति मंजु मणि;-शिंपचि होई ॥ २ ॥
छंद सोरठे; सुंदर दोहे। तें बहुरंग; कमलकुल आहे।
अनुपम अर्थ; सुभाव सुभाषा। ते पराग मक;रंद सुवासा ॥ ३ ॥
सुकृत[१]-पुंज[२]; मंजुल अलिमाळचि। ज्ञान-विराग;-विचार मराळचि।
ध्वनि वक्रोक्ति; काव्यगुण जाती। मीन मनोहर; विविध शोभती ॥ ४ ॥

१ जिना. २ पुण्यवंतांचा समुदाय.

अर्थ धर्म; कामादिक चारहि । तसे ज्ञान; विज्ञान विचारहि ।
नवरस जपतप; योग विरक्ती । जलचर सुंदर; जलांत विलसती ॥ ५ ॥
सुकृती-संत;नाम-गुण गाना । विचित्र बहुजन;-विहंग माना ।
संत सभा चहुं; दिशि अमराई । श्रद्धा वसंत;-ऋतु सम होई ॥ ६ ॥
भक्ति निरूपण; विविध विधानें । क्षमा दया दम; लता-वितानें ।
शम,यम,नियम; फूल; फल ज्ञाना । हरिपदरति रस; वेद वदेना ! ॥ ७ ॥
अपर कथांचे; विविध प्रसंग । ते शुक पिक बहु;-वर्ण विहंग ॥ ८ ॥

दो.—पुलक[2] वाटिका, बाग,वन; सुख सुविहंग-विहार ।
सु-मन चि माळी; स्नेहजळ; शिंपि सुनयनें फार ॥ ३७ ॥

आर्या— पुलक, वाटिका बागा; वन, सुख, जेवीं विहंग सुविहार ।
माळी सुमन, प्रीती; जळ, तो घाली सुलोचनें फार ॥ ३७ ॥

सावधान; गाती चरितातें । रक्षक चतुर हि; तडागासि ते ।
श्रवणि सदा; सादर नरनारी । ते सुरवर; मानस अधिकारी ॥ १ ॥
अति विषयी जे; वायस बगळे । निकट न येति; अभागी अगळे ।
शंबुक[4] भेक[5]; जीव जे नाना । विषय-कथारस; येथ दिसेना ॥ २ ॥
म्हणुनी येतां; मनांत हरले । कामी, काक; बिचारे बगळे ।
मानसि येतां; बहु कठिणाई । रामकृपेविण; गमन न होई ॥ ३ ॥
कुपथ कराल; कठोर कुसंगम । तद्वचनें हरि; वाघ, भुजंगम ।
गृहकार्यें; जंजाळ पहाना । शैल विशालचि; दुर्गम नाना ॥ ४ ॥
घनवन मोह; मान मद जाणा । नद्या कुतर्के; भयंकर नाना ॥ ५ ॥

दो.— श्रद्धापाथेयें रहित; सत्संगतिचि न सार्थ ।
त्यां दुर्गम मानस खचित; ना प्रिय ज्यां रघुनाथ ॥ ३८ ॥

आर्या— श्रद्धापाथेयाविण; सत्संगाची जयां नसे साथ ।
त्यां मानस अतिदुर्गम; वाटेना प्रिय जयांस रघुनाथ ॥ ३८ ॥

करुनि कष्ट जरि; कोणी गेला । निद्राहिवें; त्वरित गिळियेला ।
मति जडता हुड;-हुडिनें भरले । सन्निध जाउनि; स्नान न घडलें ॥ १ ॥
करवेना; मार्जन वा पाना । घेउनि परत; येइ अभिमाना ।
जरि कोणी; पुसण्यातें येती । समजावुनि सर;-निन्दा करिती ॥ २ ॥
विघ्न करिति; प्रतिबंध न त्याला । सँकृप राम; अवलोकि जयाला ।
ते सादर सर;-मज्जन करिती । घोर महात्रय; तापि न जळती ॥ ३ ॥
त्यागि न तो नर; कधीं सरातें । रामचरणिं सद्,भाव जयातें ।

१ मंडप. २ रोमांच. ३ फार. ४ मासे, ५ बेडूक. ६ सिंह. ७ फराळाची सामुग्री. ८ मदत; सहाय्य. ९ थंडीताप. १० कृपेनें.

या मानसिं; भव-गाहे इच्छिती । करोत भावें; संत संगती ॥ ४ ॥
मानस हें मन;—नयनि पाहिलें । स्नानें, कवि-मति;—मळा क्षाळिलें ।
स्फूर्ति हृदयिं; आनन्द च्चि भरला । प्रेम प्रमोदा; पूरचि आला ॥ ५ ॥
कविता सरिता; तेथ निघाली । रामविमलयश;—जल भरलेली ।
नामें शरयू; मंगलमूला । लोक-वेद-मत;—मंजुल-कूला ॥ ६ ॥
नदी पुनीत; सुमानस नन्दिनि । कलिमल-तृण-तरु;—मूल-निकन्दिनि ॥ ७ ॥

दो.— श्रोता त्रिविध समाज,पुर; ग्राम नगर युग-कूल ।
सुजनसभा कोसलपुर; सकल सुमंगल-मूल ॥ ३९ ॥

आर्या— श्रोतृसमाज त्रिविधा ग्राम, नगर, पुर अनेक, तीरांला ।
संतसभाचि अयोध्या; निरुपम जी मूळ मंगलां सकलां ॥ ३९ ॥

रामभक्ति सुर;—सरिता झाली । सुकीर्ति, सरयू; विमल मिळाली ।
सानुज राम;—समर–यश पावन । शोण महानद; तो मनभावन ॥ १ ॥
मध्यें भक्ति; जान्हवी धारा । शोभे सहित; विराग-विचारा ।
त्रिविधताप;—त्रासक त्रिमुखानीं । राम–स्वरूपा; मिळे जाउनी ॥ २ ॥
मानस-मूळ; मिळे सुरसरिते । श्रवण सुजनमन; पावन करितें ।
मधुनि कथा; सुविचित्र विभागा । त्या तीरीं; दिसती वन बागा ॥ ३ ॥
उमा महेश;—विवाह वराती । ते जलचर; अगणित बहुजाती ।
रघुवर जन्म;—महोत्सव करती । विवर्त वीची; मनहर उठती ॥ ४ ॥

दो.—बालचरित चौबंधुकृत; वनजें विपुल बहुरंग ।
नृप-राणी-परिजन सुकृत; मकधुर-वारि-विहंग ॥ ४० ॥

आर्या— शिशुलीला चौघाही; बंधूंच्या विपुल वनज बहुरंग ।
नृप—राणी—परिजनकृत; पुण्य जंणूं भ्रमर वा जल विहंग ॥ ४० ॥

रम्य स्वयंवर; जनक–सुतेचें । सुन्दर रूप; दिसे सरितेचें ।
नदींत नौ पटु;—प्रश्न बहु खरे । नाविक कुशल; विवेक–उत्तरें ॥ १ ॥
परिसुनि कथन; परस्पर करिती । पथिकवृंद; अनुतीर शोभती ।
भार्गवकोप; धार भयखाणी । घाट सुबद्ध; राम-मृदु-वाणी ॥ २ ॥
सानुज राम; विवाहोत्सव तो । पूर सुखद शुभ; सर्वां होतो ।
श्रवणिं कथनिं; पुलकित हर्षानें । सुकृति मुदितमन; करिती स्नानें ॥ ३ ॥
रामतिलकार्थित; सजिति मंगला । पर्वकालिं जणुं; समाज जमला ।
कैकयि–कुमती; जणूं शेवाळी । विविध विपत्ती; घोरचि फळली ॥ ४ ॥

१ स्नान. २ रामाचें रणांगणांतील. ३ मिरवणूक. ४ कमळें. ५ होडी. ६ तीरातीराला. ७ परशुराम. ८ रामराज्याभिषेकासाठीं. ९ शेवाळ.

दो.—शमन अमित उत्पात करी; भरतचरित, जप-याग।
कलि-अघ; खल-अवगुण, कथन; ते जलमल बक काग ॥ ४१ ॥

आर्या— शमन अमित उत्पातां भरताचें शुभ चरित्र, जपयाग ।
कलि-अघ; खल-अवगुण—गण;—कथनचि जलमल कुपक्षि बककाग ॥४१॥

कीर्तिसरित षड्; ऋतूंत सुंदर । सदा पावनी; रम्य मनोहर ।
हिमें, शिव-शैल,—सुता सुविवाहो । शिशिर सुखद; प्रभु जन्मोत्सव हो ॥१॥
वर्णन राम;-विवाहसमाजा । मुदमंगलमय; तो ऋतुराजा ।
दुःसह ग्रीष्म; राम वन गमनें । पंथ कथा खर;-आतप पवनें ॥ २ ॥
वर्षा घोर; असुर रणकन्दन । मंगले करि सुर,-साळी-रंजन ।
रामराज्यसुख; विनय महत्ता । विमल सुखद ती; शरद रम्यता ॥३॥
सतीमणी; जानकि गुणगाथा । तो गुण अनुपम; निर्मल पार्था ।
भरतभाव जो; शीतलता ते । सदा एकरस; बदलि न जाते ॥ ४ ॥

दो.—अवलोकन भाषण गमन; प्रीति परस्पर हास ।
भ्रातृ-प्रेम चहुं बंधुचें; जलमाधुरी सुवास ॥ ४२ ॥

आर्या— अवलोकन संभाषण; गमन प्रीती परस्पर सुहास ।
भ्रातृ प्रेमा चारी; बंधूंचा तोय-माधुरी वास ॥ ४२ ॥

आर्ति विनय; दीनता मदीया । लघुता ललित न; थोडि जळीं या ।
अद्भुत सलिल; श्रवणि गुणकारी । आशा तृषा; मनोमल-हारी ॥ १ ॥
राम-प्रेमा; पोषी पाणी । हरी सकल कालि; कलुषग्लानी ।
भव-श्रम शोषक; तोषक तोषा । दुःखशमन अघ; दरिद्र-दोषां ॥ २ ॥
क्रोध काम मद; मोह विनाशन । विमल विवेक; विराग विवर्धन ।
स्नानपान; सादर करतां ते । सकल पाप हरि; परितापातें ॥ ३ ॥
जळांत मानस; या नच धुतलें । ते पामर कालि;-काळें ठकले ।
तृषित बघुनियां; कुरङ्ग-जळ तें । भ्रमति जीव; दुःखित मृग सम ते ॥ ४ ॥

दो. मति अनुसार सुवारिगुण;- गणा गणुनि मन स्नान ।
स्मरुनि भवानी शंकरा; करी कथा कवि गान ॥ ४३ (क)
अथ रघुपतिपद पंकरुहें; स्मरुनी प्राप्त-प्रसाद ।
मुनि-वर्यांचा वर्णितो; शुभद सुभग संवाद ॥ ४३ (ख)

आर्या— मति अनुसार सुवारी;—गुण-गण गणुनी मनें करूं स्नान ।
स्मरुनि भवानीशंकर; कवि कथितो ही कथा अती छान ॥ ४३ (क)

---

१ हेमंत. २ वसंत. ३ दुःसह. ४ पाण्याला. ५ सुगंध. ६ मृगजळ. ७ कमळ. ८ शुभदायक.

आर्या— वंदुनि रघुपति जलरुह;—पद चिंतुनि घेउनी तत्प्रसादा ।
वदतो मुनिद्वयांच्या; संगमिं कवि रम्य सुमग संवादा ॥ ४३ (ख)

भरद्वाज मुनि; वसति प्रयागा । करी रामपदिं; अति अनुरागा ।
तापस शमदम;-दया-निधानचि । परमार्थापथिं; परम सुजाणचि ॥ १ ॥
माघिं मकरगत; रवि जैं होतो । तीर्थपतिप्रति; बहुजन येतों ।
देव दनुज नर; किन्नर श्रेणी । सादर सकळ; नहाति त्रिवेणी ॥ २ ॥
पूजिति माधव;-पद-जलजातें । हर्ष वघुनि; अक्षयवट त्यांतें ।
भरद्वाज आश्रम; अति पावन । परमरम्य मुनि;वर मनभावन ॥ ३ ॥
तेथ ऋषी मुनि; समाज जमती । तीर्थराजिं; स्नाना जे येती ।
सकलहि प्रातः; स्नानें करिती । वदति परस्पर; हरिगुण गाती ॥ ४ ॥

दो.— ब्रह्म निरूपण धर्मविधि; वर्णिति तत्व विभाग ।
वर्णिति भगवद्भक्ति ते; संयुत ज्ञान विराग ॥ ४४ ॥

आर्या— ब्रह्मनिरूपण धार्मिक; विधि, तत्त्वें वर्णिताति स-विभाग ।
भगवद्भक्ती कथन हि; बहुपरि संयुत विवेक सुविराग ॥४४॥

यापरि माघीं स्नानें करिती । पुनरपि निज निज; आश्रमिं जाती ।
प्रतिसंवत अति प्रमोद लुटती । स्नान करुनि मुनि; वृंद परतती ॥ १ ॥
एकवार ते; स्नानें केले । सर्व मुनीश्वर स्वाश्रमिं गेले ।
याज्ञवल्क्य मुनि; परम विवेकी । भरद्वाज राखी; नमुनी कीं ॥ २ ॥
सादर चरणां; क्षालन केलें । पुनीत आसनिं; अति बसवीले ।
पूजुनि, सुयशा; मुनि वाखाणी । बोले पावन; अतिमृदु वाणी ॥ ३ ॥
संशय नाथ !; एक मज भारी । करगत वेद;—तत्व तुज सारीं ।
वदतां भय मज; लाज वाटते । जरि न वदूं बहु; होइ हानि ते ॥ ४ ॥

दो.— संत वदति अशि नीति प्रभू; श्रुति पुराण मुनि गाति ।
गुरुशीं करितां कपट तरी; विमल विवेकि न होति ॥ ४५ ॥

आर्या— संत वदति अशि नीती; प्रभो ! श्रुती मुनि पुराण ही गाती ।
चित्तीं विवेक निर्मळ; उपजेना गुरुशि जे कपट करिती ॥ ४५ ॥

जाणुनि हें निज; मोह प्रगटितो । कृपा करुनि मम; नाथ ! हरा तो ।
अमित प्रभाव; राम-नामाचा । संत पुराण; श्रुतींची वाचा ॥ १ ॥
संतत जपे; शंभु अविनाशी । शिवभगवान; ज्ञानगुण-राशी ।
आकरचारि; जीव जगिं जगती । काशीमरण; परमपद लभती ॥ २ ॥

१ वेणीमाधव. २ मनास रुचणारा. ३ प्रयाग. ४ ठेवून घेतलें.
५ हातीं आलेलीं. ६ चार खाणी.

तो हि राम; महिमा मुनिराया। शिव उपदेश; करितसे स-दया।
राम कवण प्रभु ! पुसतो तुजला। वदा बुझावुनि; कृपाब्धि मजला ॥ ३ ॥
एक राम; कोसलपति-सुत तो। चरित्र ज्याचें; लोक जाणतो।
स्त्रीविरहें बहु; दुःखी झाला। क्रोधें अति रणिं; रावण वधिला ॥ ४ ॥

दो.—प्रभु तो राम किं अपर कुणी; ज्यासि जपे त्रिपुरारि।
सत्यधाम, सर्वज्ञ प्रभो; वदा विवंचुनि भारि ॥ ४६ ॥

आर्या— प्रभो राम तो अथवा; अपर कुणी ज्या पुरारि जपताहे।
सत्यधाम सर्वज्ञा ! सांगा सम्यग् विचारुनी मज हें ॥ ४६ ॥

जेणें जाई; मम भ्रम भारी। कथा नाथ मज; ती विस्तारी।
याज्ञवल्क्य त्या; हसत बोलला। रघुपति प्रभुता, विदित तूजला ॥ १ ॥
रामभक्त तूं; मनवाक्कर्में। चतुराचीं तव; कळलीं वर्में।
श्रवणेच्छा गुण; ग्राम गूढसा। पुससि प्रश्न जणुं; अती मूढसा ॥ २ ॥
ऐक तात; सादर मन लाउनि। वदतो राम;-कथा मन हारिणि।
महामोह; महिषेश-विशाला। रामकथा; कालिका कराला ॥ ३ ॥
रामकथा शशि;-किरण समाना। संतचकोर; करिति तत्पाना।
धरी संशया; याच भवानी। महादेव मग; वदे वर्णुनी ॥ ४ ॥

दो.—तो मी वदतो यथामती; उमाशंभु संवाद।
होइ, हेतु,ज्या समयिं मुनें; ऐकुनि तुटे विषाद ॥ ४७ ॥

आर्या— तोचि यथामति वदतो; आतां ईश्वर-सती सुसंवाद।
ज्या कारण; समयीं ज्या; झाला, ऐकुनि तुटेल सुविषाद ॥ ४७ ॥

इतिश्री बालकाण्डे मानसरूपक, माहात्म्यादि प्रयाग वर्णनं नाम षष्ठोध्याऽयः

अध्याय ७ वा

एकवार; त्रेतायुग आलें। कुंभज[3]मुनि-प्रति; शंकर गेले।
सहितसती; जग-जननि भवानी। पूजी ऋषि; अखिलेश मानुनी ॥ १ ॥
रामकथा मुनि,-राज वदे ती। परिसुनि शिवें अति सौख्य मानिती।
ऋषी पुसे; निर्मळ हरिभक्ती। अधिकारी; जाणुनि शिव वदती ॥ २ ॥

---

१ समजावून. २ अयोध्यापति. ३ अगस्ति.

श्रवण निरूपण; हरिगुण गाथा। वास कांहिं दिन; हो गिरिनाथा।
मुनिनिरोप; घेई मदनारी। निघे भुवनिं सह; शैलकुमारी॥ ३॥
ते समयीं; भंजन महिभारा। हरि,-रघुवंशीं; धरी अवतारा।
पित्राज्ञें त्यजि; राज्य उदासी। दंडकवनि; विचरति अविनाशी॥ ४॥

दो.—हृदयिं विचारीत जाइ हर; केवी दर्शन होइ।
गुप्तरूप अवतरे हरी; जात जाणिला जाइ॥ ४८॥ (क)

सो.—शिवमानसि अतिक्षोभ; सती न जाणे मर्म रे।
तुलसी! दर्शन लोभ; लोचन लालुचि, मन डरे॥ ४॥ (ख)

आर्या— हृदयिं विचारी जातां; शिव, कैसें दर्शनासि पावावें।
हरि अवतारा गुप्तचि; धरि, जातां लोक विदित होआवें॥ ४८ (क)
शिवचित्ता क्षोभ बहू; मर्मातें जाणते मुळीं न सती।
दर्शन लालुच लोचनिं; लोभें, भीतीस मानसीं वसती॥ ४८ (ख)

रावण, मरण; मनुजकरिं याची। प्रभु विधिवाचा; करणें साची।
जाइन-ना, तरि; तप्तचि व्हावें। विचार करतां; युक्ति न फावे॥ १॥
यापरि परितापाकुल ईश। त्यासमयीं; जाउनि दशशीश।
नीच, मारिचा, संगे घेई। कपट कुरंग, त्वरित तो होई॥ २॥
कपटें मूढ; हरी वैदेही। प्रभु प्रभाव त्या विदित नसे ही।
बंधुसहित, मृग; वधुनी आले। सजलनयन; कुटि बघतां झाले॥ ३॥
नर इव विरह विकल रघुराऊ। शोधित फिरति; विपिनिं ते भाऊ।
कधीं योग-ना; वियोग ज्यातें। विरहदुःख; दिसलें बहु त्यातें॥ ४॥

दो.— अति विचित्र रघुपति चरित; जाणति परमसुजाण।
जे मतिमंद विमोहवश; कांहिं धरिति मनिं आन॥ ४९॥

आर्या— विचित्र अति रघुपतिचें; चरित्र, परि जाणताति तत्वज्ञ।
मतिमंद वश विमोहें; कांहीं भलतेंचि मानिती अज्ञ॥ ४९॥

शिवें समयिं त्या; राम देखिला। विशेष हर्षित; हृदयीं झाला।
नयन भरुनि; रूपाब्धि पाहिला। कुसमयिं परिचय; शिवें न दिधला॥१॥
जय सच्चिदानंद जगपावन। स्मरुनि निघे मग; मदन विनाशन।
सती समेतें; शिव निघताती। कृपानिधी अति; पुलकित होती॥ २॥
दशा पतीची; बघे सती ती। संशय विविध; हृदयिं उठताती।
शंकर जगद्वन्द्य जगदीशा। सुरनर मुनि बहु; नमिती शीर्षा॥ ३॥

---

१ बापाच्या आज्ञेनें. २ होईल. ३ भवानी. ४ रावण. ५ मृग.
६ रामचंद्र. ७ रोमांचित.

-पुत्रा तो; करी प्रणामा। वदुनी जय; सच्चित्सुखधामा।
प्रेम-मग्न शिव; रूपा पाहुनि। प्रीति हृदयिं नच; राहे मावुनि ॥ ४ ॥

दो.—ब्रह्म व्यापकहि विरज, अज; अकल अनीह अभेद।
तें किं धरुनि तनु होई नर; ज्यासि न जाणति वेद ॥ ५० ॥

आर्या— परब्रह्म जें व्यापक; विरज, अकलं अज, अनीह, निर्भेद।
ते कीं धरुनी देहा; नर होई, ज्या न जाणती वेद ॥ ५० ॥

जो हरि सुरं-हित; नरतनु धरितो। त्रिपुरारीसम; सर्वज्ञहि तो।
शोधिल तो किं; अज्ञ इव नारी। ज्ञानधाम मा;-पंति असुरारी ॥ १ ॥
शंभुगिरा परि; मृषा नव्हे ती। सर्वज्ञचि शिव; सर्व जाणती।
इति संशय मनिं; अपार शिरला। ज्ञानोदय नच; हृदयीं दिसला ॥ २ ॥
यद्यपि प्रगट न; वदे भवानी। हर हृदयस्थ; जाणती ज्ञानी।
ऐक सती तूं; नारि-स्वभावा। संशय कधि मनिं; असा नसावा ॥ ३ ॥
कथा मुनी; कुंभज ही गातो। यद्भक्ती मी; मुनिला वदतो।
तो, मम इष्टदेव रघुवीरचि। सेविति ज्यासि; सदा ऋषि धीरचि ॥ ४ ॥

छंद—मुनि धीर योगी; सिद्ध संतत; विमलमति ज्या ध्याइती।
नहि, नेति, निगम; पुराण आगम, कीर्ति ज्याची वर्णिती ॥
तो राम व्यापक; ब्रह्मभुवन-निकाय-पति माया-धनी।
अवतार धरि निज; भक्तहित निजं-तंत्र अजं रघुकुलमणी ॥ १ ॥

सो.— ठसे न मनिं उपदेश; यदपि वदे शिव वार बहु।
बोले हसुनि महेश; हरिमायाबल अमित अति ॥ ५१ ॥

आर्या— उपदेश मनिं ठसेना; जरि वारंवार शंभुनें केला।
हरिमायाबल अतितर; जीवीं जाणोनि शंर्व मग वदला ॥ ५१ ॥

अति संशय मन; तुमचे वसवी। जाउनि कां न; परीक्षा घ्यावी।
तंववरि म्यां वट;-तळीं बसावें। जोंवरि मज;-पाशीं तुम्हि यावें ॥ १ ॥
जैसे जाति मोह-भ्रम-भारे। तो करि यत्न; विवेक विचारें।
जाय सती शिव;-आज्ञाकारी। कसें करावें; मनीं विचारी ॥ २ ॥
इथें शंभु मनिं; करि अनुमाना। दक्षं-सुता; कल्याण दिसेना।
मम वचनेंहि न; संशय आटे। विधिं विपरीत; होइ बहु वाटे ॥ ३ ॥
घडेल तें जें; प्रभुला वाटे। तर्क करुनि कां; वाढवुं फाटे।
जप करि हर मग; हरिनामातें। सुख-धामा प्रति; आइ सती ते ॥ ४ ॥

२ पूर्ण. ३ देवांच्यासाठीं. ४ विष्णु. ५ स्वतंत्र; ६ जन्मरहित. ७ भक्तांसाठीं.
७ शंकर. ८ समुदाय. ९ दक्षप्रजापतिकन्या. १० दैवानें. ११ सुखाचें घर-राम.

दो.—मनिं बहुवार विचारुनी; धरुनि जानकीरूप ।
त्या मार्गें ती चालली; ज्या येती नरभूप ॥ ५२ ॥

आर्या— वारंवार विचारा; करुनि मनीं धरुनि जानकीरूप ।
त्या मार्गेंचि निघाली; ज्या मार्गें येति राम नरभूप ॥ ५२ ॥

लक्ष्मण बघे; उमाकृत वेषा । चकित हृदयिं मग; भ्रमें विशेषा ।
कांहिं न बोले; अति गंभीरहि । प्रभु-प्रभाव; जाणे मतिधीरहि ॥ १ ॥
सती-कपट; जाणति सुर-स्वामी । सर्वज्ञचि ते; अन्तर्यामी ।
ज्या स्मरणें; फिटतें अज्ञान । तो सर्वज्ञ; राम भगवान ॥ २ ॥
सती तिथें करुं; इच्छी कपटा । नारि-स्वभाव;-प्रभावचि उलटा ।
निजमायाबल; मनिं वाखाणी । बोले हसुनि; राम मृदुवाणी ॥ ३ ॥
कर जोडुनि प्रभु; करी प्रणामा । तातसमेत; वदे निजनामा ।
पुसिलें मग; कोठें वृषकेतू[2] । एकटें[3] फिरा; कवण, वनिं हेतू ॥ ४ ॥

दो.—रामवचन मृदु गूढ अती; परिसुनि बहु संकोच ।
सती सभीत महेशप्रती; निघे, हृदयिं अति शोच ॥ ५३ ॥

आर्या— गूढवचन रामाचें; मृदु, परि परिसूनि लाज बहु झाली ।
सती सभीत, महेशा;-प्रति, चिंताव्यथित-चित्तचि निघाली ॥ ५३ ॥

शंकर वचना; मी न मानिलें । हरिवरि निज;-अज्ञान लादिलें ।
जाब काय मी; देउं जाउनी । उपजे दारुण; दाह तिज मनीं ॥ १ ॥
जाणति राम; सती दुःखाला । प्रभाव निज मग; प्रगट दाविला ।
सती बघे; कौतुक पाथिं जातां । सीताराम; पुढें सह भ्राता ॥ २ ॥
फिरुनि बघे; मागें प्रभु दिसती । सुंदर वेष; बंधु सीतापति ।
जिथें दृष्टि, हरि; तेथें दिसती । चतुर मुनीश्वर; सिद्ध सेविती ॥ ३ ॥
दिसती शिव विधि; विष्णु अनंतचि । एकेकाचा; प्रभाव अमितचि ।
वंदिति चरण; करिति प्रभुसेवा । पाहे विविध,-वेष सब देवां ॥ ४ ॥

दो.—सती विधात्री इंदिरा; दिसती अनुपम रूप ॥
जो जो वेष अजादि सुरां; त्या त्या तनु अनुरूप ॥ ५४ ॥

आर्या— लक्ष्मी उमा सरस्वति; अमितचि अनुपम सतीस कीं दिसती ।
ज्या ज्या वेषीं ब्रह्मा;—दिक सुर अनुरूप सर्व ही असती ॥ ५४ ॥

जिथें तिथें रघु;पति बहु दिसती । सकल सशक्तिक[4] सुरही असती ।
जीव चराचर; जे संसारीं । दिसले सकल; अनेक प्रकारीं ॥ १ ॥
पूजिति प्रभुसि; देव बहु वेषीं । रामरूप नहिं; भिन्न अशेषीं ।

---

१ देवदेवेश. २ शंकर. ३ एकट्या. ४ शक्तीसह.

अवलोकी बहु; रघुपति सारे। सीतेसह नच; वेष कुजा रे ॥ २ ॥
तो रघुवर तीं; लक्ष्मण सीता। बघुनि सती अति; होत सभीता।
हृदय-कंप, तनु;-शुद्धिहि नाहीं। नयन मिटुनि पथिं, बसली पाहीं ॥३॥
पुनरपि बघे; उघडुनी नयनां। दक्ष कुमारिस, कोणि दिसेना।
शिर नमुनी बहु; वार हरिपदीं। जिकडे शिव; ती निघेचि सेपदीं॥४॥

दो.—शंकर सन्निध गेलि मग; हसुनि पुसति कुशलासि।
केलि परीक्षा कवण विधी; सत्य वदा वचनासि ॥५५॥

आर्या— जाइ समीप महेशा; हसुनी कुशला बिचारि तिजलागीं।
कवण्या विधिनें केलें; सांग परिक्षेसि सत्य मजलागीं ॥ ५५ ॥

इतिश्री बालकाण्डे सती-भ्रमादि वर्णनं नाम सप्तमोध्यायः
मास पारायणे द्वितीयो विश्रामः

अध्याय ८ वा

प्रभु प्रभाव; जाणुनी सती ते। शिवासि भयवश; करि कपटातें।
मुळि न परीक्षा; केली स्वामी। आपणांपरि; नमिलें रामा मी ॥ १ ॥
भगवद्वचन; वृथा नच असतें। मम मनिं अशी; प्रतीती वसते।
ध्यान धरुनि मग; भवें पाहिलें। सर्व सतीकृत; चरित जाणिलें ॥ २ ॥
मायेसी मग; मस्तक नमवी। सतीसही जी; असत्य वदवी।
हरि इच्छा! भावी बलवान। हृदयिं विचारि; सुज्ञ शिव जाण ॥३॥
सीता-वेष; सतीनें धरिला। शिवा विषाद; विशेषचि झाला।
जरी करीन; सतीशी प्रीती। भग्न भक्तिपथ; होय, अनीती ॥ ४ ॥

दो.—परमपुनीता त्यागुं कशी; प्रीती करितां पाप।
प्रगट नवदे महेश जरि; हृदयिं अधिक संताप ॥५६॥

आर्या— परम पुनीता केवी; त्यागूं प्रीती करीन तरि पाप।
प्रगट वदे न महेश्वर; परि हृदयीं परम होइ संताप ॥ ५६ ॥

प्रभुपदिं शिर; शिव नमिते झाले। स्मरतां राम; मनीं मग आले।
सतीभेट त्या; देहीं नाहीं। शिव संकल्प; करी दृढ हाही ॥ १ ॥
करुनी शंकर; अशा विचारा। भुवना निघे स्मरत रघुवीरा।
आतां गगन;-गिरा मग वदली। जय भव! भली; भक्ति दृढ केली ॥२॥

---

१ तावडतोब.   २ आकाशवाणी.

ऐसा पण तुज;-वीण न कर्ता । समर्थ राम;-भक्त भगवन्ता ।
परिसुनि गिरा; धूर चिंतेचे । पुले पतील; परम संकोचें ॥ ३ ॥
वदा कवण पण; . करा कृपाला । सत्य धाम प्रभु; ! दीन दयाळा ।
यदपि सती; पुसते बहु रीतीं । तदपि न वदे; त्रिपुर-आराती ॥ ४॥

दो.—सती मनीं अनुमान करी; जाणति सब सर्वज्ञ ।
शिवाशि म्यां केलें कपट; नारि सहज जड अज्ञ ॥ ५७ (क)

सो.—पयसम् विकिति जलास; बघा प्रीतिची रीत भलि ।
भिन्न होइ, रस नाश; कपट आम्लें पडतां त्वरित ॥ ५७ (ख)

आर्या— सती करी अनुमाना; झाले तें सर्व विदित सर्वेशा ।
केलें कपट शिवासी; मी नारी सहज कीं जड-प्रज्ञा ॥ ५७ (क)
दुग्धासम जळ विकतें, भली अशी प्रीतिची असे समता ।
भिन्न पडे रस जातो; तक्रासम कपट-आम्ल-लव पडतां ॥ ५७ (ख)

चित्तीं शोक बघुनि निजकरणी । चिंता अमित; कोण ती वर्णी ।
कृपासिंधु शिव; परम अगाध । प्रगट वदति ना; मम अपराध ॥ १ ॥
अनुमानुनि शिव;-हेतु सती ती । त्यजि हर मज; समजुनि व्याकुळ ती ।
निज अघ समजुनि; वदे न कांहीं । ताप अवां-इव; मनि बहु पाहीं ॥ २ ॥
सती सशोक; बघति वृषकेतू । वदे कथा सुंदर सुखहेतू ।
वर्णित पथीं; बहुत इतिहासा । विश्वनाथ; गेले कैलासा ॥ ३ ॥
तिथें शंभु, पण; स्मरुनी अपुला । वटतरुतळिं; कमलासनिं बसला ।
शिव निजरूपीं; निमग्न झाला । पूर्ण समाधि; अखंड लागला ॥ ४ ॥

दो.—सती वसे कैलासिं मग; शोक न राहि मनांत ।
मर्म न कोणी जाणती; युगसम दिन तिज जात ॥५८॥

आर्या— तेव्हां सती वसे ती; कैलासीं. शोक फार मनिं होतो ।
मर्मा कोणि न जाणे; तिजला मग युगसमान दिन जातो ॥ ५८ ॥

प्रतिदिन शोक; सतीमनिं भारी । कैं शोकाब्धि; सुके दुखकारी ।
म्यां रघुपति-अप;-मांना केलें । पतिवचनातें; मृषा मानिलें ॥ १ ॥
त्याचें फळ मज; विधिनें दिधलें । उचित असे-जें; तैंचि आहलें ।
विधे ! आण हें उचित न तुजला । शंकर-विमुख;जगविसी मजला ॥ २ ॥
कोण वदे जी; चित्तीं ग्लानी । मनीं राम ती; स्मरते ज्ञानी ।
प्रभु ! तुज दीन;-दयाळु म्हणती । शोकनिवारक; वेदहि वदती ॥ ३ ॥

१ त्रिपुरासुराचे शत्रु, शंकर. २ ताक. ३ बुद्धी. ४ कुंमाराची भट्टी. ५ खोटें.

जोडुनि कर तरि; मी विनवीतें। या देहांतुनि; सोडवि मातें।
शिवचरणीं जरि; प्रेम शुद्ध मम। पातिव्रता मी; मनवाक्कर्म ॥ ४ ॥

दो.—विश्वचक्षु तूं एक प्रभू !; तो करि त्वरित उपाय।
होय मरण मम विनाश्रम; विपत्ति दुःसह जाय ॥ ५९ ॥

आर्या— विश्वचक्षु ऐका प्रभु !; ऐसा आतां उपाय योजावा।
जेणें येइ विनाश्रम; मरण, हि दुःखद विपत्ति हा जावा ॥ ५९ ॥

यापरि दुखित; प्रजेशें कुमारी। दुःख अती; दारुण निज भारी।
सत्तांशीति; सहस्रहि गेले। संवत शिवें; समाधिस त्यजिलें ॥ १ ॥
राम राम मग; शिव स्मरुं लागे। जाणे सती; जगत्पति जागे।
जाउनि शिवपदिं; वंदन केलें। सन्मुख आसन; हरें अर्पिलें ॥ २ ॥
करी कथन हरि;-कथा रसाळा। दक्ष प्रजेशीं; होइ त्या काळा।
विधी-विचारें; दिसला लायक। दक्षा करी; प्रजापति-नायक ॥ ३ ॥
दक्षा बहु अधिकार लाभला। मनिं मग अति अभिमान जाहला।
कोण असा जगिं; जन्मे पाहीं। प्रभुता पावुनि; ज्या मद नाहीं ॥ ४ ॥

दो.—मुनी सकल बोलावुनी; आरंभी अति याग।
निमन्त्रि सादर सकल सुर; जे पावति मखभाग ॥ ६० ॥

आर्या— दक्ष सकल बोलावी; मुनि, आरंभीं पुढें महा याग।
आमन्त्री सकल सुरां; सादर, जे पावती मखीं भाग ॥ ६० ॥

किन्नरनाग, सिद्ध गंधर्व; वधूं सहित सुर; निघती सर्व।
विष्णु विरंचि; महेशां वारुनि। जाति सकल सुर; यानें सजवुनि ॥ १ ॥
सती विलोकी, व्योमिं विमानां। दिसती बहु; सुंदर विध-नाना।
सुरसुंदरी; करिति कलगाना। परिसुनि कानिं; त्यजिति मुनि ध्याना ॥ २ ॥
पुसतां कथिलें; सर्व महेशें। पिता-यज्ञ परि;-सुनि अणु हर्षे।
जरि महेश मज; आज्ञा देते। या निमित्त दिन; कांहीं जातें ॥ ३ ॥
पति त्यागें मनिं; दुःखी भारी। वदे न निज अपराध विचारी।
बोले सती; मनोहर वाणी। भय,-संकोच;-प्रेमरस-खाणी ॥ ४ ॥

दो. -जनकभुवनिं उत्सव परम; प्रभु आज्ञा जरि होइ।
तरि मी नाथ ! कृपानिधि; सादर बघण्या जाइ ॥ ६१ ॥

आर्या— जनकागृहीं महोत्सव; आज्ञा जरि मज महेश देतील ।
कृपायतन ! मी सादर; जाइन मज सौख्य बहुत होईल ॥ ६१ ॥

---

१ सती. २ (८७). ३ वर्षे. ४ प्रजापति. ५ यज्ञभाग. ६ सोडून. ७ आकाशांत. ८ जाईन.

योग्य वदसि मम; चित्तीं रुचलें। परि अनुचित, तुज, मूळ न आलें।
दक्ष सकल; कन्यांसी अणवी। मम वैरें तुज; नच बोलावी॥ १॥
विधिसभेंत मज; विरुद्ध मानी। आजवरी; म्हणुनी अपमानी।
अनाहूत जरि; जाशि भवानी। स्नेह शील; मानीना कोणी॥ २॥
यदपि-मित्र-प्रभु;--पितृ--गुरुगेहीं। अनाहूत; जावेंचि कदाही।
तदपि विरोध; जेथ कुणि मानी। जात तेथ; कल्याणा हानी॥ ३॥
विविधविधी; शंकर समजावी। ज्ञान न मनिं; उपजे वश-भावी।
अनाहूत जरि; जाशी अबले। बरें होइना; मज हें दिसलें॥ ४॥

दो.—बघति करुनि हर यत्न बहु; राहि न दक्षकुमारि।
दिले मुख्यगण सर्वे मग; दे निरोप त्रिपुरारि॥ ६२॥

आर्या— शिव यत्नां करुनि बघे; दक्षकुमारी तरी हि राहीना।
दिधला निरोप तिजला; देउनि सह मुख्यशा निजगणांनां॥६२॥

जनकभवनिं जैं; गेलि भवानी। दक्षभयें; कोणि न सन्मानी।
सादर भेटे; केवळ माता। भगिनी भेटति; बहुत हासतां॥ १॥
दक्ष तरी न; पुसे कुशलासी। बघुनि सतीस; जळे चित्तासी।
सती बघे, जों; जाउनि यागा। पाहि कुठें नच; शंकर भागा॥ २॥
मग आठवी; शंभुच्या बोलां। प्रभु, अपमान; दाह मनिं झाला।
पूर्व दुःख; ऐसें नच गमलें। परितापें मनिं; जितुकें भरलें॥ ३॥
दुःखें दारुण; जरि जगिं नाना। तीं नच तुलति; स्वजन अपमाना।
दारुण दिसे; सती सक्रोधा। बहुविध जननी; करी प्रबोधा॥ ४॥

दो.—शिव अपमान असह्य अति; हृदय मानिना बोध।
सकल सभे हटकूनि मग; बोले संयुत क्रोध॥ ६३॥

आर्या— शिव अपमान असह्यचि; अति, हृदयीं त्या न होय उद्बोधं।
सकल सभे दरडावुनि; सोडी वाक्सायकांसि सक्रोध॥ ६३॥

ऐका बोल; सकल मुनिवृन्दां। ज्यांनि केलि; ऐकिलि शिव-निंदा।
तत्फळ त्वरित; मिळे सर्वांला। पश्चात्ताप; घडेल पित्याला॥ १॥
संत, शंभु श्रीःपति अपवादा। ऐकति तिथें; अशी मर्यादा।
जीभ कापण्या; समर्थ व्हावें। नातरि, कान; मिटूनि पळावें॥ २॥
जगदात्माचि; महेश पुरारी। जगज्जनक; सर्वां हितकारी।
पिता मंदमति; निन्दी त्या हो!। दक्ष-शुक्र-संभव हा देहो॥ ३॥

१ न बोलावितां. २ प्रारब्धवशात्. ३ उपदेश. ४ ज्ञान, समज.
५ वाग्बाण. ६ निंदेला.

त्यजितें त्वरित; तनू त्या हेतू। चिंतित चंन्द्र;मौलि वृषकेतू।
वदुनि, तनू; योगानाळें जाळी। हाहाकार; तिथें त्या काळीं ॥ ४ ॥

दो.—वार्ता परिसुनि शंभु गण; करुं धावति मखनाश।
यज्ञ विनाशा पाहुनी; भृगु रक्षी मग त्यास ॥ ६४ ॥

आर्या— ही वार्ता परिसुनियां; शिवगण नाशार्थ धावते झाले।
मख-विध्वंसा पाहुनि; भृगु-ऋषिनें रक्षणासि मग केलें ॥ ६४ ॥

समाचार हा; शिवासि कळला। कोपजे[1] वीर;-भद्र धाडियला।
जाउनि मख; विध्वंसा केलें। सकल सुरां फळ; सुयोग्य दिधलें ॥१॥
विश्वविदित गति; दक्षहि पावे। शिव-विमुखीं ज्यां; गतीस जावें।
हा इतिहास; विदित जगताला। म्हणुनी म्यां; संक्षेपें कथिला ॥ २ ॥
वर मागे; मरतां हरिपाशीं। प्रतिजन्मीं शिव;-अनुरागासी।
म्हणुनि हिमाचल; गृहासि गेली। गिरिजा-देहा; धरुनि जन्मली ॥ ३ ॥
यदा उमा, गिरि;-गेहा आली। सकळ सिद्धि; संपत्तिहि झाली।
जिथें तिथें मुनि; आश्रम करिती। उचितवास हिम;-भूधरें[2] देती ॥ ४ ॥

दो.—सदा सुमन-फळ-सहित बहु; द्रुमें[3] नवें[4] नाना जाति।
प्रगटति सुंदर, गिरीवरि; मणि-आकर[5] बहु रीति ॥ ६५ ॥

आर्या— सदा सुमन-फळ-संयुत; नानाद्रुम दिसति विविध जातींचे।
प्रगटति सुंदर शैलीं; बहु मणि-आकर अमूल्य रत्नांचे ॥ ६५ ॥

इतिश्री बालकाण्डे सतीत्यागादि पार्वतीजन्मवर्णनं
नामाष्टमोऽध्यायः।

अध्याय ९ वा

पावन जल;सरिता बहु वाहे। खग-मृग-मधुप[6] सुखी सब राहे।
जीव सहज, करि; वैर-त्यागा। गिरिवरि सकल; करिति अनुरागा ॥ १ ॥
शोभे गिरि;गिरिजा गृहिं येतां। जीव जसा हरि;भक्ति लाभतां।
मंगल नूतन; नित्य गृहीं ते। ब्रह्मादिक ज्यां; गाति यशातें ॥ २ ॥
समाचार ही; नारद पावे। कुतूहलें गिरि;-गेहा धावे।
शैलें सादर; स्वागत केलें। पाय धुउनि शुभ;आसन दिधलें ॥३॥
मुनि पदिं, नारी;सह शिर नमिलें। चरणसलिल[7] निज;गृहीं शिंपिलें।
निज सौभाग्य; बहुत गिरि वर्णी। आणुनि सुता; घालि मुनिचरणीं ॥४॥

---

१ कोपापासून उत्पन्न झालेला. २ हिमालय पर्वत. ३ वृक्ष. ४ नवे.
५ रत्नांच्या खाणी. ६ भुंगे. ७ पायांचें तीर्थ.

दो.—त्रिकालज्ञ सर्वज्ञ मुने! तुम्हां गती सर्वत्र।
मुनिवर! हृदयिं विचारुनी सांगा सुता चरित्र ॥ ६६ ॥

आर्या— त्रिकालज्ञा सर्वज्ञा; गमन तसें होतसे हि सर्वत्र।
मुनिवर चित्तिं विचारुनि; कन्येचें मम वदाल सुचरित्र ॥ ६६ ॥

बोले हसुनि; गूढ मृदु वाणी। तुमची सुता; सकल गुणखाणी।
सुंदर सहज; सुशील शहाणी। नाम अंबिका; उमा भवानी ॥ १ ॥
बहु लक्षण; संपन्न कुमारी। होइल संतत; पतीस प्यारी।
पावे सदा; अचल सौभाग्या। जननिजनक; चढतीलहि भाग्या ॥ २ ॥
होइल पूज्य; सकल जगता ही। तद्भजनें नच; दुर्लभ कांहीं।
नाम हिचें; स्मरतां संसारी। स्त्रिया चढति पति;-व्रत[1] असिधारी ॥ ३ ॥
सुता सुलक्षण; शैला तुमची। ऐका अवगुण; दोन चारची।
अगुण अमान; जननि-पितृहीना। उदासीन; लज्जादि विहीना ॥ ४ ॥

दो.—योगी जटिल[2] अकाम-मन; नग्न अमंगल वेष।
अशा पतीस वरील ही; वदे हातिची[3] रेख ॥ ६७ ॥

आर्या— निष्काम जटिल योगी; नग्न सदा, करि अमंगळा वेषा।
ऐसा पती मिळे हें; स्पष्टचि; कीं दिसतसे करीं रेषा ॥ ६७ ॥

परिसुनि मुनिवच; वाटे सत्य। दुःखित दंपति; पार्वति हर्षित।
भेद नारदा; ही नच कळला। दशा एक परि; भाव वेगळा ॥ १ ॥
सकल सखी गिरि; गिरिजा मयना। पुलक शरीरिं; भरे जल नयनां।
होइ न मृषा; देव ऋषि वाणी। उमा वचन तें; मनिं वाखाणी ॥ २ ॥
उपजे शिवपद;पद्मीं स्नेहो। प्राप्ति कठिण, मनिं; बहु संदेहो।
लपवी प्रीती; कुसमय जाणुनि। सखि-उत्संगीं[4]; बैसे जाउनि ॥ ३ ॥
नारदवचन; अन्यथा नाहीं। सुज्ञ सखी;-दंपति चिंता ही।
वदे धीर; धरुनी गिरिराया। नाथ वदा करुं; कवण उपाया ॥ ४ ॥

दो.—हिमवंता! मुनि; ऐक म्हणे; विधी-लिखित जें भाळिं।
देव दनुज नर नाग मुनि; कोण शक्त[5] जो टाळि ॥ ६८ ॥

आर्या— ऐक म्हणे हिमवंता; मुनि, विधि-लिखितचि असेल जें भाळीं।
देव दनुज मुनिवर नर; नाग कुणीहीं कधीं न तें टाळी ॥ ६८ ॥

तदपि सांगतो; एक उपाया। होय, करी जरि; दैव सहाया।
वर मी वदलों; तसाचि पाहीं।-मिळे उमेला; संशय नाहीं ॥ १ ॥

१ पातिव्रत्य. २ जटाधारी. ३ हातावरची. ४ मांडीवर. ५ समर्थ.

वराविषयीं जे; दोष वर्णिले। सर्व शंकरा;-पाशीं दिसले।
शंकरासि जरि; विवाह होतो। दोष हि गुणसम; सबजन वदतो ॥२॥
जरि [1]अहिशेज; शयन हरि करिती। बुध कांहीं त्या; दोष न धरिती।
भानु कृशानु; सर्व रस खाती। त्यांनां कोणी; मंद न म्हणती ॥ ३ ॥
शुभ वा अशुभ; सलिल सब वाहे। भागीरथि न; अपावन पाहे।
दोष समर्थी; नसेचि जाणा। रवि पावक; गंगा हि प्रमाणा ॥ ४ ॥

दो.—जरि अशि ईर्षा करिति नर; जड-विवेक अभिमान।
निरयीं पडती कल्पभरी; जीव किं ईश समान ॥ ६९ ॥

आर्या— ऐशी ईर्षा मानव; जरि करि, युत-जड-विवेक, अभिमानी।
कल्पभरी नरकी की; पडतो, जीवासि ईशसम मानी ॥ ६९ ॥

सुर-नदि-जल-कृत; वारुणि जाणा। कधिं न संत तरि; करिती पाना।
सुरसरि मिळतां; पावन जैसें। ईश अनीशां; अंतर तैसें ॥ १ ॥
शंभु समर्थ. सहज भगवाना। विवाहितां; वरणें कल्याणा।
दुराराध्य जरि; महेश गमतो। क्लेशां करतां; आशु तोषतो ॥ २ ॥
तपा करील; कठोर कुमारी। भावी फिरवुं; शके त्रिपुरारी।
वर अनेक जगिं; यद्यपि पाही। शिवाहुनी हिज; दुसरा नाहीं ॥ ३ ॥
वरदायक प्रण;-तार्ती भंजन। कृपासिंधु; सेवक-मन-रंजन।
इच्छित फळ, विण, शिव-आराधन। प्राप्ति न कोटि; योग जपसाधन ॥४॥

दो.—सांगुनि, नारद स्मरत हरी; दे गिरिजे आशीस[9]।
होइल हें कल्याण अतां; संशय त्यजा गिरीश ॥ ७० ॥

आर्या— स्मरण हरीचे करुनी; नारद गिरिजेसि आशिषां मग दे।
कल्याणाचे होय हिचें; मग मुनि, "संशय नको," गिरीस वदे ॥७०॥

सांगुनि ब्रह्म;-[10]भुवनीं मुनि गेले। ऐका पुढें; चरित जें झालें।
एकांतीं; वदली गिरिराणी। नाथ न समजे; मज मुनिवाणी ॥ १ ॥
गृह-कुल-शुद्ध;-वरा अनुरूपा। द्यावि सुता हे; दिव्य स्वरूपा।
[11]न तरि भली; राहील कुमारी। उमा प्राणसम; मजला प्यारी ॥ २ ॥
जरि वर मिळे न;, गिरिजे योग्य। गिरि जडमति, जन; वदति; अयोग्य।
या सुविचारें; करा विवाहो। ना तरि मग; उपजे उर-[12]दाहो ॥ ३ ॥
पदुनि ठेवि शिर; चरणांवरती। स्नेह सहित तिज; म्हणे गिरिपती।
अनल निघेल; शशींतुनि पाहीं। नारद वचन; अन्यथा नाहीं ॥ ४ ॥

---

१ शेषशय्येवर. २ मंदबुद्धि. ३ नरकांत. ४ मानणारा. ५ दारू. ६ जीवं. ७ सत्वर. ८ शरणागताचे क्लेश. ९ आशीर्वाद. १० ब्रह्म लोकाला. ११ नाहींतर. १२ पश्चात्ताप.

दो.—प्रिये शोक-परिहार करी; स्मरण करी भगवान।
पार्वतीस निर्माण करी; तोचि करिल कल्याण ॥ ७१ ॥

आर्या— शोका त्यागुनि सर्वहि, प्रिये करी स्मरण चित्तिं भगवान।
जो पार्वतीस निर्मी; तोचि हरी करिल सर्व कल्याण ॥ ७१ ॥

कन्येवरि बहु; असेल स्नेहो। तिला अशी तरि; शिकवण द्या हो।
करि तप जेणें; प्राप्ति महेश। अन्य उपायें, सरति न क्लेश ॥ १ ॥
नारद वचन; सगर्भ सहेतू। सुंदर सबगुण;-निधि वृषकेतू।
अशा विचारें; त्यजी कुशंका। मानुं नको; शंकरीं कलंका ॥ २ ॥
पतिवचनें मनिं; हर्षित झाली। त्वरित उठुनि; गिरिजेप्रति गेली।
बघुनि उमेसि; नयनिं ये वारी। घे उत्संगीं; स्नेहें भारी ॥ ३ ॥
वारंवार; हृदयिं तिज धरिते। गद्गद कण्ठें; वदूं न शकते।
जगज्जननि; सर्वज्ञ भवानी। मातृसुखद; बोले मृदु वाणी ॥ ४ ॥

दो.—स्वप्न अंबे मी पाहिलें; तुज सांगेन विशेष।
सुंदर गौर सु-विप्रवर; ऐसा करि उपदेश ॥७२॥

आर्या— माते मजला पडले; स्वप्न जसें, सांगतेंचि निःशेष।
विप्रें सुंदर गौरें; मजला ऐसा दिला सदुपदेश ॥७२॥

जाउनि करि तप; शैलकुमारी। नारद वचं तूं; सत्य विचारी।
मातापित्यांसि; हें मत रुचतें। सौख्यद तप; दुःखासि नासतें ॥१॥
रची तपबळें; विश्व विधाता। विष्णु तपबळें; जगता त्राता।
शिव-तप-बळें; करी संहारा। अहि तपबळें; धरी महि-भारा ॥ २ ॥
तपाधार ही; सृष्टि भवानी। करी जाइ तप; मनिं हे आणी।
परिसुनी वच, अतिं; विस्मित माता। बोाहुनि वदे; स्वप्न हिमवंता ॥ ३ ॥
समजाविलि बहु; जननि-पित्यानें। उमा तपासि; निघे हर्षानें।
प्रिय परिवार; पिता आणि माता। व्याकुळ बहु, मुखिं; येइ न वार्ता ॥४॥

दो.—वेदशिरा-मुनि येइ मग; समजावी सर्वांस।
पार्वति महिमा परिसुनी समाधान सर्वांस ॥ ७३ ॥

आर्या— वेदशिरा मुनि येउनि; समजावुनि सांगतांचि सर्वांना।
परिसुनि पार्वतिचा बहु; महिमा, तीं मानिती समाधाना ॥७३॥

धरि मनिं उमा; प्राणपतिचरणां। विपिनिं वसुनिः लागे तपकरणा।
अति सुकुमार न; तनु तप-योगा। पतिपद स्मरुनि; त्यजी सब भोगां ॥१॥

१ गूढ. २ शंकराचे ठायीं. ३ आई! ४ वचन. ५ समज. ६ शोष.
७ तपश्चर्येचा आधार असलेली. ८ बोलावून. ९ तपश्चर्येस योग्य.

प्रति दिन प्रीति; अधिक मनिं जागे । विसरे देह; तपा मनलागे ।
वर्ष सहस्र; मूळ फळ खाई । शाक खात शत; संवत जाई ॥ २ ॥
किति दिन वायु; वारि करि भोजन । करी कठिण; उपवास किती दिन ।
बिल्वपत्र महि;गत जीं सुकलीं । संवत सहस्र;-तीन खादलीं ॥ ३ ॥
मग परिहरी; शुष्कही पर्णा । उमानाम मग; पडे अपर्णा ।
क्षीण बघुनि अति; उमाशरीरा । ब्रह्म-गिरा गुरु; गगनिं गभीरा ॥ ४ ॥

दो.—होइ मनोरथ सुफल तव; ऐक गिरीश कुमारि ।
दुःसह क्लेशां पुरे करी; वरिल तुला त्रिपुरारि ॥ ७४ ॥

आर्या— सुफळ मनोरथ तुझे; होतिल, तूं समज शैल-सुकुमारी ॥
तप दुःसह परिहरि तूं; धन्यचि; तुजला वरील त्रिपुरारी ॥ ७४ ॥

ऐसें तप कधिं; कोणि न केलें । ज्ञानि, धीर, मुनि; अनेक झाले ।
हृदयिं धरुनि ही; वर विधिवाणी । सत्य सदा शुचि; संतत मानी ॥ १ ॥
येइ पिता, बोलावूं जेव्हां । हट सोडुनि; गृहिं जाई तेव्हां ।
सप्त ऋषी तुज; यदा भेटती । प्रमाण तैं विधि; गिरा मान ती ॥ २ ॥
ऐकुनि, कथिलें; नभ-वाणीनें । गिरिजा देहिं; पुलक हर्षानें ।
उमा-चरित्रा; सुरम्य कथिलें । पुढें रम्य शिव; चरित वर्णिलें ॥ ३ ॥
जाउनि सती; तनू जैं त्यागी । तैं पासुनि अति; शंभु विरागी ।
जपे सदा; रघु,नायक नामा । कुठेंहि ऐके; हरिगुण ग्रामा ॥ ४ ॥

दो.—चिदानंद सुखधाम शिव; विगत-मोह-मद-काम ।
विचरे महिवरि, हृदयिं हरी; सकल-लोक-अभिराम ॥७५॥

आर्या— सुखधाम चिदानंदहि; शिव गत-मदमोह-मान; गत-काम ।
विचरे महि हर, हृदयीं; धरुनि हरी, सकळ लोक-अभिराम ॥७५॥

कुठें ज्ञान; उपदेशि मुनींनां । कुठें गान करि; रामगुणांनां ।
यदपि अकाम; तदपि भगवाना । भक्तविरह बहु; दुःख सुजाणा ॥ १ ॥
बहुत काल; गेला या रीतीं । नित्य नवीन; रामपदिं प्रीती ।
नेम कठोर; प्रेम-शिव वाहे । अविचल भक्ति; हृदयिं बहु आहे ॥२॥
राम कृतज्ञ; कृपाळु प्रगटले । शील तेज निधि; रूप-विशालें ।
बहुविध राम; शिवा वाखाणी । तुजविण हें व्रत; पाळि न कोणी ॥ ३ ॥
बहुपरि हरी; हरा समजावी । गिरिजा जन्म;-कथेसि ऐकवी ।
अतिपुनीत गिरि;तनया-करणी । बहु विस्तार; कृपानिधि वर्णी ॥ ४ ॥

---

१ भाजीपाला. २ कांहींच सेवन न करणें. ३ जमिनीवर पडलेलीं. ४ आकाश-वाणी ५ गंभीर. ६ पुरेकर; सोड. ७ उत्तम, श्रेष्ठ. ८ पवित्र. ९ फिरूं लागले. १० निश्चल.

दो.—अतां विनति मम ऐक जरी; प्रेम मजवरी होइ।
शैलसुतेसि विवाह करी; इतुकें मजला देइ ॥ ७६ ॥

आर्या— आतां मम विनतीतें; ऐक, जरी प्रेम मजवरी करणें।
हिम-नगे-कन्येसी तूं, विवाह करि, मागतो, मला देणें ॥ ७६ ॥

शंभु म्हणे हें; उचितचि नाहीं। प्रभु आज्ञा तरि; अभंग पाही।
शिरसा मान्य; करुनि आचरणें। सेवक धर्म; नाथ ! हा म्हणणें ॥ १ ॥
माता पिता; गुरूप्रभु वचनें। विना विचारें; शुभ तीं करणें।
सब विधि प्रभू; परम हितकारी। आज्ञा अपुली; नाथ शिरावरि ॥ २ ॥
प्रसन्न प्रभु; परिसुनि शिववचना। भक्ति, विवेक;-धर्मयुत रचना।
वदे शिवा प्रभु; पण पुरवीला। विसरुं नका या; मम वचनाला ॥ ३ ॥
अन्तर्धान; वदुनि हरि॰ होती। तीच मूर्ति शिव; हृदयिं राखिती।
सप्तऋषी शिव; सन्निध आले। रम्य वचन भव; वदते झाले ॥ ४ ॥

दो.—पार्वतिपाशीं जाउनी; प्रेम-परीक्षा घ्यावि।
निरसुनि संशय गृहा मग; शैला सांगुनि न्यावि ॥ ७७ ॥

आर्या— जाउनि पार्वतिपाशीं; प्रेमाची पाहुनी परीक्षा हो।
पाठवुनी पर्वत-पति; गतसंशय करुनि भुवनिं धाडा हो ॥ ७७ ॥

ऋषींस गौरि; गमे मग कैसी। मूर्तीमन्त; तपस्या जैसी।
मुनि म्हणती; बघ शैलकुमारी। कारण कवण; करिशि तप भारी ॥ १ ॥
कुणा अराधिसि; काय इच्छिसी। सत्य मर्म तूं; कां नच कथिसी।
मनिं संकोच; होत वदण्यासी। हसाल परिसुनि; मम जडतेसी ॥ २ ॥
हट्टी मन, उप;देश मानिना। इच्छि जलावरि; भिंत्ति उठविण्या।
सत्य जाणुनी; नारद वचना। उडूं पाहते; पक्षविहीना ॥ ३ ॥
बघा मुनी मम अविवेकासी। पती कांक्षितें; सदाशिवासी ॥ ४ ॥

दो.—मुनि हसले परिसुनि वदती; गिरिसंभव तव देह।
नारद वचना ऐकुनी; सांग वसे कुणि गेह ॥ ७८ ॥

आर्या— हसले मुनि परिसुनि वच; गिरि-संभवँ देह हा तुझा म्हणती।
नारद-वच-विश्वासें; सांग तरी कोण कीं गृहीं वसती ॥ ७८ ॥

दक्षसुतां; उपदेशा दिधले। तिंहीं पुन्हा निज; गृह न पाहिलें।
चित्रकेतुचे; गृहा नाशिलें। कनक-कशिपु;-उत्सादा केलें ॥ १ ॥
नारद वच; मानिति नरनारी। भुवना त्यजुनी; होति भिकारी।
मन कपटी बरि; सज्जन दिसतो। अपणांसम करि; सर्वांसी तो ॥ २ ॥

१ हिमालयाची कन्या. २ आराधना करतेस. ३ भिंत. ४ पर्वतापासून झालेला. ५ त्यांनीं. ६ हिरण्यकश्यपुचा नाश.

त्या वचनीं; ठेवुनि विश्वासा । वांछिसि पतितें; सहज उदासा ।
अगुण निचोंड; कुवेष कपाली । अकुल अगेह; दिगंबर ब्याली ॥ ३ ॥
वद सुख कवण; असा वर मिळतां । भुलूं नको तूं; ठगें भुलवितां ।
सज्जन वचनें; सती पर्णिली । त्याग करुनि तिज; मग मारविली ॥ ४ ॥

दो.—निश्चिंताचि अधुना निजे; भिक्षा करिं, भवँ खाइ ।
सहज एकट्याचे भुवनीं; नारि सुखी कधिं होइ ॥ ७९ ॥

आर्या— अधुना निश्चिंत निजे; भव भिक्षा भक्षुनी- भरी उदरा ।
एकाकी जो सहजचि; तद्गृहि गृहिणी-निवास तो विसरा ॥ ७९ ॥

अझुनि ऐक तूं; बोध आमुचा । वर निश्चित तुज; उत्तम साचा ।
अति सुंदर शुचि; सुखद सुशीला । -वेद गाति; ज्याचें यश लीला ॥ १ ॥
दूषणरहित; सकल गुण राशी । श्रीपति पुर;वैकुण्ठनिवासी-।
-अशा वरा तुज; देउं मिळवुनी । परिसुनि वदली; हसुनि भवानी ॥२॥
सत्य वदा, तनु; गिरिभव ही हो । हट्ट न सुटे; सुटे जरि देहो ।
कनक तरी; पाषाणिं जन्मलें । त्यजी न जडता; जरी जाळिलें ॥ ३ ॥
नारदवच म्यां; नच परिहरणें । गृहीं वास वा; नाश, न डरणें ।
गुरुवचनीं न; प्रतीती ज्यासी । स्वप्निंहि सुलभ न; सुखादि त्यासी ॥४॥

दो.—महादेव अवगुणभवन; विष्णु सकल गुणधाम ।
रमेल ज्याचें मन जिथें; तया तिथेंची काम ॥ ८० ॥

आर्या— महादेव अवगुणगृह; विष्णु तसा सत्य सर्व-गुण-धाम ।
ज्याचें जेथें रमलें; मन, हो ! त्याचें तयासवें काम ॥ ८० ॥

मुनी तुम्हीं जरि; प्रथमचि येतां । शिरिं धरितें; वचनासि तत्वता ।
शिवा कारणें; जन्म वेंचिला । कोण विचारी; गुणदोषांला ॥ १ ॥
हट जरि चित्त न; सोडि बापुडें । लग्न जमविणें; बहुत आवडे ।
कौतुकि पुरुषां; आळस नाहीं । वरकन्या जगिं; अनेक पाहीं ! ॥ २ ॥
कोटि जन्म वरि; निश्चय भारी । शिवा वरिन, नातरी कुमारी ।
नारद वचना; कधीं त्यजी ना । शिव शतवार; वदे जरि जाणा ॥ ३ ॥
म्हणे, 'पाय; धरितें,' जगदंबा । जावें भुवनिं न; करा विलंबा ।
पाहुनि प्रेम; वदति मुनि ज्ञानी । जय जय जगदं;बिके भवानी ॥ ४ ॥

दो.—तूं माया भगवान शिव; जननि जनक जगतासि ।
नमुनि चरणिं शिर, मुनि निघती; पुलक बहुत गात्रांसि ॥८१॥

---

१ निर्लज्ज. २ कुलहीन. ३ साप धालणारा. ४ शंकर. ५ शंकर, संसार.

आर्या— माया तूं भगवन्तहि; शिव, जननी जनक सकल जगतासि।
निघती नमुनी, चरणीं; शिर ठेवुनि, पुलक बहुत गात्रांसी ॥८१॥

इति श्रीबालकाण्डे पार्वती तपस्यादि परीक्षावर्णनं नाम नवमोऽध्यायः

अध्याय १० वा

जाउनि मुनि; हिमवंत धाडिती। विनवुनि गिरिजे; गृहा आणिती।
शिवाकडे मग; ते ऋषि जाती। कथा उमेची; सकळ सांगती ॥ १ ॥
प्रेम मग्न शिव; ऐकुनि होती। हर्षित ऋषि, निज; भवना जाती।
सुजाण शंकर; करी स्थिर मना। आरंभी रघु;-नायक ध्याना ॥ २ ॥
तारक असुर; होय त्या काळीं। विशाल भुजबल; प्रतापशाली।
लोक लोकपति; सर्व जिंकिले। सुख संपत्ति;-हीन, सुर झाले ॥ ३ ॥
अजरामर, नच; जाइ जिंकिला। लढतां बहु; सुरसंघहि हरला।
विरंचि[1]तें; जाउनि विनवीती। दुःखी देव; विधीला दिसती ॥ ४ ॥

दो.—समजावुनि त्यां विधि वदे; दनुज-निधन होईल।
शिवशुक्रोद्भव[2] तनय जो; तोचि यासि जिंकील ॥ ८२ ॥

आर्या— सर्वां विधि समजावी; सांगे, तैं असुर-नाश होईल।
जो शिवशुक्रोद्भव सुत; तोचि रणामाजिं यास जिंकील ॥ ८२ ॥

मी वदतो त्यां; करा उपाया। होइल, ईश्वर, जरी सहाया।
त्यागुनि सती; दक्ष-मखिं देहा। जन्मे पुन्हां; हिमाचल गेहा ॥ १ ॥
केलें तपा; शंभुपति लागीं। समाधि लावुनि; बसला त्यागी।
यद्यपि हें अति; दुस्तर गमतें। वदेन ऐका; युक्ति मम मतें ॥ २ ॥
धाडा मदना; त्वरित शिवासी। क्षोभ करूं द्या; हर हृदयासी।
जाउनि मी मग; शिवपदिं नमुनी। विवाह करविन; भीड घालुनी ॥ ३ ॥
देव! हिता हा; उपाय आहे। सर्व म्हणति; उत्तम बापा हें।
प्रेमें सुर; करिती स्तवनाला। मीनकेतु[3] मग; प्रगट जहाला ॥ ४ ॥

दो.—विपत्ति सुर निज सांगती; परिसुनि करी विचार।
शंभु विरोधिं न कुशल मम, हसुनि, वदे मग मार[4] ॥ ८३ ॥

---

१ ब्रह्मदेवाला. २ शिववीर्यापासून झालेला. ३ कामदेव. ४ मदन.

आर्या— सुर वर्णिति विपदेतें, निज, मग परिसूनि तो करि विचार ।
शंभुविरोधें कुशल न; मम, मनिं हसुनी, सुरां वदे मार ॥८३॥

सुर! कार्या; करितो अवधारा । वदती परम; धर्म उपकारा ।
परहितार्थ जो; त्यजि देहातें । संतत संत; प्रशंसिति त्यातें ॥ १ ॥
वदुनि निघे; सर्वां वंदुनिया । सुमन धनू करिं; सहित सहाय्यां ।
जातां मदन; विचार मनाचे । रुद्र विरोधें; मरणचि साचें ॥ २ ॥
प्रभाव निज तो; मग विस्तारी । सकल करी, निज;-वश संसारीं ।
कोपे यदा; वारिचरकेतू । सपदि विनष्ट; सकल श्रुति-सेतू ॥३॥
ब्रह्मचर्यव्रत; संयम नाना । धर्म, धीर; विज्ञानहि जाणा ।
सदाचार जप; योग विरक्ती । सभय विवेक;-कटक तों पळती ॥४॥

छंद.—पळती विवेक; सहाय सह तों; सुभट संयुगं–विमुख ते ।
सद्ग्रन्थपर्वत;-कन्दरांतचि; अवसरीं त्या जाति ते ॥
होणार हे विधि; कोणरे! त्राता जगीं; खळबळ उडे ।
दो-कंठ कुणि, रतिनाथ ज्या, कोपें धनू घे करि खडे ॥ १ ॥

दो.—जे सजीव जगिं, अचरचर, नारि पुरुष ज्यां नाम ।
ते मर्यादा त्यजुनि निज; होति सकल वश–काम ॥ ८४ ॥

आर्या— जीव अचर वा चर जे; ज्यातें जागीं नारि पुरुषसें नाम ।
ते निज मर्यादेतें; त्यजुनी झाले, क्षणांत वशकाम ॥ ८४ ॥

सर्वां मनीं; मदन अभिलाषा । बघुनि लता; लवती तरुशाखा ।
सरिता सिंधु;कडे पळताती । तलाव, पुष्करिणीतें मिळती ॥ १ ॥
दशा जडांची; अशी होय जरि । चेतन करणी; कोण कथा तरि ।
स्थल-जल-नभ-चर; जीवहि सारे । होति काम वश; समया-विसरे ॥२॥
मदन-अंध; व्याकुळ जन होती । चकोरही दिन; रात न बघती ।
देव दनुज नर; किन्नर व्यालहि । प्रेत पिशाच; भूत वेताळहि ॥ ३ ॥
यांची दशा; कोण वाखाणी । कामदास हे; सदा जाणुनी ।
सिद्ध विरक्त; महामुनि योगी । ते हि कामवश; अती वियोगी ॥ ४ ॥

छंद.—अति कामवश; योगीश तापस, पामरांची का गती ।
बघती चराचर, नारिमय, जे; ब्रह्ममय जग पाहती ॥
अबला विलोकिति; पुरुषमय जग; पुरुष सब अबला पहा ।
दो दंडभरि; ब्रह्मांड उदरीं; कामकृत कौतुक महा ॥१॥

१ देवांना. २ मदन. ३ लगेच. ४ शास्त्रमर्यादा. ५ रणांगण. ६ दोन डोक्यांचा. ७ काळ वेळ विसरून. ८ सर्प.

सो.—कोणि धरीना धीर; सर्वांचें मन मदन हरि।
ज्यां रक्षी रघुवीर; ते थोडे बचले चि तरि ॥ ८५॥

आर्या— धरवे धीर न कोणा; सर्वांचे हरि तसेंचि मन मदन।
रक्षी रघुवीर जयां; बचले ते भाग्यवन्त कीं मद न ॥ ८५॥

दोन घडी हें; कौतुक झालें। जोंवरि काम; शिवाप्रति आले।
शंभु बघुनि; भीती मदनाला। यथापूर्व; संसार जहाला ॥ १ ॥
जीवां सुख मग; होय समस्तां। मद[1] जातां; जैसें मदमस्तां[2]।
रुद्रा बघुनि; भीति बहु मदना। दुराधर्ष; दुर्गम, भगवाना ॥ २ ॥
फिरतां लाज, न; करवे कार्या। उठे जिवावरि; रची उपाया।
प्रगटी मग ऋतु; रुचिर बसन्ता। तरुराजी नव; रम्य कुसुमिता ॥ ३ ॥
वन उपवन; वाटिका तडागीं-। परम सुभगदश; दिशा विभागीं-।
भरती येत;जणूं अनुरागा। बघुनि मृतां-मनिं; मनसिज[3] जागा ॥४॥

छंद— जागे मनोभव; मृतहिमर्नि, वन; सुभगता[4] ती वदुं किती।
शीतल सुगंध; सुमंद मारुत[5]; मदन-अनल-सखा अती ॥
फुलती जळीं बहु; कंज, गुंजति; पुंज मंजुल मधुकरा[6]।
कलहंस पिकशुक; सरस रव मृदु; गाति नाचति अप्सरा ॥१॥

दो.— सकल कला कोटी करुनी; कचला कटक समेत।
शंभुसमाधी अभंगची; कोपे हृदय-निकेत ॥ ८६ ॥

आर्या— कोट्यावधि सकलकला; करुनी कंदर्प कटकयुत[7] कचला।
कोपे काम कल्पुनी; कंपेना शिवसमाधि ती अचला ॥ ८६ ॥

सुंदर शाखे रसालं[8]-विटपा। चढला क्षुब्ध;-मनें, अतिकोपां।
सुमन धनुषि निज; शर संधानी। करुनि कोप; कर्णान्ता ताणी ॥ १ ॥
सोडी विषम; विशिख उरिं लागे। भग्नसमाधि; शंभु मग जागे।
ईश, विशेष; क्षुब्ध मनिं झाले। नयन उघडुनी; सकळ पाहिलें ॥ २ ॥
आम्रपल्लवीं; मन्मथ[3] दिसला। होति कुपित; त्रैलोक कंपला।
तृतिय नयन मग; शिवें उघडला। बघतां, जळुनी; मदन भस्मला[9] ॥ ३ ॥
हाहाकार; होत जगिं भारी। सभय सर्व सुर; सुखी सुरारी[10]।
स्मरुनि कामसुख; सचिंत भोगी। होति अकंटक; साधक योगी ॥ ४ ॥

---

१ माद. २ दारू पिऊन उन्मत्त झालेल्याना. ३ मदन. ४ रम्यता, सौंदर्य. ५ वारा. ६ भृंग. ७ सैन्यासह. ८ आंब्याच्या झाडाच्या. ९ भस्म झाला. १० देवांचे शत्रू.

छंद— योगी अकंटक; होति, पति गति; श्रवणिं, रति मूर्छित अती।
वदते रडे बहु; रीति करुणा; जाइ शंकर प्रति सती॥
अति प्रेमयुत; विनती विविधविध; जोडि कर, सन्मुख उभी।
प्रभु आशुतोष; कृपाळु शिव, अबला बघुनि बोले नभी॥१॥

दो.—येथुनि तव नाथासि रती, होइल नाम अनंग।
विना वपू व्यापील जग; ऐके मिलनें-प्रसंग॥८७॥

आर्या— येथुनि तव नाथासी; प्राप्ती होइल अनंग नामाची।
विनावपूही व्यापिल; जग, पुनरपि अवधि ऐक मिळण्याची॥८७॥

जैं यदुवंशिं; कृष्ण अवतारा। धरिल हराया; बहु महिभारा।
कृष्णतनय; होइल पति तुझा। बोल अन्यथा; होइ न माझा॥१॥
परिसुनि शिव;-वाणी रति गेली। पुढें कथा; वदतो जशि घडली।
समाचार; अमरांसि समजला। वैकुण्ठा विधि; सुरगण गेला॥२॥
विष्णु विरंचि; सहित सुर सगळे। शिवाकडे; कैलासिं धावले।
पृथक् पृथक ते; करुनि प्रशंसा। करिति प्रसन्न; चन्द्र-अवतंसा॥३॥
कृपा-सिंधु; बोले वृषकेतू। अमरां येणें; कवण्या हेतू।
म्हणे विधी; प्रभु अन्तर्यामी। तदपि भक्तिवश; विनती स्वामी॥४॥

दो.—सकल सुरां चित्तीं असा; शिव! गमतो उत्साह।
निजनयनीं बघुं इच्छिती, अपुला नाथ, विवाह॥८८॥

आर्या— सकल सुरांचे हृदयी; उत्साहचि परम नाथ हा वसतों।
निजनयनीं बघुं इच्छिति; विवाह अपुला जगासि सुखकर तो॥८८॥

नेत्र भरुनि; उत्सवा पहावें। असें तुम्हीं; मदनारि करावें।
जाळुनि काम; रतिसि वर दिधले। कृपासिंधु बहु; भलें जाहलें॥१॥
दण्ड करुनि वरि; प्रसाद करिती। नाथ सहजही; प्रभुची रीती।
गिरितनया करि; तपा अपारा। करा तिच्या, प्रभु! अंगीकारा॥२॥
विधि विनंती; स्मरुनी प्रभुवाणी। वदे तथास्तु; शंभु सुख-खाणी।
दुंदुभि वाजविती स्वर्गामी। सुमनवृष्टि जय;जय सुरस्वामी॥३॥
जाणुनि समय; सप्तऋषि आले। विधिनें पर्वत;-गृहा प्रेषिले।
प्रथम जाति मुनि; गिरिजा-भवना। बोलति छलं;-संयुत मृदु वचना॥४॥

दो.—अस्मद्वचन न मानिलें, नारद-मुनि-उपदेश।
पण अलीक ठरलाचि तव; कामा जाळि महेश॥८९॥

१ सत्वर संतुष्ट होणारें. २ भिऊं नको. ३ भेटीचा काळ. ४ शरीर. ५ निरनिराळी. ६ चंद्रचूड, शंकर. ७ विनंति. ८ देव. ९ पाठविले. १० कपट. ११ आमचें. १२ खोटा.

आर्या— अस्मद्वचन न गणिलें; नारद वचनासि सत्य बहु गणिलें ।
निष्फळ गेला तुमचा; पण, रुद्रे मन्मथासि जाळीलें ॥८९॥

इति श्री बालकाण्डे मदनकार्य मदन दहनादि सप्तर्ष्यागमनवर्णनं नाम दशमोऽध्यायः

मास पारायणे तृतीयो विश्रामः

अध्याय ११ वा.

ऐकुनि बोले; हंसुनि भवानी । उचित वदां; मुनिवर विज्ञानी ।
मुनिमत कामा; आज जाळिलें । शिव अद्यापि;हि[१] विकृत राहिले ॥ १ ॥
माझें मतें; सदाशिव योगी । अज अनवद्य; अकाम अभोगी ।
जाणुनि असें; शिवा जरि भजलें । मनवाक्कर्मे; प्रेमा केलें ॥ २ ॥
तरि ऐका मम; पणा मुनीश्वर ! । सत्य करील; कृपानिधि ईश्वर ।
म्हणतां कीं जें; मार जाळिला । अविवेकचि हा; अती बोललां ॥ ३ ॥
मुने अग्निचा; सहज स्वभावो । हिम त्या निकट; शकेना जावों ।
समीप जातां; नष्टचि व्हावें । महेश मदनां, सम जाणावें ॥ ४ ॥

दो.—हर्षति ऐकुनि वचन मनीं; प्रीति बघुनि विश्वास ।
निघति भवानिसि नमुनि शिर; जाति शैल गेहास ॥ ९० ॥

आर्या— हर्षति ऐकुनि वचनां; मुनि, मनि जाणोनि भक्ति विश्वास ।
नमुनि भवानी चरणां; शिर, मग मुनि, जाति शैलभुवनास ॥९०॥

या वृत्तान्ता; गिरीस कथिलें । ऐकुनि ते अति; दुःखी झाले ।
मग सांगे; रतिचे वरदाना । परिसुनि सुखी;होइ गिरि स्वमना ॥१॥
शंकर-प्रभुता; मनांत भावी । सादर मुनींस; मग बोलावी ।
शुभदिन नक्ष;त्रादि पाहिला । शास्त्रविहित,तिथि;-निश्चय केला ॥२॥
लग्नपत्रिका; ऋषिकरिं अर्पी । पाय धरुनि; विनवुनि त्यां तर्पी[३] ।
ते, पत्रिका; विधीतें देती । वाचुनि मनिं; मावेना-प्रीती ॥ ३ ॥
वाचुनि विधि सर्वांसि ऐकवी । बहु सुर, मुनि; समुदाय हर्षवी ।
पुष्पवृष्टि नभिं; वाद्य वाजती । मंगल कलश;सकल दिशि सजती॥४॥

दो.—सजूं लागती सकल सुर; वहनें[४] विविध विमान ।
होति शकुन मंगल शुभद; करिति अप्सरा गान ॥ ९१ ॥

---

१ वियोग नसलेले. २ निर्दोष. ३ तृप्त केलें ४ वाहनें.

आर्या— सर्वहि सुर सजवीती; सुंदर सुखदें सुआसनें 'यानें।
होती मंगल शकुनहि; शुभद बहू; करिति अप्सरा गानें ॥ ९१ ॥

शिवशृंगार; शंभुगणिं केला। जटामुकुट अहि; मोर सजविला।
अहिकंकण; कुंडलें घालितीं। व्याघ्राजिन-पट; भस्म फासिती ॥१॥
शशि ललाटिं, शिरिं; सुंदरगंगा। नयन तीन; उपवीत भुजंगा।
गरल कंठिं; तशि नरशिरमाला। वेष अशिव, शिव;-धाम-कृपाला ॥२॥
त्रिशूळ डमरू; करीं विराजे। निघे वृषावरि; वाजति बाजे।
सुरवधु बघती; सस्मित-वदना। वरा उचित जगिं; वधू मिळेना ॥ ३ ॥
विष्णु विरंचि; आदि सुर जाती। निज निज वाहनिं; बसुनि बरातीं।
सुरसमाज अति; अनुपम पाहीं। वरा योग्य ही; वरात नाहीं ॥४॥

दो.— विष्णु विहसुनी वदे मग; बोलावुनि दिशिराज।
विलग विलगं व्हा; चला सब; निज निज सहित समाज ॥९२॥

आर्या— विष्णु वदे विहसुनि; मग; बोलावुनिया समस्त दिक्पालां।
विलग विलग होउनियां, निज-जन समवेत कीं पुढे चाला ॥ ९२ ॥

वर अनुसार; वरात नसे ही। परनगरीं; होईल हसें ही।
विष्णु वचन; परिसुनि सुर हसती। निजसेनेसह; विलग चालती ॥ १ ॥
मनींमनीं; सस्मित मदनारी। सहज विष्णु-वच; विनोदकारी।
प्रियकर-वच; परिसुनि प्रिय गमलें। भृंगी प्रेरुनि; गणां जमविलें ॥ २ ॥
परिसुनि शिव;-शासन गण आले। प्रभुपदपद्मा; प्रणाम केले।
नाना वाहन; वेषहि नाना। शिव हंसले; निरखुनी गणांनां ॥ ३ ॥
बहु मुख कुणि; मुखहीन पहा हो। करपदविण कुणि; बहु पद बाहो।
विपुल नयन कुणि; नयन विहीनचि। हृष्ट पुष्ट कुणि; अति तनु क्षीणंचि ॥४॥

छंद— तनुक्षीण कुणि, अति; पीनं पावन; कुणि अपावन; गति धरी।
भूषण; कराल; कपाल करिं, सब; सद्य शोणित तनुवरी ॥
खर, श्वान, शुकर; शृगाल-मुख, गणः-वेष अगणित ना गणे।
बहु जिनसि भूत; पिशाच योगि, जमातं वर्णन ना बने ॥ १ ॥

सो.— नाचति गाती गीत; परम तरंगी भूतगण।
दिसती अति विपरीत; विचित्रची बोलति वचन ॥९३॥

आर्या— नाचति गाती गीतें; रंगेले परम भूतगण असती।
दिसती अति विपरीतचि; वचनें विविधें विचित्रची वदती ॥९३॥

१ वस्त्र. २ जानवें. ३ वेगवेगळे. ४ मिरवणूक. ५ बाहू. ६ किडकिडित. ७ लठ्ठ. ८ नर-मस्तकाची कवटी. ९ रक्त. १० नाना प्रकारचे. ११ जमाव. १२ रंगेले.

वर जैसा कीं, वरात तैसी। कौतुक विविध; करिति मार्गासी।
इथे; हिमाचल; रची वितांना[1]। विचित्र अति नहि; होय वर्णना ॥ १ ॥
शैल सकल जे; विश्वीं वसती। विशाल लघु ना; गणिले जाती।
वन सागरनद;नदी-तलांवां। निमन्त्रणें गिरि; म्हणे पाठवा ॥ २ ॥
कामरूप[2], तनु; सुंदर धारी। सहित समाज; सहित वरनारी।
येति सकल; तुहिनाचल[3]-गेहा। गाती मंगलें[4]; समेत स्नेहा ॥ ३ ॥
गिरिनें प्रथम; गृहां बहु सजिलें। यथायोग्य; सर्वांसि वसविलें।
बघुनी पुर;-शोभा अधिकाई। लघू भासली; विधि-निपुणाई ॥ ४ ॥

छंद.—लघुभास विधिची; निपुणता निर;-खुनि पुरशोभा भली।
वन, बाग, कूप; तडाग सरिता; सुभग वदनि न वर्णिली ॥
मंगल विपुल; तोरण, पताका, केतु गृहगृह शोभती।
स्त्री पुरुष सुंदर,-रूप चतुरहि; बघुनि मुनि मनि मोहती ॥१॥

दो.—जगदंबा जिथ अवतरे; पुर तें वर्णिल कोण।
ऋद्धि सिद्धि संपत्ति सुख; नित्य नूतनचि जाण ॥ ९४ ॥

आर्या— जगदंबा अवतारा; धरि ते नगरासि वर्णिले न वचे।
संपत्ति ऋद्धि सिद्धी; सुख नूतन अधिक वाढतें साचें ॥ ९४ ॥

परिसुनि, नगर;-समीप वऱ्हाडी। खळबळ बहु; पुरशोभा वाढी[5]।
वाहन शृंगा;रादि सजविती। मग सादर, सामोरें जाती ॥ १ ॥
हर्ष मनीं, सुर;-समाज बघुनी। सुखी होति अति; विष्णु लक्षुनी।
शंभुसमाजा; यदा देखती। भिउनि वाहनां; त्यजूनि पळती ॥२॥
धीर धरुनिया; सुज्ञ राहिले। जीव घेउनी; बाल पळाले।
जातां गृहिं; पुसती पितृमाता। वदति वचन,भय;-कंपित-गात्रां[6] ॥३॥
काय वदावें; न बोलवेची !। वऱ्हाड कैचें, धाड यमाची।
वर बावळा; वृषावरि[7] बसला। व्याल-कपाल, भस्म-सजवीला ॥ ४ ॥

छंद्—तनुभस्म व्याल; कपालभूषण; नग्नजटिल भयंकरा।
सह भूत प्रेत; पिशाच्च योगिणि; विकटमुख रजनीचरां ॥
जो सजिव राहि; वऱ्हाड पाहुनि; पुण्य अगणित जाणुं ते।
पाहोत तेचि; विवाह, घर घर; बात अशि बहु चालते ॥

दो.—जाणुनि ईशसमाज हा; जननि - जनक हसताति।
मुलां बुझाविति विविध विधी; भिऊं नका नच भीति ॥ ९५ ॥

---

१ मंडप. २ मनाप्रमाणें रूप घेणारे. ३ हिमालय. ४ मंगलगीतें.
५ वृद्धी. ६ देहानें. ७ बैलावर.

आर्या— जाणुनि महेशगण हा; हसुनी ते जननिजनक मग वदती।
विविधपरी समजावुनि; बाळांनों भिउं नका; नसे भीती ॥ ९५॥

इतिश्री बालकाण्डे शिवस्य विवाहार्थमागमनवर्णनं
नामैकादशोऽध्यायः।

अध्याय १२ वा

वऱ्हाड्यांसि जन; घेउनि आले। जानोसे त्यां; सुंदर दिधले।
मैना शुभ; आरती-तयारी। करी-सुमंगल; गाती नारी ॥ १॥
कांचनपात्रें; भूषितपाणी। वर ओवाळुं; जाति हर्षानीं।
विकटवेष वर; रुद्र पाहिला। बहु भयभीत; मनीं त्या अबला ॥ २॥
घरोघरीं; घाबरुनी घुसती। जनवासांप्रति; शंभु पावती।
दुःखित मयना; मनांत भारी। बोलाविली; गिरीश-कुमारी ॥ ३॥
स्नेहें बहु; बसवी माण्डिवरी। श्यामसरोज; नयनिं ये वारी।
ज्या विधिनें तुज; रूपा दिधलें। जड बावळ्या; वरा कां सृजिलें ॥ ४॥

छंद — कां बावळा वर; निर्मि; विधि जरि; तुजसि सुंदरता दिली।
सुरतरुसि फळ जीं; लागणें, तीं; बाभळीसी लागलीं॥
तुजसहित गिरिहुनि; उडूं, पावकिं; पडूं, जलनिधिमधिं तरी।
घर बुडो अपयश; होउं, जगिं जगतां विवाह न हा करीं ॥ १॥

दो.—होति विकल अबला सकल; दुखित बघुनि गिरिं नारि।
करि विलाप, वदते रडत; स्नेहा स्मरुनि विचारि ॥ ९६॥

आर्या— अबला व्याकुळ सकला; होती; दुःखित बघूनि गिरिनारी ।
करुनि विलापा पडते; कन्या-स्नेहा स्मरे रडे भारी ॥ ९६ ॥

मींच नारदां; काय बुडविलें। भरलें घर मम; उजाड केलें।
उमेसि मम; उपदेशा दिधलें। वरार्थ वेड्या; तपा करविलें ॥ १॥
खरेंचि यातें; मोह न माया। उदासीन; धन; धाम, न जाया।
परघर नाशक; लाज न भीती। प्रसव-वेग; वन्ध्या न जाणती ॥ २॥

---

१ हात. २ भयंकर. ३ जानोशाचे ठिकाणीं.

जननी व्याकुळ; बघुनि भवानी। विवेकयुत मृदु; बोले वाणी।
ब्रह्मलिखित तें; जननि ! न टळतें। धरि विवेक; त्यज चिंता माते ! ॥ ३ ॥
पती बावळा; ललाटि लिहिला। दोष तुझांसि न; जाइ काविला।
पुसशीं कीं तूं; ? विधिच्या अंकां। व्यर्थ जननि कां; घेसि कलंका ॥ ४ ॥

छंद— कां घेसि जननी; दोष, करुणा; सोडिं हा, अवसर नसे।
सुख असुख जें; विधिलिखित मज तें; जाउं तेथें मिळतसे ॥
परिसुनि वचन; विनीत कोमल; सकल अबला शोचती।
बहुरीतिं विधितें; देति दूषण; नयन नीर विमोचती ॥ १ ॥

दो.—त्या अवसरिं नारदसहित; अणि ऋषि सप्त समेत।
वार्ता परिसुनि तुहिन गिरी; अपुल्या जाति निकेत ॥९७॥

आर्या— त्या अवसरिं मुनि नारद; सह, तैसे सप्त ऋषिहि समवेता।
वार्तेतें या परिसुनि; हिमगिरि जाती त्वरें निज निकेता ॥ ९७ ॥

मग नारद; सर्वां समजावी। पूर्वकथा; वृत्तांत ऐकवी।
मैने सत्य; समज मम वाणी। जगदंबा तव; सुता भवानी ॥ १ ॥
अजा अनादि; शक्ति अविनाशिनि। सदा शंभु;-अर्धांग निवासिनि।
जगसंभव; पालन, लय, कारिणि। निज इच्छे; लीलावपु धारिणि ॥२॥
प्रथम दक्षगृहिं; जन्मा आली। नाम सती; सुंदर तनु झाली।
तिथें सती; शंकरा विवाही। कथाप्रसिद्ध; विदित जगता ही ॥ ३ ॥
एक वार शिव;-संगें येतां। रघुकुल कमल;-पतंगा बघतां।
मोहमग्न; शिववच न मानिलें। भ्रमवश सीता;-वेषा धरिलें ॥ ४ ॥

छंद— वेष सती धरि; सीतेचा, शिव, अपराधें त्यजि त्या काळीं।
हर-विरहें पितृ;-मखांस जाउनि; योगाग्नीनें, तनुजाळी ॥
जन्मुनि तवगृहिं; निजपतिलागीं; आतां दारुण तप केलें।
गिरिजा शंकर;-प्रिया, सर्वदा; जाणुनि संशय; त्यजि सगळे ॥१॥

दो.—ऐकुनि नारदवचन मग; गेला सर्व विषाद।
क्षणिं पसरे हा सकलपुरीं; घरोघरीं संवाद ॥ ९८ ॥

आर्या— परिसुनि नारद वचना; त्यांचा सर्वहि विषाद तो हरला।
क्षण एकें नगरीं त्या; संवादचि हा घरोघरीं भरला ॥ ९८ ॥

मग मैना, हिम;-वन्त अनन्दति। गिरिजापद; बहुवारहि वन्दिति।
नारि पुरुष शिशु; वृद्ध शहाणे। सर्व नगरजन; युत हर्षानें ॥ १ ॥

---

१ उत्पत्ति. २ सूर्य. ३ यज्ञांत. ४ सुवर्णकलश.

करिति नगरि बहु; मंगलगानां। सजिति सर्व; हाटकघट नाना ॥
सिद्ध झालिं बहु;-विध पकान्नें। वर्णित यथा; सूपशास्त्रानें ॥ २ ॥
त्या अवसरि; कवण बाखाणी। वसे गृहीं ज्या; जननि भवानी।
वऱ्हाडासि; सादर बोलावी। आले सर्व;- देवही देवी ॥ ३ ॥
पंक्ती बहुत; भोजना बसती। निपुण वाढपी; वाढुं लागती।
पाहुनि, कीं सुर; करिति भोजना। स्त्रिया उखाणे; घालिति नाना ॥ ४ ॥

छंद— नाना उखाणे; वदति सुंदरि; व्यंग वचनें बोलती।
सुर करिति भोजन; सावकाश; विनोद ऐकुनि हांसती ॥
आनन्द वाढे; जेवतां जो; कोटिवदनिं न वर्णिला।
अचवूनि पानें; देति मग जन;-वासिं सुरगण चालला ॥१॥

दो.—लग्नपत्रिका वाचिती; मुनि मग हिमवन्तासि।
समय विवाहा विलोकुनी; बोलाविति देवांसि ॥ ९९ ॥

आर्या— लग्नपत्रिकावाचन; गिरिपतिशी येउनी मुनी करिती।
समय विवाहा जाणुनि; ते वृन्दारक[1] गणांसी आणविती ॥ ९९ ॥

आणवि सादर; सकल सुरानां। सर्वां उचितचि; दिलें आसना।
वेदि, वेदविधिनें; सजवीती। सुभग सुमंगल; नारी गाती ॥ १ ॥
सिंहासन अति; दिव्य मनोहर। अवर्ण्य विधिकृत; अती रम्यतर।
शिव बसले शिर; विप्रां नमुनी। मनीं रघुवरा; प्रभुतें स्मरुनी ॥ २ ॥
उमेसि आणा; मुनीश वदती। शृंगारुनि तिज; सखी आणिती।
रूप बघुनि सुर; सकल मोहले। रूप कवण कवि; वर्णू शकले ॥ ३ ॥
जगदंबा जाणुनि; भवभामा। मनोमनीं सुर; करिति प्रणामा।
सुन्दरता;-सीमाचि भवानी। वर्णु शकेना; कोटिहि वाणी ॥ ४ ॥

छंद— कोटी वदन ना; वर्णवे जग;-जननिची; शोभा महा।
संकोचती श्रुति; शेष वाणी; मंदमति तुलसी अहा ! ॥
सौन्दर्यखाणि; भवानि गेली; मध्यमण्डपिं शिव जिथें।
पाहुं शकेना; लाज पतिपद;-कमल, मन-मधुकर तिथें ॥ १ ॥

दो.—मुनिं आज्ञेनें गणपतिसी; पूजिति शंभु भवानि।
परिसुनि, संशय नका धरूं; अनादि सुर जाणोनि ॥१००॥

आर्या— मुनि आज्ञेनें गणपति; पूजन करिताति शंकर भवानी।
ऐकुनि संशय कोणी; मानुं नका सुर अनादि जाणोनी ॥ १०० ॥

---

[1] देव.

वेद, विवाह,-विधीतें वर्णी । तेवि मुनीश्वर; करविति करणी ।
घेइ गिरी कुश; कन्या-पाणी । अर्पि जाणुनी; भवा भवानी ॥ १ ॥
कर ग्रहण जैं; करी महेश्वर । मनि हर्षति अति; सकल सुरेश्वर ।
वेदमन्त्र मुनि;-वर उच्चरिती । जय जय जय; शंकर, सुर करिती ॥ २ ॥
वाजति वाद्यें; विविध विधानां । सुमनवृष्टि नभिं; होती नाना ।
हर-गिरिजेचा, विवाह झाला । सकल भुवनिं; उत्साहचि भरला ॥ ३ ॥
दासीदास; तुरगे[1] रथ नागां-। धेनु, वस्त्र-मणि; वस्तु विभागां-।
यानिं[2], कनक;-पात्रादि भरोनी । दाहिज दिला; कवण वाखाणी ॥ ४ ॥

छंद— दाहिज दिला बहु; विविधविध, कर; जोडुनी हिम-गिरि वदे ।
त्यां काय द्यावें; आप्तकामा; धरितसे मग शिवपदें ॥
संतोष श्वशुरा; देति शिव मग; कृपासागर बहुपरी ।
शिवपादपद्मां; प्रेमपूरित; मानसें, मयना धरी ॥ १ ॥

दो.—नाथ ! उमा मम प्राणसम; गृह किंकरी कराविं ।
क्षमा सकल अपराध तिज; ही याञ्चा पुरवावि ॥ १०१ ॥

आर्या— नाथ उमा प्राणासम; निजगेहीं किंकरी करा तिजला ।
अपराध विस्मरावे; वर इतुका द्या, सदाशिवा मजला ॥ १०१ ॥

बहुपरि शिव; समजावि सासुला । वंदुनि पद गेली गेहाला ।
उमेसि मग अंकावरि घेई । अति सुंदर उपदेशा देई ॥ १ ॥
करी सदा; शंकर-पद-पूजा । नारिधर्म; पतिदेव, न दूजा ।
वदतां - लोचनिं; भरलें वारी । आलिंगी मग; हृदयिं कुमारी ॥ २ ॥
कां जगिं नारि विधी सृजितो ही । पराधीन, सुख, स्वप्निंहि नाहीं ।
व्याकुळ करी; प्रेम जननीला । कुसमय जाणुनि; धरि धीराला ॥ ३ ॥
भेटे पुन्हां; पुन्हां धरि चरणां । प्रेम परम, करि; कोण वर्णना ।
भेटुनि सर्व; सखींस भवानी । आलिंगी; जननीस जाउनी ॥ ४ ॥

छंद—जननीस भेटुनि; जाइ, देती उचित आशिस सर्वही
पाहे फिरे; मातेसि, तिज सखि; नेति शिव सन्नीधही ।
बहु याचकां, परितोषुनी, शिव; पार्वतीसह चालती ।
अति अमर हर्षति; सुमन वर्षति; वाद्य बहु, नभिं वाजती ॥ १ ॥

दो.—जाति सर्व हिमवंत मग; पोंचविण्या अति प्रीति ।
विविधपरी परि तोषुनी; शंकर निरोप देति ॥ १०२ ॥

---

१ घोडे. २ वाहनांत. ३ मागणी.

आर्या— जाती हिमवंत सर्वे; बोळविण्या मग तयांसि अति मानें।
विविधपरी तोषवुनी; निरोप दिधलाहि मदन-दहनानें ॥ १०२ ॥

त्वरित गृहा; गेले गिरिराजा। बोलावी; शैलादि समाजा।
सादर, दान; मान, विनयानें। बोळविलें; सर्वां हिमवानें ॥ १ ॥
जेव्हां शिव; कैलासीं आले। निज-निज-धामा देव निघाले।
भवभवानि; पितरौ जगताचे। केविं वर्णु; शृंगारा त्यांचे ॥ २ ॥
करिति विविधविध; भोगविलासां। गणांसहित; वसती कैलासा।
विहार नित्यचि; नवा चालला। काल विपुल या;-परी लोटला ॥३॥
कुमार षण्मुखं; पुढें जन्मला। जो रणि वधि; तारकासुराला।
प्रसिद्ध आगम;-निगम-पुराणीं। षण्मुख-जन्म; सकल-जन-कार्णी ॥४॥

छंद— जग-विदित षण्मुख; जन्मकर्म; प्रताप पुरुषार्थ हि महा।
या कारणें, वृषकेतु-पुत्र; चरित्रि कृत संक्षेप हा ॥
हा उमाशंभु; विवाह जे नर; नारि, गाती ऐकती।
कल्याण कार्यि; विवाहमंगलिं; सर्वदा सुख पावती ॥

दो.—चरित सिंधु गिरिजापती; वेद न पावति पार।
वर्णिल तुलसीदास किती; अति मतिमंद गंवार ॥ १०३ ॥

आर्या— गिरिजारमण-चरित्रचि; अब्धी, ज्या श्रुति न पावती पार।
तुलसीदास किती मग; वर्णी मतिमंद जो अति गवार ॥ १०३ ॥

इतिश्री बालकाण्डे शिवविवाहवर्णनं नाम द्वादशोऽध्यायः।

अध्याय १३ वा

ऐकुनि सरस; शिव;-चरित्र सुंदर। भरद्वाज सुख; पावति मुनिवर।
कथा-लालसा; अती वाढली। नयनीं नीर; तनू पुलकावलि ॥ १ ॥
प्रेम-विवश, मुखिं; येइ न वाणी। दशा बघुनि; हर्षे मुनि ज्ञानी।
अहो धन्य तव; जन्म मुनीश्वर। तुला प्राणसम; प्रिय गौरीश्वर ॥ २ ॥
शिव-पद-कमळिं; जयां रति नाहीं। ते स्वप्निंहि नच; प्रिय रामाही।
विश्वनाथपदिं; निश्चल स्नेहो। रामभक्तिचें; लक्षण हें हो ॥ ३ ॥

---

१ शंकरानें, २ कार्तिकेय, ३ गावंढळ, मंदबुद्धि. ४ ऐकून.

शिवसम कवण; राम-व्रत-धारी । अघविणे त्यजिलि; सतीशी नारी ।
पणा करुनि; दावी हरि-भक्ती । कवण राम-प्रिय; शिवसम असती ॥४॥

दो.—प्रथमचि वर्णुनि शिवचरित; कळलें मर्म समस्त ।
राम-दास तुम्हि पावन; रहित विकार; प्रशस्त ॥ १०४ ॥

आर्या— प्रथमचि शिवचरितातें; वर्णुनि तव मर्म जाणिलें सारें ।
सेवक विमल हरीचे; रहित विकारें समस्त कीं बारे ॥ १०४ ॥

मी जाणें; तुमचे गुण-शीलां । ऐक सांगतो; रघुपति लीला ।
ऐक मुने तव; समागमेंसीं । जाइ न वदलें; सुख जें मजसी ॥ १ ॥
रामचरित अति; अमित मुनीशा । वदवेना शत;-कोटि अहीशां ।
तदपि यथाश्रुत; वदेन वाणीं । स्मरुनि गिरापति; प्रभु धनु-पाणी ॥२॥
वाणी दारु;-नारि-सम स्वामी । राम सूत्रधर; अन्तर्यामी ।
कृपा करिति ज्या; दास मानुनीं । कवि-उरँ-अजिरिं; नाचवी वाणी ॥ ३ ॥
कृपाब्धितें; प्रणमुनि रघुनाथा । वर्णिन रुचिर; राम-गुण-गाथा ।
परम रम्य, गिरि;-वर कैलासीं । सदा जिथें शिव; उमा निवासी ॥ ४ ॥

दो.—सिद्ध तपोधन योगिजन; सुर किन्नर मुनिवृंद ।
वसति तिथें सुकृती सकल; सेविति शिव सुखकन्द ॥१०५॥

आर्या— सिद्धतपोधन योगी;-जन मुनि किन्नर सुरादि बहुवृंद ।
वसुनी सुकृती सकलहि; शंभु सदा सेविताति सुखकंद ॥ १०५ ॥

हरिहर विमुख; धर्मरति नाहीं । ते नर स्वप्नि न; जाति तिथें ही ।
विशाल वट त्या; गिरिवरि होता । सर्वकाळिं ज्या; नव सुंदरता ॥ १ ॥
त्रिविध समीर, सुशीतल छाया । शिव-विश्राम;-विटप म्हणती या ।
एकवार तरु;-तळिं प्रभु गेले । तरु बघुनी मनिं; अति सुख झालें ॥२॥
स्वकरें व्याघ्रा;-जिना घातलें । शंभु कृपाळु; सहज वरि बसले ।
कुंद-इंदु-दर;-गौर शरीरें । प्रलंबभुज; परिधन मुनि चीरें ॥ ३ ॥
तरुण-अरुण;-अंबुजसम चरणें । नख-द्युति भक्त;-हृदयतम हरणें ।
भुजग-भूति; भूषण त्रिपुरारी । आननरूप; शरद्-शशि-हारी ॥४॥

दो.—जटामुकुट सुरसरितें शिरीं लोचन जलज विशाल ।
नीलकण्ठ लावण्यनिधी; शोभे नवेन्दु-भाल ॥ १०६ ॥

१ पाप नसतांना. २ सतीसारखी. ३ शेषांना. ४ काष्ठ-पुतळी. ५ कवीच्या अंतःकरणरूपी अंगणांत. ६ शंख. ७ नवीन. ८ कमल. ९ तेज. १० देवनदी-गंगा, ११ अर्धचंद्र;-युक्त मस्तक.

आर्या— जटामुकुट शिरिं गंगा; शिव शोभे नलिन-नेत्र सुविशाल।
नीलकण्ठ लावण्या;निधि, विलसे तें नवेन्दुनें भाल ॥ १०६ ॥

बसले दिसति; कामरिपु कैसे। धरुनि शरीर; शान्तरस जैसे।
अवसर उचित; पार्वती मानी। जाइ शिवाप्रति; जननि भवानी ॥१॥
प्रिया, म्हणुनि बहु; आदर करिती। वामभागिं हर; आसन देती।
सन्निध बसतां; हर्षित झाली। पूर्विल जन्म;-कथा मनिं आली॥ २॥
पतीप्रेम बहु; मनिं अनुमानी। हसुनि उमा; वदली मृदु वाणी।
कथा सकल,—लोकां हितकारी। विचारील ती; शैल कुमारी॥ ३॥
पुरारि! विश्व;—नाथ, मम नाथा। त्रिजगिं विदित तव; महिमा-गाथा
चर अणि अचर; नाग नर देवां। सकलां प्रिय; पदपंकज सेवा॥ ४॥
दो. - प्रभु! सर्वज्ञ, समर्थ शिव; सकल-कला-गुण-धाम।
ज्ञान,-योग-वैराग्य-निधी; प्रणत-कल्पतरु-नाम ॥ १०७॥
आर्या— शिवसर्वज्ञ समर्था, सकल कलांसी, सुरम्य-सुखधामा।
योगज्ञान विरक्ती; निधि असुनी, प्रणत-कल्प-तरु-नामा.॥ १०७॥

प्रसन्न मजवरि; जरि सुखराशी। मानिति नित्य; मला निजदासी।
तरी हरा प्रभु; मम अज्ञाना। रामकथा शुभ; सांगुनि नाना॥ १॥
ज्याचें गृह सुर;-तरु-तळिं बसलें। दुःख दरिद्र; तया कधिं झालें।
शशिभूषण हें; मनीं विचारा। मम मतिचा भ्रम; नाथ! निवारा॥ २॥
प्रभु जे मुनि अति; परार्थवादी। म्हणती रामचि; ब्रह्म अनादी।
शेष शारदा; वेद पुराणें। सकल करिति; रघुपति गुणगानें॥३॥
तुम्हिही राम; राम दिनराती। सादर जपतां; काम-अराती।
दशरथनृप-सुत; राम हि तोची। कीं अज अगुण; अगम्य दुजाची॥ ४॥
दो.—केविं ब्रह्म नृपतनय जरी स्त्रीविरहें जो भ्रान्त।
माहिमा जाणुनि; चरित्र तें; भ्रमित मती मम होत ॥१०८॥
आर्या— जरि नृपतनय तरी तो; ब्रह्म कसें; नारिविरहमतिभग्न।
देखुनि चरिता, ऐकुनि; महिमा, माझी मती भ्रमीं मग्न ॥ १०८ ॥

अनीह व्यापक; विभू अन्य जरि। तें मज सांगा; समजावुनि तरि।
अज्ञ गणुनि, मनिं; कोप; नसावा। भ्रमनाशार्थ; उपाय करावा॥ १॥
राम-प्रभुत्वा; वनिं अनुभविलें। अतिभय-विकल न; तुम्हांसि वदलें।
तदपि मलिन मन; मुळिं न उमजलें। त्याचें फळ मज; योग्य मिळालें॥२॥
संशय अजुनि; मनीं या वसती। कृपा करा; करिते मी विनती।
तैं प्रभु, बहुपरि; केलें बोधा। तें स्मरुनी नहि; कराल क्रोधा॥ ३॥

१ व्याकुळ.

बिमोह आतां; तैसा नाहीं । रामकथा; रुचते; बहु पाहीं ।
वदा पुनीत; राम-गुणगाथा । भुजगराजभूषण; सुरनाथा ॥ ४ ॥

दो.— नमितें पद, शिर भूमिवरी; बिनती कर जोडून ।
सांगा रघुवर विमलयश; वेदशास्त्र मंथून ॥ १०९ ॥

आर्या— पदनमितें शिर भूवरि; ठेवुनि, विनती करूं कराञ्जलिनें ।
रघुवर-विमल-यशातें; वर्णावें, वेदशास्त्रमथनानें ॥ १०९ ॥

जरि अधिकार; नसे नारीसी । मनवचकर्मैं; तुमची दासी ।
गूढहि तत्व न; साधु लपविती । अधिकारी जैं; आर्त पाहती ॥ १ ॥
मी अति आर्त; असें सुर-नाथा । दया करुनि मज; वदा हरिकथा ।
कारण तें; सांगा सुविचारी ! । निर्गुण ब्रह्म; सगुण-वपुधारी ॥२॥
प्रभु मग वदा; राम अवतारा । बाल चरित मग; कसें उदारा ।
सांगा सीता; कशी विवाही । राज्य त्यागण्या दूषण कांहीं ॥ ३ ॥
चरित, वसुनि वनिं; अपार करि तो । रणांत कैसा; रावण वधितो ।
राज्यीं बसतां; करि बहु लीला । सांगा सकल; शम्भु सुखशीला ॥४॥

दो.—पुढें कसें करुणायतन; आश्चर्या करि राम ।
प्रजेसहित रघुवंशमणी; केविं जाति निजधाम ॥ ११० ॥

आर्या— करुणायतन कथा कशिं; आश्चर्ये जी करी पुढे राम ।
रघुकुलमणि निज-जन-युत; कैसें गमना करीति निज-धाम ॥११०॥

सांगा मज तें; तत्व वर्णुनी । जाणुनि ज्यांत; मग्न मुनि ज्ञानी ।
ज्ञान भक्ति; विज्ञान विरक्ती । सांगा सर्वहि; सह विभाग तीं ॥ १ ॥
आणिक राम-रहस्य अनेक । सांगा नाथ; विमल सुविवेक ।
जें कांहीं मीं; नसेल पुशिलें । राखावें नच; गुप्त दयाळें ॥ २ ॥
त्रिभुवन-गुरु-शिव; वेद हि वानी । अन्य, न जाणति, पामर प्राणी ।
सुंदर सहज; उमेनें पुसले । प्रश्न सरल शिव, मनास रुचले ॥३॥
हर-हृदिं[1] राम;-चरित आठवलें । वपु पुलकित, जल; लोचनिं भरलें ।
श्री रघुनाथ; रूप मनिं आलें । परमानन्द-मग्न; मन झालें ॥ ४ ॥

दो.—मग्न ध्यानरसिं मुहूर्त[2] ही; मग जागे मदनारि ।
रघुपति चरिता पुढें हर; हर्षें वर्णील भारि ॥ १११ ॥

आर्या— ध्यानरसीं मग्न-मनें; मुहूर्त, मग मागुताचि मदनारी ।
महादेव मग महिमा; मापतिचा सांगतो उमे भारी ॥ १११ ॥

१ हृदयांत. २ दोन घटका.

सत्य असत्य; गमें अज्ञानें । रज्जु भासते भुजंग भ्रमानें ।
ज्याचें ज्ञान; लया जग नेई । यथा स्वप्न-भय; जागत जाई ॥ १ ॥
वंदन, बाल;-रूप त्या रामा । सिद्धि सुलभ सब; जपतां नामा ।
मंगलभवन; अमंगलहारी । द्रवो हि दशरथ; अजिरें विहारी ॥२॥
नमन करुनि; रामासि पुरारी । गिरा-सुधा; हर्षित उच्चारी ।
धन्य, धरणिधर;- राजकुमारी । कोणि न तुजसम; जग-उपकारी ॥३॥
पुशिले रघुपति;-कथा प्रसंगा । जगीं जशी; जगपावनि; गंगा ।
तूं रघुवीर;-चरण अनुरागी । केले प्रश्न; जगत-हित-लागीं ॥ ४ ॥

दो.—रामकृपेनें पार्वती; स्वप्निंहि तव मनिं कांहीं ।
शोक मोह संदेह भ्रम; अल्प दिसत मज नाहीं ॥११२॥

आर्या— रामकृपेनें पार्वति; स्वप्नीं ही मानसीं तुझ्या कांहीं ।
शोक मोह संदेहो; भ्रम, मम मतिनें मुळीं नसे पाहीं ॥ ११२ ॥

इतिश्री बालकाण्डे श्रीशिवपार्वतीसंवादे पार्वती-प्रश्न-वर्णनं
नाम त्रयोदशोऽध्यायः ।

अध्याय १४ वा

अति शंका ही तुवां घेतली । श्रवणिं निरूपणिं; जगहित झाली ।
नाहिं हरिकथा; पडली कानां । श्रवणरंध्र अहि;-भवनचि माना ॥१॥
नयन न घेती; संत-दर्शना । मोर-पंख-लोचन; त्यां गणना ।
कडूभोपळा; तें शिर जाणा । जे न नमे हरि;-गुरू-पदांनां ॥ २ ॥
ज्यां हरिभक्ति न; हृदयस्थानीं । जीतं जणूं शव; सम ते प्राणी ।
रामगुणांचें; गान करीना । दादुरीच ते जीभ, खरी ना ॥ ३ ॥
कुलिशं कठोरचि; निष्ठुर छाती । हर्ष हरि-कथें; पावेना ती ।
ऐक शिवे; रामाची लीला । सुरहित, असुर;-विमोहनशीला ॥४॥

दो.—रामकथा सुरधेनुसम; सेवक-सुख बहु दानि ।
संत-समाज, सुर-लोकहीं; कोण न ऐके प्राणि ? ॥११३॥

---

१ भुजंग, सर्प. २ आंगण. ३ सापाचें घर, बीळ. ४ जिवंत असून.
५ बेडकाची. ६ वज्र. ७ पार्वती ! ८ देणारी.

आर्या— रामकथा सुरभीसम; सर्वांही सेवकांसि सुखदा ही ।
संत-समाज, सुरांचे; संघ, न कां सेविती असुख-दाही ॥ ११३ ॥

रामकथा; सुंदर करटाळी । संशय विहगां; दूर पिटाळी ।
रामकथा कलि,-विटप कुठारी । सादर ऐक; गिरीश कुमारी ॥ १ ॥
रामनामगुण; रम्य चरित्रें । जन्म कर्म; श्रुति; गाति पवित्रें ।
अन्त न जसा राम भगवाना । तसे कथा गुण कीर्ती नाना ॥ २ ॥
तदपि यथाश्रुत; जशि मति माझी । सांगूं प्रीति; बघुनि अति तूझी ।
प्रश्न उमे तव; सहज रम्यतर । सुखद संत;-संमत; मम प्रियकर ॥३॥
एक गोष्ट मज; रुचली नाहीं । जरी मोहवश; वदलिस कांहीं ।-
कीं तो राम; कोणि तरि दूजा । श्रुति जो गाती; ध्याति मुनी ज्या ॥४॥

दो.—ऐकति वदती अधम नर; ग्रसिले मोह पिशाच ।
पाषंडी हरिपदविमुख; जाणति मृषा न साच ॥११४॥

आर्या— ऐसें ऐकति वदती; मोहपिशाचें जयां नरां गिळलें ।
पाषंडी-रामपदा; विमुख मृषा साच ना जयां कळलें ॥११४॥

अज्ञ अकोविद; अंध अभागे । बाबुळ[1] विषय; मुकुरे[2]-मनिं; लागे ।
विशेष लंपट; कपटि कुटिल-ही । स्वप्नि न संत; सभा दिसली-ही ॥१॥
वदती वेद;-विसंमत वाणी । ज्यां ना उमजे; लाभ न हानी ।
मुकुर मलिन अणि; नयन विहीनां । रामरूप कें; दिसेल दीनां ॥ २ ॥
ज्यातें अगुण न; सगुण विवेकहि । जल्पति कल्पित; वचन अनेकहि ।
हरिमायावश; जगांत भ्रमतां । कांहिं न अघटित; तयां बोलतां ॥३॥
वातुल[3] भूत;-विवश मदमस्त । ते बोलति; कुविचारग्रस्त ।
करिती महा;-मोह-मद-पाना । वच त्यांचें न; धरावें कानां ॥ ४ ॥

सो.—करि मनि विचार भारि; त्यज संशय भज रामपद ।
ऐक गिरीशकुमारि; भ्रमतमारि[4] मम वच सुखद ॥११५॥

आर्या— निजहृदयीं सुविचारें; त्यजुनी संशय भजस्व रामपदा ।
ऐके गिरिवर कुमरी; भ्रम-तम-रवि-कर-वचांसि मम सुखदा ॥११५॥

निर्गुण सगुणीं; भेद नसे तो । मुनि पुराण बुध; वेद वदे तो ।
जो अलक्ष अज; अगुण अरूपहि । भक्ति प्रेमवश; होइ सरूपहि ॥ १ ॥
जें गुणरहित; सगुण तें कैसें । जल, हिमउपलें[5]; अभेदचि जैसे ।
भ्रमतमासि रवि; नाम जयाचें । विमोह कैंचा; मनीं तयाचे ॥ २ ॥

१ शेवाळ; २ आरसा. ३ वात झालेले, ४ भ्रमाचा नाश करणारा सूर्य, ५ गार, बर्फ.

राम सच्चिदानंद दिनेश्वर। मोहनिशा नच; तिथें अल्पतर।
सहज प्रकाश-रूप भगवान। तेथ न अरुणोदय विज्ञान ॥ ३ ॥
हर्ष विषाद; ज्ञान विज्ञान। जीव धर्म, मी; मी अभिमान।
राम ब्रह्म; व्यापक, जग जाणें। परमानंद; परेश पुराणें ॥ ४ ॥

दो.—पुरुष प्रसिद्ध प्रकाशनिधी; प्रगट परावरनाथ।
रघुकुलमणि मम नाथ हरी; वदुनि नमवि शिव माथें ॥११६॥

आर्या— प्रगटप्रकाशनिधि जो; प्रसिद्ध पुरुषचि परावरेश्वर तो।
स्वामी रघुकुलमणि मम; शिव वदुनी प्रीतिनें नती करतो ॥ ११६ ॥

स्वभ्रम नहिं; समजे अज्ञानी। हरिवरि मोह; लादि जड प्राणी।
नभि घनपटल; बघुनि घन भारी। म्हणति झांकला; रवि कुविचारी ॥ १ ॥
नयनिं अंगुली; घालुनि बघतां। दोन शशी; दिसती जरि नसतां।
उमे प्रभूवरि; मोह कल्पना। धूम, धूळ, तम; जेवीं गगना ॥ २ ॥
विषय, इन्द्रियें; सुर, जीवांनां। एकापासुनि; दुज्या चेतना।
यां सर्वांस; प्रकाशक जो ही। राम अनादी; कोसलपतिही ॥ ३ ॥
जगत प्रकाश्य; प्रकाशक रामचि। मायाधीश; ज्ञानगुणधामचि।
ज्या सत्तेनें; जड अशि माया। सत्य भासते; मोह-सहायां ॥ ४ ॥

दो.—रजत-शुक्तिका-भास जणूं; यथा भानुकरें-वारि।
यद्पि मृषा कालत्रयहीं; कोण भ्रमासि निवारि ॥ ११७ ॥

आर्या— रजत शुक्तिकेमध्यें; किंवा जैसें कुरंगजळ दिसतें।
यद्पि मृषा कालत्रयिं; कवणाचें मन न सांग कीं भ्रमतें ॥ ११७ ॥

हरि आश्रित; ऐसें जग वसतें। असत्य तरि बहु; दुःखद गमतें।
स्वप्नीं जरि शिर; कोणि कापलें। विना जागृती; दुःख न हरलें ॥ १ ॥
हा भ्रम ज्याच्या; कृपे नासतो। गिरिजें राम; कृपाळु जाण तो।
आदि अंत नच; कोणि जाणती। मति अनुसार; निगम ज्या गाती ॥२॥
चैंळे अपद; ऐके विण कानां। हस्त विना, करि; कर्में नाना।
आननरहित; सकलरस भोगी। वाणीविण; वक्ता अतियोगी ॥ ३ ॥
तनु-विण- स्पर्शी; नयनविण पाहे। घ्राण न, अमित वास; घेताहे।
सर्वपरी अशि; अद्भुत करणी। महिमा कवण; कशी किति वर्णी ॥४॥

दो.—ऐसें गाती वेद बुध; मुनि करिती जें ध्यान।
तो दशरथसुत भक्तहित; कोसलपति भगवान् ॥ ११८ ॥

---

१ सूर्य. २ जुनें, सनातन. ३ मस्तक. ४ दाट, ५ सूर्यांच्या किरणांनीं भासणारें जळ, ६ मृगजळ. ७ हालतो, चालतो.

आर्या— श्रुतिबुध यापरि गाती; करिती ज्याचें सदा मुनी ध्यान।
भक्तहिता दशरथसुत कोसलपति राम तोच भगवान ॥ ११८ ॥

काशीं[1], बघुनि जीव जै मरतो। ज्या-नामें मीं; विशोक करतों।
प्रभु मम तोचि; चराचर स्वामी। रघुवर सर्वां; अन्तर्यामी ॥ १ ॥
ज्याचें नाम; विवश नर वदती। बहु-जन्मार्जित; अघां नासती।
जे नर सादर; स्मरणा करती। भववारिधि; गोपद इव तरती ॥ २ ॥
परमात्मा तो; राम भवानी। "तेथें भ्रम" तव; अनुचित वाणी।
अशा संशयां; मनीं आणिती। ज्ञान विराग; सकल गुण जाती ॥३॥
परिसुनियां; भ्रमहर, हरवचना। नाश पावली कुतर्क-रचना।
प्रीति प्रतीति; रामपदिं जडली। दारुण असं;भावना उडली ॥ ४ ॥

दो.—शिवपद वारंवार धरी; जोडुनि जलरुह पाणि।
बोले गिरिजा वचनवर; जणूं प्रेमरस खाणि ॥ ११९ ॥

आर्या— वारंवार हरपदीं; नमुनी जोडूनि पंकरुह पाणी।
सुंदर वचना गिरिजा; बोले सप्रेम शुद्धरसखाणी ॥ ११९ ॥

शशिसम परिसुनि, गिरा पुरारी। भ्रम-शरदातप; सरला भारी।
कृपा करुनि मम; संशय हरले;। रामरूप तें; मला उमजलें ॥ १ ॥
नाथ! कृपें; नाशिलें विषादा। सुखी जाहलें; चरण प्रसादां।
मातें निज किंकरी मानुनी। यदपि सहज जड; नारि अडाणी ॥२॥
सांगा जें मीं; पूर्वी पुशिलें। जरि मजवरि; प्रभु प्रसन्न असले।
ब्रह्म राम, चिन्मय अविनाशी। सर्वरहित सब; हृदय निवासी ॥३॥
नरतनु धरितो; कवण्या हेतू। समजावुनि; सांगा वृषकेतू।
परिसुनि वाणी; परम विनीता। बघुनि कथेवरि; प्रीति पुनीता ॥ ४ ॥

दो.—हर्षित-मन, कामारि तंव; शंकर सहज सुजाण।
बहुविधि गिरिजे प्रशंसुनी; बोलति कृपानिधान ॥१२०॥ (क)

आर्या— मनिं मदनारी हर्षित; होउनि अति; शम्भु सहज सुज्ञानी।
नानापरी उमेसी; प्रशंसुनी वदतसे कृपाखाणी ॥ १२० ॥ (क)

इतिश्री बालकाण्डे श्री शिवपार्वती संवादे श्रीरामस्वरूपवर्णनं नाम चतुर्दशोऽध्यायः

नवाह पारायणे प्रथमो विश्रामः

मास पारायणे चतुर्थो विश्रामः

---

[1] काशींत.

अध्याय १५ वा.

दो.—रामचरित मानस विमल; ऐके कथा भवानि।
खगराजासी बोलला; जी भुसुंडि निज वाणि ॥ १२० ॥ (ख)
सो.—तो संवाद उदार; कैसा तो सांगेन मग।
ऐक राम अवतार; चरित परम सुंदर अनघ ॥ १२० ॥ (ग)
सो.—हरिगुण नाम अपार, कथा, रूप, अगणित अमित।
मी निज मति अनुसार; उमे ऐक, वदतो चरित ॥ १२० ॥ (घ)

आर्या— रामचरित मानस हें; कथा तुला सांगतों शुभ भवानी।
श्रोता खगनायक जो; गरुड, भुशुंडी स्वयें वदे वाणीं ॥ १२० ॥ (ख)
आर्या— कैसा सांगेन पुढें; झाला संवाद तो उदार अती।
ऐक कथा अति पावन; अवतारां राम ते जसे धरती ॥ १२० ॥ (ग)
आर्या— पार न हरिगुण-नामां; अगणित तैसेंचि रूप अपरिमित।
मी निज-मति अनुसारें; वदतों तूं ऐक आदरें चरित ॥ १२० ॥ (घ)

ऐक उमे हरि;-चरित रम्य अति। विपुल, विमल; निगमागम वर्णिति[1]।
हरि अवतार; हेतु[2] ज्या होई। इदमित्थं[3] नच; वदला जाई ॥ १ ॥
राम अतर्क्य; बुद्धि मन वाणी। मम मत हें तूं; ऐके ज्ञानी।
तदपि संत मुनि; वेद पुराणें। वदति कांहिं जें; मति अनुमानें ॥ २ ॥
तसें सुमति; सांगतों तुलाही। कारण जें; उमजे मजलाही।
यदा यदा[4] जगिं; धर्मग्लानी। माजति असुर; अधम-अभिमानी ॥ ३ ॥
करिती पाप; कोण तें वर्णी। सीदंति[5] विप्र; धेनु सुर धरणी।
तदा विविध वपु; श्रीप्रभु धरिती। सज्जन दुःख; कृपानिधि हरिती ॥ ४ ॥

दो.—असुर नाश, सुर रक्षुनी रक्षिति निज श्रुति-सेतु।
विमल सुयश विस्तारिती हरिजन्मा हा हेतु ॥ १२१ ॥

आर्या— असुरां मारुनि देवां; स्थापुनि; रक्षूनिया श्रुती-सेतू;
विस्तारी निज निर्मल; यश. रामा जन्म घ्यावया हेतू ॥ १२१ ॥

तें यश गाति; भक्त भव तरती। कृपासिंधु जन;-हित तनु धरती।
हरि जन्माचे; हेतु अनेकचि। एकैकाहुनि; परम विचित्रचि ॥ १ ॥
जन्म एक दों; मी वाखाणीं। सावध ऐके; सुमति भवानी।
द्वारपाल; हरिचे प्रिय दोनी[6]। जे जय विजय; जाणि सब कोणी ॥२॥
द्विजशापानें; दोनी भ्राते। जाति असुर; तामस, देहातें।
कनक-कशिपु अणि हाटकलोचन। जगत विदित; सुरपतिमदमोचन ॥३॥

१ वाणीनें. २ कारणास्तव. ३ 'हे असे' नक्की. ४ म. गी. पहा.
५ नाश पावतात. दुःखी होतात. ६ हिरण्याक्ष.

विजयी समर;-वीर विख्याती। वराहवपुनें; एक निपाती।
होउनि नरहरि; दुजासि मारी। प्रल्हादाचें; यश विस्तारी ॥ ४ ॥

दो.—होति निशाचर जाउनि ही; महावीर बलवान।
कुंभकर्ण रावण सुभट; सुर-विजयी जग जाण ॥ १२२ ॥

आर्या— ते जाउनि रजनीचर; होती बलवान बहु महावीर।
भट कुंभकर्ण रावण; जगविश्रुत, सुरजयी महाधीर ॥ १२२ ॥

मुक्त होति ना; हत भगवानें। तीन जन्म द्विज; वचन-प्रमाणें।
एकवार प्रभु; तद्धितैलागीं[1]। धरी शरीर; भक्त अनुरागी ॥ १ ॥
कश्यप अदिति; तदा पितृमाता। दशरथ कौसल्या; विख्याता।
एक कल्पि या;-परि अवतारी। चरित पवित्र; करी संसारीं ॥ २ ॥
कल्पीं दुःखित; बघुनि सुरांसी। हरतां समरीं; जलंधरासी।
अपार रण; केलेंचि शंकरें। दनुज मारितां अतिबल न मरे ॥३॥
परम सती; असुराधिप-नारी। त्याचि बळें तो; शिवासि भारी ॥४॥

दो.— कपटें भंगुनि तिचें व्रत; हरि करि सुर-कार्यास।
मर्म जाणिलें तिनें तंव; कोपुनि दे शापास ॥ १२३ ॥

आर्या— तद्व्रत कपटें भंगुनि; संपादी विष्णु देव कार्यासी।
मर्मा समजे जेव्हां; मग ती कोपूनि देइ शापासी ॥ १२३ ॥

तच्छापा[2] हरिः प्रमाण मानी। कृपाळु भगवान्; कौतुकखाणी।
मग जालंधर; रावण झाला। रामें रणिं; मारुनि पदिं नेला ॥ १ ॥
एक जन्म या; हेतु असे हो। ज्यास्तव राम; धरी नरदेहो।
प्रतिअवतार; करी हरिलीला। ऐक मुने, कवि; विविध बोलिला ॥ २ ॥
नारद एक;-वार दे शापा। म्हणुनि अवतरे; एक्या कल्पा।
चकितचि गिरिजा;परिसुनि वाणी। विष्णुभक्त अति; नारद ज्ञानी ॥ ३ ॥
शाप कासया; मुनिनें दिधला। कवण दोष; मापतिनें[3] केला।
तो प्रसंग मज; वदा पुरारी। मोह मुनि मना; विस्मय भारी ! ॥ ४ ॥

दो.—बोले हसुनि महेश तंव; ज्ञानी मूढ न कोणि।
राम ज्यासि जैं जसा करी; होइ तसा तैं प्राणि ॥ १२४ ॥ (क)

आर्या— मग विहसुनी महेश्वर; बोले, ज्ञानी न मूढ कोणी तो।
ज्यातें रघुनाथ जसा; जेव्हां करितो तसाच तो होतो ॥ १२४ ॥ (क)

इति श्रीबालकाण्डे उमामहेश्वर संवादे; अवतार हेतु कथनं
नाम पञ्चदशोऽध्यायः

---

१ त्यांच्या हितासाठीं. २ तिच्या शापास. ३ लक्ष्मीपति.

अध्याय १६ वा

सो.—वदतो हरिगुणगाथ; भरद्वाज करि श्रवण मग।
भवभंजन रघुनाथ; भज तुलसी! त्यज मान मद ॥१२४॥ (ख)

आर्या— भरद्वाज मुनि सादर; ऐका सांगेन रामगुणगाथा।
मानमदा मोडुनि भज; प्रज्ञा! भवभंजना रमानाथा ॥ १२४ ॥ (ख)

हिमगिरिगुहा; एक मन-भावनि। वाहे सन्निध; सुरनदि पावनि।
आश्रम परम; पुनीत पाहिला। देवर्षीचे; मनि अति भरला ॥ १ ॥
बघुनि शैल सरि; विपिन-विभागू। उपजे श्रीपति;-पदि अनुरागू।
हरिला स्मरतां; शाप न बाधी। सहज विमलमनिं; लागे समाधी ॥२॥
देखुनि मुनिगति; भय इन्द्राला। बाहुनि देइ; मान मदनाला।
सहितसहाय; जाइ मम हेतू। निघे हर्ष मनिं; जलचरकेतू ॥ ३ ॥
शुनासीर चित्तीं; भय करती। इच्छि देवऋषि; ममपुरवसती।
कामी लोलुप; जे जगिं जगती। कुटिल काक इव; सर्वा डरती ॥ ४ ॥

दो.—शुष्क हाड घेउनि पळे; श्वान बघुनि सिंहास।
हरिल हरी; मानुनी जणूं; ताशी न लाज इन्द्रास ॥ १२५ ॥

आर्या— शुष्कास्थी घेउनि ते; श्वान पळे जेविं बघुनि मृगराजा।
हरि घेइल, मानी जड; जाण न तैसी सुराधिपा लाजा ॥ १२५ ॥

त्या आश्रमीं; मदन जैं गेला। मायेनें ऋतु; वसन्त केला।
कुसुमित विटप; विविध बहुरंगें। कूजति कोकिल; गुंजति भृंगें ॥ १ ॥
त्रिविध पवन अति; रम्य वाहतो। काम-पावका; जो वाढवितो।
रंभादिक सुर; नारि नवीना। सकल विषमशर;-कला प्रवीणा ॥२॥
करिति गान बहु; तान तरंगा। बहुविध क्रीडति; पाणिपतंगा।
सहाय पाहुनि; मदन हर्षला। बहुविध माया;-प्रपंच रचला ॥ ३ ॥
कामकला मनिं; मुनिसि न व्यापी। डरला स्वयें; मार मनिं पापी।
केवि तयासी नच; भीति तयातें। रक्षण करी; रमापति ज्यातें ॥ ४ ॥

दो.—सहित सहाय सभीत अती; हार मानि मनिं फार।
जाउनि धरि मुनि चरणमग; आर्त वदे बहु मार ॥१२६॥

आर्या— होउनि भवभीत अती; सहित सहायेंसि मानि मनिं हार।
मुनिचरणां धरि धावुनि; दीन अती आर्त होउनी मार ॥ १२६ ॥

---

१ गाथा. २ नदी. ३ लागली. ४ बोलावून. ५ कामदेव. ६ इंद्र
७ सिंह. ८ तरुण; ९ मदन, १० हातांत चेंडू घेतलेल्या;

नारदमनीं; कोप नव झाला। प्रियवचनें; तोषवि कामाला।
नमुनि चरणिं शिर; आज्ञा पावुनि। आइ मदन निज; समाज घेउनि॥१॥
मुनि-सुशीलता; आपुलि करणी। सर्व, सुरसभे; आउनि वर्णी।
श्रवुनि सर्व मनिं; विस्मय करिती। मुनी प्रशंसुनि; हरिला नमिती॥२॥
मग नारद; पावले शिवासी। मी जित-कामचि गर्व मनासी।
कामकृती मग; वदे हरासी। प्रिय जाणुनि त्या;शिव उपदेशी॥३॥
वारंवारचि; विनवूं तुजला। कथा जशी वदलासी मजला।
तशी कधीं; हरिशीं न वदावी। निघे प्रसंगीं; तरि लपवावी॥४॥

दो.—हित उपदेशी सदाशिव; नारद मनीं न मान।
भरद्वाज कौतुक बघ ती; हरि इच्छा बलवान॥१२७॥

आर्या— शंभु करी उपदेशा; हितार्थ तरि नारदासि रुचला ना।
भरद्वाज बघ कौतुक;इच्छा हरिची कशी सुबलवाना॥१२७॥

राम करूं; इच्छी तें होतें। वदा अन्यथा; कोण करी तें।
शंभुवचन मुनि; मना न आलें। विरंचि लोका; तदा निघाले॥१॥
एक-वार कर;तलिं वर वीणा। हरिगुणगान; गात विधि नाना।
क्षीरसिंधु मुनि;-नायक गेले। श्रीनिवास श्रुति;-पति जिथ बसले॥२॥
मुदित उठुनि; श्रीनाथ भेटले। मुनिसमेत निज आसनिं बसले।
बोले हसुनि; चराचर राया। बहु दिनिं दर्शन; दिधलें सदया॥३॥
काम चरित; नारदें वर्णिलें। प्रथमचि यद्यपि; शिवें वर्जिलें।
प्रचण्ड अति; रघुपतिची माया। मोहि न कोणा; येतां जगिं या॥४॥

दो.—करी रुक्षमुख; वचन मृदू; बोले श्रीभगवान।
स्मरणें तव पळताति दुरी; मोह मार मद मान॥१२८॥

आर्या— रुक्ष वदन करुनी मग; मृदु वचने बोलताति भगवान।
स्मरणें तव पळती कीं; भय मानुनि मोह मार मद मान॥१२८॥

बघ मुनि मोह; होइ मनि त्यांचे। ज्ञान विराग; मनीं नहि ज्यांचे।
ब्रह्मचर्यरत; धीरमतीतें। तुम्हां मनोज किं; करि पीडेतें॥१॥
नारद वदे; सहित अभिमाना। सकल कृपा; अपुली भगवाना!।
करुणानिधि, मग; मनीं विचारी। रुजला गर्व; तरू मनि भारी॥२॥
त्यासी उपडुनि; फेकूं दूरी। पण अमुचा; सेवक हितकारी।
मुनिचें हित मज; होइल लीला। अवश्य करणें; अशा कृतीला॥३॥

१ मंडळी. २ ऐकून. ३ विष्णूला. ४ विष्णु.

निवे नमुनि शिर; हरिपद कमला। अहंकार बहु, हृदयि वाढला।
श्रीपति निज; माया तंव प्रेरी। क्रूर तिची कृति ऐका भारी ॥४॥

दो.—मार्गी नगर ती र ची मग; शत योजन विस्तार।
रमावास-नगरीहुनि ही; रचना विविध प्रकार ॥१२९॥

आर्या— शत योजन विस्तृतशा, ती निर्मी मग सुरम्य नगराते।
वैकुंठ पुरीहुनिही; विविधपरी करुनि रम्य रचना तें ॥ १२९ ॥

नगरिं वसति; सुंदर नरनारी। अणुं बहु मनसिज; रति, तनुधारी।
वसतो तिथें; शीलनिधि राजा। अगणित हयगज; सैन्य समाजा ॥१॥
शत सुरेशसम; विभव[1] विलासचि। रूप-तेज-बल, - नीति-निवासचि।
त्याची कन्या; विश्व-मोहिनी। श्री[2] मोहित हो; जिला पाहुनी ॥ २ ॥
ती हरिमाया; सब-गुण-खाणी। शोभा तिची; कोण कीं वाणी।
करी स्वयंवर; नृपबाला ती। अगणित मही; - पाल जमताती ३ ॥
मुनि कौतुकी; नगरिं त्या गेला। नगर जनीं; वृत्तान्तहि कथिला।
ऐकुनि सर्व; भूपगृहिं आले। करुनि पूजना; नृपें बसविलें ॥ ४ ॥

दो.—आणुनि मुनिला दाखविली; भूपें राजसुतेस।
वदा नाथ! मनिं विचारुनी; गुणदोषांसि विशेष ॥१३०॥

आर्या— मग नारदासि दावी; आणुनियां निजसुतेसि तो नृपती।
हृदयिं विचारुनि सांगा; गुणदोषां नाथ जे हिचे असती ॥१३०॥

रूप बघुनि मुनि; विरति विसरले। बहुत काळ मग; बघत राहिले।
तिचे लक्षणां; पाहुनि भुलले। हृदयिं हर्ष, परि; प्रगट न वदले ॥१॥
हिला वरिल तो; अमरचि होइल। रणीं जिंकिला; कधीं न जाइल।
सेविति सकल; चराचर त्यासी। सुता, शीलनिधि; वरील ज्यासी ॥२॥
बघुनि लक्षणें, ठेवि मनासी। वदे कांहि मग; रचुनि नृपासी।
सुता सुलक्षण; तुम्ही नृपाला। सांगुनि; मनीं; सचिंत निघाला ॥३॥
काय करावा; यत्न विचारी। जेणें मज ही; वरी कुमारी।
जपतप नच; होणें या काला। दैवा! मिळे; कवणविधि बाला ॥४॥

दो.—या समयीं पाहिजे अती; शोभा, रूप, विशाल।
जे पाहुनि रीझे कुमरी घालिल मम जयमाळ ॥ १३१ ॥

१. वैभव, २. लक्ष्मी

आर्या— अवश्य ऐशा अवसरिं; अतिशोभों, रूप, तेंहि; सुविशाल।
जें पाहुनि रीझेलाचि; मजला मग कुमरि घालि जयमाळ ॥१३१॥

प्रभुपार्शी मी; रूप मागतों। विलंब जातां; होइल बहु तो।
हरिसम हितकर; कोणि न मजला। तोचि सहाय; करो समयाला ॥ १ ॥
मग हरितें; बहुविधा विनविलें। कृपाब्धि कौतुकि; विष्णु प्रगटले।
हरि बघुनी मुनि; – नयन तोषले। कार्य सफल; समजुनी हर्षले ॥ २ ॥
अति दैन्यें; वृत्तान्त कथियला। कृपाळु प्रभु! व्हा; सहाय मजला।
प्रभुजी! मज; निज; – रूपा द्यावें। अन्य उपाय न; तिज पावावें ॥ ३ ॥
दास-हितचि प्रभु; होइल जैसें। शीघ्र उपायां; कराचि तैसें।
निज मायेच्या; यळा पाहिलें। दीन दयाघन; हसुनि बोलले ॥ ४ ॥

दो.—जेणें होइल परम हित; ऐका मुने सुजाण।
तेंचि करीन; न अन्य मुळीं; वचन मृषा नच मान ॥१३२॥

आर्या— जेणें नारद! तुमचें; हित केवळ एक होय सुज्ञाना।
त्याचि करीन उपाया; नहि अन्या; वचन सत्य मम माना ॥१३२॥

कुपथ्य मागे; व्याकुळ रोगी। देइ न वैद्य; पहा मुनि योगी।
तेविं करिन मीं; तव सुहिताला। सांगुनि हरि; अंतर्हित झाला ॥ १ ॥
माया विवश; होइ मुनि मूढ। समजेना हरि; – गिरा सुगूढ।
तिथें मुनीश्वर; सत्वर गेले। जिथें स्वयंवर; वितान केलें ॥ २ ॥
बसले निज निज; आसनिं राजे। सहित समाज; सजुनि रूपा जे।
मुनिमनिं हर्ष; रूप अति मजला। वरिल मला; न चुकूनि दुजाला ॥३॥
हितार्थ मुनिच्या; दीन दयाळें। अकथ्य ऐसें; कुरूप दिधलें।
या लीलेसी; कोणि न जाणिति। नारद जाणुनि; मस्तक नमिती ॥४॥

दो.—वसति तिथें युग[2] रुद्रगण; ते जाणति सब भेद।
विप्रवेषिं फिरती बघत; प्रिय अति जयां विनोद ॥१३३॥

आर्या— रुद्रगणद्वय[2] तेथें; होते त्यां सकल भेद तो फळतो।
विप्रवेषि जे फिरती; बघति जयांसी विनोद बहु गमतो ॥१३३॥

ज्या समाजि मुनि; बसले ज्ञानी। रूपास्तव मनिं, बहु अभिमानी।
तेथें शिवगण; बसले दोन्ही। विप्रवेष नच; समजे कोणी ॥ १ ॥

१. मंडप, २. दोन.

व्यंग वचन ते; वदती नाना। सुन्दरता हरि; देइ पहाना!।
राजकुमारि; रिझेलचि बघुनी। वरील यासी विष्णु जाणुनी ॥२॥
मुग्ध मुनी, मन; हाति पराचें। प्रसन्न हरगण; हसती साचे।
विनोद वचनें; मुनी परिसती। मोहभ्रममति; मुळिं न उमजती ॥३॥
कोणि न समजे; या लीलेतें। रूप दिसे तें; राज – सुतेतें।
मर्कट – वदन; भयंकर तनुला। बघुनि कोप मनिं; नृप-तनयेला ॥४॥

दो.—सखीं समेत कुमारि तंव; चाले राज मराल।
फिरे निरीक्षित, सकलनृप; कर-कमळीं जयमाळ ॥१३४॥

आर्या— राजकुमारि सखींचे; समेत चाले तदा जणुं मराळ।
बघत, फिरे नृपवृंदा· विलसे शुभ करसरोजिं जयमाळ ॥१३४॥

जिकडे नारद; फुलूनि बसले। चुकुनि चक्षु, ना; तिकडे वळले।
व्याकुळ मुनि, बहु; परि चुळबुळले। दशा बघुनि; शिवगण मनिं हसले ॥१
जाइ धरुनि हरि, नृप – वेषाला। हर्षें कुमरि; घालि जयमाळा।
वधुला घेउनि; श्रीपति गेले। सकळ नृपाळां, निराश केले ॥ २॥
मोह विकल मुनि: बुद्धी नाठी। मणि गळला जणुं; सुटतां गाठी।
तेव्हां वदले, हरगण हसुनी। दर्पणिं मुख मुनि: बघा जाउनी ॥३॥
पळती वदुनि; उभय भय भारी। वदन बघे मुनि; दिसतां वारी।
वेष विलोकुनि: कोप वाढला। शाप तयां कटु; कठोर दिधला ॥४॥

दो.—व्हाल निशाचर जा कसे; कपटी पापी दोन्हि।
हसलां मज भोगाल तरी, फिरुनि हसांना कोणि ॥१३५॥

आर्या— व्हा रजनीचर जाउनि: कपटी पापी अती त्वरें दोन्ही।
हसला मजला भोगा; फल, फिरुनी मुनि हसाल ना कोणी ॥१३५॥

बघतां जळीं: रूप निज दिसलें। तदपि न मनिं; संतोष पावले।
स्फुरे अधर[2] बहु; कोप मनासी। सपदि निघे; कमलापतिपाशीं ॥ १
शाप ना तरी: देइन प्राणा। जगतीं केलें; मम अपमाना।
मध्यमार्गि: भेटे दनुजारी। सवें रमा, ती; राजकुमारी ॥ २॥
मधुरवचन, सुर;–नाथ बोलले। व्याकुळवत मुनि; कुठें चालले।
त्या वचनें बहु; कोप उपजला। मायावश मनिं; विवेक नुरला ॥ ३॥

---

१. मूढ, २. ओठ.

परोत्कर्ष तुम्हि; बघूं न शकतां। ईर्षा कपट विशेषें करतां।
सिंधुमथनिं: रुद्रासि फसविले। प्रेरुनि सुर; विषपान करविलें॥४॥

दो.—विष हरासि, असुरां सुरा; स्वयें रमा मणि चारु।
स्वार्थसाधु अति कुटिल तरी; सदा कपट व्यवहारु॥१३६॥

आर्या— विष शंभुसि, असुरांसी; सुरा. रमा आपणासि मणि सार।
स्वार्थसाधु अतिकपटी; तुमचा तों नित्य कुटिल आचार॥१३६॥

परम स्वतंत्र न; कोणि शासता। मनास वाटे; तसे वागतां
सुजना दुर्जन: उलटें करतां। विस्मय हर्ष न मनांत धरतां॥१॥
परीक्षितां; सर्वांसि ठकवुनी। निर्भयता; उत्साह बहु मनीं।
कर्म शुभाशुभ; तुज ना बाधी। आजवरी तुज कोणि न साधी॥२॥
आज उचित गृहिं; वायन दिधलें। कृतकर्मचि जणुं; सफळ जाहलें॥
मला वंचिलें; धरुनी देहा। तोचि धरा, मम; शाप असे हा॥३॥
कपिरूपा; दिधलें आह्मांसी। सहाय करिती: कीश तुह्मांसी।
बहु केलें मम; अपकाराला। तरि भोगाल; नारि-विरहाला॥४॥

दो.—शाप धरुनि शिरिं, हरिखें मनीं कृपाळु-बहु विनवीति।
निजमायेची प्रबलता; आकर्षुनि मग घेति॥१३७॥

आर्या— शाप धरुनि शिरिं हर्षित; चित्तें; विनवूनि मान बहु देती।
निजमायेची शक्ती; आकर्षुनि ते कृपालु मग घेती॥१३७॥

जंव हरि माया; दूरि निवारी। लक्ष्मी नाहिं, न राजकुमारी।
सभीत मुनि अति; मग हरिचरणां। धरी; पाहि; प्रणतार्ती हरणा॥१॥
मृषा असतु मम; शाप कृपाळू। ही मम इच्छा; वदे दयाळू।
मी वदलो बहु दुर्वचनांतें। नाश कशानें; मम पापांतें॥२॥
जा कर जप; शंकर-शतनामा। त्वरित हृदयिं: पावसि विश्राम॥
प्रिय शिवसम नच; कोणी मातें। भुलूं नका या; विश्वासातें॥३॥
कृपा पुरारी; करी न ज्यासी। मुने भक्ति मम: प्राप्त न त्यासी।
धरुनि मनीं हें; महिवरि विचरा। तुम्हां निकट ये; माया न जरा॥४॥

दो.—बहुविध मुनितें प्रबोधुनी; झाले अन्तर्धान।
सत्यलोकिं नारद निघे; करित राम गुणगान॥१३८॥

---

१ सुंदर मणी, कौस्तुभ. २. हर्ष. ३. होवो

हरगण पथि; मुनि जातां बघती । विगतमोह; मनिं; हर्षित दिसती ।
सभीत अति; नारदप्रति आले । चरण धरुनि वच; आर्त बोलले ॥ १ ॥
द्विज न आम्हि; हरगण मुनिराया । फळें प्राप्त, बहु; अपराधा या ।
शापानुग्रह; करा कृपाळू । नारद वदले; दीन दयाळू ॥ २ ॥
व्हाल निशाचर; जरि दोघेही । विपुल विभव; बल तेज तसेंही ।
स्वभुजें विश्व,-जयासि कराल । विष्णु मनुज तनु; तदा धरील ॥ ३ ॥
रणीं मरण, हरि;-करें तुम्हांसी । व्हाल मुक्त; नच या जन्मासी ।
मुनिपदिं शिर; नमुनी ते निघती । यथासमय, तनु; राक्षस धरिती ॥४॥

दो.—एक कल्प या हेतु प्रभू; धरिति मनुज अवतार ।
सुर-रंजन सज्जन सुखद; हरि भंजन भू-भार ॥ १३९ ॥

आर्या— यास्तव एके कल्पीं. प्रभु धरिती, राम मनुज अवतारा ।
हरि, सुर रंजन, सज्जन; सुखद, करी भजनासि भूभारा ॥१३९॥

यापरि जन्म; कर्म हरिचे रे । सुंदर सुखद; विचित्र कितीरे ।
प्रतिकल्पासि; प्रभू अवतरती । चारु चरित; नानाविध करती ॥१॥
तैं ते कथा; मुनीश्वर गाती । पावन परम: प्रबंधां रचिती ।
अनुपम नाना; प्रसंग कथिती । परिसुनि विस्मय, सुज्ञ न करितीं॥२॥
हरि अनन्त हरि; कथा अनन्त । श्रवण कथन; करिती बहु संत ।
परम रम्य अति; रामचरित तें । कल्पकोटि; गातां नच सरतें ॥३॥
हा प्रसंग; कथिला रुद्राणी । हरिमाया; मोही मुनि ज्ञानी ।
प्रभु कौतुकी; प्रणत हितकारी । सेवा-सुलभ; सकल दुखहारी ॥४॥

सो.— सुर नर मुनि कुणि नाहिं: ज्या न मोहि माया प्रबल ।
सुविचारुनि मनिं कांहिं, भजा महामाया-पतिसि ॥ १४० ॥

आर्या—सुरनर मुनि कुणि नाहीं: माया प्रबल न जयासि मोह करी ।
सुविचारुनी मनीं हें; भजनें मायापतीस चित्तिं धरी ॥ १४० ॥

इति श्री बालकाण्डे नारदाभिमानादि नारद मोह भंग—
वर्णनं नाम षोडषोऽध्याय;

---

१ येणार नाही.

अध्याय १७ वा.

गिरिजे अपर[1] हेतु मी वदतो । ऐक विचित्र; कथा विस्तर तो ।
ज्या कारण अज; अगुण अरूप । ब्रह्म होइ; कोशलपुर भूप ॥ १ ॥
जो प्रभु विपिनिं; फिरत तुज दिसला । बंधु सहित धरि; नर वेषाला ।
अवलोकुनि जें; चरित भवानी । सती देहिं; बनलिस भ्रम खाणी ॥२॥
अजुनि हि छाया; मिटे न सारी । ऐक चरित तें; भ्रमरुजहारी[2] ।
केली लीला; या अवतारीं । सकल वर्णिलों; मति-अनुसारीं ॥३॥
भरद्वाज !; ऐकुनि शिववाणी । प्रेम, लाज; सस्मिता भवानी ।
फिरुनि कथा; वदती वृषकेतू । तो अवतार; होय ज्या हेतू ॥ ४ ॥

दो.—मुनि मी वदतो सकल तुज; सावधान श्रृणु त्यास
रामकथा कलिमलहरणि; मंगलदायक खास ॥ १४१ ॥

आर्या— सकलकथा ती वदतो ऐक मुने सावधान चित्ताने ।
रामचरित कलिमलहर; मगलदायक सुरम्य सुरसाने ॥ १४१ ॥

स्वायंभू मनु; आणि शतरूपा । ज्यां पासुनि नरः-सृष्टि सरूपा ।
धर्माचारें; शुद्ध दंपती । वेद आज यश; ज्यांचें गाती ॥ १ ॥
नृप उत्तान;-पाद सुत त्याचा । ध्रुव हरिभक्त; होइ सुत ज्याचा ।
लघुसुत नाम; प्रियव्रत त्यातें । वेद पुराण; प्रशंसिति ज्यातें ॥ २ ॥
देवहूति मनुचीच कुमारी । कर्दम मुनिची; जी प्रिय नारी ।
आदिदेव प्रभु; दीन दयाळा । उदरिं धरी जी; कपिल कृपाळा ॥३॥
जो करि सांख्य;-शास्त्र निर्माण । तत्वविचार,-निपुण भगवान ।
तो मनु राज्य; करी बहुकाळीं । प्रभु आज्ञा सब;-विधि प्रतिपाळी॥४॥

दो.—होइ न विषय विराग; गृहिं वसतां ये वृद्धपण ।
हृदयिं दुःखें बहु ओग; जन्मचि गत हरिभक्तिविण ॥ १४२ ॥

आर्या— होइ न विषयविरक्ती; गृहिं वसता जाहलेचि वृद्धपण ।
अनुताप मनी उपजे; जन्मवृथा जाहलाचि भक्ति-विण ॥ १४२ ॥

बळें राज्य मग; सुता अर्पिलें । नारिसमेत; गमन वनिं केलें ।
नैमिष तीर्थ;-वरा विख्याता । अतिपावन; साधकसिधि दाता ॥१॥

१ दुसरा, २ भ्रमरूपी रोगहारक.

सिद्धसमाज; वसति मुनि जेथें। हर्षित नृप मनुः आई तेथें।
पथिं आतां; शोभति मतिधीर। ज्ञानभक्ति जणुं; धरिति शरीर ॥२॥
प्राप्त जाहले; गोमति तीरा। हर्षे मज्जति; निर्मल नीरीं।
धर्मधुरंधर; नृपऋषि बघुनी। भेटूं येति, सिद्ध मुनि ज्ञानी ॥ ३ ॥
जीं जीं सुंदर; तीर्थें असती। मुनी सकल; सादर करवीती।
शरीर कृश; मुनि;-पट परिधाना। सत्समाजिं करि; श्रवण पुराणां ॥४॥

दो.—द्वादश अक्षर मंत्रवर; जपती अति अनुरक्त।
वासुदेव पदपंकरुहीं; दंपति अति आसक्त ॥ १४३ ॥

आर्या— द्विषडक्षर मत्राते; सतत जपती अतीव अनुरागे।
वासुदेव पदपद्मी; दम्पतिचे त्या सदैव मन लागे ॥ १४३ ॥

करिति अहार; शाकफलकंदा। स्मरती ब्रह्म; सच्चिदानंदा।
मग हरिसाठी; करिति तपाला। त्यागुनि फळमुळ; पीति जलाला॥१॥
मनिं अभिलाषः निरंतर करिती। नेत्रीं निरखूं; हरिची मूर्ती।
अगुण अखंड; अनंत अनादी। ज्यातें चिंतिति; परार्थवादी ॥ २ ॥
नेतिनेति ज्या; गाती आगम। निजानंदः निरुपाधि, निरुपम।
शंभु विरंचि; विष्णु हे जाणा। ज्याच्या अंशें; उपजति नाना ॥३॥
ऐसा प्रभु; सेवक-वश बनतो। भगतलागीं; लीलातनु धरतो।
असे सत्य जरि; ही श्रुतिभाषा। तो पुरविल; अमुची अभिलाषा ॥४॥

दो.—यापरि जाती वर्षषट; सहस्र जल आहार।
संवत सप्त सहस्र मग; जाति वायु-आधार ॥ १४४ ॥

आर्या— वर्षे सहा सहस्रहि; सारियली करुनि वारि आहार
सवत सात सहस्रे; क्रमिली केवळ समीरें आधार ॥ १४४ ॥

संवत दशशत; त्यागिति तेंही। उभीं एक; पायीं दोघेंही॥
विधि.हरि-हर, तप; अपार बघती। मनु समीप; बहु वेळां येती ॥ १ ॥
मागा वर, बहु;-परी प्रलोभिति। परमधीर, अणु; मात्र न चळती।
देह दिसे; अस्थी सांगाडा। तदपि मनागं; मनीं नहिं पीडा ॥२॥
प्रभु सर्वज्ञ; दास निज मानी। अनन्यगति; तापस नृपराणी।
माग माग वर; आशि नभवाणी। परमगभीर; कृपामृतखाणी ॥ ३ ॥

१ उपमासहित; २ वायु· ३ किंचित्.

मृतसंजीवनि; गिरा रम्य ते। श्रवण-रंध्रिं[1]; घुसुनी उरिं शिरले।
हृष्ट-पुष्ट-तनु; सुंदर झाली। जणुं आतांचि; घराहुनि आली ॥४॥

दो.—श्रवण-सुधासम वच भवुनी; पुलक प्रफुल्लित गात्र।
बोले मनु नत दण्डवत; प्रेम न हृदयिं रहात ॥ १४५ ॥

आर्या— श्रवण सुधासम वचना; ऐकुनि फुलताति पुलक जणुं गात्रीं।
साष्टांगें नमुनि वंदे; प्रेम न राहे जणूं हृदयपात्रीं ॥ १४५ ॥

प्रेक-भक्त-सुर;-तरु, सुरधेनू। विधि-हरि-हर; वंदित पदरेणू।
सेवासुलभ; सकल सुखदायक। प्रणतपाल; सचराचरनायक ॥ १ ॥
जरि अनाथहित; मजवरि स्नेहो। प्रसन्न होउनि; हा वर द्याहो।
जें स्वरूप शिव-मानसिं वसतें। मुनि यत्नां; करिती ज्यास्तव तें ॥२॥
हे भुशुंडिमन;—मानसहंसा। सगुण अगुण ज्या; निगमिं प्रशंसा।
डोळे भरुनि; रूप तें दावी। आर्तिनाशना! कृपा करावी ॥ ३ ॥
दंपतिवचन; परमप्रिय लागे। मृदुल विनीत; प्रेमरस-रंगें[2] ॥
भक्तप्रिय प्रभु; कृपालु झाले। विश्ववास[3]; भगवान प्रगटले ॥ ४ ॥

दो.—नीलसरोरुह; नीलमणी; नील नीरधर[4]शाम।
लाजति तनुशोभा बघुनी; कोटि कोटि शतकाम ॥ १४६ ॥

आर्या— नीलसरोजासम जो; नीलमणी नीलनीरधर शाम।
लज्जित होती बघुनी; तनुशोभा; कोटि कोटि शतकाम ॥ १४६ ॥

शरदमयंक[5] रूप; मुखशींवा[6]। चारुकपोल[7]; चिबुक[8], दर ग्रीवा[9]।
अधर अरुण, रद[10]; नासा सुंदर। हास्य विनिंदक; विधुकर निकर[11] ॥१॥
नव अंबुजसम; अंबक[12]— शोभा। दृष्टि ललित मनिं; उपजवि लोभा।
भृकुटि मनोज;—चाप अतिकारी। तिलक ललाट;-पटालिं द्युति भारी ॥२
कुण्डल मकर; मुकुट शिरिं भ्राजे। अलक[13] कुटिल; मधुपावलि[14] लाजे।
उरिं श्रीवत्स; रुचिर वनमाला। भूषित, पदक-हार-मणिजालां ॥३॥
केसरि कंधर; चारु जानवें। अंगद भूषण; रम्यतर नवे।
करिकर[15] सदृश; सुभग भुजदण्ड। कटिं निषंग[16]; करिं शर कोदण्ड[17] ॥४॥

---

१ ऐकून, २ रंगानें, ३ विश्रांत राहणारे, ४ ढग, ५ चंद्र, ६ सीमा, ७ गाल, ८ हनुवटी, ९ गळा, १० दंत, ११ समुदाय, १२ डोळे, १३ केस, १४ भ्रमरसमुदाय, १५ सोंड, १६ भाता, १७ धनुष्य.

दो.—तडित विनिंदक पीतपट; उदरिं रेख वर तीन।
नाभि मनोहर, करी जणूं; रवितनया गति क्षीण ॥ १४७ ॥

आर्या— सौदामिनी विनिंदक; पीतांबर; उदरिं रेख वर तीन।
नाभि मनोहर घेते; कालिंदीचा विवर्त चोरून ॥ १४७ ॥

पद राजीव न: वदले जाती। मुनि-मनमधुप; जयांमधि वसती।
वामभागिं शोभे अनुकूला। आदिशक्ति; छविनिधि जगमूला ॥१॥
जिचे अंश; उपजति गुणखाणी। अगणित उमा, रमा, ब्रह्माणी।
भृकुटि विलास; जिचा जग नाना। वामभागिं, सीता ती जाणा ॥ २ ॥
रूपनिधी, हरि-रूपा पाहुनि। बघति नयन; नि-र्निमेष होउनि।
सादर बघति; अनूपम रूपा। तृप्ति न पावति; मनुशतरूपा ॥ ३ ॥
हर्ष विवश तनु;-भान विसरले। करिं पद धरुनि; दण्डवत पडले।
ठेवि शिरीं प्रभु; निजकर-कंजा। त्वरें उठविले; करुणापुंजा ॥ ४ ॥

दो.—वदले कृपानिधान मग, प्रसन्न मज जाणून।
मागा वर जो रुचे मनीं, महादानि मानून ॥ १४८ ॥

आर्या— मग ते कृपाब्धि वदले; प्रसन्न मजला अतीव जाणून।
अति दानी मानुनि, घे; रुचेल मनिं तव, वरास मागून ॥ १४८ ॥

परिसुनि प्रभुवच; जोडुनि पाणी। धीर धरुनि बोले मृदुवाणी।
नाथ बघुनि पद,- कमल आपुले। सर्व काम मम; पूर्ण जाहले ॥ १ ॥
एक लालसा; असे मना ही। सुगम अगम वदुं; शके न कांहीं।
देतां सुगम; तुम्हां गोसावी। निज दैन्यें मज; अगम गमावी ॥ २ ॥
रंका यदा; कल्पतरु-प्राप्ती। लाज मागतां; बहु संपत्ती।
प्रभाव त्याचा; तो नच जाणे। तथा हृदयिं मम; संशय होणें ॥३॥
सर्व जाणती, अन्तर्यामी। मम पुरवाल, मनोरथ स्वामी।
लाज त्यजूनी माग नृपाही। अदेय तुज, मज, नसेचि कांहीं ॥४॥

दो.—दानि-शिरोमणि, कृपानिधी; नाथ ऐक सद्भाव।
तनय तुम्हांसम मागतो, प्रभुशीं कवण दुराव ॥ १४९ ॥

आर्या— दानि शिरोमणि नाथा; कृपानिधे सांगतोचि सद्भावा।
लपवूं काय सामर्थ्या; अपणांसम तनय देव तो द्यावा ॥ १४९ ॥

१ वीज, २ यमुना, ३ भोंवरा, ४ सूप, ५ सरस्वती, ६ कपट लपवालपव.

प्रेमवचन; परिसुनी अमोले। एवमस्तु; करुणानिधि बोले।
ममसम शोधुं; कुठें मी दूजा। भूप, तनय मी; होइन तूझा॥ १॥
बघुनि शतरुपा उभि कर जोडुनि। देवि[1] माग वर; रुचे तुझे मनिं।
नाथ! नृपें जो; वर मागितला। कृपाल! मजही; तो प्रिय गमला॥२॥
प्रभु परंतु अति, होइ धिटाई। भक्तहिता तरि; तुज प्रिय होई।
तूं ब्रह्मादि; सकल जग स्वामी। ब्रह्म सकल; जीवान्तर्यामी॥ ३॥
जाणुनि हें मनिं; संशय येती। प्रमाण, परि; प्रभु-उक्ति असे ती।
जे निजभक्त; नाथ तव असती। ज्या गतिला ज्या; सुखा पावती॥४॥

दो.—ते सुख, ती गतिः ती भक्ती तो निजचरणीं स्नेह।
तो विवेक, ती रीति; प्रभू, द्या मज निःसंदेह॥ १५०॥

आर्या— ते सुख ती दृढभक्ती; ती गति, तो शुद्ध तवपदीं स्नेहो।
तो विवेक आचारहि; निःसंदेहें प्रभो मला द्या हो॥ १५०॥

गूढ रुचिर मृदु; ती वर-रचना। ऐकुनि बोले; कृपालु वचना।
जी रुचि तव मनिं; असेल कांहीं। पूर्ण होय ती; संशय नाहीं॥ १॥
जननि! विवेक; अलौकिक तूझा। नाश न होय; अनुग्रह माझा।
चरण नमुनि मनु; फिरून वदती। प्रभु! मम अन्य; असें कीं विनती॥२॥
प्रेम पुत्रवत; तवपदिं व्हावें। सुखें मूढ मज; जनीं म्हणावें।
मणिविणफणि;जणुं;जलविण मीन। ममजीवनही; तव आधीन॥ ३॥
वर मागुनि मग; चरणां धरलें। एवमस्तु करुणा; निधि वदले।
अध[3] शासना; मग मानावें। जाउनि सुरपति;-सदनिं वसावें॥४॥

दो.—भोगुनि भोग विशाल, तात समय लोटेल मग।
व्हाल कोसिलापाल; तंव मी होइन तनय तव॥ १५१॥

आर्या— लोटेल समय कांहीं; तंव भोगांसी विशाल भोगाल।
सुत तुमचा मी होइन; जे समयीं व्हाल कोसिलापाल॥ १५१॥

इच्छामय नर; — वेषा घेइन। प्रगट-रूप तव; सदना येइन।
अंशांसह तनु; धरुनी ताता। चरित करीन; भक्तसुखदाता॥ १॥
भाग्यवन्त नर; सादर ऐकुनि। तरतिल भव; मद ममता त्यागुनि।
आदि शक्ति; जननी जगता या। ही अवतार; धरिल मम माया॥२॥

---

१ भगवान ह्मणतात, २ आज, ३ आज्ञेला.

पुरविन मी; अभिलाष तुमचा। सत्य सत्य पण; सत्य आमचा।
किंतिदां बहुनी; कृपानिधान। अन्तर्धान; होति भगवान॥ ३॥
रूपा दंपति; ध्यानीं धरती। कांहिं काळ त्या; आश्रमिं वसती।
विनायास; समयीं तनु त्याजिती। अमरावतींत; करिती वसती॥ ४॥

दो.—हा इतिहास पुनीत अती, उमे वदे वृषकेतु।
भरद्वाज ऐका अपर; हरि जन्माया हेतु॥ १५२॥

आर्या— पावन इतिहास अती; वृषकेतू हा उमेप्रती वदला।
भरद्वाज मुनि ऐका; हरिजन्मा हेतु अपर जो घडला॥ १५२॥

इति श्री बालकाण्डे मनुशतरूपाख्यानं नाम सप्तदशोऽध्यायः
मास परायणे पंचमो विश्रामः

अध्याय १८ वा.

ऐक मुनीश; पुनीत पुराणी। कथा उमेप्रति; शिव वाखाणी।
एक विदित जगिं; केकय देश। सत्यकेतु तिथ; वसे नरेश॥ १॥
धर्म धुरंधर; नीति निधान। तेज-प्रताप; - शील, - बलवान।
दोन तयासि; तनय अति वीर। सब गुणधाम; महा रणधीर॥ २॥
धनी ज्येष्ठसुत; जो राज्यातें। नाम प्रताप; - भानु हें-त्यातें।
अपर तनय अरि;—मर्दन नामा। भुजबल अतुल; अचल संग्रामा॥३॥
युग बंधूंची परम एकता। प्रीति, सकल; छल दोष वर्जिता।
नृपें राज्य सुत;-ज्येष्ठा दिधलें। हरिप्राप्त्यर्थ; गमन वनिं केलें॥ ४॥

दो.—जैं प्रताप रवि होइ नृप; फिरली देशी द्वाहि।
प्रजा पालितो यथाविधी; पापलेशही नाहिं॥ १५३॥

आर्या— जेव्हां प्रतापभानू, झाला नृप तेधवां फिरे द्वाही।
पाळी प्रजा यथाविधि; देशीं त्या पापलेशही नाहीं॥ १५३॥

---

१ पुरातन.

नृपहितकारक; सचिव शहाणा। नाम धर्मरुचि, शुक्रचि माना।
सचिव सुज्ञ; बंधू बलवीर। स्वयें प्रताप;-पुंज रणधीर॥ १॥
सेनायुत; चतुरंग अपारा। अमित सुभट अति-रणझुंझारां।
सैन्य बघुनि नृप; हर्षित झाला। रणदुंदुभि-रव नभिं दुमदुमला॥ २॥
दिग्विजया नृप; सजवी कटकें। निघे बघुनि दिन; वाजति डंके।
जिथें तिथें; युद्धें मग नाना। जिंकि निजबळें, सकल नृपांना॥ ३॥
द्वीपसप्त, निज; भुजवश केले। घेउनि कर; भूपांसि सोडिले।
तदा सकलही; अवनिमण्डला। एक प्रताप-रवी; नृप बनला॥ ४॥

दो.—विश्व बाहुबल वश करुनी; केला नगरिं प्रवेश।
धर्म अर्थ कामादि सुख; सेवी समयिं नरेश॥ १५४॥

आर्या:— बाहुबळें विश्वांतं; स्ववश करुनि निज, पुरींत पद ठेवी।
सुख धर्म अर्थ कामा-दिक समयीं तो यथाविधी सेवी॥ १५४॥

भूप प्रतापभानु; बलशाली। सुरभिसम[1]; भूमी मग झाली।
सब दुख रहित, प्रजे, सुखभारी। धर्मशील; सुंदर नर नारी॥ १॥
सचिव धर्मरुचि; हरिपदिं प्रीती। भूप-हिता; शिकवी बहु नीती।
गुरु सुर संत; पितर भूदेवां। नृप सकलांचि, सदा करि सेवा॥ २॥
भूपधर्म जे; श्रुति वाखाणी। सादर सकल; करी सुख मानी।
प्रति दिन देइ; विविध-विध दानां। वेद शास्त्र; करि श्रवण पुराणा॥ ३॥
नाना वापी; कूप तडागां। सुमन वाटिका सुंदर बागा।
विप्र-भुवन; सुरभवन नवीनें। सर्व तीर्थिं; बनविलीं नृपानें॥ ४॥

दो.—वेद पुराणें वर्णिती; एक एक जो याग।
वार सहस्र सहस्र, नृप; करी सहित अनुराग॥ १५५॥

आर्या— वेद पुराणीं वर्णित; विविध विधी एकवार जे याग।
वार सहस्र सहस्रहि; नृप करि तो सर्व सहित अनुराग॥ १५५॥

कांहिं न मनिं; फळअनुसंधान। भूप विवेकी; परम सुजाण।
जे करि कर्म; धर्म, मन वाणी। वासुदेविं अर्पी; नृप ज्ञानी॥ १॥
एकवार हय;-आरुढ राजा। सजवुनियां; मृगयेच्या साजा।
गंभीरवनिं; विन्ध्याचलिं शिरला। पावन मृग मग; बहु[2] मारिला॥ २॥

१ कामधेनू, २ धनदाट.

विपिनिं फिरत; त्या; दिसे वराह । गिळुनि शशी जणुं; लपला राहू ।
विधुं विशाल, नच; मुखांत राही । जणूं क्रोधवश; सोडित नाहीं ॥३॥
सुकरें दशनः विकराल वर्णिले । तनु विशाल, बहु; पीवर दिसलें ।
हयरव परिसुनि; घुर घुर करितो । चकित विलोकुनि; कान उचलितो॥४॥

दो—नील महीधर, शिखरसम, बघुनि विशाल वराह ।
टांच मारि, हय हाकि नृप; म्हणे नसे निर्वाह ॥ १५६ ॥

आर्या— नील महीधर, शिखरा,-सम बघुनि तो विशाल सुवराह ।
मारी टांच हयातें; म्हणतो आतां न होय निर्वाह ॥ १५६ ॥

येत बघुनि हय; अती रवांनें । वराह पळतो; पवन - रयानें ।
सत्वर करि नृप; शरसंधाना । धरि धरणीसि; विलोकुनि बाणा ॥१॥
लक्ष्य धरुनि नृप; तीर चालवी । सुकर करुनि छल; व्यर्थ घालवी ।
लपत छपत मग; तो मृग पळतो । भूप कोप-वश; पाठि लागतो ॥ २ ॥
दूर शिरे घन;— गहनिं वराह । जिथें हय गजां; नहि निर्वाह ।
अति एकट वनिं; विविधा क्लेश । तरि न सोडि मृग;-माग नरेश ॥ ३ ॥
सूकर बघुनि; नृपाचे धीरा । त्वरित शिरे गिरि;-गुहा गभीरा ।
अगम बघुनि; अनुतापें भरला । फिरे; घोर वनिं, मार्ग विसरला ॥४॥

दो.—खेद खिन्न क्षुधित तृषित; राजा वाजि समेत ।
शोधी व्याकुळ सरित सर; जळविण होइ अचेत ॥ १५७ ॥

आर्या— क्षुधित परिश्रान्त अती; तृषित बहू, भूप वाजि समवेत ।
व्याकुळ फिरला शोधित, सर सरिता; जळविना विगत चेत ॥ १५७ ॥

वनि अटतां; आश्रम त्या दिसला । नृपति कपट-मुनि;-वेषें बसला ।
ज्याचा देश; नृपें रणिं हरला । त्यजुनि सैन्य रण; सोडुन पळला ॥१॥
प्रताप रविचा; समयाचि जाणुनि । आपुला कुसमय; मनिं अनुमानुनि ।
नगरिं न जाइ; मनीं बहु ग्लानी । साम नृपासि न; करि अभिमानी ॥ २ ॥
कोपा गिळुनि; रंकइव, राजा । वसे वनीं; तापसमुनि—साजां ।
त्या समीप नृप; जाता झाला । प्रतापरवि, त्यानें ओळखला ॥ ३ ॥
तृषाक्रान्त नृप; त्या नच जाणी । बघुनि सुवेष; महामुनि मानी ।
तुरगाहुनि; उतरुनि त्या नमिलें । चतुर नृपें, परि; नाम न कथिलें ॥ ४ ॥

---

१ चंद्र, २ डुक्कर, ३ लड, ४ जोराने, ५ बेचैन.

दो.—तृषित विलोकुनि भूपतिसी; तलाव तो दावीत।
मज्जनपान, समेत हय; करूनि नृप हर्षीत ॥ १५८॥

आर्या— तृषित विलोकुनि भूपति; कपटमुनी दाखवी तलावाला।
वाजी समेत पान; स्नाना करुनी प्रफुल्ल नृप झाला ॥ १५८ ॥

श्रम हरुनी नृप; सुखी जाहला। निज आश्रमिं त्या; मुनिनें नेला।
आसन दे रवि;-अस्त जाणुनी। मग तापस; बोले मृदुवाणी ॥ १ ॥
कोण, वनीं कां; फिरा एकले। सुंदर युवो[2]; जिवावरि उठले।
चक्रवर्तिचीं; चिन्हें दिसतीं। वाटे देखुनि; दया मज अती ॥ २ ॥
नाम प्रतापभानु अवनीश्वर[3]। सचिव तयाचा; असें मुनीश्वर।
मृगया करतां; वनांत भुललों। बहु भाग्यें प्रभु;-पदीं पावलों ॥ ३ ॥
आम्हां दुर्लभ; दर्शन अपुलें। सन्निध, भाग्य; -उदय मनि गमलें।
तात! वदे मुनि; निशा जाहली। सत्तर योजन; पुरी राहली ॥ ४ ॥

दो.—निशा घोर, गंभीर वन; पंथ न सुचे सुजाण।
रहा रात्र, हें जाणुनी; करा प्रभातिं प्रयाण ॥ १५९ (क)

दो.—तुलसी जशि भवितव्यता; तैसें मिळे सहाय।
त्या समीप ये आपण कीं; घेउनि तिथें चि जाय ॥ १५९ [ख]

आर्या—रजनी घोर, वनीं या; गहनीं मार्ग न दिसे बघे सुज्ञा।
क्रमुनी रात्रीं येथें; अरुणोदयिं मग चढाल कीं यानां[4] ॥ १५९ ॥ [क]

आर्या—भवितव्यता जशी कीं, तुलसी तैसें मिळेल साहाय्य।
आपण सन्निध येइल; अथवा त्या तेथ घेउनी जाय ॥ १५९ [ख]

बरें नाथ; वंदुनि आज्ञेला। हय तरुसी बांधुनि नृप बसला।
नृप बहु रीति; प्रशंसी त्याला। पद वंदुनि स्तवि; निज भाग्याला ॥ १ ॥
मग मृदु सुंदर; गिरा वदेतो। तात[5] मानुनी; धिटाइ करितों।
मज मुनीश!; सुत, दास गणावें। नाथ! नाम निज; मज सांगावें ॥ २ ॥
तो जाणे नृप; त्यासि न नृपती। कपट-कुशल तो; सुहृद भूपती।
वैरी, क्षत्रिय; तशांत राजा। छलबल करुनि; साधि निजकाजा ॥३॥
स्मरुनि राज्य सुख, दुखित अराती[6]। अवां[7]-अनल इव, जळते छाती।
नृपवच सरळ; ऐकुनी कानीं। स्मरुनि वैर मनिं; हर्षा मानी ॥४॥

१ घोडा, २ तरुण, ३ भूपती, ४ वाहनावर, ५ बाप, ६ शत्रु, ७ कुंभाराची भट्टी.

दो०—कपटभरित वाणी मृदुल; बोलें युक्ति समेत ।
नाम भिकारी अतां मम: निर्धन रहित निकेत ॥१६०॥

आर्या— कपटपूर्ण वचनातें; मृदु मुनि बोलेल युक्ति समवेत ।
नाम आमुचें आतां, 'भिकारी,' निर्धन विनाहि विनिकेत ॥१६०॥

भूपवदे जे; ज्ञान — निधान । प्रभु-समान जे; गत अभिमान ।
स्वरूप निज, ते; गुप्त राखती । कुवेश करुनी; कुशल पावती ॥ १ ॥
करिति संत श्रुति; कंठ-रवातें । परम अकिंचन; प्रिय हरिला ते ।
प्रभुसम अधन; भिकारि अगेहा । बघुनि करिति विधि; शिव संदेहा॥२॥
योऽसि, सोऽसि तव; चरण नमामी । मजवरि कृपा; करा तुम्हि स्वामी ।
सहज प्रीति; पाहुनि भूपतिची । अपणांवरि; विश्वास विशेषचि ॥३॥
सर्व रीति; भूपा वश करुनी । वदे विशेषचि; स्नेह दावुनी ।
सद्भावा; ऐके महिपाला । वसतां इथें; काळ बहु झाला ॥४॥

दो.—कुणि न भेटला आजवरी; मी नच कोणालाहि ।
लोकमान्यता अनलसम; मुनि-तप-कानन दाहि ॥१६१॥ (क)

दो.—तुलसी बघुनि सुवेष, भ्रमती मूढ न, चतुर नर ।
सुंदर केकी देख; वचन सुधासम अशन अहि ॥ १६१(ख)

आर्या— आजवरी नच कोणी, भेटे मज; मीहि नाहिं कवणाला ।
लोकमान्यतावन्ही; क्षणांत जाळी मुनी-तप-वनाला ॥ १६१ (क)

आर्या— तुलसी बघुनि सुवेषा; केवळ मूढ न; सुजाण नर फसती ।
वचन सुधासम केकी; खाती, भुजगां सुरम्य जरि दिसती ॥ १६१ ॥(ख)

यास्तव गुप्त; वसें जगिं पाहीं । हरिवाचुनी; प्रयोजन नाहीं ।
प्रभु जाणे सब, विना सांगतां । सिद्धि कवण वद; लोक रीझतां ॥१॥
तूं शुचि सुमति; परम प्रिय मजसी । प्रीति प्रतीति; मजवरी तुजसी ।
तात अतां जरि; छपवूं कांहीं । दारुण दोष; घडे मजलाही ॥ २ ॥
जों जों तापस; वदे उदास । तों तों वाढे; नृप - विश्वास ।
निजवश बघुनि; कर्म मन वाणीं । मग बोले; तापस बक-ध्यानी ॥ ३ ॥
नाम एकतनु; अमुचें बाळा । परिसुनि नृप, शिर; नमुनि बोलला ।
नामाचा या; अर्थ वदांना । निजसेवक दृढ; मजला माना ॥ ४ ॥

१ घर. २ जे असाल ते. ३ मोर.

दो.—आदि सृष्टि रचिली यदा, जन्म तदा मम जाण ।
नाम एक-तनु म्हणुनि मम; देह न धरिले आन ॥ १६२ ॥

आर्या— आदिम सृष्टी झाली; तेव्हां मम जन्म जाहला जाण ।
वास्तव एक तनू हें; नाम मला, प्राप्त देह नच आन ॥ १६२ ॥

करा न विस्मय; मनीं जराही । तप-दुर्लभ सुत; कांहीं नाहीं ।
तपोबलें जग; सृजी विधाता । तपोबळें विष्णू जग-त्राता ॥ १ ॥
तपोबळें शिव; करि संहारा । कांहिं न अगम; तपें संसारा ।
ऐके नृपती; अति अनुरागें । कथा पुरातन; तो वदुं लागे ॥ २ ॥
कर्म धर्म; इतिहास अनेकां । करी निरूपण; विरति[1] विवेका ।
उभ्दव पालन; प्रलय कहाणी । विस्मयकर; कितितरि वाखाणी ॥३॥
परिसुनि नृप; तापसवश झाला । नाम आपुलें; सांगे त्याला ।
म्हणे मुनी, तुज; नृपा जाणलें । कपट तुझें मज; गोड लागलें ॥ ४ ॥

सो.—ऐक नृपा अशि नीति; सर्वां न वदावें नांव ।
तुजवरि मम अति प्रीति; परम चतुरता बघुनि तव ॥ १६३ ॥

आर्या— ऐक नृपा अशि नीती; सर्वां सांगे न भूप नामातें ।
तव चातुर्यें तुजवरि; उपजे प्रीती बघूनि, या, मातें ॥ १६३ ॥

तुझें नाम; प्रतापदिनेश्वर[2] । सत्य केतु तव; पिता नरेश्वर ।
सर्व गुरु कृपें; जाणूं राजा! । वदूं न जाणुनि; आत्म-अकाजा ॥ १ ॥
बघुनि तात तव; सहज सरलता । प्रीति प्रतीति[3]; नीति निपुणता ।
मम मनिं तुजवरि; प्रीति उपजली । तव प्रश्नें मज; कथा वदविली ॥ २ ॥
प्रसन्न मी, तुज; संशय नाहीं । माग नृपा, मनिं; रुचेल कांहीं ।
भूपति हर्षित; परिसुनि वचनां । बहुविधि विनवी; धरुनि पदांनां ॥३॥
कृपासिंधु मुनि; दर्शनिं तूझे । पदार्थ चारी; करतळिं माझे ।
तथापि प्रभुला; प्रसन्न जाणुनि । त्यजूं शोक, वर; दुर्लभ मागुनि ॥४॥

दो.—जरामरणभय-रहित तनू; रणिं न जिंकिला जाउं ।
एकछत्र, रिपुहीन मही; राज्य कल्पशत पावुं ॥ १६४ ॥

आर्या— जरामरणरहिता तनु; कोणी मजला रणीं न जिंकावें ।
एकछत्र रिपुहीनहि; महिराज्या कल्पशतहि भोगावें ॥ १६४ ॥

॥ इति श्री बालकाण्डे प्रताप भानु चरित्रे पूर्वार्धं वर्णनं नामाष्टादशोऽध्यायः ॥

---

१ वैराग्य, २ भानु, ३ विश्वास.

अध्याय १९ वा.

म्हणे तपस्वी: ऐसें व्हावें । कारण एक; कठिण परिसावें ।
कालहि तव पदिं; नमील शीसा[1] । एक विप्रकुल: त्यजुनि महीशा ॥ १ ॥
तपयोगें; विप्रां बल भारी । कोण तयांचा; कोप निवारी ।
विप्रां वश जरि; करिशि नरेश । तरि तव वश विधि; विष्णु महेश ॥२॥
ब्रह्मकुळीं; सामर्थ्य न चाले । सत्य वदुनि दो; भुज उचलीले ।
विप्रशापाविण; ऐक नृपाला । तुझा नाश नच; कवणें काळा ॥ ३ ॥
परिसुनि वचन; नृपा परितोष । नाथ ! अतां मम; होइ न नाश ।
तुझ्या प्रसादें; कृपानिधाना । सर्वकाळ; पावूं कल्याणा ॥ ४ ॥

दो.—तथास्तु म्हणुनी कपटमुनी; कुटिल वदे; बहु तोष ।
वनिं भुलणें मम संगतिही; वदतां मजसि न दोष ॥ १६५ ॥

आर्या— तथास्तु म्हणुनी कपटी; कुटिल वदे दाखवूनि परितोष
वनिं भुलणें मम भेटी; जरि वदसी, मजसि नाहिं तरि दोष ॥ १६५ ॥

म्हणुनि तुला; वर्जितसें राजा । वार्ता वदतां; करिशि अकाजा ।
षट्कर्णीं; पडतांच कहाणी । नाश तुझा; सत्यचि मम वाणी ॥ १ ॥
हें प्रगटसि; अथवा व्दिजशापां । नाश होइ तव; भानु प्रतापा ।
अन्य उपायिं: निधन तव नाहीं । जरि हरिहर; कोपति मनिं पाहीं ॥२॥
सत्य नाथ ! पद; नमुनि नृप म्हणे । व्दिज; गुरु कोपीं; कोण रक्षणें ।
रक्षी गुरु जरि; कुपित विधाता । गुरु-विरोधिं जगिं; कुणी न त्राता ॥३॥
आम्हि मानुंना; जरि वच पाहीं । होउ नाश मग; चिंता नाहीं ।
एक मला भय; वाटे थोर । प्रभु ! महिदेव[2];-शाप अति घोर ॥४॥

दो.—होति विप्र वश कवण विधी; कृपा करुनि वद कांहिं ।
दीनबंधु तुजवाचुनीही; हितकर्ता मम नाहिं ॥ १६६ ॥

आर्या—. होति विप्र वश कैसे; कृपा करुनी मला वदा कांहीं ।
दीनबंधु, तुजवांचुनि; हितकर्ता साच मज दुजा नाहीं ॥ १६६ ॥

श्रुणु नृप विविध; यत्न जगिं पाहीं । कष्टसाध्य, तरि; फळति किं नाहीं ।
साधन एकचि; असे सुगमता । परंतु तेथें; एक कठिणता ॥ १ ॥

---

१ मस्तकाला २ ब्राह्मण

दो.—आदि सृष्टि रचिली यदा, जन्म तदा मम जाण ।
नाम एक-तनु म्हणुनि मम; देह न धरिले आन ॥ १६२ ॥

आर्या— आदिम सृष्टी झाली; तेव्हा मम जन्म जाहला जाण ।
वास्तव एक तनू हें, नाम मला, प्राप्त देह नच आन ॥ १६२ ॥

करा न विस्मय; मनीं जराही । तप-दुर्लभ सुत; कांहीं नाहीं ।
तपोबलें जग; सृजी विधाता । तपोबळें विष्णू जग-त्राता ॥ १ ॥
तपोबळें शिव; करि संहारा । कांहिं न अगम, तपें संसारा ।
ऐके नृपती, अति अनुरागें । कथा पुरातन, तो वदुं लागे ॥ २ ॥
कर्म धर्म; इतिहास अनेकां । करी निरूपण, विरति विवेका ।
उभ्दव पालन, प्रलय कहाणी । विस्मयकर कितितरि वाखाणी ॥३॥
परिसुनि नृप, तापसवश झाला । नाम आपुलें सांगे त्याला ।
म्हणे मुनी, तुज, नृपा जाणलें । कपट तुझें मज, गोड लागलें ॥ ४ ॥

सो.—ऐक नृपा अशि नीति, सर्वा न वदावे नांव ।
तुजवरि मम अति प्रीति, परम चतुरता बघुनि तव ॥ १६३ ॥

आर्या— ऐक नृपा अशि नीती, सर्वा सागे न भूप नामातें ।
तव चातुर्ये तुजवरि; उपजे प्रीती बघुनि, या, मातें ॥ १६३ ॥

तूझें नाम; प्रतापदिनेश्वर । सत्य केतु तव, पिता नरेश्वर ।
सर्व गुरु कृपें, जाणूं राजा । वदूं न जाणुनि, आत्म-अकाजा ॥ १ ॥
बघुनि तात तव, सहज सरलता । प्रीति प्रतीति, नीति निपुणता ।
मम मनिं तुजवरि, प्रीति उपजली । तव प्रश्नें मज कथा वदविली ॥ २ ॥
प्रसन्न मी, तुज, संशय नाही । माग नृपा, मनिं; रुचेल कांहीं ।
भूपति हर्षितः परिसुनि वचनां । बहुविधि विनवी; धरुनि पदांनां ॥३॥
कृपासिंधु मुनिः दर्शनिं तूझे । पदार्थ चारी, करतळिं माझे ।
तथापि प्रभुला; प्रसन्न जाणुनि । त्यजूं शोक, वरः दुर्लभ मागुनि ॥४॥

दो.—जरामरणभय-रहित तनूः रणि न जिंकिला जाउं ।
एकछत्र, रिपुहीन मही; राज्य कल्पशत पावुं ॥ १६४ ॥

आर्या— जरामरणरहिता तनु; कोणी मजला रणी न जिंकावें ।
एकछत्र रिपुहीनहि; महिराज्या कल्पशतहि भोगावें ॥ १६४ ॥

॥ इति श्री बालकाण्डे प्रताप भानु चरित्रे पूर्वार्ध वर्णनं
नामाष्ठादशोऽध्यायः ॥

---

१ वैराग्य, २ भानु, ३ विश्वास.

अध्याय १९ वा.

म्हणे तपस्वीः ऐसें व्हावें । कारण एक; कठिण परिसावें ।
कालहि तव पदिं; नमील शीसा[1] । एक विप्रकुलः त्यजुनि महीशा ॥ १ ॥
तपयोगें: विप्रां बल भारी । कोण तयांचा; कोप निवारी ।
विप्रां वश जरि; करिशि नरेश । तरि तव वश विधि; विष्णु महेश ॥२॥
ब्रह्मकुळीं; सामर्थ्य न चाले । सत्य वदुनि दोः भुज उचलीले ।
विप्रशापाविण; एक नृपाला । तुझा नाश नच; कवणें काळा ॥ ३ ॥
परिसुनि वचन; नृपा परितोप । नाथ ! अतां ममः होइ न नाश ।
तुझ्या प्रसादें; कृपानिधाना । सर्वकाळः पावूं कल्याणा ॥ ४ ॥

दो.—तथास्तु म्हणुनी कपटमुनीः कुटिल वदेः बहु तोष ।
वनिं भुलणें मम संगतिही; वदतां मजसि न दोष ॥ १६५ ॥

आर्या— तथास्तु म्हणुनी कपटी; कुटिल वदे दाखवूनि परितोप
वनि भुलणें मम भेटी; जरि वदसी, मजसि नाहि तरि दोष ॥ १६५ ॥

म्हणुनि तुला; वर्जितसें राजा । वार्ता वदतां; करिशि अकाजा ।
षट्कर्णी; पडतांच कहाणी । नाश तुझा; सत्यचि मम वाणी ॥ १ ॥
हें प्रगटसि; अथवा द्विजशापां । नाश होइ तव; भानु प्रतापा ।
अन्य उपायिं: निधन तव नाहीं । जरि हरिहरः कोपति मनिं पाहीं ॥२॥
सत्य नाथ ! पदः नमुनि नृप म्हणे । द्विज; गुरु कोपीं; कोण रक्षणें ।
रक्षी गुरु जरि; कुपित विधाता । गुरु-विरोधिं जगिं; कुणी न त्राता ॥३॥
आम्हि मानुंना; जरि वच पाहीं । होउ नाश मग; चिंता नाहीं ।
एक मला भय, वाटे थोर । प्रभु ! महिदेव[2];-शाप अति घोर ॥४॥

दो.—होति विप्र वश कवण विधीः कृपा करुनि वद कांहिं ।
दीनबंधु तुजवाचुनीहीः हितकर्ता मम नाहिं ॥ १६६ ॥

आर्या—. होति विप्र वश कैसे; कृपा करूनी मला वदा कांही ।
दीनबंधु, तुजवांचुनि; हितकर्ता साच मज दुजा नाहीं ॥ १६६ ॥

श्रुणु नृप बिविध; यत्न जगिं पाहीं । कष्टसाध्य, तरि; फळति किं नाहीं ।
साधन एकचि; असे सुगमता । परंतु तेथें; एक कठिणता ॥ १ ॥

---

१ मस्तकाला २ ब्राह्मण

आर्या.— पुरोहिता राजाचे; मग तो आणी क्षणांत उचलूनी ।
गिरिगव्हारांत ठेवी; मायेनें त्या मतीस भुलवूनी ॥ १७१ ॥

आपण घेइ; पुरोहितरूपा । शेजे त्याचे; निजे सुरूपा ।
प्रतापरवि अति, शीघ्र जागला । निजगृह पाहुनि; अति विस्मयला ॥१॥
मुनि-महिमा मग; मनिं अनुमानी । उठुनि जाइ; नत्र जाणे राणी ।
त्याचि हयावरि; वनांत गेला । पुर नर नारिन; कोणि देखिला ॥ २ ॥
होतां दोन; प्रहर ये नृपती । उत्सव-वाद्यें; नगरिं वाजती ।
पुरोहितामग; बघुनी राजा । चकित विलोकि; स्मरुनि निज काजा ॥३
नृपा तीन दिन; युग सम गमती । कपटि मुनिपदीं; लीन तन्मती ।
जाणुनि समय; पुरोहित आला । कृतसंकेत; नृपासी वदला ॥ ४ ॥

दो.—नृप हर्षे जाणुनी गुरु; भ्रमवश राहिन चेत[२] ।
वरीं त्वरें दश अयुत, वर; विप्र कुटुंब समेत ॥ १७२ ॥

आर्या.— गुरु ओळखूनि हर्षे, नृपती भ्रमवश करीन सुविचार ।
बोलावी वर विप्रां दश अयुता तो समेत परिवार ॥ १७२ ॥

पुरोहितें त्या; पाक बनविला । चारपरी षड्रस; श्रुति कथिला ।
मायामय तो, करीन पाका । अगणित होती; व्यंजन शाका ॥ १ ॥
विविध मृगांचें; आमिष[३] शिजलें । द्विज मांसातें; खळें मिसळलें ।
भोजनासि सब; सुविप्र आले । क्षाळुनि[४] पद; सादर बसवीले ॥ २ ॥
तो महिपाल; वाढतो जेव्हां । नभवाणी आशि; झाली तेव्हां ।
विप्रवृंद, घरिं; उठुनी जावें । महा हानि हें; अन्न न खावें ॥ ३ ॥
केलें पाका; भूसुरमांसा । द्विज उठले मानुनि बिश्वासा ।
भूप विकलमति; मूढ भ्रमानीं । भावी वश मुखिं; येइ न वाणी ॥ ४ ॥

दो.—बोलति विप्र सकोप तंव; करिती ना सुविचार ।
निशिचर होशिल भूपते मूढ, सहित परिवार ॥ १७३ ॥

आर्या.— ब्राह्मण वदती कोपें.; सुज्ञ तरी; तिळ न करिति सुविचारा ।
होसि निशाचर मूढा; नृपते ! तूं शीघ्र सहित परिवारा ॥ १७३ ॥

क्षत्रबंधु; अणुनी विप्रांसीं । भ्रष्ट करूं; बघसी सर्वांसीं ।
ईश्वर राखी; निजधर्मा; रे । नष्ट होसि तूं; सह परिवारें ॥ १ ॥

---

१ चकित झाला, २ विचार, ३ मास, ४ धऊन,

वर्षांआंतः नाश तव व्हावा। जल दाता कुळीं; कुणि न रहावा।
भीतिविकल नृप; शाप परिसुनी। पुनरपी झाली; अकाश-वाणी ॥ २ ॥
विप्र! शाप; कुविचारें दिधला। कांहीं दोष न; नृपासि घडला।
चकित विप्र; ऐकुनि नभ वाणी। नृप गेला मग; भोजन-खोणीं ॥ ३ ॥
तिथें पाक नच; विप्र दिसे कीं। चिन्ता व्याकुळ; फिरला नृप कीं।
सकल कथा; विप्रांतें वदला। भयें विकळ; भूमीवरि पडला ॥ ४ ॥

दो.— भूपति भावी टळे नच; यद्यपि तूं निष्पाप।
तया अन्यथा कोण करी घोर अती द्विज शाप ॥ १७४ ॥ *

आर्या.— भूपति भावि टळेना यद्यपि तूं सत्य असाशि निष्पाप।
कवण अन्यथा करि तो; सुघोर ऐसा द्विजा तिचा शाप ॥ १७४ ॥

विप्रवृंद हें; वदुनि निघाला। समाचार पुर—जनां मिळाला।
दुःखित दोष; देति दैवातें। रचितां हंस; करी काकातें ॥ १ ॥
गृहा पोचवी; पुरोहितासी। असुर; तापसा; दे खबरीसी।
तो खल सर्वां; पत्र पाठवी। समेत सेना; नृपां आणवी ॥ २ ॥
डंका घोषें; नगर वेढिलें। नित्य विविध रण; कंदन झालें।
भट झुंझार; दाविती करणी। बंधु सहित नृप; पडला धरणीं ॥ ३ ॥
सत्ये केतु कुळि; कुणि न वाचला। विप्रशाप कधिं; असत्य ठरला।
विजयी नृप; तें नगर वसवुनी। निजपुर गेले; सुयश पावुनी ॥ ४ ॥

दो.— भरद्वाज श्रृणु ज्यांसि जइं; होइ विधाता वाम।
रज मेरूसम, जनक यम; त्यासि व्यालसम दाम ॥ १७५ ॥

आर्या.— ऐक भरद्वाज मुने; यदा विधाता वळे जवा वाम।
रज मेरुसम; जनकहि; यम होतो; त्यासि भुजग सम दाम ॥ १७५ ॥

यथासमय मुनि; श्रृणु तो राजा। होइ निशाचर; सहित समाजा।
दश शिर तया; विसि भुजदण्ड। रावण नाम; सुवीर प्रचण्ड ॥ १ ॥
भूपानुज अरि; मर्दन नाम। कुंभकर्ण; होई; बलधाम।
सचिव धर्म रुचि; होता साचा। बंधु सपत्न; होइ लघु त्याचा ॥ २ ॥
नाम बिभीषण; विदित जनांनां। विष्णुभक्त जो; निधि विज्ञाना।
सुत सेवक जे; नृपासि असती। घोर निशाचर; सर्वहि वसति ॥ ३ ॥

१ पाकशाळेत, २ माळ,

कामरूप खल; जाति अनेका । कुटिल भयंकर; रहित विवेका ।
कृपारहित; अति; हिंसक पापी । वदवेना चि; विश्व परितापी ॥ ४ ॥

दो.—उपजति यद्यपि पुलस्त्यकुळीं; पावन अमल अनूप ।
तदपि महीसुर शापवश; होति सकळ अघरूप ॥ १७६ ॥

आर्या.— त्या पुलस्त्य कुळिं जन्मनि; पावन अनुपम अतीव निष्पाप ।
भूसुर शापास्तव ते; सकलहि होताति कीं महापाप ॥ १७६ ॥

इति श्री बालकाण्डे प्रतापभानुवाख्याने ब्रह्म शापादि वर्णनं नामकोन विंशोऽध्यायः ॥

अध्याय २० वा

करिति विविध तप; तीनहि भाई । परम उग्र नच, कथिलें जाई ।
जाइ निकट; तप; बघुनि विधाता । प्रसन्न मी, वर; मागे ताता ॥ १ ॥
दशमुख पद धरि करि विनती तें । श्रुणु जगदीशा, मम वचनातें ।
मी नामरें, मारितांहि कोणी । जातिद्वय नर; कपि वांचोनी ॥ २ ॥
तथास्तु घोर; तपा त्वां केलें । म्यां, विधिनें तुज, वरासि दिधलें ।
घटकर्णाप्रति; मग विधि गेले । तया बघुनि मन; विस्मित झालें ॥३॥
जरी करी खल; नित्य अहारा । होइल नाश; सकल संसारा ।
प्रेरि शारदा; फिरवि मतीतें । सहामास; मागे निद्रेतें ॥ ४ ॥

दो.—बिभीषणासी जाइमग; म्हणे तात वर माग ।
तो मागे भगवन्त पदीं; विमल अचल अनुराग ॥ १७७ ॥

आर्या— सन्निध बिभीषणाचे; जाउनि वदला मुला वरा माग ।
तो मागे रघुपतिचे; पद कमलीं; विमल अचल अनुराग ॥ १७७ ॥

त्यां देउनि वर; ब्रह्मा गेले । हर्षित ते निज; गृहासि आले ।
मय-तनया, मंदोदरि नामा । परम सुंदरी; नारि-ललामा ॥ १ ॥

---

१ अनुपम, २ पापमय, ३ कुंभकर्ण,

रावणासि भय; वैर आणुनी । होउन यातुधानें-पति, आपुली ।
मिळतां सुंदर; नारि हर्पला । बंधूंचा मग; विवाह केला ॥ २ ॥
त्रिकूट गिरिवरि; महासागरीं । विधि-निर्मित अति; सुदुर्ग भारी ।
तया मयानें; पुन्हां सजविलें । कनकरचित; मणि;-भुवन बनविलें ॥ ३ ॥
भोगावति जशि; अहिकुलवास । अमरावति जशि; शक्र-निवास ।
त्याहुनि रम्य; अधिक अति बंकी । जग-विख्यात; नाम ती लंका ॥ ४ ॥

दो.—खंदक सिंधु गंभीर अती; चौदिशि वेढी ज्यास ।
कनककोट मणिखचित दृढ; वर्णुं न शकती, त्यास ॥१७८॥(क)

दो.—हरि प्रेरित ज्या कल्पि जो; यातुधान पति होत ।
शूर, प्रतापी, अतुलबल; वसतो सैन्य समेत ॥ १७८ ॥ (ख)

आर्या— गंभीर सिंधु खंदक; चारि दिशांनीं तयासि वेढितसे ।
कनककोट, मणिखचित चि; अति दृढ वर्णी तया कवीहि कसें ॥१७८॥ (क)

आर्या— ज्या कल्पीं प्रेरित हरि; जो कोणी यातुधान पति होतो ।
प्रतापि अतिबल शूरहि; निजबल समवेत तो तिथें वसतो ॥ १७८ ॥ (ख)

तिथें निशाचर; भट बहु होते । सर्वां सुर; करिती नाशातें ।
मग तेथें; शक्राज्ञें गेले । यक्षपती-रक्षक; बहु वसले ॥ १ ॥
रावणासि ही; खबर मिळाली । निजेदळें-सह; तो वेढा घाली ।
बघुनि विकट भट; सेन्य महती । यक्षहि जीवा; घेउनि पळती ॥ २ ॥
सर्व नगर; रावणें पाहिलें । चिंता जाउनि; सुख बहु झालें ।
सुंदर सहज; अगम अनुमानें । राजधानि ती; केलि रावणें ॥ ३ ॥
उचित निवासां; ज्यां त्यां दिधले । सुखी सकळ; रजनीचर केले ।
धनदावरि; एकदां धावला । पुष्पकयाना; घेउनि आला ॥ ४ ॥

दो.—लीलेनें कैलास मग; सहज उचलुनी घेइ ।
जणुं तोलुनि निज बाहु बल; सुखी अधिक तो होइ ॥ १७९ ॥

आर्या.— लीलेनें कैलासा; रावण मग सहज जाउनी उचली ।
निजभुजबल तोलुनि जणुं; सौख्यप्राप्ती तयासि बहु झाली ॥ १७९ ॥

सुख संपत् सुत; सैन्यहि सत्ता । प्रताप जयबल; बुद्धि महत्ता ।

---

१ मयासुर, २ निशाचरपती, ३ दुर्भेद्य, ४ खोल, ५ इंद्राच्या आज्ञेनें, ६ कुबेर, ७ सैन्य, ८ कुबेरावर, ९ पुष्पक विमान,

नित्य नवीं हीं, वाढत जातीं । प्रति-लाभें कीं; लोभ वाढती ॥ १ ॥
कुंभकर्णसम; अतिबल भ्राता । जगीं न प्रतिभट; ज्या पहातां ।
करुनि पान; निजतो षण्मास । आगतांचि; त्रैलोक्यां त्रास ॥ २ ॥
प्रतिदिन जरि तो; अहार घेता । विश्वा वेगीं सपाट करिता ।
समरधीर नच; वर्णु शकें त्या । तत्सम अमित; बली भट होता ॥ ३ ॥
वारिदनाद[2]; ज्येष्ठ सुत त्याचा । वीरोत्तम तो; जगांत साचा ।
ज्या कोणी, रण-सन्मुख नव्हती । ज्या बघतांचि; देवही पळती ॥ ४ ॥

दो.—कुमुख, अकंपन, कुलिश-रद धूमकेतु अतिकाय ।
एकैकहि जग जिंकुं शके; ऐसे सुभट-निकाय ॥ १८० ॥

आर्या.— कुलिशरदीहि अकंपन; कुमुख तसे धूमकेतु अतिकाय ।
एकैक जगा जिंकूं; शकेल ऐसे बहू भट-निकाय ॥ १८० ॥

कामरूप; जाणति ते माया । स्वप्निंहि नाहीं; धर्म वा दया ।
दशमुख सभे; एकदां बसला । अमित बघे; परिवार आपुला ॥ १ ॥
सुतसमूह जन; परिजन दिसती । पार कोण गणि; निशिचर जाती ।
सैन्या बघुनि; सहज अभिमानी । बोले वचन; क्रोध-मद-मानी ॥ २ ॥
ऐका सकल; निशाचर यूथें[3] । अमुचे वैरी; विबुध-वरूथें[3] ।
ते सन्मुख नच; युद्धा वळती । सबळ रिपूतें; पाहुनि पळती ॥ ३ ॥
त्यांच्या मरणा; एक उपाय । तुम्हां सांगतो; ऐका सोय ।
द्विजभोजन मख,-होमां-श्राद्धां । करा जाउनी; सर्वां बाधा ॥ ४ ॥

दो.—क्षुधाक्षीण, बलहीन सुर; सहज शरण मग येति ।
तैं मारूं कीं सोडुं तरी; स्वाधीन चि जरि होति ॥ १८१ ॥

आर्या.— क्षुधाक्षीण बलहीन हि; सुर सगळे सहज येति मग शरण ।
तेव्हां मारूं अथवा; सोडूं त्या करुनियां निजाधीन ॥ १८१ ॥

शक्रजितासी[4]: मग बोलावी । दे शिक्षा[5], बल; वैर वाढवी ।
समरधीर जे; सुरबलवान । लढण्याचा ज्यानां अभिमान ॥ १ ॥
रणिं जिंकुनि त्यां; आण बांधुनी । आ ताताज्ञा; वन्द्य मानुनी ।
यापरि सर्वां; आज्ञा दिधली । आपण निघे; गदा करिं धरली ॥ २ ॥

१ दारू पिऊन, २ मेघनाद, ३ समुदाय, ४ इंद्रजिताला, ५ उपदेश.

रावण चाले; डोले अवनी । गर्जत गर्भ; स्रवति सुररमणी ।
सकोप रावण; येतां परिसुनि । देव लपति गिरि; मेरू जाउनि ॥ ३ ॥
दिक्पालांचे; लोक रम्य ते । शून्य दिसति मग; दशाननातें ।
सिंहनाद करि: बहुधा भारी । गाळि देइ; देवां पाचारी ॥ ४ ॥
रणमदमत्त; फिरे जगिं धावे । शोधी प्रतिभट; कुठें न पावे ।
रवि, शशि, पवन वरुण धनधारी । अग्नि, काळ, यम: सब अधिकारी ॥५॥
किन्नर सिद्ध; मनुज नागांला । सर्वांपाठीं, बळें लागला ।
ब्रह्मसृष्टि; जितुकी तनुधारी । दशमुख, वश;-वर्ती नरनारी ॥ ६ ॥
शासन सर्वंहि; सभय मानिती । नित्य नेम; चरणातें नमिती ॥७॥

दो.—भुजबलवश विश्वा करुनी; ठेवि न कोणि स्वतंत्र ।
माण्डलीकमणि दशानन; राज्यकरी निज-मन्त्र ॥ १८२ (क)

,, देव यक्ष गंधर्व नर; किन्नर नाग कुमारि ।
जिंकि, वरी निजबाहुबलें,-बहु सुंदर वर नारि ॥ १८२ (ख)

आर्या— भुजबळवश विश्वातें, करुनी कोणा स्वतंत्र ना ठेवी ।
माण्डलीकमणि रावण; निजमन्त्रे राज्यवैभवा सेवी ॥ १८२ (क)

आर्या.— गन्धर्व, यक्ष, किन्नर; सुरनर नागादि, बहुत सुकुमारी ।
बाहुबळें जिंकुनियां; वरिल्या सुंदर कितीक वरनारी ॥ १८२ (ख)

इन्द्रजितासी; जें जें कथिलें । तें जाणुं त्यानें, पूर्विंच केलें ।
पूर्वीं ज्यातें; आज्ञा दिधली । कृती तयांनीं; कैसी केली ॥ १ ॥
दिसती भीम,-रूप सब पापी । निशिचर-निकर: देव-परितापी ।
असुर-निकाय; उपद्रव करिती । कपटवेष मायेनें धरिती ॥ २ ॥
जेणें होय; धर्म निर्मूल । करिती सर्व; वेद-प्रतिकूल ।
जिथें जिथें द्विज; धेनु पावती । नगर गांव पुर, अग्नि लाविती ॥ ३ ॥
शुभ आचरण; करीना कोणी । देव विप्र गुरु; कोणि न मानी ।
नच हरिभक्ति: यज्ञ, तप ज्ञान । स्वप्निं न कानीं; वेद पुराण ॥ ४ ॥

छंद:—जपयोगविरक्ती; तपमखभक्ती; श्रवणिं पडे दशशीशा ।
आपण मम जाई; राहुं न देई; सर्व करीत विनाशा ॥

१ पृथ्वी, २ देवस्त्रिया, ३ कुबेर, ४ समुदाय.

आचार भ्रष्टला या जगताला; धर्म न येतो कानां ।
त्यां बहुविधि त्रासवि; देश निकासवि वदती वेद पुराणां ॥१॥

सो.—वदति न जाइ अनीति; घोर निशाचर जी करिती ।
हिंसेवरि अति प्रीति; त्यां पापांतें कवण मिति; ॥ १८३ ॥

आर्या.— वदवि न जाय अनीती; घोर निशाचर, सदैव करिती ती ।
प्रीती हिंसेवरी अति; पापां त्यांच्या तशी नसेचि मिती ॥ १८३ ॥

इतिश्री बालकाण्डे रावण तपस्यादि धर्मनिर्मूलन वर्जनं नाम विंशोऽध्यायः

मास पारायणे षष्ठो विश्रामः

अध्याय २१ वा.

झाले खल बहु; चोर जुगारी । लंपट जे; परधन परदारी ।
मानिति जननि; जनक ना देवां । साधूं पासुनि, करविति सेवा ॥ १ ॥
ज्यांचें हें; आचरण भवानी । जाण सर्व ते, निशिचर प्राणी ।
ग्लानी अति; बघुनी धर्माला । धरा[2] सभय; धरि व्याकुळतेला ॥ २ ॥
गिरि, सर[3], सिंधु; भार ना मजला । परद्रोह्याचा; जितुका झाला ।
सकल धर्म; विपरीतचि दिसती । रावणभयें; वदूं न शकेती ॥ ३ ॥
सुविचारें धरि: गोरूपातें । जाइ जिथें सुर;-मुनि-वर होते ।
रडुनी निज; दुःखासि वदे ती । कोणी कांहीं; करूं न शकती ॥ ४ ॥

छंद. सुरमुनि गंधर्वहि; मिळुनी सर्वहि; जाती विधिचे लोकां ।
सह गो-तनु-धारी; भूमि बिचारी; परमविकल भय-शोकां ॥
ब्रह्मा सब जाणे; मनिं अनुमानें; मम आधीन न कांहीं ।
ज्याची तूं दासी; तो अविनाशी; तुझा सहाय, मलाही ॥१॥

दो.—स्मरुनि हरिपदां; विधि वदे; धरणि धरी तूं धीर ।
हरि[4] हरि दारुण आपदे; सकल विदित रघुवीर ॥१८४॥

---

१ देश पारखरी, २ पृथ्वी, ३ तलाव, ४ हरण करील,

आर्या— विधि मग वदला धरणी; स्मरुनी हरिपद धरी तरी धीर।
दारुण-विपत्ति-नाशा; करी प्रभु, सर्व-विदित रघुवीर॥१८४॥

सुर सब बसुनी; विचार करती। दिसे कुठें प्रभु; करण्या विनती।
वैकुण्ठा कुणि; जावें म्हणती। कोणि वदे पय;- निधिं प्रभु वसती॥१॥
ज्याचे हृदयिं; भक्ति आशि प्रीती। सदा प्रगट प्रभु; तैशा रीतीं।
गिरिजे! होतो; सभेंत बसलो। अवसर जाणुनि; गोष्टी वदलो॥२॥
हरि व्यापक जगिं; पूर्ण पसारें। प्रेमें प्रगट; होय मी जाणें।
देश, काल, दश; -दिशांस पाही। सांगा तरि, प्रभु; कोठें नाहीं॥३॥
अगजगमय, सब;-रहित विरागी। प्रेमें प्रगटे; मथनें आगी।
माझें वचन; तयांसीं पटलें। साधु! साधु! मग; ब्रह्मा वदले॥४॥

दो.—परिसुनि वच मनिं हर्ष, तनू; पुलकित, नयनीं नीर।
स्तुती करी जोडुनी कर; सावधान मति धीर॥१८५॥

आर्या— वच परिसुनि मन हर्षित; पुलकित तनु, नयनिं वाहतें नीर।
कर जोडुनी विधी मग; करी स्तुती सावधान मति धीर॥१८५॥

छंद. जयजय सुरनायक; जनसुखदायक प्रणतपाल भगवन्ता।
गो-द्विज हितकारी; जय असुरारी; सिंधुसुता प्रियकान्ता॥
पालक सुरधरणी; अद्‌भुत करणी; मर्म जाणत नाहीं।
हे सहज कृपाला; दीन दयाला; करा अनुग्रह कांहीं॥१॥
जयजय अविनाशी; सब घटवासी; व्यापक परमानन्दा।
अविगत गोतीता; चरित-पुनीता; मायारहित मुकुंदा॥
ज्या लागि विरागी; अति अनुरागी; विगतमोह मुनिवृन्द।
निशिवासर ध्याती; गुणगण गाती; जयति सच्चिदानंद॥२॥
जो सृष्टि उपजवी; त्रिविधा बनवी; कोणि सहाय न दूजा।
तो करो अघारी; दया मुरारी; जाणूं भक्ति न पूजा॥

१ क्षीरसागर, २ स्थावर जंगम, ३ पाणी, ४ लक्ष्मी, ५ सर्वगत, ६ इंद्रियातीत, ७ पापाचा शत्रु.

जो भवभयभंजन; मुनिमनरंजन; गंजन[1] विपत्ति-यूथां ।
मन वचादि बाणा; सांडुनि ज्ञाना; शरण सकल सुर; नाथा ! ॥३॥
वाणी-श्रुति-शेषां; अखिल मुनीशां; होइ न ज्याचें ज्ञान ।
करि दीनां प्रीती; वेदहि वदती; द्रवो तोचि भगवान ॥
भववारिधि-मंदर; बहुविधिसुंदर, गुणमंदिर; सुख-पुंजा ।
मुनि-सिद्ध-सकलसुर; परमभयातुर; नमिति नाथ ! पदकंजा ॥४॥

दो —बघुनि सभय-सुर, धरा,-वच, परिसुनि संयुत स्नेह ।
गगनि गिरा गंभीर उठे, हरणि शोक संदेह ॥१८६॥

आर्या— सभय बघुनि सुर धरणी; परिसुनियां वचन संयुत स्नेह ।
गगन गिरा गंभीरा; झाली जी, हरणे शोक सदेह ॥१८६॥

भिऊं नका मुनि; सिद्ध सुरेशां । तुम्हां लागिं; धरितो नरवेषा॥
अंशा सहित, मनुज अवतारा । धरीन दिनकर;-वंशि उदारा ॥१॥
कश्यप अदितिं; महातप केलें । पूर्वी मी त्यां; वरासि दिधलें ।
ते कौसल्या, दशरथ रूप । कोसल पुरीं; प्रगट नरभूप ॥२॥
जाउनि त्यांचे, गृहिं अवतरतो । रघुकुलमणि; चौ बंधू बनतों ।
नारद-वचना; सत्यचि करणें । परमशक्ति-संयुत अवतरणें ॥३॥
हरीन सर्वहि; भू-भारातें । स्वस्थ असा सुर; त्यजुनि भयातें ।
ऐकुनि नभ-वाणी कानानें । त्वरित फिरति सुर; अति हर्षानें ॥४॥
ब्रह्मा, धीर, धरणिला देई । निर्भय होइ; भरोसा येई ॥५॥

दो —गेले निजलोकास विधी, सांगुनि हें देवांस ।
धरा कपितनू महीवरी; सेवा हरिपायांस ॥१८७॥

आर्या— विधि निजलोका गेले; यापरि आज्ञा करूनि देवांसीं ।
सेवा प्रभुपद-पद्मा; वानर देहा धरूनि भू-वासीं ॥१८७॥

॥ इति श्री बालकाण्डे भूम्यादीनां प्रार्थनादि भगवद्वर-प्राप्ति-वर्णनं नामैकविंशोऽध्यायः ॥

---

[1] विपत्ति-संघाचा नाश करणारा.

अध्याय २२ वा.

गेले सकल; लोक निजधामा। धरेसहित; पावुनि विश्रामा।
जैसे कांहीं; विधिनें कथिलें। विना विलंबें; विबुधीं केलें ॥१॥
वनचर-देह; धरणिवरि धरिती। प्रताप बलही; अतुल तयांप्रति।
गिरि-तरु-नख,- आयुध-धर वीर। हरि अवतार; चिंतिती धीर ॥२॥
गिरि-काननिं; सर्वहि भरपूर। अनीक निज निज; रचिती वीर।
सर्व चरित हें; रुचिर गाइलें। ऐका जें; मध्येंचि राहिलें ॥३॥
कोसलपुरिं; रघुकुलमणि राव। वेद विदित त्या; दशरथ नांव।
धर्मधुरंधर; गुणधी ज्ञानी। हृदयिं भक्ति; मनिं; शारंङ्गपाणी ॥४॥

दो.—कौसल्यादी नारि प्रिय, अति आचरण पुनीत।
पति अनुकूल; प्रेम दृढ, हरि-पद-कमलिं; विनीत ॥१८८॥

आर्या — कौसल्यादिक नारी; सर्व सदाही; सुशील सुपुनीत।
पति अनुकूला; प्रीती; हरिपदकमलीं प्रगाढ; सुविनीत ॥१८८॥

एकवार; भूपाल-मनाही। शोक होइ; मजला सुत नाहीं।
गुरु गृहिं जाइ; त्वरित भूपाल। चरण धरुनि करि, विनति विशाल ॥१॥
निजसुख दुख सब, गुरुसि ऐकवी। वसिष्ठ बहुपरि; त्या समजावी।
धीर धरी; होतिल सुत चारी। त्रिभुवन विदित; भक्तभयहारी ॥२॥
वसिष्ठ, शृंगी; ऋषी आणवी। पुत्रकाम, शुभ; यज्ञ करवी।
भक्ति सहित मुनि, आहुति देतो। अग्नि प्रगट चरु; घेउनि होतो ॥३॥
वसिष्ठ मुनिनें; मनीं चिंतिलें। सकल कार्य तव; सिद्ध जाहलें।
देइ नृपा हें; हवी वांटुनी। यथायोग्य ते; भाग बनवुनी ॥४॥

दो.—पावक अदृश्य होइ मग; समजावुनि सभ्यांस।
परमानन्दीं मग्न नृप; मन न पुरे हर्षास ॥ १८९ ॥

आर्या.— अग्नी अदृश्य झाला; सभ्यां समजावुनी हि सकलांसीं।
परमानदिं बुडे नृप; हृदय तयाचे पुरे न हर्षासी ॥ १८९ ॥

बोलावी नृप; प्रिय नारींला। कौसल्यादी; आल्या सकला।
अर्धभाग; कौसल्यें दिधला। द्विधा पुन्हां मग; अर्ध जाहला ॥१॥

१ देवांनी, २ कपि, वानर, भालु वगैरे, ३ सैन्य, ४ गुणसागर.

कैकेयीतें; एक अर्पिला। उरला मग तो; द्विधा खण्डिला।
कौसल्या; कैकयिच्या हातीं। सुमित्रेसि ते; प्रसन्न देती॥ २॥
यापरि गर्भ;—सहित त्या नारी। हर्षित हृदयीं; सुख अति भारी।
जैं पासुनि हरि; गर्भी आले। सुख-संपत्ति;-पूर्ण जन झाले॥ ३॥
विराजती; मंदिरिं त्या राणी। तेज शील; शोभेच्या खाणी।
सुखयुत किंचित्; काल लोटला। हरि प्रगटाया; समय पातला॥ ४॥

दो०—योग, लग्न, ग्रह, वार तिथी; सकल होति अनुकूल।
सकल चराचर हर्षयुत; रामजन्म सुखमूल॥ १९०॥

आर्या— ग्रह लग्न योग वारहि; तिथ्यादिक सकल येति अनुकूल।
सकल चराचर हर्षे; युत झाले; रामजन्म सुखमूल॥ १९०॥

नौमी तिथि, मधुमास पुनीत। शुक्लपक्ष अभिजित हरि-प्रीत।
मध्य दिवस अति; शीत न उष्मा। पावन काल; लोक विश्रामा॥ १॥
शीतल मंद; सुरभि वहु वायु। हर्षित सुर; संतां उत्साहु।
वन कुसुमित; गिरिंमणी भ्राजती। सरिता सकल; सुधाजल स्रवती॥२॥
तो अवसर जैं; विरंचि जाणे। जाति सकल सुर; सजुनि विमानें।
विमल गगन; संकुल सुरयूथें। गाती गुण; गन्धर्व वरूथें॥ ३॥
वर्षति सुमन; सुअंजली सजुनी। दुंदुभि दुम्; दुम वाजति गगनीं।
देव नाग मुनि करिति स्तवातें। नानाविध; अर्पिति सेवा ते॥ ४॥

दो०—सकल देव करुनी स्तवन; जाती निज निज धाम।
जग निवास प्रभु प्रगटले; अखिल लोक विश्राम॥ १९१॥

आर्या— नम्र विनतितें करुनी, निज निज धामासि सकल सुर जाती।
जगन्निवास हरी तो; प्रगटे जो सकल-लोक विश्रान्ती॥ १९१॥

छंदः— तो प्रगट कृपाळू; दीनदयाळू; कौसल्या हितकारी।
हर्षित नृपनारी, मुनिमनहारी; अद्भुत रूप विचारी॥
लोचन अभिरामा; तनु घनशामा; निज आयुध भुज चारी।
भूषण वनमाला; नयन विशाला; शोभासिंधु खरारी॥ १॥

१ हातांनीं, २ चैत्र महिना, ३ भगवंताला प्रिय, ४ पर्वतांवर, ५ अमृतासारखें, ६ राणी कौसल्या, ७ विचार करूं लागली.

मग युगकर जोडी; स्तुती हि थांडी; कैशी करूं अनन्ता ।
माया—गुणज्ञाना;—तीत अमाना; वेद-पुराण—वदन्ता ॥
करुणासुखसागर; सबगुण आगर; ज्या गाती श्रुति संत ।
तो मम हित-लागी; जन अनुरागी; होइ प्रगट श्रीकान्त॥२॥
ब्रह्मण्ड-निकायां; निर्मितमाया; रोम रोमिं ज्या वेद म्हणे ।
तो मम उरवासी; या उपहासीं, श्रवुनि धीरमति स्थिर नसणें ॥
जे ज्ञान उपजलें, प्रभू विहसले, चरित विविध करणेचि तरी ।
मग कथा सांगुनी; बुझावि जननी; सुत-प्रेमा ज्यापरी धरी ॥३॥
माता मग बोले; ती मति डोले; त्यजीं तात या रूपा ।
करिजे शिशुलीला; अति प्रियशीला; ते सुख येइन मापा ॥
परिसुनि वचनाला; रडूं लागला; हरि घेउनि शिशुरूपा ।
या चरिता गातीं; हरिपदिं जातीं; ते न पडति भवकूपा ॥४॥

दो —विप्र-धेनु-सुर-संत-हित; धरी मनुज अवतार ।
निजइच्छा निर्मिततनु ही; माया-गुण-गो-पार ॥ १९२॥

आर्या— विप्र-धेनु-सुर-संता; साठीं धरितो मनुष्य अवतार ।
निज-इच्छा-निर्मित-तनु; माया-गुण—इन्द्रियासि जो पार ॥ १९१ ॥

श्रवुनि परम प्रिय; शिशुरुदनाला । राणीवसा; उतावीळ आला ।
हर्षे चौंदिशिं; धावति दासी । आनन्दती; सकल पुरवासी ॥ १ ॥
दशरथ ऐकुनि पुत्र जन्मला । ब्रह्मानन्द;—मग्न, जणुं झाला ।
परम प्रेम मनिं; पुलक तनूला । करुनि धीर, मति, उठूं लागला॥१॥
ज्याचें नाम;-श्रवणें शुभ होई । तोचि हरी गृहिं; माझे येई ।
परमानन्द,-पूर्ण-मन राजा । सांगे विविध; वाजवा बाजां ॥३॥
बोलावी मग; वसिष्ठ गुरुला । द्विजां सहित येः भूप गृहाला ।
अनुपम बालक; जाउनि पाही । रुपराशि; गुण-सीमा नाहीं ॥ ४ ॥

दो.—नान्दी श्राद्ध करुनि मग; । जातकर्म संपादि ।
नृप विप्रांतें देइ बहु; हाटक[१]-गो-वसनादि[२] ॥ १९२ ॥

आर्या— नान्दीश्राद्ध करुनियां; यथाविधी जातकर्म संपादी ।
नृप विप्रांतें देई; बहुदानें, धेनु हेम वसनादी ॥ १९३ ॥

---

१ सुवर्ण, २ वस्त्रें वगैरे.

ध्वज, पताक: तोरणिं पुर भरलें । कोण वर्णि तें; किती सजविलें ।
पुष्पवृष्टि गगनांतुनि गळती । ब्रह्मानन्द;-मग्न जन होती ॥ १ ॥
नारी, वृंद:-वृंद मग निघती । सहज साज मग: करुनि धावती ॥
हाटक घट; ताटीं शुभ भरती । मंगल गात: भूपगृहिं शिरती ॥२॥
ओंवाळणी; आरत्या करती । पुन: पुन्हां शिशु;-चरणीं पडती ।
मागध-सूत;-बंदि-गण गायक । पावन गुण: गाती रघुनायक ॥३॥
सर्वप्रदान: सर्वहि करिती । स्वयें घेति जे ते न राखिती ।
मृगमेद-चंदन;-सडे शिंपिले । विखळें मार्ग; सकलही भरले ॥ ४ ॥

दो.—मंगलघोष घरोघरीं; अवतरले सुखकन्द ।
हर्षवन्त दिसती सकल; नगर,नारि-नर-वृंद ॥ १९४ ॥

आर्या— मंगलवाद्य घरोघर; वाजति जें प्रगट होति सुखकन्द ।
जिथें तिथें बहु हर्षित; दिसती सब नगर-नारि-नर-वृंद ॥ १९४ ॥

केकयकन्या, तशी सुमित्रा । दोघी प्रसवति; सुंदर पुत्रां ।
त्या सुख संपत्; समय समाजा । वर्णुं न शकति; गिरा अहिराजा ॥ १ ॥
पुरी अयोध्या; कशी भासली । प्रभू-दर्शना; निशाच आली ।
भानु बघुनि: संकोच पावली । तद्पि जणूं; संध्या मग झाली ॥ २ ॥
अगरु-धूप जणुं, बहु कालिमा । अबीर उडतो: जणूं लालिमा ।
मंदिर-मणि:-समूह जणुं तारा । नृप-गृह-कळसचि; इन्दु उदारा ॥ ३ ॥
वेद घोष मृदु; जो नृप भुवनीं । जणुं खगमुखर; समय जाणोनी ।
कौतुक बघुनी; पतंग भुलला । एक मास त्या; जात न कळला ॥ ४ ॥

दो.—मास दिनांचा दिवस तो; मर्म न समजे काइ ।
रथ समेत रवि थांबला: निशा कशी तरि होइ ॥ १९५ ॥

आर्या— मास-दिनांचा दिन तो: झाला परि मर्म कोणिना उमजे ।
रथ सहिताचि रवि थांबे; कशापरी मग निशा तरी उपजे ॥१९५॥

हें रहस्य नच; कोणी जाणे । दिनमणि निघे; करित. गुणगानें ।
उत्सव बघुनि; देव मुनि नाग । घरा फिरति; वर्णित निज भाग ॥१॥
आणिक एक; वदूं निज चोरी । श्रुणु गिरिजे! तव;मति दृढ भारी ।
काकभुशुण्डि:सहित मी फिरलों । मनुज रूप; म्हणुनी ना कळलो ॥ २ ॥

१ थव्या थव्यानीं, २ कस्तुरी, ३ कैकयी, ४ शेष, ५ गुलाल, ६ सूर्य,

परमानन्द; प्रेम-सुख-फुलला। मग्न-मनें मीं; मार्गी भुलला।
हें शुभ चरित; तयासी उमजे। रघुवर कृपा; जयावरि उपजे ॥३॥
त्या समयीं जो; जैसा आला। दिलें नृपें; इच्छित तें त्याला।
गज-रथ-तुरग; हेम-गो-हीरे। दिलीं नृपें; नानाविध चीरें[1] ॥४॥

दो.—सकलांचे तोषवि हृदय; जो तो देइ अशीसें[2]।
चिर जीवोत हि सकल सुत; दास तुलसिचे; ईश ॥ १९६ ॥

आर्या— परितोषवि सकलांचे; चित्ता; ते सर्व देति आशीस।
चिरंजीव सुत होती; चारी ही दास तुलसिचे ईश ॥ १९६ ॥

कांहीं दिन; गेले या रीती। जातां कळे; दिवस ना राती।
नामकरण; अवसर जाणोनी। बोलाविले; नृपें मुनि ज्ञानी ॥ १ ॥
पूजा करूनि; भूपति वदले। ठेवा नांव; मुने मनिं रुचलें।
अनेक अनुपम; नामें भूपा। वदतो मी निज;-मति-अनुरूपा ॥ २ ॥
जो आनंद; सिंधु सुखरासी। त्रिलोक पावे; लवें सुखासी।
तो सुख-धाम; नाम या राम। अखिल जनां, दायक विश्राम ॥ ३ ॥
विश्वभरण; पोषण जो करितो। त्याचें नाम, भरत हें धरितो।
ज्याचें स्मरण; रिपूंतें नाशी। रिपुघ्नें[3] नामें; वेद प्रकाशी ॥ ४ ॥

दो.—लक्षण धाम राम प्रिय; सर्व जगा आधार।
गुरु वसिष्ठ त्या ठेविती; लक्ष्मण नाम उदार ॥ १९७ ॥

आर्या— लक्षण-धाम प्रिय जो; श्रीरामा, सर्व-विश्व-आधार।
ठेवी वसिष्ठ गुरु त्या; लक्ष्मण हें नांव सार्थ अति सार ॥ १९७ ॥

सुविचारें गुरु; ठेवी नाम। नृप तव सुत हे; वेद-ललाम।
मुनि-धन; भक्त,-जीव; शिव-प्राण; । शिशु-लीला; तव;--हितार्थे जाण ॥१॥
बालपणिंच निज;हित-पति[4] जाणुनि। लक्ष्मण राम;--चरणिं रति मानी।
भरत शत्रु-हन; दोन्ही भाई। सेवक-प्रभु-सम; प्रीती होई ॥ २ ॥
श्याम-गौर; सुन्दर युग[5] जोडी। निरखुनि रूप; जननि तृण तोडी[6]।
चांग्रे, रूप;--शील-गुण-धाम। तदपि अधिक; सुख-सागर राम ॥३॥
हृदयिं अनुग्रह; इन्दु[7] प्रकाशे। सूचित किरण; मनोहर हासें।
अंकावरि कधिं; कधिं झोपाळां। जननि वदे,छकुल्या! प्रिय! बाळा! ॥४॥

१ वस्त्रे, २ आशीर्वाद, ३ शत्रुघ्न, ४ हितकारक स्वामी, ५ दोन, ६ दृष्ट काढीत असे, ७ चंद्र.

दो.—व्यापक ब्रह्म निरंजन; निर्गुण बिगत बिनोद।
तो अज भक्ति प्रेमवश मातांकीं दे मोद ॥ १९८ ॥

आर्या— व्यापी ब्रह्म निरंजन; निर्गुण जो, गतविनोद जो स्ववश।
कौसल्या उत्संगीं;! भक्ति प्रेमासि शुद्ध, अज विवश ॥ १९८॥

इतिश्री बालकाण्डे पुत्रकामेष्ट्यादि श्रीरामादिजन्मकथा
वर्णनं नाम द्वाविंशोऽध्यायः

अध्याय २३ वा

कामकोटिसम; श्याम शरीर। नीलकंज; वारिद गंभीर।
अरुण चरण; पंकज नख जोती। कमल-दलीं: जडलीं जणुं मोतीं ॥१॥
रेख, कुलिश; ध्वज, अंकुश तळपे। श्रवुनि नुपुर-रव; मुनिमन हरपे।
कटि किंकिणि; रेखात्रय उदरा। अनुभवि जाणे; नाभि गभीरा ॥२॥
विशाल भुज; गुन-भूषण भारी। हृदयिं वाघनख; शोभाकारी।
उरिं मणिहार: पदक ही शोभे। विप्रचरण; दिसतां मन लोभे ॥३॥
कंबुकण्ठ, हनुवटि; अति सुंदर। आनन अगणित;-मदन-रम्य-तर।
दो, दो दन्त: लाल अति अधर। नासा, तिलक न; वदवे पार ॥४॥
सुंदर श्रवण; सुचारु कपोल। प्रिय अति मधुर; तोतरे बोल।
चिक्कण कच: काळे किति कुरळे!। बहुत रचुनि; मातेनें सजले ॥५॥
पीत झगा: तनुवरी घातला। रांगत धावे; प्रिय मज गमला।
वर्णुं न शकति: रूप श्रुति शेषहि। जाणे, जो: देखे स्वप्नींही ॥ ६ ॥

दो.—सुख संदोह मोहपर; ज्ञान-गिरा-गोतीत।
दम्पति-परम-प्रेम-वश: करि; शिशु-चरित; पुनीत ॥१९९॥

आर्या— सुखकन्द हि मोहापर; तैसा जो ज्ञान-वाङ्-मनोतीत।
दंपति-परम-प्रेमा-वश करितो; बालचरित सुपुनीत ॥१९९॥

---

१ मातेच्या मांडीवर, २ अजन्मा, ३ मेघ, ४ वज्र, ५ कमरेचा करगोटा, ६ शंख, ७ नाक, ८ कान, ९ तुळतुळीत, १० केश.

यापरि राम, जगतपितृमाता । कोसलपुर;-जीवां सुखदाता ।
जो रघुनाथ;-चरणिं रति मानी । प्रगट तयाचें; भाग्य भवानी ॥ १ ॥
रघुपति-विमुख; यत्न करि कोडी । कवण शक्त भव;-बंधन, तोडी ।
जीव चराचर; जी वश करते । ती माया; प्रभुला बहु डरते ॥ २ ॥
भृकुटि विलासें; नाचवि तिजला । कोण भजावा, सांडुनि प्रभुला ? ।
मनवचकर्में: त्यजुनि चतुरता । करी कृपा; रघुराजा, भजतां ॥ ३ ॥
यापरि शिशु,-लीला प्रभु करिती । कोसलपुरी; - जना सुखवीती ।
कधिं उत्संगीं घेउनि डोलवि । ठेवुनि कधीं; पाळण्यां हालवि ॥ ४ ॥

दो.—प्रेम मग्न कौसल्या; निशिदिन जाति न ज्ञान ।
सुत स्नेहें माता वश; बालचरित करि गान ॥ २०० ॥

आर्या प्रेममग्न कौसल्या, निशिदिन जाता नसे तिला ज्ञान ।
पुत्र स्नेहें-माता; प्रेमानें बाल-चरित करि गान ॥ २०० ॥

एकवार; जननिनें न्हाणिला । शृंगारुनि; पाळणां निजविला ।
निजकुल इष्ट;-देव भगवाना । पूजेलागीं केलें स्नाना ॥ १ ॥
पूजुनियां; नैवेद्य समर्पी । पाक-गृहीं मग; पदासि अर्पी ।
फिरुनि आली; देवघराला । नैवेद्या, सुत; खातां दिसला ॥ २ ॥
सभीत गेली; पर्यंकासी । निजलेला; पाही बाळासी ।
पुन्हां दिसे भोजन करितांही । हृदयिं कंप मनिं, धीर न राही ॥ ३ ॥
इथें तिथें युग बालक पाही । मति-भ्रम मम; कीं दुसरें कांहीं ।
बघुनि जननिचें; मन घाबरलें । सस्मित मधुर, प्रभू मग हसले ॥ ४ ॥

दो. - दाखविलें मातेसि निज; अद्भुत रूप अखंड ।
रोमिं रोमिं त्या लागलीं; कोटि कोटि ब्रह्मांड ॥ २०१ ॥

आर्या — दाखविलें मातेसी; अति अद्भुत निज अखंड रूपातें ।
रोमि रोमि दिसती कीं; ब्रह्मांडे कोटि कोटि ती मातें ॥ २०१ ॥

अगणित रवि शशि; शिव चतुरानन । बहु गिरिसरित; सिंधु-भू कानन ।
स्वभाव-काल: कर्म गुणज्ञानां । बघे विविध जें; कधीं न कानां ॥१॥
दिसली माया; बहुविध गाढी । सभीत दिसली; करयुग जोडी ।
जीव पाहिले: नाचवि ज्यांसी । दिसली भक्ति; सोडवी त्यांसी ॥२॥

१ समर्थ, २ मांडीवर, ३ झोंपाळ्याजवळ, पाळण्याजवळ.

तनु पुलकित, मुखिं; शब्द न आला । नयन मिटुनि पदिं; नमवि शिराला ।
विस्मित बघुनी; माता भारी । पुन्हा होति; शिशुरूप खरारी ॥३॥
स्तुती न करवे; भयचि वाटलें । जगत्पिता मी; पुत्र समजलें ।
राम जननिला; बहु समजावी । अम्ब ! कथा कोणा न वदावी ॥४॥

दो.—पुनः पुन्हां कौसल्या; विनति करी, कर जोडि ।
लागो पुन्हां कधीं न मज; प्रभु तव माया थोडि ॥ २०२ ॥

आर्या—पुनः पुन्हां कौसल्या; विनतीते करितसे; करां जोडी ।
लागो कधीं न पुनरपि; माया तव घोर राम मज थोडी ॥ २०२ ॥

शिशुचरिता; रामें बहु केलें । दासां अति; आनंदा दिधलें ।
कांहि काळ: जातां चौभाई । मोठे होति; जनां सुखदाई ॥ १ ॥
गुरुनें चूडा;- कर्म करावलें । विपुल दक्षिणा; विप्र पावले ।
परम मनोहर; चरित अपार । करित फिरति; चारी सुकुमार ॥ २ ॥
तनुमनवचन; अगोचर जोही । दशरथ अजिरिं[1]; फिरे प्रभु तोही ।
भोजनासि: बोलावी राजा । त्यजुनि येति ना; बाल समाजा ॥३॥
कौसल्या जैं; धरण्या धावे । ठुमुक ठुमुक मग; पळूनि जावें ।
निगम अंत; शिव पार न पावे । तया धराया; माता धावे ॥ ४ ॥
धूसर धूळि;-भरित तनु येती । हसुनि भूप; मांडीवरि घेती ॥५॥

दो.—भोजन करितां चपल मती; चुकवोनी सर्वास ।
किंचाळत जाती पळुनी; दध्योदन तोंडास ॥ २०३ ॥

आर्या— भोजन करतां करतां; चपळमती चुकवुनीच सर्वांसी ।
किंचाळत पळती मग; दध्योदन लागलेंचि तोंडासी ॥ २०३ ॥

बालचरित; अति सरल रम्यतर । शेषादिक; गाती श्रुति शंकर ।
यांत जयांचें; चित्त न रमलें । त्या लोकां; विधिनें वंचियलें ॥१॥
यदा कुमार; होति ते भ्राता । उपनय[2] करिति; तात-गुरुमाता ।
विद्या पढण्या; गुरु गृहिं गेले । अल्पकाळिं सब; विद्या शिकले ॥२॥
ज्याचे सहज; श्वास, श्रुति चारी । तो हरि पढे !; सुकौतुक भारी ।
विद्या-विनय-; निपुण गुण-शीलां । रुचती खेळ; सकल नृपलीला ॥३॥
करगत चाप; बाण अति शोभे । रूपा बघुनि; चराचर लोभे ।
ज्या वीथीं; विचरति चौघेही । थकित सकल अति; नर नारीही ॥४॥

---

१ आंगणांत, २ उपनयन, मुंज.

दो.—कोसल पुरवासी नर; नारि वृद्ध वा बाल।
प्राणाहुनि वाटती प्रिय; सर्वां राम कृपाल ॥ २०४ ॥

आर्या— कोसल पुरवासी जन; नर नारी; वृद्ध तरुण वा बाळ।
प्रिय वाटे प्राणांहुनि; सर्वांसीं राम जो अति कृपाळ ॥ २०४ ॥

बंधु, सखे; बोलावुनि घेती। नित्य वना; मृगयेतें जाती।
मारी मृग, मनिं; पावन भावी। प्रति दिन आणुनि; नृपासि दावी ॥१॥
राम शरें, जे जे, मृग वधिले। तनू त्यजुनि, सुर;- लोकीं वसले।
अनुज सख्यांसह; भोजन करिती। पिता-जननि;-आज्ञा अनुसरिती ॥२॥
पुरजन जेणें, मिळे सुखाला। कृपाळु; तैशा; करिती लीला।
श्रुति पुराण; सुमंन ऐकावीं। निज अनुजांसीं; मग सांगावीं ॥३॥
उषःकाळिं: उठती रघुनाथ। जननि, तात;-गुरुनां नमि माथ।
घेउनि आज्ञा; करि पुर-काजा। चरित बघुनि मनिं; हर्षित राजा ॥४॥

दो.—व्यापक अकल अनीह अज; निर्गुण नाम न रूप।
भक्तां कारण विविध विध; लीला करी अमूप ॥२०५॥

आर्या— व्यापक निष्कल अज जो; अनीह निर्गुण अरूप, ना नाम।
भक्तांस्तव तो श्रीहरि: लीला नाना विधी करी परम ॥ २०५ ॥

॥ इति श्रीबालकाण्डे भगवतो बाललीलावर्णननाम त्रयोविंशोऽध्यायः ॥

अध्याय २४ वा.

बालचरित हें; सादर कथिलें। सर्वहि चरिता; ऐका पुढिले।
विश्वामित्र; महामुनि ज्ञानी। वसे शुभाश्रम; जाणुनि विपिनीं ॥१॥
योगयज्ञ जप; मुनि तिथ करती। खल, मारीच; सुबाहुसि डरती।
बघुनी यज्ञ; निशाचर धावति। देति उपद्रव; मुनि दुख पावति ॥२॥
गाधितनय-मन; चिंताव्यापी। हरिविण मरति न; निशिचर पापी।
मग मुनिवर मनिं; करी विचारा। प्रभु अवतीर्ण; हरण महिभारा ॥३॥

याचि मिसें मुख; आउनि पाहिन। विनति करुनि गुण; बंधू आणिन।
ज्ञान विराग; सकल-गुण-अयना। प्रभुला पाहिन; भरुनि नयनां ॥४॥

दो.—बहुपरि करित मनोरथ; जाण्या नलगे वार।
करुनि मज्जना शरयु जळीं; प्रविशे नृप दरबार ॥ २०६ ॥

आर्या— बहुविध करित मनोरथ; येण्याते लागला न तरि वार।
शरयू-स्नाना करुनी; मुनि सत्वर येति भूप-दरबार ॥ २०६ ॥

मुनि आगमन; कळे जैं, राजा। भेटे घेउनि; विप्र समाजा।
दण्डवतें; मुनिला सन्मानी। आणुनि बसवी; स्वयें निजासनिं ॥१॥
चरणां धुउनि; करी विधि-पूजा। मजसम धन्य: आज नहि दूजा।
विविध परी; भोजन करवीलें। मुनिवर हृदयीं; हर्ष पावले ॥२॥
मग सुत चारी; चरणिं घातले। राम बघुनि मुनि; भान विसरले।
प्रेममग्न, बघतां मुख-शोभा। चकोर जणु, राकाशशि लोभा ॥३॥
हर्षित-मन नृप; मुनितें बोले। अशा कृपेसी; कधीं न केलें।
कवण हेतु; येणें मुनिराया। विलंब नाहीं; कार्य कराया ॥४॥
मजला असुर,-समूह सतावी। कांहिं याचना तुजसि करावी।
अनुज समेत; देइ रघुनाथा। वधुनि राक्षसां, करी सनाथा ॥५॥

दो.—नृपा देइ मन, हर्षित; त्यजी मोह अज्ञान।
धर्म, सुयश नृप, तुजप्रती: यांचे बहु कल्याण ॥ २०७ ॥

आर्या— हर्षित चित्त देई, नृपते! मोहासि सांडि अज्ञान।
धर्म सुयश तुज लाभे; याचे होईल अनन्त कल्याण ॥ २०७ ॥

नृपें ऐकतां, अप्रिय उक्ती। हृदय-कंप, हरली मुखकान्ती।
वृद्धपणीं सुत-लाभ जाहला। विप्र विचारुनि: वचन न वदलां ॥१॥
मागा धेनु, भूमि धन-कोशां। देउं सर्वही: आज सहर्षा।
कांहीं प्रिय; प्राणाहुनि नाहीं। तेही देऊं; क्षणांत पाहीं ॥२॥
सर्वचि सुत मज: समान प्राणां। रामा देणें: मुने घडेना।
कुठें निशाचर; घोर कठोर। परम रम्य सुत: कुठें किशोर ॥३॥
मुनि परिसुनी; प्रेमरस वाणी। बहु हर्षातें; मनांत मानी।
वसिष्ठ तंव बहु-विध समजावी। भूप-संशयां; पूर्ण घालवी ॥४॥

१ स्थानाला, निघीला, २ विधियुक्त पूजा, ३ पूर्णचंद्र.

तनय उभय, मग; सादर अपवी । हृदयिं धरुनि; नानाविध शिकवी ।
माझे प्राण; नाथ ! सुत दोन्ही । पिता मुनीं तुम्हि; दुजा न कोणी ॥५॥

दो.—सोंपवि भूप ऋषीस सुत; देइ बहुत आशीस ।
गेले जननी भुवनिं प्रभू; निघति नमुनि पदिं शीस ॥२०८ (क)

सो.— पुरुषसिंह युग वीर; सुखें जाति मुनिभयहरण ।
कृपासिंधु मति धीर; अखिल विश्व-कारण-करण ॥ २०८ (ख)

आर्या— सोंपवि भूप ऋषीतें; सुत दोन्ही देइ बहुत आशीस ।
गेले जननी भुवनीं; प्रभु निघती नमुनि मातृपदिं शीस ॥ २०८ (क)

आर्या— पुरुषसिंह ते दोन्ही; वीर सुखें निघति मुनिभयाहरण ।
कृपासिंधु मति धीर हि; अखिलाचि या विश्वकारणा-करण ॥ २०८ (ख)

अरुण-नयन, उर;-बाहु विशाल । नील-जलज तनुः शाम तमाल ।
कटिं पट पीतः कसित वर भाता । रुचिर-चाप; सायक घे हाता ॥१॥
श्याम गौर; सुंदर युग भ्राते । महानिधीः विश्वामित्रातें ।
प्रभु ब्रह्मण्य,-देव मी जाणें । सोडि जनकः माझिया कृपेनें ॥२॥
पार्थि जातां; ताडका दाविली । शब्द ऐकुनीः कोपें आली ।
एकया बाणेंः प्राणां हरलें । दीन बघुनिः निज पद तिज दिधलें॥३॥
निजनाथा मुनि जाणे सर्वा । विद्या निधितें; अर्पी विद्या ।
लागेना मुळिं; क्षुधा पिपासा । अतुलित तनु,-बल, तेज प्रकाशा ॥४॥

दो.—सर्व आयुधें अर्पुनीः निजाश्रमीं प्रभु आणि ।
कंद मूल फल भोजना; दे प्रेमें हित मानि ॥ २०९ ॥

आर्या— सकलास्त्राते अर्पुनि; निजाश्रमासी प्रभूसि मुनि आणी ।
फळ कंद मूळ भोजन; भक्तीने देइ, परम हित मानी ॥ २०९ ॥

प्रातर्मुनिसि; वदति रघुराय । यज्ञ करावा; होउनि निर्भय ।
ऋषी यज्ञ मगः करूं लागती । रक्षणार्थ प्रभुः उभे राहती ॥१॥
मारिच असुर; ऐकुनि क्रोधावे । सेनेसह, मुनि;-द्रोही धावे ।
फलविण बाण; राम त्या मारी । शत योजन तो उडला दूरी ॥२॥
पावक बाणें; सुबाहु मारी । निशिचर कटक; अनुज संहारी ।
असुर मारि; द्विज-निर्भय-कारी । स्तवन देव मुनि; करिती भारी ॥३॥

१ विश्वाच्या कारणाचें कारण. २ कमळ. ३ कसेलेलें. ४ तत्क्षणीं. ५ टोंक नसलेला.

काहीं दिवस, तिथें रघुराया। करी वसुनि: विश्रांति दया या।
भक्तोत्सव बहु; कथा पुराणें। विप्र वदति: यद्यपि प्रभु जाणे ॥४॥
तंव मुनि सादर; वदुनि सुभाषी। जाउनि लीला: एक पहावी।
धनु-मखा; ऐकुनि रघुनाथ। जाती हर्षित, मुनिचे सांथ ॥५॥
आश्रम एक: दिसे मार्गां हीं। जिथें जीव, खग: मृगादि नाहीं।
शिला बघुनि; मुनिराया पुसिलें। सकल सविस्तर; मुनी बोलले ॥६॥

दो.—गौतमनारी शापवश: धरी उपॅल-तनु धीर।
चरण-कमल-रज वांछिते: कृपा करा रघुवीर ॥ २१० ॥

आर्या — गौतमनारी, शापा: वश होउनि उपल-देह धरि, धीरा !।
चरण-कमल; रज वांछी; करुनि कृपा उद्धरावि रघुवीरा ॥ २१० ॥

छंद. स्पर्शत पद पावन; शोक विनाशन; प्रगट होइ तप पुंज जशी।
पाहुनि रघुनायक; जनसुखदायक; सन्मुख उभि कर जोडि कशी ॥
अति प्रेम अधीरा; पुलकशरीरा; वदनि येइना वचन बळे।
बहु भाग्य उगवलें; चरणां धरिलें; युगल नयनिं जळधार गळे ॥१॥
मनिं धैर्या धरिलें; प्रभु ओळखलें; रामकृपे भक्ती होतां।
अति निर्मलवाणीं; स्तवनें वानी; ज्ञानगम्य जय रघुनाथा।
मी नारि अपावन; प्रभु जग-पावन; रावण-रिपु जनसुखदाई।
राजीव विलोचन; भवभयमोचन; पाहि शरण मीं प्रभु! पाईं ॥२॥
मुनि, शापा दिधलें; अनुपम केलें; परम अनुग्रह मनि-माने।
दिसले भर लोचन; हरिभवमोचन; हाचि लाभ शंकर जाणे।
विनती प्रभु माझी; अल्पमतीची; नाथ न मागें वर आना।
पद-कमल-परागा; रस-अनुरागा; मम मन-मधुप करो पाना ॥३॥
ज्या पदिं सुर-सरिता; परमपुनीता; प्रगट होइ शिव शिरीं धरी।
ते हे पद पंकज; ज्यां पूजी अज ! मम शिरि धरा कृपाल हरी।
बहु स्तवी या परी; गौतमनारी; पुन: पुन्हां हरिचरण धरी।
जो मनिं अति भावे; तो वर पावे; पति लोका गेलीच खरी ॥४॥

---

१ मनुष्य-वशाला, २ बरोबर, ३ पाषाण, ४ ज्ञानाने प्राप्त होणार, ५ सुनोने.